म. ग्रं. सं. ठाणें

# ५ कवि

## मं. वि. राजाध्यक्ष

REFBK-0012728

कर्नाटक प्रकाशन संस्था

৭৫৫২

৬৩৯৬০
২৬।২।৬৭

# पांच कवि

केशवसुत, नारायण वामन टिळक,
विनायक, गोविंदाग्रज, बालकवि
ह्यांच्या निवडक कवितांचा संग्रह

संपादक

**मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष**

कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २

मूल्य तीन रुपये

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९४६

पुनर्मुद्रण : १९४७, १९५२, १९५६, १९६२

मुद्रक :

वा. ग. ढवळे

कर्नाटक मुद्रणालय

चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :

वा. ग. ढवळे

कर्नाटक प्रकाशन संस्था

चिराबाजार, मुंबई २

# पांच
# कवि

REFBK-0012728

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम १२३५७० वि: काव्य
क्रमांक १९२९ नों: दि: २८।३।६७

१२७२८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

नव्या उमेदी, नवे जिव्हाळे, नव्या मराठ्यांचे;
नवे भरोंसे, नवें कवन हें नव्या उमाळ्याचें.

—'बी'

प्रस्तावना ... ... ... ७-३८

केशवसुत .... .... .... ४१-७५

१. मजुरावर उपासमारीची पाळी ४९
२. कवितेचें प्रयोजन ५०
३. पुष्पाप्रत ५२
४. शब्दांनो ! मागुते या ! ५४
५. तुतारी ५४
६. झपूर्झा ६०
७. स्फूर्ति ६२
८. नवा शिपाई ६४
९. नैर्ऋत्येकडला वारा ६५
१०. सतारीचे बोल ६९
११. आम्ही कोण ? ७२
१२. हरपलें श्रेय ७३

नारायण वामन टिळक .... .... ७६-१०४

१. वनवासी फूल ८१
२. माझी भार्या ८५
३. अगाध कांहीं तरी ९१
४. कुणास्तव कुणीतरी ९२
५. गुलाब ९४
६. केवढें हें क्रौर्य ९५
७. पांखरा ! येशिल का परतून ? ९७
८. आंधळा झालों तर– ९७
९. रणशिंग ९९
१०. ब्राह्मण किंवा महार १०१
११. पुरें जाणतों मीच माझें बल! १०४

विनायक .... .... .... १०५-१३२

१. महाराष्ट्र–लक्ष्मी १०९
२. हतभागिनी ११०
३. यापुढें १११
४. संयोगिता ११३
५. ध्यास तो भास ११७
६. दसरा १२५
७. प्रीति निमाली तर– १२७
८. सुवास १२७
९. स्त्री आणि पुरुष १३०
१०. नदी आणि कवि १३१

गोविंदाग्रज .... .... .... १३३-१६१

१. अनामिकाचे अभंग १३८
२. "राजहंस माझा निजला !" १४१
३. दसरा १४६
४. विरामचिन्हें १५१
५. ती कोण ? १५२
६. प्रेम आणि मरण १५३
७. कवि आणि कैदी १५७
८. एक समस्या १५९
९. कृष्णाकांठीं कुंडल १६१

## बालकवि .... .... .... १६२–१९१


| | | | |
|---|---|---|---|
| १. अरुण | १६६ | ८. पांखरास | १८१ |
| २. निर्झरास | १७० | ९. बाळें तीं खेळत होतीं | १८३ |
| ३. फुलराणी | १७२ | १०. धर्मवीर | १८५ |
| ४. तारकांचें गाणें | १७५ | ११. प्रेमलेख | १८९ |
| ५. संध्यातारक | १७६ | १२. औदुंबर | १८९ |
| ६. श्रावणमास | १७७ | १३. कांहीं अपूर्ण गीतें | १९० |
| ७. बाल-विहग | १७८ | | |


## टीपा .... .... .... १९३–२२८

# प्रस्तावना

१८८५ सालीं हिंदी राजकारणाप्रमाणें मराठी साहित्यांतहि स्वातंत्र्योन्मुख नव्या युगाचा आरंभ झाला. त्याचें नेतृत्व ज्या केशवसुतांकडे त्यांची पहिली कविता त्या वर्षीची. इतिहासाच्या सोयीसाठीं कोठल्याहि क्रांतीची एखाद्या निश्चित वर्षाशीं सांगड् घालण्यांत आली तरी ती क्रांति पंचांगाच्या परवानगीसाठीं अडून वसली होती असें समजण्याचें कारण नाही. तिचीं पूर्वचिन्हें कमी-अधिक स्पष्ट असतात. जीर्णतेची उबग येऊं लागल्यावर विरोधाची भित्री कुजबूज सुरू होते; असंतोषाचे कढ वाढूं लागतात आणि मग बंडाचा बावटा कोण उभारणार इतकाच प्रश्न उरतो. साठ वर्षांपूर्वी तें केशवसुतांनी केलें. "उचलुनि म्हणुनि निशाण, साद घालितों." त्यांची साद ऐकून थरारलेल्या कवींनी "बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे" उडवून दिली आणि मराठी साहित्यांत नवजीवन ओतलें. आघाडीवरच्या अशा पांच कवींच्या निवडक कवितांचा हा संग्रह आहे. १८८५ ते १९२० हा ह्यांचा काळ. तो संपतांच श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर ह्यांनी "आधुनिक कविपंचक' ह्या शीर्षकाखालीं ह्यांच्या काव्यावर अभ्यासपूर्ण निबंध लिहिले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या 'संस्कृत कविपंचका'शीं तुलना होण्याइतकी प्रतिष्ठा ह्या नव्या कवींत आहे हें मार्मिकपणें सुचविलें. नव्याची अवहेलना रूढिप्रिय महाराष्ट्र कदाचित् इतरांपेक्षां अधिक करतो. ह्यातींत ह्या कवींची एकंदरीने उपेक्षा झाली. पण पुढील पिढ्यांनी ह्या ऋणाची पुरी जाणीव दाखविली आहे. केशवसुतांसारख्या एखाद्या कवीबाबत ती तुलनेने तोकडी पडली किंवा रंगभूमीवरील यशाच्या झळाळीमुळें गोविंदाग्रजांबाबत ती कांही काळ फाजील वाढून तारतम्य सुटलें असलें तरी साधारणतः महाराष्ट्रानें आपल्या अन्यायाचें परिमार्जन केलें आहे.

साहित्याचा इतिहास हा बंडांचा इतिहास असतो. नवनव्या उन्मेषांची मातबरी जेथें फार अशा क्षेत्रांत रूढीचा जाच लवकर जाणवतो. काल ज्याला नवें म्हणून झिडकारलें त्यालाच आज जुनें म्हणून कवटाळणारे रूढिग्रस्त बहुसंख्य असतात; व साहित्याच्या जिवंत प्रवाहाला बांध घालण्याची भाषा ते बोलतात. पण असा कोणताच बांध अजून टिकला नाही. मराठी साहित्याच्या इतिहासांतहि हाच प्रकार आढळतो. किंबहुना, त्याची जन्मकथाच बंडाची आहे. "या वड्या बंडवाल्यांत ज्ञानेश्वर माना पहिला." प्रौढ काव्यरचनेला मराठी भाषा 'अशिष्ट' मानणाऱ्या पंडितांची त्यांनी कदर बाळगली नाही व "अमृतातेंही पैजा" जिंकण्याचा बेडर संकल्प

मराठीकडून पार पाडविला. मराठीला नवीन सामर्थ्य प्राप्त झालें व तिचें साहित्य येथून वाढीस लागलें. कांही काळ मागें हटलेली ही संस्कृत भाषेची सावली पुढें वेळोवेळीं मराठीवर आक्रमण करू पाहत होती. ती गडद झाली कीं आपल्या साहित्याचीं 'प्रकाशाचीं दारें' बुजून जाऊन तें खुरटू लागण्याची भीति उभी राहात असे. पण हें खुरटणेंच भाषेला शोभादायक अशी शास्त्री-पंडितांची श्रद्धा. बहुजनांपासून दुरावलेला हा वर्ग नेहमीच मराठीच्या मुळावर येऊं पाहत होता. सुदैवाने समाजाच्या खालच्या थरांतून उभे राहिलेले तुकारामबुवा अथवा वरखालच्या ह्या सर्व थरांना उठावणी देणारे रामदासस्वामी असल्या संतकवींच्या कर्तृत्वामुळे मराठीचें मराठीपण टिकून राहिलें. जिवंत बोलीचा हा बाणा जतन करणारा आणखी एक वर्ग म्हणजे शाहिरांचा. वीररसाइतकाच ह्यांना शृंगाररस प्यारा. त्यांचे आश्रयदाते मुख्यत: खालच्या थरांतील. शिष्ट राहाणीच्या अनेक बुजगावण्यांशी तोंडओळख नसणाऱ्या त्या निकोप रसिकांचा आणि त्यांच्याशीं समरस होणाऱ्या शाहिरांचा शृंगार उघडा आणि थोडा भडक होता. मराठी स्वराज्याच्या उत्तर कालांत ह्या प्रवृत्तीची वाढ होत होती. त्याच वेळीं जातिबंधनें आणखी घट्ट होऊन थराथरांतील अंतर अधिक होऊं लागलें होतें. ह्या परकेपणामुळें शिष्ट साहित्याने शाहिरी काव्याला अस्पृश्याची पदवी दिली. पुराणांची सोवळी संगत सोडून हलक्यांसलक्यांसाठीं कवनें गाणारा आणि आपली काव्यशक्ति मळविणारा कवि छंदी-फंदी आणि उच्छृंखल वाटूं लागला. विशेषतः ब्रह्मकुलोत्पन्नाने त्या मार्गाला जाणें हें महत्पाप! मोरोपंतांनी रामजोश्याला लावण्या रचण्यापासून परावृत्त केलें म्हणे. साध्वी अहल्याबाई होळकर हिने अनंतफंदी ह्यास तोच उपदेश केला. मर्यादित आणि ओझरता कां होईना पण जो जीवनाचा स्पर्श काव्याला होत असे त्याची अशी नाकेबंदी सुरू झाली. पुढे स्वराज्याचा इमलाच कोसळून पडला आणि त्याच्या आसऱ्याने राहिलेली शाहिरी मुकी झाली. ह्या पडझडीचे खिन्न पडसाद एखाद्या परशुरामाच्या ओळींत ऐकू येतात. प्रभाकर आपलें रंगेल कलम अखेर मुंबई-ठाण्याच्या शेठ-सावकारांना विकून त्यांची उदमी कर्तबगारी गाऊं लागला. सनदी शिष्टांच्या उपेक्षेने सुकत चाललेला हा जिवंत काव्याचा झरा पारतंत्र्याच्या उन्हाळ्याने पुरा आटून गेला. उरला फक्त पंडितकवींचा संप्रदाय आणि संतकाव्याचा वारस. पहिल्याची थक्क करणारी कृत्रिमता व दुसऱ्याची ऐहिक अवस्थेसंबंधीं उदासीनता ह्यांनीच तत्कालीनांना कसलेंतरी सुस्त समाधान मिळवून दिलें असावें.

*** *** *

ह्यापुढील कांही वर्षांचा काल सुन्नपणाचा गेला. डोळ्यांपुढे हिरावून नेलेल्या वैभवाची आठवण सहजासहजीं भरून निघणें कठिण होतें. त्या विकलपणांत प्रतिकाराचा प्रश्नच नव्हता. ज्या नव्या संस्कृतीने कुरघोडी केली तिची सर्वच तऱ्हा न्यारी होती. हे जेते खरे, पण मराठी इतिहासाला परिचित असलेल्या जेत्यांहून ह्यांचें वळण वेगळें दिसलें. लूटमार अथवा कत्तल हा सनातन आचार त्यांनी पाळला नाहीच; उलट, आजपर्यंत जणू ईश्वरी प्रकोप म्हणून सहन केल्या जाणाऱ्या दंग्यांधोप्यांना त्यांनी पायबंद घातला व जुन्या अमदानींतील ढिल्या कारभारामुळें गांजलेल्यांना संरक्षण दिलें. आतां काशीयात्रेला काठीला सोनें बांधून निर्भय चित्ताने जावें असें कृतज्ञ लोक अचंब्याने म्हणू लागले. काळाच्या प्रभावाने पुढे काठीला बांधावयाला सोनेंच उरलें नाही तरी त्या दुव्यामागील भावना खरी होती. विषण्णतेचा पहिला भर ओसरल्यावर, स्वराज्याच्या सरत्या दिवसांतील अंदाधुंदी आणि नव्या राजवटींतील स्वास्थ्य ह्यांची प्रथम मनांत व नंतर जनांत तुलना होऊं लागली. ही नवी संस्कृति अनेक अंगांत पुढारलेली होती. हें नाकारण्याची प्रथा पुढे वाढीस लागली तरी तिच्यांत सत्यान्वेषणापेक्षां देशाभिमानच अधिक होता. इंग्रजांची शिस्तप्रियता, कारभारांतील नेटकेपणा, भौतिक शास्त्रांतील त्यांची गति आणि चौरस ज्ञानलालसा ह्यांची मोहिनी आपल्या लोकांवर पडली ह्यांत नवल नाही. इंग्रजांची सरशी सर्वांगीण ठरली. अंमल नीट बसत असतांनाच त्यांनी शाळा-कॉलेजें उघडून आपल्या कल्पने-प्रमाणें विद्याप्रसारास आरंभ केला. ' मुंबई विद्यापीठा 'ची स्थापना १८५७ मध्यें झाली व पदवीधरांची पहिली तुकडी आणखी तीन वर्षांनी बाहेर पडली; तरी कॉलेजें त्यापूर्वीं अनेक वर्षें चालू होतीं. त्यांपैकीं एक वैद्यकीचें व एक स्थापत्यशास्त्राचें. आरंभीं मिशनऱ्यांनी व नंतर धाडसी ' नेटिवां 'नी छापखाने मांडले. छापलेल्या मजकुराला प्रथम लोक कसे बुजत व तो ओवळा आहे ही समजूत कांही काळ किती दृढ होती ह्याची मनोरंजक माहिती श्री. अ. का. प्रियोळकर ह्यांच्या एका भाषणांत § आढळेल. पण हीं किल्मिषें दूर झाल्यावर त्या कलेच्या उदंड सामर्थ्याची जाणीव होऊन आपल्या लोकांनी मोकळ्या मनाने तिचा स्वीकार केला. नियतकालिकें निघू लागलीं. भाऊ महाजन व बाळशास्त्री जांभेकर ह्यांचें ' दर्पण ' हें साप्ताहिक १८३२ मध्यें निघालें. तें पहिलें मराठी नियतकालिक. छापील पुस्तकांचीहि संख्या वाढू लागली. ही नवीन विद्या व मुद्रणकला ह्यांचे मराठी जीवनावर, व म्हणून वाङ्मयावर, विस्तृत आणि खोल परिणाम झाले.

§ ' पंचारति ' पाहा.

एक महत्त्वाचा परिणाम असा कीं इंग्रजी संस्कृतीच्या ह्या पहिल्या ओळखीनें दिपून गेलेली ती सुशिक्षित पिढी तिचे गुण व आपलीं उणीं गाऊं लागली. साधारणतः इंग्रजी गुणांइतकींच आपलीं उणींही खरीं होतीं. इतकेंच कीं थोडें तारतम्य सुटून स्वदोषवर्णन गैरवाजवी झालें. पण हा दोष व्यक्तींचा नव्हे, तर परिस्थितीचा. त्यांचें स्वत्व नष्ट पावल्याची भाषा तेवढीच गैरवाजवी आहे. पहिली झळाळी हरपल्यावर स्वच्छ नजरेनें महाराष्ट्रानें आपला तोल सावरला. पुढे प्रतिक्रिया म्हणून उलट दिशेनें फाजील आत्मगौरवाकडे हा तोल झुकला ह्याचा उल्लेख येईलच.

आपण "इंग्लिशांचे पक्षपाती" आहों ह्या आक्षेपाचें निरसन तत्कालीन प्रसिद्ध विद्वान् विनायक कोंडदेव ओक ह्यांनी असें केलें: "कां कीं आठ दिवसांच्या उपाशी माणसास कोंड्याची भाकर अमृतासारखी वाटावी, त्याप्रमाणें मराठेशाहीच्या शेवटल्या दिवसांतल्या झोटिंग पादशाहीस, पेंढारास आणि क्रूरतेस लोक त्रासून गेले होते. त्यांस मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनसारख्याची कारकीर्द सुखावह वाटावी हें साहजिक होतें......साहेबानें अमकें एक काम वाईट केलें असें इ. स. १८६१-६२ पर्यंतच्या मराठी लेखांत कधींहि आढळावयाचें नाहीं."

इंग्रजी वाङ्मय आणि संस्कृति ह्यांच्याशीं परिचय झालेल्या ह्या नव्या पिढीला आपल्या समाजांतील दोष स्पष्ट दिसू लागले व अनेकांनी तसें उघड बोलून दाखविण्याचें धाडस केलें. जातिभेदानें समाजाचीं छकलें पडलीं होतीं. बालविवाहासारख्या रूढींची मगरमिठी जीवनांतील आनंद शोषून घेत होती. स्त्रियांची, विशेषतः विधवांची, अवस्था करुण झाली होती. ह्या नवशिक्षितांच्या वाचनांत येणाऱ्या इंग्रजी वाङ्मयांत चित्रित झालेली समाजस्थिति तुलनेनें फारच पुढारलेली होती. विशेषतः त्या शतकारंभींच्या इंग्रजी कवींची उद्दाम स्वातंत्र्यलालसा ह्या वाचकांत खळबळ उडवून न देती तरच आश्चर्य. समाजसुधारणेची ही तळमळ प्रामाणिक होती हें विसरू नये. नव्या शिक्षणानें दिलेली दृष्टि आणि असले ढोबळ दोष—डोळ्यांवर किती कातडें ओढून घेणार? दोषांवर गुणांचें सारवण करणारा हट्टी देशाभिमान लवकरच आला व सुधारक-दुर्धारकांचा झगडा त्याबरोबर सुरू झाला. त्याचा इतिहास येथें अप्रस्तुत आहे. पण ह्या बिनीच्या सुधारकांसंबंधीं वर्षानुवर्षें गैरसमज माजले होते हें केशवसुतांसारख्या कवीच्या अभ्यासाच्या दृष्टीनें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. (गं. बा. सरदार ह्यांच्या 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी' ह्या पुस्तकांत ह्याची चिकित्सा आढळेल.)

इंग्रजी राज्य ही दैवी कृपा असें मानणाऱ्या लोकहितवादी, रानडे, भांडारकर, इत्यादि सुधारकांच्या देशप्रेमासंबंधीं शंका घेण्याऐवजीं सामाजिक अन्यायांची त्यांना अधिक

चीड होती असें समजणें रास्त होईल. प्रार्थनासमाज, बंगालमधील ब्राह्मसमाज इत्यादि धर्मसुधारक, निर्गुणोपासनावादी, संस्थांविरुद्ध काहूर उठविणें सोपें होतें व तें उठविलें गेलें. ‘ परमहंस मंडळी ’ ही गुप्त सभा, गुपित फुटल्यावर, बरखास्त करावी लागली. ख्रिस्ती धर्माचा अभ्यास हा अशा संस्थांचें एक स्फूर्तिस्थान होता हें उघड आहे. मिशनऱ्यांचे ह्याबाबतचें कार्य अभ्यसनीय आहे. धर्मांतर हें त्यांचें साध्य असलें तरी त्यांनी केलेला ज्ञानप्रसार, रोगनिवारणाचें कार्य आणि अनाथसेवा हीं केवळ साधनें म्हणून वापरलीं नाहीत. आपल्या कर्मठ व सहानुभूतिशून्य समाजरचनेमुळें व विपम आर्थिक जीवनामुळें असंख्य निराधार वणवण फिरत होते; त्यांपैकीं अनेकांना माणुसकीची ऊब अशा ख्रिस्ती संस्थांतच मिळाली. दोन समाजांतल्या ह्या फरकाने कित्येक विचारवंतांच्या डोक्यांत काहूर उठविलें असेल. मामुली लालचीने धर्मांतर करणारा इसम विचारांत घेण्याचें कारण नाही. पण नारायण वामन टिळकांसारखा सत्प्रवृत्त पंडित ख्रिस्ती होतो हें केवळ मिशनऱ्यांचें कवटाळ नसावें. केशवसुतांचाहि तिकडे कल असावा अशी भीति त्यांच्या आप्तेष्टांस कांही काळ वाटत होती म्हणतात. महाराष्ट्रांतील अन्नाच्या दुष्काळाइतकाच आपुलकीचा दुष्काळहि धर्मांतराच्या साथीस जबाबदार धरिला पाहिजे. § नव्या कवितेला ह्या आपुलकीचा ओलावा आहे; मानवधर्माची तिला ओढ लागली आहे.

१८७० च्या सुमारास दिशा बदलू लागल्याचीं चिन्हें दिसतात. सत्तावन सालचें स्वातंत्र्ययुद्ध फसलें आणि पारतंत्र्याची पकड आणखी घट्ट झाली. ह्या घटनांनी बेचैन झालेलीं माणसें दुसऱ्या वाटा चांचपडूं लागलीं. चौफेर चढाई करणाऱ्या इंग्रजी संस्कृतीशी वेळींच मुकाबला न केल्यास ह्या देशाचें स्वत्वहरण होईल व तें कायमच्या गुलामींत खितपत पडेल ह्या विचाराने भारलेली देशाभिमानी मंडळी आतां हळूहळू आघाडीवर आली. परक्यांपुढें मान ताठ हवी, स्वाभिमानाचें कवच चढविल्याशिवाय ह्या लढ्यांत आपला टिकाव लागणार नाही, हें त्यांनी ओळखलें आणि आपल्या मताचा मिशनऱ्यांच्या चिकाटीने प्रसार केला. १८७४ मध्यें विष्णुशास्त्री चिपळूणकरांची ‘ निबंधमाला ’ सुरू झाली. लोकजागृतीस मासिक तोकडें पडतें म्हणून १८८१ मध्यें शास्त्रीबुवा, टिळक व आगरकर ह्यांनी ‘ केसरी ’

§ नव्या राजवटीने जुन्या गांवगाड्याला हादरा दिला व त्याला खिळखिळा केला; त्यांच्या आश्रयाने तोंवर गुजराण करणारा कुणबी आतां उघडा पडला; त्याला सावरून घेण्याइतका बंधुभाव आपल्या समाजांत नव्हता. त्याच्या ह्या घसरगुंडीची हकीकत श्री. त्रिंबक नारायण अत्रे ह्यांच्या ‘ गांवगाडा ’ ह्या पुस्तकांत आढळेल.

ह्या साप्ताहिकाची स्थापना केली. आगरकरांना त्यांतून पुढे अंग काढून घ्यावें लागलें. ह्या घटनेंतच महाराष्ट्राच्या जीवनांत उठलेल्या लढ्याचें सार आहे. ह्याच लढ्याच्या प्रतिध्वनींनी ह्या कविपंचकाची कांही कविता गजवजून गेली आहे.

लोकमान्य टिळक व विष्णुशास्त्री चिपळूणकर् हे नव्या शिक्षणपद्धतींतूनच बाहेर पडले; किंबहुना तिचा प्रसारहि त्यांनी केला. "वाघिणीचें दूध" पचवून नवीन रग आली, तिचा उपयोग तिचाच जबडा उघडून तिचे खरे दांत लोकांना दाखविण्यासाठीं व जमल्यास पाडण्यासाठींहि त्यांना करावयाचा होता. तो त्यांनी कांही अंशीं करून दाखविला हें निर्विवाद आणि अभिमानास्पदहि आहे. पण त्यांची बरीच रग भिन्न मतांच्या स्वकीयांचा पाणउतारा करण्यांत खर्ची पडली हेंहि खरें. आगरकरांची स्वातंत्र्यलालसा रेसभरहि कमी नसेल; पण त्यांच्या प्रामाणिक सुधारणावादामुळें त्यांना बदनाम करण्यांत आलें. 'लोकहितवादींविरुद्ध' वावटळ उठली. असे आणखी किती तरी अज्ञात मोहरे खर्ची करण्यांत आले असतील! 'आर्यसमाजा'चे संस्थापक दयानंद सरस्वती ह्यांच्यासंबंधीं विष्णुशास्त्र्यांनी लिहिलेले विषारी लेख व दयानंदांचा पुण्यांत झालेला अपमान विसरणें कठिण आहे. सुधारक आपले जे दोष दाखवितात ते दोष नसून गुणच आहेत असा पुकारा झाला. आपला धर्म, इतिहास, राहणी, हीं सर्व निर्दोष आणि इंग्रजांहून उच्च हें बहुजनसमाजास पटवून देणें सोपें होतें. अशा रीतीने महाराष्ट्रांत स्वातंत्र्याच्या चळवळीची कडव्या जीर्णोद्धारवादाशी अशुभ युति घडली. परिणामीं रूढीचें 'कीट' अधिकच चढलें, सामाजिक अन्यायांना तोंड फुटणें कठिण झालें आणि जुनीं दुःखें दमट अंधारांत कुढत–कण्हत राहिलीं. पण बाहेर उज्ज्वल परंपरेचा कोलाहल चालू होता! केशवसुतांच्या 'तुतारी'सारख्या कवितेंतील आवेश कडवट वाटला तरी ह्या सामाजिक पिछेहाटींत त्याची उपपत्ति लागेल. पुढे आणखी कांही कवींनीहि ह्या दंभावर हल्ला केला. दर्शनी सफेती दिली जाणारा हा समाज आंतून पोखरला होता.

लागती दुहीच्या आगी राष्ट्राच्या संसाराला
अति महामूर पुर येतो ढोंग्यांच्या पावित्र्याला;
खडखडाट उडवी जेव्हां कोरड्या विधींचा मेळा

—'वी'

बालकवींचा 'धर्मवीर', गडकऱ्यांचा 'दसरा', टिळकांचें 'रणशिंग' अथवा 'ब्राह्मण आणि महार' असल्या कवितांत केशवसुतांच्या 'तुतारी' व 'गोफण'–

प्रमाणें ह्या दुर्दैवी सामाजिक परिस्थितीकडे आपलें लक्ष्य वेधलें आहे. विनायक मात्र ह्या पंथाचा नाही. "पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ" हा त्याचा सूर, आणि तो सूर ह्या काळीं लोकप्रिय होता. आपलें 'पूर्व', आपला भूतकाळ, सुंदर असें सिद्ध केलें कीं भविष्यकाळाची चिंता नको, तो आपोआप सुंदर होईल अशी श्रद्धा फैलावत होती.

भूतकाळाला अशा रीतीने नवेंच महत्त्व प्राप्त झालें. त्याचें असेल–नसेल तें वैभव हुडकून काढण्याची विद्वानांत स्पर्धा लागली. कांही मिशनरी लेखक व इंग्रज इतिहासकार ह्यांनी आपल्या इतिहासावद्दल काढलेल्या अनुदार उद्गारांत अधिक इंधन मिळालें. ग्रँट डफने मराठ्यांवर शिंतोडे उडविले ते पुसून काढण्याच्या उद्योगाला प्रथम नीळकंठ जनार्दन कीर्तने लागले. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें हुडकण्यांत विश्वनाथ काशीनाथ राजवाडे आदि विद्वानांनी हिरीरीने आपलें आयुष्य खर्ची घातलें. कागद-पत्रांचे धुळीने भरलेले रुमाल सुटले; बखरींचा अभ्यास सुरू झाला; पोवाड्यांचीहि विचारपूस होऊ लागली. देशकार्यार्थ पूर्वजपूजेचा हा वन्हि चेतविण्यासाठीं शिवाजीउत्सव सुरु झाले. ह्यांतून मराठी स्वराज्याचा इतिहास आपल्या पायावर उभा केला जात होता. तो घासून-पुसून चकचकीत करण्याचें काम कांही लेखकांना पुरलें. स्वातंत्र्याच्या लढ्याचें प्रतिबिंब ह्या जुन्या लढ्यांत सुशिक्षित महाराष्ट्र पाहू लागला. नव्या वैऱ्यांनी मुस्कटदावी केलेली; तेव्हां, उपमान म्हणून, जुन्या वैऱ्यांचा वाङ्मयांत उद्धार सुरू झाला. हे जुने वैरी म्हणजे मुसलमान व त्यांच्याशी यशस्वी झुंज खेळून ज्यांनी स्वातंत्र्य मिळविलें आणि उपभोगलें ते मराठे, आणि जरा कमी प्रमाणांत रजपूत, हे स्फूर्तिस्थान झाले. 'हरहर महादेव'ला 'जय एकलिंगजी' ची साथ कथा-कादंबऱ्यांतून मिळू लागली. विनायकाच्या ऐतिहासिक कथाकाव्यांचे विषय हेच आहेत. हळूहळू राष्ट्रप्रेम ह्या विषयापुरतें मर्यादित होऊ लागलें; आणि कोटें-कोठें प्रतिबिंबभावाची जाणीव सुटली; हजारों अजाण वाचकांना रूपकाऐवजीं स्वभावोक्तीचा भास झाला. हिंदी राष्ट्राच्या दृष्टीने ह्याचे दुष्परिणाम त्या काळीं फार थोड्यांना उमगले.

> "ब्राह्मण नाहीं हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा
> तेच पतित कीं जे आंखडिति प्रदेश साकल्याचा"

–ही केशवसुतांची विशाल आणि दूर दृष्टि त्या वेळीं अपवादासारखी म्हणूनच टीकास्पद झाली.

राजकीय, आणि एका दृष्टीने उदात्त, कारणांसाठीं जुन्या इतिहासाला ही जी नवी जिल्हई दिली जात होती तिचा वाङ्मयाने उपयोग करून घेतल्याचा वर उल्लेख आलाच आहे. हरि नारायण आपट्यांच्या कांही कादंबऱ्यांना त्यांतून मसाला मिळाला. ऐतिहासिक कांदबऱ्यांची चटक वाचकाइतकीच लेखकाला लागली. शिवाजीच्या आयुष्यांत कथानकाची खाण सापडली; नंतर त्याच्या वंशजांचा वास काढीत कादंबरीकार हिंडू लागले. ह्यांतील बहुतेक कादंबऱ्यांतील इतिहास मुख्य सूत्राच्या आधारापुरताच होता; उरला फक्त अनैतिहासिक उजळा. कथानकांचे सांचे जमले व राजकीय जागृतीच्या मूळ हेतूइतकीच रोमहर्षणाची हौस पुरविण्यांत येऊ लागली. रोमांचाचा काव्याशीं निकट संबंध ध्यानांत घेतां, काव्यालाहि ह्या इतिहासप्रेमाचा स्पर्श झाला ह्यांत कांहीच नवल नाही. कल्पनारम्यतेला ( Romanticism ) त्यांत केवढा अवसर ! विनायकाप्रमाणें त्याला धर्माभिमानाची बैठकहि नको. गडकऱ्यांसारख्या उत्कट कल्पनाशक्तीच्या लेखकाला त्यांतून राजसंन्यासाचें नाटक रचतां आलें आणि 'कृष्णाकांठीं कुंडल' कल्पून त्याभोंवतीं भूल घालणारें वातावरण निर्माण करतां आलें. तेथें भाषेचा साजहि त्याच रंगाचा जमवून घेतला. जुनें शाहिरी आणि ऐतिहासिक वाङ्मय ह्यांच्या अभ्यासाने गडकऱ्यांनी तो लेखणीचा डौल कमविला. बालकवींवरहि त्याची मोहिनी पडली असावी असें त्यांच्या कांही अपूर्ण राहिलेल्या कवितांवरून वाटतें. हा जुन्याचा अभिमान नव्हे. कदाचित् भोंवतालच्या 'संसारांत राम' नाही हें असमाधान बुडवून टाकण्यास अशा कवींना ही शाहिरी रसगंगा हें एक शांतिस्थान लाभलें असावें. केशवसुत ह्या लढाऊ कवीला तसा विसर पडायला नको होता आणि त्याची तहानहि निराळी होती ! नारायण वामन टिळक आपल्या संसारांत इतक्या बालभावाने गुरफटले होते कीं त्याच मोठ्या समाधानांत त्यांना अंधुकपणें उमगलेल्या इतर गाऱ्हाण्यांचा निरास झाला !

गेल्या शतकांतील मराठी जीवनाचीं जीं कांही प्रमुख वळणें वर रेखाटलीं आहेत त्यांच्या संदर्भाने तत्कालीन मराठी काव्याचा अभ्यास सुकर व्हावा. येथेंहि जुन्या-नव्यांत स्पर्धा माजली आणि उपहास, अवहेलना इत्यादि नेहमींचे संस्कार नव्यांच्या वाट्याला आले. १८५५ पूर्वींहि काव्यप्रांतांत क्रांतीचा पुसट माग लागतो; आणि त्यानंतरहि अनेक वर्षें ही क्रांति थोडे रसिक व त्यांहून थोडे कवी ह्यांपुरतीच मर्यादित होती हें विसरूं नये.

# प्र स्ता व ना

१९१६ साली केशवसुतांच्या प्रथमावृत्तीला लिहिलेल्या प्रस्तावनेत रेव्हरंड टिळक म्हणतात : “ अर्वाचीन मराठी कवींचे तीन वर्ग करितां येतात. पहिला प्राचीन संस्कृत कवींच्या शाळेंतील कवी. दुसरा संस्कृत व इंग्रजी कवींच्या शाळेंतील कवी आणि तिसरा ह्या दोन्ही शाळांचा पूर्ण परिचय असूनहि ज्यांच्या काव्यस्फूर्तीने स्वतःच स्वतंत्र मार्ग काढिला असे कवी. ह्या ( तिसऱ्या ) वर्गांत येणारे आधुनिक मराठी कवी फारच थोडे आहेत आणि त्यामध्यें जग केशवसुतांना पहिली जागा देत आहे. ”

हें वर्गीकरण बहुतेक काव्येतिहासकारांस सोयीचें वाटलें आहे. तें केशवसुतांच्या समकालीनांनाहि लागू पडतें.

१८१८ नंतरचीं कांही वर्षें काव्याच्या दृष्टीने जवळजवळ सुनींच गेलीं. पूर्वीच्या काव्यांतील कांही उरलेंसुरलें असेल तेंच. राज्यकारभाराचा खांदेबदल झाल्यावर अधूपणा समाजांत पसरला त्यानेंच काव्य आखडलें असावें. ही अवकळा उलटल्यावर पुनश्च त्याची चळवळ सुरू झाली; पण, साहजिक, आणखी कांही वर्षें ती संस्कृत काव्याच्या आणि संस्कृतनिष्ठ पंडिती काव्याच्या पांगुळगाड्याचा आधार सोडूं शकली नाही. कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे, परशुरामपंत गोडबोले, गणेशशास्त्री लेले, इत्यादि शास्त्रीमंडळींनी ह्या सुमारास मोरोपंती घाटाची, अलंकारांनी मढविलेली व बहुतांशीं भाषांतरवजा कविता लिहिली. विषय अथवा शैली ह्यांबाबत सगळी उसनवारीच असली तरी ह्या शास्त्रीमंडळींची रसिकता त्यांच्या काव्यांत डोकावल्याशिवाय राहात नाही. § क्वचित् लावणी ढंगाचा उडता वासहि येतो. उत्तान वर्णनांत मूळांतील संस्कृतची अभिजात सबब होती. मात्र अशा कवितेचें क्षेत्र अगदींच कोतें हें उघड आहे. ‘ भोस्वाही प्रतिभा ” हा ह्या काव्याबद्दलचा कै. वासुदेव बळवंत पटवर्धन ह्यांचा शब्दप्रयोग त्याच्या स्वरूपाची योग्य व्याख्या करतो. संस्कृत ऐवज संस्कृतप्राय मराठींत त्यानें आणिला, ह्यापलीकडे मराठी जीवनाचा त्याला संपर्क झाला नव्हता. आशय, शैली आणि कल्पना ह्यांच्या कांही संकुचित संकेतांभोंवतीं तें काव्य फिरत होतें. अभंग-परंपरा तुटली, तिच्यांतील मर्यादित भावदर्शनालाहि काव्य पारखें झालें. कथनकाव्याची सद्दी अजून संपली नव्हती. लौकिक विषयांतून ऐहिक बोध काय घ्यावयाचा अथवा त्याचें पारलौकिक तात्पर्य काय हें बाळबोध पणें

§ कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्या ‘ विविधज्ञानविस्तार ’ ज्युबिली अंकांतील ( ग्रंथ दुसरा ) ‘ पन्नास वर्षांपूर्वीचें महाराष्ट्र ’ ह्या लेखांत त्या काळच्या विद्वान् शास्त्रीवर्गीताहि जुन्या कारकीर्दीतील रसिकपणाची, नव्हे रंगेलपणाचीहि, छटा कशी रेंगाळत होती ह्याचें वर्णन आहे.

स्पष्ट केलें नाही तर कविता भुंडी वाटावयाची. केशवसुतांच्या काळींहि ह्या हरदासी कल्पना जोमांत होत्या; कालपरवांपर्यंत त्या पूर्णपणें मावळल्या नव्हत्या !

इंग्रजी काव्याचा अभ्यास होऊं लागल्यावर त्याचीं भाषांतरें होणें हें साहजिक होतें. येथेंहि स्फुट कवितांवर दीर्घ कथनकाव्याचीच सरशी झाली. श्री. बजाबा रामचंद्र प्रधान ह्यांचें वॉल्टर स्कॉटच्या Lady of the Lake चें ‘ दैवसेनी ’ ( १८६७ ) व कान्होबा रणछोडदास कीर्तिकर ह्यांचें टेनिसन्‌च्या Princess चें इंदिरा ( १८८४ ) हीं भाषांतरें प्रसिद्ध आहेत. येथें मूळ विषय परके असले तरी भाषा घरांतील वाटावी इतकी सोपी होती हा विशेष महत्त्वाचा आहे. कीर्तिकर धंद्यानें डॉक्टर, पण त्यांचा वाङ्मयीन व्यासंग असाधारण होता व त्यामुळें मराठी काव्याला हितकर दिशा कोणती ह्याचा मार्मिक अंदाज त्यांना होता असें समजण्यास हरकत नाही. जळगांवला त्यांच्याच अध्यक्षतेखालीं त्र्यंबक .बापूजी ठोमरे ‘ बालकवि ’ झाले.

कीर्तिकरांप्रमाणेंच ‘ राजा शिवाजी ’ ( १८६८–७१ ) कर्ते महादेव मोरेश्वर कुंटे ह्यांची कामगिरी येऊ घातलेल्या नवीन कवितेचे मार्गदर्शक म्हणून फार थोर आहे. कादंबरीवजा चरित्र असलेल्या ह्या गाढ्या विद्वानाने आपल्या काव्यविषयक कल्पना वेडरपणें मांडून परंपरावाद्यांचा म्हणजे बहुजनसमाजाचा उपहास ओढवून घेतला. ‘ राजा शिवाजी ’ची प्रस्तावना ह्या काव्येतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. संस्कृतच्या गुलामीइतकाच इंग्रजीच्या गुलामीविरुद्ध त्यांचा कटाक्ष आहे. परपुष्टतेची ही कोंडी फोडली पाहिजे, त्याशिवाय मराठी कवितेला तरणोपाय नाही हें त्यांनी जाणलें. काव्य समाजाच्या सर्व वर्गांसाठीं असावें, केवळ शालशिष्टांसाठीं नको ही त्यांची घोषणा क्रांतिकारक होती. त्यासाठीं त्यांनी बोलभाषेची शिफारस केली. “ साकी किंवा पद ह्यांमधून दिसणारी मराठी भाषा श्लोक व आर्या ह्या संस्कृत छंदांतून दिसत नाहीं. ” शिवाजी हा विषयहि सर्वस्पर्शी म्हणून त्यांनी निवडला; कारण काव्याने सर्व समाजांत वारें खेळविलें पाहिजे ही त्यांची श्रद्धा. केशवसुतसंप्रदायासाठी कुंट्यांनी भूमि तयार करून ठेविली.

काव्यशैलीच्या साधेपणाविषयींचीं कुंट्यांचीं मतें महाराष्ट्राच्या पचनी पडावयास फार काळ लागला. तरी ‘ राजा शिवाजी ’ ने काव्यविषय म्हणून इतिहासाकडे हळूहळू कित्येकांची दृष्टि वेधिली. तेथून चालू स्थितीपर्यंतच्या प्रवासांत आणखी काळ लोटला. पण ह्या सुमारास जुनी काव्यविषयांची कोंडी आणखी एके ठिकाणीं फुटली. पांडुरंग

व्यंकटेश चिंतामणिपेठकर ह्यांच्या 'गंगावर्णनां'त सरळ सृष्टिवर्णन असून परलोकाच्या हिशेबाचा संपर्क त्याला झालेला नाहीं. कुंट्यांप्रमाणें चिंतामणीपेठकरांनीहि कृत्रिम शैलीविरुद्ध हत्यार उगारलें. "मराठी काव्याच्या पायांतली यमकाची विडी नाहींशी व्हावी" हें १८७४ सालीं मागणाऱ्या ह्या कवीचा केशवसुतसंप्रदायाशीं उघड दुवा जुळतो. यमकाशिवाय कविता घडत नाही ही श्रद्धा अजूनहि अनेकजण बाळगून असतात. पण पाऊणशें वर्षांपूर्वीं वामन, मोरोपंत असल्या 'यमक्यां'चा इतका दरारा असतां त्याविरुद्ध शब्द काढणारें धाडस निराळेंच असावें. पंडिती काव्याच्या बंदिस्त वैभवाला आणखी एक शह मिळाला. मराठी कवितेचा कोंडमारा करणाऱ्या ह्या अनेक संस्कृत रखवालदारांपैकीं एकेकाचा जाच कमी होत होत आतां मुक्तछंदाच्या मोकळेपणापर्यंत तिच्यांतील चैतन्य वाढलें आहे. ह्या मोकळेपणाला कोणी बिचकले तरी त्या चैतन्याकडे डोळेझांक करणें कठिण. मराठी कवितेच्या आझादीच्या इतिहासांत चिंतामणिपेठकरांचाहि खास निर्देश झाला पाहिजे.

येथवर सूत्र केशवसुतांपर्यंत, म्हणजे सुमारें १८८५ पर्यंत, येऊन पोंचलें. ह्यानंतर वीस वर्षें केशवसुत लिहीत होते. त्याच काळांत टिळक वगैरे कांही ताज्या दमाच्या कवींचा वावर सुरू झाला. पण केवळ एका पिढींत कोसळण्याइतकी जुनी परंपरा लेचीपेची नव्हती. त्यापुढेंहि कांही वर्षें ह्या कविपंचकाशी समांतर असा तिचा प्रवाह वाहात होता. तो क्षीण होत गेला असेल, पण अगदींच आटूनहि गेला नाही. आधुनिक कवितेच्या स्वरूपाची चर्चा करण्यापूर्वी ह्या 'इतर' कवींची नामावळी द्यावी. ह्यांच्यांतील सर्वच जुन्याचे इमानी वारसदार नव्हते; कांहीं नव्याच्या उंबरठ्यावर घोटाळण्याइतके धीट होते हें ध्यानांत धरावें.

ह्या कवींपैकीं विशेष परंपरानिष्ठ म्हणजे विठ्ठल भगवंत लेंभे, मोरो गणेश लोंढे व विद्याधर वामन भिडे. जुन्या वळणाची बोधपर रचना आणि संस्कृताने जडावलेली भाषा हे त्यांचे विशेष. भिड्यांची कविता तर संस्कृत समासांच्या वजनाखालीं खचून गेली होती. गंगाधर रामचंद्र मोगरे ह्यांची काव्यसरणी जुनी असली तरी त्यांच्या विचारांना आधुनिकतेचा स्पर्श झालेला होता. तेंच गोविंद वासुदेव कानिटकर ह्यांच्या संबंधींहि म्हणतां येईल. इंग्रजी काव्याच्या वाचनाचा परिणाम येथें ओळखणें कठिण नाही. मोगऱ्यांचा मराठीविषयींचा अभिमान आणि कानिटकरांच्या दीर्घ काव्याचे ऐतिहासिक विषय हे पाहिल्यावर कुंट्यांचे श्रम फळ धरू लागल्याचें सुचिन्ह पटतें.

ह्यांशिवाय 'केरळकोकिळ'कर्ते कृष्णाजी नारायण आठल्ये व नाटककार म्हणून नांव मिळविणारे इतिहाससंशोधक वासुदेवशास्त्री खरे ह्यांनीहि वरीचशी जुन्या धर्तीवर काव्यरचना केली. ह्या सर्वांहून अलग पडणारे कवि म्हणजे विष्णु मोरेश्वर महाजनी. त्यांनी इंग्रजी स्फुट कवितांचीं भाषांतरें केलीं आणि त्या थाटाचीं स्वतंत्र गीतेंहि रचलीं. केशवसुतांपूर्वींच मराठी साहित्याची येथें भावगीतांशी अर्धीमुर्धी ओळख झाली.

नव्या-जुन्याच्या ह्या संधिकालीं उभय रीतींचें व त्यांमागील वृत्तींचें समालोचन केल्यास पुढील वाट स्पष्ट दिसेल. ह्या संधिकालाचा विस्तारहि मोठा होता. त्याच्या सर्व छटा विरून गेल्या असें म्हणवत नाही.

हा विरोध केवळ काव्यशैलीबाबत नसून काव्यविषयक कल्पनांबाबत होता ; आणि ह्या कल्पनांचे लागेबांधे संसारवृत्तींशीं जखडले होते. वासुदेव बळवंत पटवर्धन ह्यांच्या 'काव्य आणि काव्योदय' ह्या निबंधांत मराठी कविता कां खुरटून गेली ह्याचें सुंदर विवरण आहे. आपली समाजरचनाच खऱ्या कवितेच्या प्रसाराला प्रतिकूल होती. पटवर्धन म्हणतात : "आमचा समाज म्हणजे अनेक निरनिराळ्या खणांची आणि पुडांची पेटी आहे. ह्या पेटींत प्रत्येक स्वतंत्र आणि आपल्यापुरता पूर्ण असल्यामुळे पेटीच्या सबंधपणाशीं त्याचा फारसा संबंध राहत नाहीं. त्यामुळें पेटींत असणाऱ्या अनेक पदार्थांचा अन्योन्यसंपर्क होत नाहीं आणि एकाचा दुसऱ्यावर परिणाम होऊन क्रिया-प्रतिक्रियांच्या आंदोलनास जागा मिळत नाही. तसेंच आमच्या समाजाचें अंशतः होतें. कुणबी, माळी, सुतार, सोनार, लोहार, चांभार, ब्राह्मण, प्रभु, इत्यादि असंख्य पदार्थ समाजपेटींत आहेत. परंतु त्यांच्या हृदयाचे ठोके एकत्र पडतील असा त्यांचा एकजीव झालेला नाही. त्यामुळें एकरस राष्ट्राच्या हृदयाची खळबळ, आणि तडफड, ह्या बहुरस व बहुवस राष्ट्राच्या हृदयांत उदय पावली नाही – अजून पावली नाही.... एक ठिणगी पडल्याबरोबर एकदम पेट घेऊन सगळ्या जंगलभर भडका होण्यास ज्या प्रकारची एकविधता जंगलांत लागते त्याच प्रकारची एकविधता सबंध राष्ट्राच्या हृदयाची असल्यावांचून प्रक्षुब्ध प्रतिभेच्या प्रचंड पराक्रमाचे आदर्श जे जिवंत काव्यग्रंथ ते निर्माण होत नाहीत ; आणि खालपासून वरपर्यंत राष्ट्रांतील सर्व वर्गांस सारखेच गुंगवून सोडणारे काव्यग्रंथ उदयास आल्याशिवाय काव्याची प्रतिष्ठाहि वाढत नाही....निरनिराळ्या यातींचे निर-निराळे फड असून निरनिराळे डफ व निरनिराळी थाप अशी आमच्या समाजाची स्थिति होती व आजहि आहे." § ह्या तुकडे पडलेल्या दुर्दैवी समाजाचें

§ 'काव्य आणि काव्योदय' (१९०९).

'राष्ट्रीय काव्य' खऱ्या अर्थाने असें निर्माण होणें त्या काळीं अशक्यच होतें. वाङ्मयेतिहासांतहि जिचा बडेजाव ती प्रौढ कविता ब्राह्मणादि पांढरपेशापुरती 'स्पृश्य तळ्यां'सारखी राखून ठेविली होती. एखादा रसिक कुणवी-माळी कुतूहलाने तिकडे वळला तरी तिचा त्याला काय उपयोग? त्या सांचलेल्या कवित्वाचे विषय वेगळे म्हणून त्याची तहान भागणें शक्य नाही. इतकेंच नव्हे तर तें काव्य त्याला वाचून समजलेंहि नसतें, इतकी ती भाषा त्याच्या आंवाक्यावाहेर असे. मानेवर खडा ठेवून लहानपणींच संस्कृतची संथा घेतलेल्या ब्राह्मणांनाच फक्त त्याच्या गाभ्यांत प्रवेश होता. म्हणून त्याला अभंग आणि लावणीचा जीवंत झराच अधिक चवदार वाटला; त्या बाजूला सहसा कोणी पंडित फिरकतहि नसे. "तुकारामासारख्या 'शूद्रकवी'ची दाद लागायला शें-दोनशें वर्षे लागलीं" § अशी ही काव्यक्षेत्रांतील स्पृश्यास्पृश्यता क्वचित् भक्तिरसाच्या ओलाव्याने डळमळली तरी ती तेवढ्यापुरतीच! एरव्ही, काव्यांतील ज्ञातिसंस्थांची वहिवाट मजबूत राहिली.

तरीहि, ह्या वरिष्ठ वर्गांत मराठी कवितेला फारशी प्रतिष्ठा नव्हतीच! संस्कृतांत रमलेल्या शास्त्री-पंडिताला ती अगदीच 'प्राकृत' वाटे आणि पुढे इंग्रजी शिक्षण घेतलेल्या विद्वानाला ती बिलकुल 'देशी' वाटू लागली! ह्या नवशिक्षितांची हजेरी कुंटयांनी 'राजा शिवाजी'च्या प्रस्तावनेंत घेतली आहे. त्या आळसटलेल्या, नीरस आणि मंद सामाजिक जीवनांत काव्याला एक खेळणें ह्यापलीकडे किंमत नव्हती; म्हणून आपल्या आवडीप्रमाणें बहुतेकांनी पिढीजाद चालत आलेलीं खेळणीं पसंत केलीं; थोडे नव्या परदेशी चिजांवर भाळले; आणि खरी मराठी कारागिरी ओबड-धोबड म्हणून मागें पडली. ज्ञानेश्वरांची पुण्याई फिकी पडूं लागली. वामनाला संस्कृत रचनेपासून मराठीकडे वळवावयाला रामदासांना श्रम पडले. मराठींत कविता करणें हा गौण मार्ग असा ग्रह. "रसिकत्वाला थारा नाही" हा पुढें प्रकट झालेला विनायकाचा वैताग ह्या परिस्थितीमुळें आपण समजूं शकतों.

ह्या पंडिती कवितेंत आत्मनिष्ठेला जागा नव्हती. 'खाजगी अनुभव' कवितेप्रमाणें जीवनांतहि निषिद्ध इतकी व्यक्तित्वाची गळचेपी होत असावी अशी शंका येते. चार-चौघांसारखें चाललें-बोललें पाहिजे; चाल चुकली तरी बोल बदलूं नये असा संकेत असला पाहिजे. त्यामुळेंच वाचेने सोवळा असलेला हा समाज करणीने सोवळा होताच असा कयास बांधतां येत नाही. आणि त्यामुळेंच त्याच्या काव्यांतील भावना

§ 'काव्य आणि काव्योदय' (१९०९).

सार्वजनिक होत्या. तेच नीतिपाठ, तेच विधि-निषेध आणि त्यांना आधार म्हणून तींच तीं उष्टीं पौराणिक कथानकें! परिणामीं कवीं-कवींत फरक काय तो धाटणीपुरता. सफाई, अलंकार, भाषाप्रभुत्व हींच कमी अथवा अधिक. कवि हा केवळ कारागीर झाला; त्याला कांहींच आंतरिक वैशिष्टय उरलें नाहीं. " अंतरंग ओथंबुन ओसंडे ती सुंदरता " असा प्रकारच नव्हता. त्या रूढिग्रस्त पण आत्मसंतुष्ट समाजांत अंतरंगाच्या निराळे-पणाची काय तमा? आधुनिक कविता आत्मप्रत्ययांतून स्फुरलेली असते. † सूक्ष्मदर्शी रसिकाला तिच्यांत कवीची छाया न्याहाळतां येते. त्यालाच जुनी पंडिती कविता व्यक्तित्वशून्य भासते. पण हा आत्मप्रत्यय अभंगांत आहे; तो एकदेशी, म्हणून मर्यादित कक्षेचा, असला तरी त्याची तीव्रता वादातीत आहे. नव्या कवितेंतील आत्मपरता ही परभृत, इंग्रजी वाङ्मयांतून उचललेली, ह्या शिळ्या आक्षेपाला ह्या अभंगांहून चांगलें उत्तर कोणतें? आपल्या कोंदटलेल्या आणि अकालपोक्त वाङ्मयपरंपरेंतून ती कांहीं काळ मरगळून गेली होती व पश्चिमेकडच्या वाऱ्याने तिला जागवली हेंच खरें.

मोरोपंतांच्या ' केकावली 'ची तुकारामबुवांच्या अभंगांशीं ह्या दृष्टीने तुलना करण्या-सारखी आहे. मोरोपंत हे भाषेचे सम्राट्. ' निरोष्ठरामायण ', ' परंतुरामायण ', असलीं एकशेंआठ रामायणें लिहून त्यांनी भाषेशीं केलेले खेळ थक्क करणारे आहेत. उलट, तुकारामबुवांची भाषा अगदींच रांगडी. पण ज्या परमेश्वराला दोघांनीहि हांका मारल्या त्याने मोरोपंतांना ' ओ ' म्हटलें असेल असें वाटत नाही; इतकी त्यांची ' केकावली ' भावदृष्टया कोरडी आहे. म्हणजे हा काव्यविषयक कल्पनेचा प्रश्न आहे. अंतरंग व बहिरंग ह्यांमधील श्रेष्ठतेचा वाद आहे. बहिरंगावर भर देऊन पंडितकवी बौद्धिक चमत्कृतीच्या मागें लागले; शब्दांचे " डोंबारी खेळ " करून त्यांनी वाचकाला विस्मयांत टाकिलें आणि विस्मित झालेला वाचक अमक्याने हजार कविता लिहिली, तमक्याने लाख कविता लिहिली अशी गणिती भाषा बोलू लागला; एखादा भाबडे-पणाने अजूनहि बोलतो. पण हें काव्याचें गणित नव्हे; हा फार तर पद्य-मजुरीचा हिशेब झाला! " जुनीं मापकोष्टकें जराशीं बाजुस सारा तीं, " इतकीच नव्या कवितेची विनवणी आहे. " पाहा उघडिलें हृदयाला ", तेथेंच काव्य नसलें तर बाहेरची छानछोकी कुचकामाची. पण जुना कवि आणि त्याची कविता हीं अलंकारांमुळें

---

† ' फुलवात ' ( अनिल ) प्रस्तावना पाहा. पृष्ठें ५–१२. ह्याला उत्तर देण्याचा प्रयत्न श्री. रा. म. आठवले ह्यांनीं ' प्रतिभा विशेषांक ' १९३५, ह्यांत केला आहे.

कासावीस झालेलीं आहेत. त्या नादांत हृदयाचें स्पंदन त्यांना ऐकूं येणें शक्य नाही. §

तेंच काव्यविषयांसंबंधीं. जुन्या कवींनी 'रामायण', 'महाभारत' आणि पुराणें ह्यांचा उपसा आरंभला. कधीं संसार असार आहे हें सांगणारी 'पंतोजी' पद्धतीची कविता लिहिली. भोंवतालच्या जीवनांत काव्यविषयाचा आढळ झालाच नाही. विद्वत्ता आणि (खरी अथवा बेगडी) निवृत्ति ह्यांच्या कैचींत सांपडलेल्या ह्या शुष्क कवितेचें दैनंदिन व्यवहाराशी, साधारण माणसांशी, कांहीच नातेंगोतें उरलें नाही.

कर्कश शुष्क तर्कनिपुण प्राज्ञवर-पंडित-परिपूर्ण
मात्र हे विशाळ,'मणिगोटे' भिजले नच सद्रस-लोटें !
नजर न त्यांचेवर ठरते, उरावर जड दडपण पडतें,
गहन विद्वत्तापरितापें प्राकृत जग थरथर कांपे !

—'बी'

काव्य म्हणजे फक्त शिस्तवार शब्दरचना हा समज त्या काळीं फार थोड्यांना गैर वाटत असे. पद्य आणि काव्य हे आजहि कांही विद्वानांच्या कोशांत समानार्थी शब्द म्हणून आढळतील. "इतिहास, व्याकरणादि विषयहि छंदाच्या विटाळ्यांत घालून ठोकून काढिले कीं त्यांना काव्य म्हणायला सामान्य जन कचरत नाही. 'मी गेलों बाजारीं भाजी घ्यायास एकदां नीट। आलों घरीं पहातों तों भाजीमाजि गवसला कीट।' हीसुद्धां सामान्य दृष्टीने कविता झाली" * भेंड्यांच्या चढाओढींत शब्द जुळविणारा शीघ्रकवि आणि आंतील तळमळीला शब्दरूप देणारा भावकवि ह्यांची प्रत एकच! शंभर वर्षांपूर्वी कविता म्हणून वृत्तपत्रांत काय प्रकाशित होत असे ह्याचे नरसिंह चिंतामण केळकरांनी 'टिळकचरित्रां'त मासले दिले आहेत.

हवा थंड आहे तया बेळगांवीं
वस्त्रें बहु त्वां बळें बाळगावीं।
आळस करितां बहुदुःख वाटे
शरीर सुद्धां फुटती खवाटे ॥

—'ज्ञानप्रकाश' (१७–१०–१८६१)

---

§ "कवितासुंदरी ही एखाद्या कुलस्त्रीप्रमाणें अलंकारभूषणांनी एखाद्या सराफाच्या चालत्या-बोलत्या दुकानाप्रमाणें दिसायला पाहिजे ही त्या वेळीं प्राचीनांची दृष्टि होती."

— प्रल्हाद केशव अत्रे, 'फुलांची ओंजळ,' प्रस्तावना, पृ. ३०.

* वा. ब. पटवर्धन, 'काव्य आणि काव्योदय,' पृ. ४.

– ह्या त्यांपैकीं एक. शाळकरी मुलांसाठीं भूगोलहि श्लोकबद्ध झाला; पण पाठांतराने तो लक्षांत राहावयास सोपा म्हणून पद्याचा खटाटोप केला असला तरी तें काव्य नव्हे हें सुद्धा सगळ्यांस पटलें नसतें. ह्यांतून एक महत्त्वाचा मुद्दा उद्भवतो. स्मरणसुलभता हा पद्याचा मुख्य गुण मुद्रणकला येण्यापूर्वी फार उपयोगीं पडला, तरी मुद्रण सुलभ झाल्यावरहि पद्याला उठल्या-सुटल्या वेठीस धरण्याचा अट्टाहास चालूच होता. मुद्रणकलेचा प्रसार झाल्यावर गद्यरचना वाढू लागली. न्यायमूर्ति रानड्यांच्या आढाव्याप्रमाणें १८६४ पर्यंत गद्य-पद्याचें प्रमाण दोनास एक व १८९६ मध्यें चारास एक इतकें वाढलें. § कथा, व्यवहारोपदेश इत्यादींचा भार आतां गद्यावर सोंपवण्यास हरकत नव्हती; पण त्यानंतर फार काळ पद्याने हें ओझें अकारण वागविलें आणि खऱ्या काव्याची कुचंबणा केली.

अशा प्रकृतींचें हें काव्य समाजाच्या अपकर्षाचें (decadence) एक लक्षण आहे. जीवनाकडे त्यानें पाठ फिरविली होती. लौकिकाचा संबंध सुटला आणि अलौकिकाची ओढ लागली नाहीं. कृत्रिमतेचें कौतुक इतकें वाढलें कीं तीच नैसर्गिक भासावी! सत्त्व विलयाला जाऊन निरर्थक उपाधींचें अवडंबर माजलें. विशाल जीवनांतून मागें पाय घेतला आणि आपल्यापुरता जगाचा संकोच केला. अशा ह्या शालजोडींतील काव्याचा वावर देवघरांतून माजघरांत व माजघरांतून देवघरांत इतक्यापुरताच होता. बाहेरच्या जगाचा वारा त्याच्यापर्यंत पोंचला नाही. ज्या वर्गाचें तें काव्य त्याची अवस्था ह्याहून निराळी नव्हती.

ह्या अवस्थेची उबग येऊन नवजीवनासाठीं महाराष्ट्रांत जी हालचाल सुरू झाली तिचाच काव्यक्रांति हा एक भाग होता. लोकमान्य टिळकप्रणीत राजकीय क्रांतीचें वारें, राजकीय आणि सामाजिक असले अनैसर्गिक तट ओलांडून, सर्व समाजांतून सळसळू लागलें ह्यांत नवल वाटत नाही. ह्याविषयींचा उल्लेख आरंभीं आलाच आहे. राजकारणाच्या मानानें इतरत्र स्थितिनिष्ठांचा विरोध अधिक कडवा होता इतकेंच. साहित्यांतील क्रांतीच्या कल्पना परदेशांतून उसन्या घेतल्या होत्या ह्या कर्मठ आक्षेपाला असें उत्तर देतां येईल कीं लोकशाहीच्या आणि एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनाहि तेथूनच आल्या. पण केवळ उसनवारी अंगीं लागत नाही. आणि उसनवारी-शिवाय जगाचा व्यवहार चालत नाहीं, मग ती लौकिक असो की वैचारिक. इंग्रजी साहित्याच्या वाचनाने व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांनी अनेक सुशिक्षित मनांत मूळ धरलें.

§ वि. सी. सरवटे, 'मराठी साहित्य-समालोचन', पृष्ठें ४८–४९.

स्त्रिया, दलित इत्यादींविषयीं उदारपणें विचार सुरू झाला. आगरकर, लोकहितवादी रानडे, जोतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, भाऊ महाजन, वगैरे आद्यसुधारक एकमुखाने बोलले नाहींत तरी आपल्या जीर्ण सामाजिक जीवनाची पुनर्रचना करण्यासंबंधीं त्या सर्वांना तळमळ लागली होती. केशवसुत व त्यांचा संप्रदाय ह्यांच्या सुधारणावादी कवितांचा उगम येथें आहेच; पण स्वातंत्र्याच्या आणि विकासाच्या लालसेची छाप त्यांच्या सर्वच कवितांवर व काव्यशैलीवरहि पडली आहे. सामाजिक व राजकीय ध्येयवादाला व्यवहाराची मुरड जीवनांत तडजोडीसाठीं घालावी लागते. पण ह्या पांगळेपणाची काव्य अथवा कलेच्या निर्मळ सृष्टींत आवश्यकता नसल्यामुळेंच 'तुतारी'पंथाची तीक्ष्णता इतकी बेडर भासते. परभृततेंत बेडरपणा येणें शक्य नाही. दोन संस्कृतींची टक्कर झाली – एक आपली प्राचीन आणि दुसरी नव्या दमाची व परदेशी. तींतून त्या शिथिल झालेल्या प्राचीन संस्कृतीला नवें वळ लाभलें आणि नवे बहर आले.

पूर्वी उल्लेखिल्याप्रमाणें ह्या नव्या काव्याचें अंतर्मुखता हें एक प्रमुख लक्षण आहे. वर्ड्स्वर्थ, शेली वगैरे इंग्रजी 'रोमॅन्टिक' कवींच्या वाचनाचा ठसा त्याच्यावर आहे हें निश्चित. शंपाऊणशें वर्षांपूर्वी इंग्रजी काव्यहि अशाच संक्रमणांतून पार पडलें होतें. ह्या कविपंचकांत केशवसुतांवर तो ठसा सर्वांत अधिक उमटला आहे आणि विनायकांवर सर्वांत कमी. वैयक्तिक अनुभूतींतून उगवणाऱ्या ह्या काव्याला साऱ्याहि विषयांत मोठा आशय आढळला आणि काव्यविषयाचें क्षेत्र विलक्षण वाढलें. कांही ठराविक विषयांची मिरासदारी चालू होती ती थांबून कविप्रतिभेला संचारासाठीं सर्व क्षेत्र मोकळें झालें. "धोंड्यामधूनीहि दिसे कवीला" ह्या नव्या हिरीरींत एखाद्या गवती फुलाभोंवतीं गुंगण्यापासून तों "अनंताची प्रदक्षिणा" करण्यापर्यंत तिचें सामर्थ्य वाढलें. ह्या सामर्थ्याची पुरी जाणीव बहुतेक नव्या कवींत आहे. "पुरें जाणतों मीच माझें बल" अशा ताठ्याने तो आपल्या प्रतिभेचीं उन्मादसूक्तें गातो. ती "अत्यद्भुत गूढ शक्ति" संचारली कीं कवि "मुक्तात्मा" होऊन "दिक्कालांतून आरपार" पाहूं शकतो. "परोक्षा-सही सोपान, तूंच मर्त्य जगताचा प्राण" अशी बालकवींचीहि कविविचारासंबंधीं श्रद्धा आहे. टिळकांसारखे कवी स्वतःला वारंवार 'वेडा' म्हणतात ते अशा अभिप्रायाने कीं नफ्यातोट्याच्या हलक्या हिशेबांत गुरफटलेल्या व्यवहारी शहाणपणापार ते गेले आहेत; "औचित्याचा फोल विवेक" त्यांच्या स्वतंत्र वृत्तीला बांधू शकत नाही. "परंतु वेडाविण सुटतिल कां हृदयाचीं कोडीं?" हीं नाजूक कोडीं हलक्या हाताने उलगडणारा कवि, धूमकेतूप्रमाणें, "महाक्रान्तीचें तें भविष्य"हि वर्तवितो! अनेक करंट्या पिढ्यांच्या

सुलतानीने चेपून टाकिलेला 'मीपणा' असा जागृत होऊं लागला; स्वत्वाची विझलेली ओळख पुन्हां फुलली – "मजहुनि मोठा एकच मी" – आणि काव्याला फार काळ पारखी झालेली आत्मानंदाची उत्कटता पुनश्च लाभली.

संसाराच्या कोनांकोपऱ्यांतहि काव्य पाहाणारी ही आधुनिक कविता प्रवृत्तिवादीच असणार. जग मिथ्या, सुख म्हणजे मृगजळ, असें मानणारें वैराग्य एखाद्या परमार्थरत सत्कवींत भिनलें असेल; पण जुन्या कवींचे थवे एकसुराने तसली पोपटपंची करूं लागले आणि निवृत्तीचा दंभ माजला. राष्ट्राची हिंमत खचली कीं ही वैराग्याची कफनी तिला पायघोळ झाकू पाहाते आणि निष्क्रियतेची लाज राखते! नवी कविता जीवनसन्मुख आहे, संसाराचें सार ती ओळखते.

> "जगतांतच जीवन आहे, जीवनांतच आहे आनंद,
> येथें जगांतच जीवनानंद."
>
> – 'अनिल'

पृथ्वी-स्वर्गांच्या मीलनाची टिळक-बालकवींची आवडती कल्पना हाच अनुराग प्रगट करिते. टिळकांच्या 'वनवासी फुला'चा तोच विषय आहे; संसारांतील "श्रमसौंदर्य" ते चाखू शकतात. § "नाहीं स्वप्न, न भास, वा बुडबुडा; जीवित्व साचें असे" अशी केशवसुतांचीहि श्रद्धा होती. ह्या संसारांतील रूढींचीं कोळिष्टकें झाडून टाकून तो सुंदर कसा करितां येईल हा ह्या कवींचा शोध मुख्यतः चालू होता. तसा आशावाद ह्या काव्यांत तुडुंब भरला आहे.

हा आशावाद लढाऊ आहे. "जुनें जाउं द्या मरणालागुनि" ह्या केशवसुतांच्या बंडखोर घोषणेचे पुढें शतप्रतिध्वनी दुमदुमले. टिळक, बालकवि, गोविंदाग्रज, 'बी', रेंदाळकर इत्यादींनी त्यांत आपले ओजस्वी आवाज मिळविले. त्यांच्यावर नक्कल केल्याचा आरोप झाला आहे; फार काय, केशवसुतहि त्यांतून सुटले नाहीत. पण नक्कल आणि अस्सल ह्यांतील अंतर कळणारा रसिक अशा आक्षेपाने बुजणार नाही! एऱ्व्हीं स्वप्नसृष्टींत तरळणारी बालकवींची प्रतिभा 'धर्मवीर'चें तांडव खेळते हाच ह्या केशवसुतप्रणीत नवयुगाचा महिमा! केशवसुतांच्या विचारांची, क्वचित् भाषेचीहि, छाया अशा कवितांवर पडणें हें नैसर्गिक वाटण्याइतकी ह्या कवींची केशवसुतांठायीं भक्ति होती; पण तसले जळजळीत विचार अधिकाधिक आत्मसात् होत होते. म्हणून या कवितांना नक्कल म्हणणें अन्यायाचें ठरेल.

---

§ 'टिळकांची कविता, भाग पहिला, पृष्ठ १७३.

ह्या उदारमतवादी कवितेचे दोन मुख्य विषय म्हणजे अस्पृश्य, मजूर वगैरे आपल्या विषम सामाजिक आणि आर्थिक घटनेचे बळी आणि स्त्रिया. ह्यांपैकीं स्त्रिया हा काव्याचा सनातन विषय असला तरी त्यांच्यासंबंधींच्या वृत्तींत फरक पडत गेला. जुन्या निवृत्तिपर कवितेंतील स्त्री ही मोक्षाच्या वाटेंतील धोंड ही तक्रार सोडली तरी पौराणिक विषयांवरील कथनकाव्यांत स्त्रियांची भरपूर वर्दळ आहे. त्यांत अनेक नमुने येतात. पण त्या पौराणिक साध्वींची रूपरेखा पूर्वीपासूनच निश्चित असल्यामुळे कविप्रतिभेला कांही तपशील हालविण्यापलीकडे विशेष खेळ करण्याला वाव नसे. कदाचित्, देवीपदाधिष्ठित स्त्रियांवर लौकिक स्त्रीस्वभावाचा आरोप करून खुसखुशीत घरगुतीपणा येत असेल. पण एकंदरीनें पुराणांच्या मुर्वतीखातर कांही देवींचीं स्तोत्रें गाइलीं तरी स्त्रियांना आत्मा अथवा व्यक्तित्व असल्याची शंका ह्या पंडितकवींना क्वचितच आली असेल. त्यामुळे त्यांच्या सर्व स्त्रिया एकाच किंवा फार तर दोनतीन ठराविक मुशींतून ओतल्यासारख्या दिसतात. तेथें स्त्रीजात दिसते, पण स्त्री दिसत नाही. नवीन कवितेची स्त्रीविषयक दृष्टीहि नवीन आहे. इंग्रजी वाङ्मयाच्या वाचनाचा तिच्यावर परिणाम झालेला आहे. स्त्री ही बाहुली नाही; प्रणयविषय होण्यासाठीं ती रूपगुणांची खाण असावी असा संकेत नाही. ह्या प्रणयाची भूमिका वैयक्तिक, अगदींच खाजगी, असते. टिळकांनी स्वपत्नीविषयीं मुबलक लिहिलें आहेच; पण जे केशवसुत व बालकवि सांसारिक जीवनाबाबत कधींकधीं अभागी समजले जातात त्यांनीहि तशी कविता लिहिली. ह्या वैयक्तिकतेमुळे व स्त्रीला दिलेल्या प्रतिष्ठेमुळें ह्या कवितेंतील शृंगार नागर व मर्यादशील राहिला. जुन्या शृंगाराला अश्लीलतेचें अस्तर फार वेळां जोडलेलें दिसतें. लावण्यांतील उत्तानता खुली असते; पण पंडिती कविता ह्या बाबतींत सोवळी नव्हती. § परशुरामपंत गोडबोल्यांनी जुन्या काव्याचें जें 'नवनीत' तयार केलें त्यांतून शाळाखात्याच्या "सक्त हुकुमान्वयें" त्यांचे चिरंजीव रावजीशास्त्री ह्यांना दुसरी आवृत्ति काढतांना "ग्राम्यधर्मसूचक पद्यें गाळावीं लागलीं" आणि तींहि "प्रायशः प्रत्येक कवीच्या वेच्यांतून"!! तिसऱ्या आवृत्तींत आणखी कांही "अश्लील किंवा असभ्य शब्द चुकून राहिलेले आढळले", म्हणून तीं पद्यें छाटलीं! कृष्णचरित्राच्या वर्णनांत संभावित कवीलाहि शृंगाराची हौस पुरवून घेण्याची संधि मिळाली. कांही आधुनिक कवींना ती संधि ऐतिहासिक कथानकांत सांपडली. ह्या किंवा लावणींतीलहि शृंगाराला स्त्रीच्या वेगळ्या व्यक्तित्वाची अपेक्षा नसते. तेथें सर्व स्त्रिया सारख्याच!

---

§ रा. श्री. जोग, 'प्रदक्षिणा,' पृष्ठ १२ पाहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ५३५८० दि: ...

विनायकाच्या ऐतिहासिक काव्यांत रंगविलेल्या आदर्श स्त्रियांवरहि हाच आक्षेप घेतां येईल.

प्रेमाप्रमाणेंच अनुकंपेचाहि स्त्री हा एक विषय होऊं लागला. 'तुतारी' आणि तत्सम कवितांत स्त्रीवर्गाला दास्यांत दडपणाऱ्यांचा कडक निषेध आहेच; पण विशेषतः विधवांच्या दुःखानें कळवळून लिहिलेली कविता ह्यापुढें आढळून येते. समाजाच्या ह्या मनोरचनेंत विधवा काव्यांतहि कदाचित् अशुभ मानिली जात असावी! पण हळूहळू ती तेथें इतकी रुळली कीं करुणरसासाठीं एक भरंवशाचा विषय म्हणून अनेक बऱ्यावाईट कवींना तिचा आधार झाला. गोविंदाग्रजांच्या 'समर्थे'त अशाच भोंदू-पणाचा वेध घेतलेला आहे.

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः" हें ब्रीदवाक्य बाळगणाऱ्या मासिक 'मनोरंजना'चा हा काळ. कथा-कादंबऱ्यांतूनहि स्त्रियांचा प्रश्न धीटपणें डोकावूं लागला. पण १८८६ मध्यें पत्नीला "अपरकवितादैवत" म्हणणारे केशवसुत आणि पुढच्याच वर्षी "माझी भार्या" ह्या काव्याच्या आरंभीं स्त्रीजातीला नमन करणारे अथवा स्त्रीला 'महारथी' म्हणणारे टिळक ह्यांची संभावना लंपट म्हणूनच झाली असणार. दुर्दैवानें, १९३५ सालींहि श्री. माडखोलकरांनी केशवसुतांवर स्त्रैणतेचा आरोप केला! § ह्याचा विचार पुढे होईलच.

'अंत्यज' व 'मजूर' ह्यांच्याविषयींच्या केशवसुतांच्या कवितांतील तिडीक प्रामाणिक आहे. अंत्यजाची सावली ह्यापूर्वी काव्यावर पडली नसेल; पुढे ती पसरू लागली. मजुराची उपासमारी हें त्याच्या पूर्वसंचिताचें फळ मानणाऱ्या समाजानें त्यालाहि काव्याच्या दारांत कधी उभा केला नव्हता. टिळकांनी ख्रिस्ती सेवाधर्माला जागून अनाथ आणि अस्पृश्य ह्यांच्यासाठीं होईल तें केलें. पुढें अनेक कवींनी कारुण्याचा हुकमी झरा म्हणून दारिद्र्याला राबवलें असलें तरी केशवसुतांची तीव्रता फार थोड्यांत आली. 'तुतारी'सारख्या कवितेंतील संताप आणि ही करुणा हीं एकाच भावनेचीं दोन अंगें आहेत. एकंदरीने, आधुनिक कवितेवर ह्या भावनेचा बराच परिणाम झाला. ही माणुसकी, विशाल ऐक्याच्या वृत्तीमुळे परदुःखानें लागणारी ही आंच, अगदींच नवी आहे. "अवघ्या अभाग्यांचे अश्रू, उभे आमच्या डोळ्यांत" ('अनिल') ही ती 'मानवता'; पण ती अश्रुसिंचनाने थंड होण्याइतकी दुबळी नाहीं. तिला 'त्वेषाचा...घट्ट पीळ' आहे.

---

§ 'अर्वाचीन मराठी साहित्य', पृष्ठ ११.

गांठ मारुनी वैराची
गोफण केली छान;
कठिण शब्द या धोंड्यांनीं
करितों हाणाहाण!

—'केशवसुत'

पंडिती काव्याच्या आत्मसंतुष्ट सुखासीनतेपासून ह्या लढाऊ मानवतेपर्यंत मराठी कवितेनें घेतलेली झेंप अभिमानास्पद आहे. एका दृष्टीने खाजगी असणारी ही आधुनिक कविता ह्या दृष्टीनें सर्वस्पर्शी आहे. उलट, 'सार्वजनीन' भावना व्यक्त करू पाहाणारी जुनी कविता कोणाच्याच भावना व्यक्त करू शकली नाहीं! मग भावना हालविणें दूरच राहिलें. "तव आंतर अग्नी क्षणभर तरी फुलवावा" (कुसुमाग्रज) असें तिला कधी वाटलें नाही. 'मूर्तिभंजन' तिच्या आवाक्यांत नव्हतें.

आधुनिक कविता स्त्रीप्रेमी असून देशप्रेमी नाही असा एक आक्षेप अनेक वर्षं प्रचलित आहे. नव्या आणि जुन्या कवितेंतील स्त्रीप्रेमाचा विचार वर झाला आहे! देशप्रेम ह्या वस्तूविषयीं अनेक गैरसमज आपण उराशीं बाळगत आलों आहों. जीर्णतेचा उदोउदो म्हणजेच देशप्रेम असें मानणाऱ्याला रूढिभंजक केशवसुत आणि त्यांच्यासारखे सुधारणावादी देशद्रोही वाटणें साहजिकच होतें! आपली पोटजात म्हणजे देश अशी ज्याची सुटसुटीत कल्पना त्याला "जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें" पाहणाऱ्या केशवसुतांच्या देशप्रेमाबद्दल शंका येणारच! वस्तुतः

"आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो!
ऐकायला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो!"

—अशी तळमळ प्रकट करणाऱ्या कवीसंबंधीं तसली शंका यावी ह्याचाच चमत्कार वाटतो. चहापाननिषेधाचें पद जुळविणारा मनुष्य 'राष्ट्रीय कवि' असें कालपरवां-पर्यंत अनेकांना वाटत असे ह्याची येथें आठवण होते. लोकजागृतीच्या कोत्या कल्पना ह्यामागें होत्या. तसेंच वर्तमानपत्री गद्याप्रमाणें काव्यहि भरडून काढतां येतें ही कल्पनाहि. त्या मानानें विनायकांची कविता ह्या कल्पनांच्या कक्षेंत येते; कारण तिला धर्मप्रेमाचे आणि भूतकालाच्या गौरवाचे गडद रंग दिलेले आहेत. विनायकांची मनोभूमिका त्याला साजेशी होती. केशवसुतांची दुसऱ्या तऱ्हेची; बालकवींची तिसऱ्याच. ह्या कवींनी स्वातंत्र्यविषयक कांही सवंग कल्पनांची कवाईत केली नाहीं म्हणून ते देशाविषयीं बेफिकीर होते असा त्यांच्यावर गहजब करणें अन्यायाचें आहे.

मराठी भाषा व महाराष्ट्र ह्यांविषयींहि बहुतेक नव्या कवींना प्रेम वाटत होतें. कित्येकांना महाराष्ट्राच्या इतिहासांत स्फूर्ति आढळली. त्याच्या अद्भुतरम्यतेने गडकऱ्यांवर मोहिनी घातलीच, पण बालकवीहि शेवटींशेवटीं तिकडे झुकू लागले होते. मात्र ह्याबाबतचें सूक्ष्म वृत्तिवैचित्र्य ओळखलें पाहिजे. ढोबळपणें सर्व कवींना एकाच दाव्यांत बांधणें चुकीचें होईल.

आधुनिक काव्याचा एक ठळक विशेष म्हणजे त्याचें सृष्टिप्रेम अथवा निसर्गप्रेम. हें इंग्रजी कवितेंतून उचललें असा एक जुना दावा आहे. त्यांतील तथ्य कदाचित् इतकेंच कीं इंग्रजी कविता वाचल्यावर कांही कवींनी घर अथवा गांवाची कूस ह्यांच्या-पलीकडे उघड्या डोळ्यांनी पाहिलें व तेथें दिसलेल्या सौंदर्याची आपल्या काव्यांत नोंद केली. जुन्या कवितेची बैठक चार भिंतीआडची ; तेथें असल्या सौंदर्याला प्रवेश कठिण होता. असलाच, तर अलंकार साधण्यासाठीं! पण त्या ओढाताणींत तें विसकटण्याचाच संभव अधिक! कवीच्या वैयक्तिक प्रचीतीची तेथें अपेक्षा नसे ; त्यामुळें ठोकळेबाज वर्णन मिळावयाचें. ह्याला अपवाद असतील, पण जुन्या कवींच्या दृष्टीने सृष्टीचा संक्षेप फक्त माणसापुरताच होता हें खरें. आधुनिक कवीची सृष्टीबद्दल, आणि काव्यविषयांबद्दल कल्पना विशाल असल्याचें वर आलेंच आहे. निसर्गांतील बहुढंगी आणि सूक्ष्म सौंदर्यें आतां काव्यांत अवतरलीं. रूप-रस-गंधांचे विशेष रेखीवपणें आले. त्यांची संवेदना व्यक्तिगत असल्यामुळें स्थळ-काळाच्या सत्याची जोड मिळाली. बालकवींच्या ‘ निश्वासां’त महाबळेश्वर आहे. पुढें माधवांनी तळकोंकणचें काव्य शब्दांत भरलें. येथेंहि व्यक्तिवैचित्र्य अमूप आहे. कोणीं आपल्या भावनांची पडछाया फुलांत ओळखली ; कोणीं त्यांत दैविकता पाहिली ; कोणीं संसारतापांतून सुटकेची वाट त्यांच्यांत शोधली; तर बालकवींसारखा रसिकश्रेष्ठ त्यांच्याशी तादात्म्य पावला. ह्या वैचित्र्यांत आणि स्वच्छंदपणांत ह्या निसर्गप्रेमाचा, आणि तें केवळ उसनें नसल्याचा, पुरावा आहे.

ह्यासंबंधीं वासुदेव बळवंत पटवर्धन ह्यांचें विवेचन † वाचण्यासारखें आहे. डोंगराळ महाराष्ट्रांत सृष्टिसौंदर्याला वाण नाही, पण “ महाराष्ट्रांतील कवींची प्रतिभा ह्या बाजूने जागीच झालेली नव्हती ;... हृदय संस्कारक्षम असावें लागतें ; तें तसें नव्हतें ... नाना रूपांनी, नाना गुणांनी आविर्भूत होणारी भौतिक सृष्टि जेथें असेल तेथें प्रतिभेच्या आविर्भावास आणि काव्याच्या स्फुरणास अवश्य असणाऱ्या कारणांपैकीं एक हजर आहे असें म्हणावयास हरकत नाही. महाराष्ट्रांत काव्योदयाचें हें प्रसादचिन्ह हजर

† ‘ काव्य आणि काव्योदय ’, पृष्ठें १९–२२.

असून तेथें त्या तऱ्हेचा काव्योदय झाला नाही. असें कां? सृष्टीच्या अंतरंगांत निजून असलेलें चैतन्य ओळखून त्याशीं गुजगोष्टी करणारी अंतर्भेदी प्रतिभा महाराष्ट्राच्या वांट्यासच आली नव्हती." निसर्गसौंदर्याबावत इतक्या उजाड असणाऱ्या जुन्या काव्याच्या उपासकांना फुलपांखरांचीं नाजूक गाणीं लिहिणारे कवी वेडसर वाटले ह्यांत आश्चर्य नाही.

फुलांप्रमाणेंच मुलें. टिळक आणि बालकवि त्यांच्यांत रमले आणि त्यांच्याविषयीं गाणीं लिहूं लागले. 'मुलांस झोडपणाऱ्या एका पंतोजीस' केशवसुतांनी धिक्कारलें आहे. शिस्तीच्या निमित्ताने मुलांस बदडणाऱ्या अडाणी पालकांची व गुरूंची त्या कर्मठ समाजरचनेंत रेलचेल होती. बालमुकुंदाच्या खोड्या रसभरितपणें वर्णन करण्यांत व ऐकण्यांत त्यांचें वात्सल्य खर्च होत असावें. मुलांनी फक्त तीं वर्णनें मार खाऊन पाठ करावयाचीं. हळूहळू आपल्या गृहजीवनांतील हा कुंदपणा कमी झाला आणि मुलें, काव्यांतहि, जरा मोकळेपणाने वागूं लागलीं. त्या समाजाने आपल्या कवींनाहि मुलांप्रमाणें 'ह्याला हात लावूं नको, तिकडे पाहूं नको' असा धाक दाखवून चार सोवळ्या बोधपर विषयांत कोंडून ठेविलें होतें!

आधुनिक कवितेंत रडवेपणाचा सूर आहे अशी एक तक्रार ऐकू येते. केशवसुत, बालकवि अथवा गोविंदाग्रज ह्यांच्या कवितांतील विषण्ण स्थळांचा निर्देश सहज करितां येईल. बहुतेक आधुनिक कवींना कसलें तरी "अनामिक आर्त-पिसें" लागलेलें दिसतें. त्यांना "अकारण हुरहूर" वाटते. म्हणून हे कवी दुबळे आणि रोगट असें इतर कांही टीकाकारांप्रमाणें माडखोलकरांचेंहि † म्हणणें. ज्यांच्या आकांक्षा मोठ्या त्यांचीं दुःखें मोठीं. पूर्णत्वाच्या सौंदर्याची तहान ज्याला लागलेली त्याला तृप्तीचें सुख विरळ. म्हणून असलें नैराश्य फक्त महान् आशावाद्यांच्याच नशिबांत असतें! उलट, "ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें" असें मानणाऱ्या अल्पसंतुष्टाला तीव्र खाजगी दुःखें कोठलीं? असलीं तरी लोकलाजेस्तव त्यांची मुस्कटदाबी करावयाची. सामाजिक दुःखांची तर जाणीवच नाही! नव्या कवितेवर आत्मपरतेमुळें खाजगी व कनवाळूपणामुळें सामाजिक दुःखांची क्वचित् काळवंडणारी छाया पडली आहे.

> "परि त्याच दीर्घ किंकाळ्या ठरतात जगाचीं गाणीं!
> निःश्वास आंत जे कढती ती स्फूर्ति लोक हा मानी"
>
> —'बालकवि'

† 'अर्वाचीन मराठी साहित्य' पाहा.

– निराशेचा विषय कोणता ह्यावर तिचा दुबळेपणा अवलंबून राहील. कांहीं आधुनिक कवींत ट्रम म्हणून व वाचकांची सहानुभूति मिळविण्यासाठीं आंसवांची झरणी लागलेली दिसेल. पण कोणत्याहि काळांत अथवा पंथांत खऱ्या-खोट्यांची भेसळ असणारच. त्रिखंड धुंडूनहि जें गवसलें नाहीं असें केशवसुतांचें 'हरपलें श्रेय' अलौकिक होतें. त्यांची निराशाहि अलौकिक होती. मामुली असमाधानाची कविता निराळी !

ह्यासारखाच पण तुलनेने ह्यापेक्षां फार महत्त्वाचा प्रश्न गूढगुंजनाचा आहे. येथें नांवापासून वाद आहे. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर ह्यांनीं सुचविलेला हा शब्द रुळला असला तरी माधवराव पटवर्धन ह्यांचा 'सायुज्य-वाद' अथवा आत्माराम रावजी देशपांडे ह्यांनी 'ज्ञानेश्वरीं'तून घेतलेला 'प्रतीति-धर्म' § हे शब्द त्या गूढतेची निश्चित व्याख्या करण्याचा प्रयत्न करतात. ह्याशिवाय 'शून्यशोधन' वगैरे शब्द आहेतच. ही नांवांची गुंतावळ येथें सोडविण्याचें कारण नाही. तसेंच, गूढगुंजनाची सर्वांगीण चिकित्साहि आवश्यक नाही. केशवसुतांच्या कांही कवितांत मनाच्या एका वेगळ्याच अवस्थेचा प्रत्यय येतो. कसल्याहि वेगळेपणाला बुजणाऱ्या साधारण मराठी वाचकाला अशी कविता रुचणें अशक्य होतें. त्याची पाठराखणी कांही टीकाकारांनीहि केली. कविता सुबोध – नव्हे, बालबोध – असावी, तिचें मर्म उघड्यावर मांडलेलें असावें, म्हणजे ग्रहणशक्तीला ताण पडणार नाही असा ज्यांचा आग्रह त्यांना विश्वांतील परम गूढाचा ध्यास लागलेली कविता आक्षेपार्ह वाटली. संस्कृत साहित्यशास्त्राने सांगितलेला 'प्रसाद' हा गुण तेथें नव्हता ; म्हणजे अन्वयार्थ सोपा नव्हता ! अशा काव्याचा अन्वय पुस्तकी तत्त्वज्ञानाने लागणार नाही, केवळ कवीच्या प्रतीतीच्या आधारेंच लागेल, हें ज्यांना उमगलें नाही अशा विद्वज्जड टीकाकारांनीहि त्याला नाक मुरडलें. कल्पनेची भव्यता ज्यांच्या कुवतीपलीकडे होती त्यांनी असें काव्य दांभिक असल्याचाहि आरोप केला. अर्थात् दांभिकपणाला येथें अवसर आहे ; पण तो सर्व ठिकाणीं आहे. उदाहरणार्थ, एकंदरींत काव्याचें अ-काव्याशीं प्रमाण फार अल्प म्हणून काव्यच नाकारण्यासारखें हें झालें ! केशवसुतांच्या अशा काव्यांतून कदाचित् स्फूर्ति मिळाल्यामुळे असेल पण त्यांच्यानंतर गोविंदाग्रज, रेंदाळकर, 'बी' यांनी तसलें काव्य लिहिलें. टिळक आणि बालकवि यांनीहि क्वचित् ते सूर काढले. ही प्रथा अशी वाढीस लागल्यामुळे बऱ्यावाईट टीकाकारांनी तिच्याविरुद्ध चहूंबाजूंनी झोड उठविली. गूढतेचा उडता वासहि त्यांना मानवेना. थोडी सूचकता

§ 'फुलवात' प्रस्तावना, पृष्ठें १४–२७ पाहा.

काव्यांत आली, तरी संस्कृतांतील ‘ व्यंजने ’चीहि सवलत तिला न देतां, गूढगुंजन म्हणून तिच्याविरुद्ध काहूर उठविण्यांत येऊ लागलें. माधव त्रिंबक पटवर्धनांसारख्या विद्वान् कवीनें केशवसुतांच्या कांही उत्कृष्ट कवितांची ह्या विकृत दृष्टीने केलेली चिरफाड § पाहून खेद होतो. जेथें पटवर्धन घसरले तेथें सामान्य वाचकाची काय कथा !

या सर्व गूढवादी कवींची भूमिका एकच आहे. अथवा त्यांचा संप्रदाय आहे असें नाही. ही वृत्ति आधुनिक नाही; सर्वकालीन आहे. प्राचीन संतकवींइतकीच रवीन्द्रनाथ ठाकूर अथवा अरविंद घोष ह्यांच्या काव्यांत ती प्रकट झाली आहे; आणि पूर्वेइतकीच पश्चिमेंतहि. इंग्लंडांतील डन्, ब्लेक अथवा वर्ड्स्वर्थ हीं नांवें प्रसिद्ध आहेतच, पण शेलीसारख्या श्रेष्ठ भावकवींतहि गूढार्थाच्या आकर्षक छटा आहेत; आणि विरळ छटांचाहि माग काढावयाचा झाल्यास ही कवींची नामावळी फार लांबेल. ह्याचा अर्थ इतकाच कीं अनेक कवींना ह्या वृत्तीने भारलेलें आहे.

पार्थिव अथवा लौकिक जीवनाला फार मर्यादा आहेत ह्या त्याच्या अपूर्णतेची ज्याला जाणीव झाली आहे त्याला पूर्णतेची, ज्ञातापलीकडील अज्ञाताची, ओढ लागते. सामान्य मनुष्य आपल्या इवल्याशा संसारांतील सुखदुःखांत इतक्या आपुलकीने गुरफटलेला असतो कीं त्यापलीकडे कांहीं असेल ह्याचा त्याला संशयहि येत नाही. जें ‘ दृष्टी ’ आड तें ‘ सृष्टी ’ आड अशी त्याची व्यवहारी समजूत आणि तें त्याचें समाधान. पण ज्याच्या दृष्टीचीं असलीं झांपडें गळलीं त्याला कसल्यातरी भव्यतेचा साक्षात्कार होतो; आणि त्यासाठीं आसावलेल्या आत्म्याला शांति मिळते.

क्षुद्रपणांतुन मी सुटलें,
जीर्ण बंध सारे तुटले,
मी माझी मज सांपडलें !

—‘ बी ’

—ह्या ‘ मी ’पणाचा, ‘ विभूती ’चा पूर्ण विकास होण्यास ‘ जनमर्यादा ’ ओलांडली पाहिजे; दिक्कालाचे “ पडदे फाडून ” चिरंतनाशीं एकतानता साधली पाहिजे. ह्या चिरंतन तत्त्वाला, ह्या विविधतेमागील एकतेला, कोणीं ईश्वर म्हटलें, कोणीं निसर्ग; कोणीं त्यांत परम-सौंदर्य पाहिलें, कोणीं प्रेम-ब्रह्म त्याच्याशी मीलनाचा, सायुज्याचा, ध्यास घेणाऱ्या वृत्तीला

§ ‘ अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक, ’ प्रथम खंड, पृष्ठें १०६–१६३, पाहा.

लागलेल्या हुरहुरींतून असलें काव्य निर्माण होतें. त्यांत एखादें निश्चित तत्त्वज्ञान हुडकणें व्यर्थ आहे. कारण त्याचा उगम कर्कश तर्कांत नसून श्रद्धेंत असतो; म्हणून केवळ बौद्धिक कसरतीने त्याची संगति लागावयाची नाही. कोठें विशिष्ट तत्त्वज्ञानाची परिभाषा ओळखीची वाटली तरी तिच्या शाब्दिक कुंपणांतच कविप्रतिभा खेळली पाहिजे असा दुराग्रह विरस करील. काव्यसमाधींत त्या अलौकिक सृष्टींतील जीं दृश्यें, जे 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास', कवीने पाहिले त्यांची तो भाषेंत मांडणी करण्याचा प्रयत्न करतो; म्हणून अशा काव्याची भाषा प्रतीकात्मक असते. वाचक ज्या प्रमाणांत त्या वृत्तीशीं समरस होईल, आपल्या परीने साधक बनेल, त्या प्रमाणांत तीं प्रतीकें तो उलगडू शकेल; इतरांस तीं कूटेंच वाटतील. रूपक हीच काव्याची भाषा ह्या शेलीच्या मताचा हाच आशय. लौकिक व्यवहाराच्या चरकांत निःसत्त्व होऊन गेलेले शब्द अलौकिक अनुभवाची साथ करण्यास असमर्थ ठरतात. "नरें मिळविलें, अहह! तेज तें पूर्वी होतें जें त्यांत." शब्द फिके पडल्यामुळें असल्या काव्याचा अर्थ अंधुक वाटतो. हा दोष कवीचा नव्हे. तो कांही अंशीं भाषेचा आणि कांही अंशीं वाचकाचा. हें न उमगल्यामुळें अशा काव्याविषयीं फार गैरसमज माजले. जें आपल्याला गूढ तें कवीलाहि गूढ; राहिला फक्त शब्दांचा पसारा आणि अलौकिक अनुभवाचें ढोंग असा उद्धट अंदाज सवंग झाला.

ह्या प्रतीतिधर्माचा काव्यांत दोन प्रकारांनी अवतार होतो. ध्येय साधल्याचा, जडाचीं सर्व आवरणें नष्ट होऊन परमतत्त्वांत विलीन झाल्याचा, उद्दाम आनंद कधी काव्य उजळतो. असीम भव्यतेचें ज्याला दर्शन घडलें त्याच्या उत्स्फूर्त उद्गारांत त्या भव्यतेचा उन्माद असतो; पण "औचित्याचा फोल विवेक" करीत राहिल्याने गोठून गेलेल्या संवेदनाशक्तीला ती खोटी बडबड वाटते. केशवसुतांनी कवीच्या अतीन्द्रिय सामर्थ्या-बद्दल लिहिलें आहे; त्याची संभावना माधवराव पटवर्धनांनी "अचाट क्लिष्ट अत्युक्ति" अशा शब्दांत केली! कधीं त्या साक्षात्कारासाठीं तळमळणारा कवि तो दुरावल्याचें दुःख काव्यांत आर्तपणें प्रकट करतो. ही आर्तता भक्तकवींच्या शेकडों अभंगांत आहे. नामदेवांनी वियोगपीडित चक्रवाक आणि आईपासून चुकलेलें मूल वगैरे उपमा देऊन एका अभंगांत आपली खंती वर्णन केली आहे. आधुनिक कवींतील त्याच भावनेवर विकलतेचा अथवा रडवेपणाचा आरोप कांही टीकाकारांनी केला!

ही दुःखाची अथवा हर्षाची उत्कटता गेल्या कांही शतकांतील पंडितकवींच्या आंवाक्याबाहेर होती. त्यांचे विषय आणि भावना थिट्या होत्या; अलौकिकाचा वाराहि त्यांना लागला नसावा. रचनाकौशल्य हेंच त्यांचें ध्येय आणि त्यांची रससाधना

संस्कृत साहित्यशास्त्राने आंखून दिलेल्या सरणींपुरतीच मर्यादित होती. अशा ह्या थिजून गेलेल्या काव्यावर ज्यांनी आपल्या रसिकतेची गुजराण केली त्यांना आधुनिक काव्यांतील हें तेज पचलें नाही.

कवितेच्या अंतरंगाप्रमाणें बहिरंगांतहि ह्या नव्या काळांत फरक पडत गेला. त्यापूर्वी कारागिरीचा अवास्तव बडेजाव असल्यामुळे, अधिकाधिक बंधनें पाळूनहि घोटीव रचना करणारा कवि आदराचा विषय होता; म्हणून संस्कृत वृत्तप्रकारांचें पंडितकवींना एवढें आकर्षण वाटत असे. तेथें करामतीला केवढा वाव होता! आर्येची रेखीव मांडणी यामुळेच त्या कवींना फार मानवली. अशा रचनेंत इतकें तांत्रिक यश मिळविण्यासाठीं आवश्यक असलेलें भाषाप्रभुत्व त्यांच्या अंगीं होतें ह्यासंबंधीं वाद नाही. पण भाषा अर्थावरहि प्रभुत्व गाजवू लागली! गण-मात्रांचा हिशेब सफाईने जुळत्रला तरी तो जुळवतांना शब्दरचना संस्कृत धर्तीवर गेली; समासांची पंगत बसू लागली. ह्या क्लिष्टतेंत क्वचित् काव्यच हरवून जात असे. अर्थाची क्लिष्टता आणि ही केवळ शाब्दिक क्लिष्टता यांतील फरक महत्त्वाचा आहे. त्यांतच मोरोपंत घराण्यांतील यमकाच्या वेडाने बरीच कविता शब्दचमत्कृतीच्या दीनवाण्या पदवीला येऊन पोंचली! भाषेच्या अतिरिक्त साज शृंगारापायीं काव्य उघडें पडलें! † साकी, दिंडी, पदें या प्रकारांचें स्वरूप मराठी वाण्याचें होतें. अभंग आणि लावणी यांसंबंधींहि तेंच खरें आहे. तेथें रचनेच्या सासुरवासानें अर्थाची कुचंबणा होत नसे. पण यांतील लावणीखेरीज इतर प्रकार अशिष्ट नसले तरी गौण मानले जात. ह्या खोट्या सोवळेपणाच्या सक्तीमुळें काव्यांतील जीवंतपणा कमी होऊन कृत्रिमतेची भर झाली. पण कृत्रिमतेशिवाय काव्य कसलें अशीच त्या काळची कल्पना! ती अजूनहि कोठें कोठें डोकें वर काढीत असते!

नव्या कवितेनें येथेंहि बंड पुकारलें; तसें नसतें तरच आश्चर्य. कारण जीर्ण बंधनांतून सुटण्याची चळवळ एकांगी राहू शकत नाही. बाह्य जीर्णता ही अंतरंगाच्या जीर्णतेशीं जखडलेली असते. केशवसुतांच्या अगोदरच वृत्तरचनेकडून जातिरचनेकडे कल दिसू लागला होता. केशवसुतांनी केलेल्या धडाडीच्या प्रयोगांनी तो बळावला. पुढें इतर कवींनी विषयानुरूप रचनेचा अंगीकार करून वैचित्र्य साधिलें. विनायकानें पदांच्या चाली पुष्कळ उपयोगांत आणिल्या. संगीत नाटकांची आवड वाढत होती. तेथील चाली काव्यप्रांतांत शिरल्या. अशा पद्यप्रकारांतील शैथिल्य उघड असलें तरी त्यांनी वृत्तरचनेच्या कृत्रिमपणांतून सुटका झाल्यामुळें कवितेला मोकळेपणा आणि

† "चातुर्याचे योगें कवित्व करिती। प्रासादिक अंग आणितां नये ॥" — तुकाराम.

प्रसन्नता कशीं प्राप्त होतात हें दाखविलें. जातिरचना गायनसुलभ असते हें तिचें अंग केवळ गायनयोग्य अशीच कविता लिहिणाऱ्या पुढील कवींच्या पथ्यावर पडलें तरी केशवसुतांच्या पिढींत ती दृष्टि नव्हती. केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज यांनी अभंग लिहिले. पण अक्षरछंदांचा प्रसार आणि त्यांतील प्रयोग होण्यास आणखी कांही काळ लोटावा लागला. ती पुढील पायरी होय. गोविंदाग्रजांच्या कांही कवितांत लावणी-पोवाड्याचा थाट बहुशः भाषाशैलींत व क्वचित् रचनेंत उतरला आहे.

इंग्रजींतील 'सॉनेट' हा पद्यप्रकार ह्याच सुमारास मराठींत आला. येथेंहि पहिलेपणाचा मान केशवसुतांचाच. शेक्सपिअर, ड्रमंड यांच्या तशा कवितांचीं त्यांनी भाषांतरें केलींच; पण त्या प्रकारावर त्यांचें इतकें मन जडलें की ते "एखाद्या मिशनरीप्रमाणें त्याचें प्रतिपादन करून चतुर्दशपद्या रचण्याविषयीं शिफारस करीत." 'चतुर्दशपदी' हें केशवसुतांनी दिलेलें साधें संख्यावाचक नांव. पुढें त्याला नांव काय द्यावें ह्याविषयीं रण माजून 'सुनीत', 'स्वनितका'पासून तों 'शुनीत', 'सण्णाट' असल्या उपहासदर्शक नांवांपर्यंत मजल गेली. यांपैकीं 'सुनीत' हें सुटसुटीत नांवच पुढें रूढ झालें. सुनीताची बांधणी, त्याची यमकरचना, त्यांतील ओळींची संख्या, यांबाबत आरंभीं अनिश्चितता होती. कदाचित् तिच्यामागें प्रयोगबुद्धि असेल. उदाहरणार्थ, केशवसुतांनी कांहीं इंग्रजी सुनीतांचीं सोळा ओळींत भाषांतरें केलीं. शेवटच्या चार ओळींसाठीं निराळें वृत्त उपयोगांत आणिलें; किंवा चौदा ओळी ठेवूनहि शेवटच्या दोन ओळींत वृत्त बदललें! टिळकांनी मात्रा-वृत्तांत सुनीत-रचना केली. रेंदाळकरांनी निर्यमक सुनीतें लिहिलीं. यांशिवाय तांबे, नागेश वगैरे त्या पिढींतील आणि नंतरच्या पिढींतील अनेक कवींनी सुनीताचा फैलाव केला. हा काव्यप्रकार इंग्रजींतून उसना घेतलेला म्हणून परंपरानिष्ठ टीकाकारांनी त्याविरुद्ध कोलाहल केलाच. असेच एक कडवे पुराणमताभिमानी कवि अनंततनय ह्यांनी त्याला विरोध करितांना तो "आर्यपद्धतीप्रमाणें" नसल्याचें लिहिलें. पण पुढें त्यांचें मत बदललें आणि त्यांनी स्वतःच सुनीतें रचिलीं. 'सॉनेटा! तूं जरिहि परकी ज्ञानवान् सद्गुणी रे" असें त्याला काव्यांत शिफारसपत्र दिलें; इतकेंच नव्हे तर मोरोपंतांवर एक सुनीत लिहिलें! कालपुरुषाच्या उपरोधाची ही चुणूक वाटते!

केशवसुत व इतर आधुनिक कवी यांना सुनीताचें इतकें आकर्षण वाटण्याचीं मुख्य कारणें हींच असावींत कीं तें भारदस्त असून इतकें साधें असतें. त्याच्या मर्यादित लांबीमुळें पोकळ रचना टळून त्यांत अर्थगांभीर्य येतें आणि त्यांतील आंदोलनामुळें आत्मपरतेची छटा चढते. अलंकारांच्या अतिरेकामुळें फुगलेल्या आणि

ढिसाळ काव्यरचनेवर नेटकेपणाची शिस्त लावण्यासाठीं सुनीत हाच चांगला तोडगा होता. सर्व आधुनिक कवींच्या प्रकृतीला तो योग्य ठरला नसला तरी विचारप्रधान त्रुटित रचनेसाठीं कांहींना त्याचा निश्चित उपयोग झाला. §

रचनेंतील साधेपणाकडे प्रवृत्ति वळवल्यामुळें अलंकारांचा, विशेषतः शब्दालंकारांचा, सोस कमी झाला. ह्या अलंकारांच्या अतिरेकामुळें बोंगेबाज दिसणारी जुनी कविता मागें पडूं लागली. संस्कृत साहित्यशास्त्र प्रमाण समजणाऱ्या रसिकाला कांहीं काळ चुकल्यासारखें वाटलें असेल. पण त्याची रसिकता जिवंत असल्यास या सर्व जाचांतून सुटका झाल्यावर स्वतंत्र बाण्याच्या नव्या कवितेनें त्याला सुखावलें असेल. " संस्कृत भाषेंतील साहित्यशास्त्राच्या भरभराटीचा काळ म्हणजे हिंदुसमाजाच्या नीतिभ्रष्टतेचाच काळ. अलंकारांचे किचकट व अतिशय सूक्ष्म भेद व विभाग काढणें हें देखील संस्कृत काव्यमीमांसाशक्तीला म्हातारपण आल्याचेंच चिन्ह होय "– हें महादेव मल्हार जोशी ह्यांचें मत* त्या साहित्यशास्त्राचा मराठी कवितेवरील पगडा अभ्यासितांना विचारांत घेण्यासारखें आहे. अशा शास्त्रांच्या, गैरलागू विद्वत्तेच्या, वळजोरीनें मराठी कविता सुकत चालली होती. कवीपेक्षां साहित्यशास्त्राची प्रतिष्ठा वाढली होती.

टीकाकारमतानुसार रचना जातां करूं सत्वर
रम्योद्यान उजाड रान अवघें होईल – शंका नको !

– ह्या उजाड रानांत हिरवळीचा ताजेपणा आणणाऱ्या नव्या काव्याचा मोठा वैरी म्हणजे जुना टीकाकार. त्यानें विदारक टीकेचें थैमान मांडलें, कारण त्याच्या विद्वत्तेची मिरास धोक्यांत आली होती. पण–

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे ?–पुसतों तुम्हांला

–असा केशवसुतांनी खडा सवाल टाकला. विद्वज्जड टीकाकार आणि स्वच्छंद कवि

---

§ ह्यासंबंधीं 'काव्यचर्चा' ह्या ग्रंथांतील ना. म. भिडे ह्यांचा 'चतुर्दशपद कविता अथवा सुनीतविचार' (पृ. १६३-१८५) व 'काव्यविचार' ह्या ग्रंथांतील श्री. वा. रानडे ह्यांचा 'सुनीत' (पृ. ४०-५५) हे लेख पाहावे.

* 'काव्यचर्चा', काव्य व संस्कृत साहित्यशास्त्र, पृ. ८७ पाहा.

यांतील हा झगडा फार वर्षें टिकला व त्यांत एकंदरीने कवीचीच सरशी झाली असें म्हणावयास हरकत नाही.

केशवसुतांच्या युगाला प्रारंभ होऊन साठ वर्षें लोटलीं तरी आधुनिक कवितेसंबंधीं अजूनहि तुच्छतेचे उद्गार कांही ठिकाणांतून निघतातच. मोरोपंत ही मराठी काव्यप्रतिभेची सीमा असें मानणाऱ्याला आधुनिक कविता समाधान देऊं शकत नाही. आणखी कांही पूर्वग्रह आधुनिक काव्याचीं उणीं सदैव काढीत असतात. त्यांपैकीं कांहींचा येथें उल्लेख करितों.

नव्या कवितेचा तोकडेपणा हा कित्येकांना प्रतिभेच्या कमजोरीचें लक्षण वाटतो. ओळींच्या संख्येनें काव्याचे गुण जोखणाऱ्यांचा उल्लेख ह्यापूर्वीच आला आहे. जुनें काव्य कथानकप्रधान असे. क्वचित् तसें नसलें तरी कुठेंहि उपमा-उत्प्रेक्षांची बेसुमार लांबण लावतां येत असे. तेव्हां काव्याच्या प्रसाराचें एक प्रमुख साधन म्हणजे हरदास असे हें लक्ष्यांत ठेवावें. म्हणून काव्याचीं ‘आख्यानें’ होऊ लागलीं! नव्या कवितेच्या अंतर्मुखतेला अशी लांबण अयोग्य वाटते, कारण अशा सैल रचनेंत भावनेच्या उत्कटतेला आणि एकतानतेला बाध येतो. केवळ शब्द पिंजून अथवा कल्पनांचा घोळ घालून काव्याचें मातेरें करण्याचें पाप क्वचित् गोविंदाग्रजांसारख्या आधुनिकाकडूनहि घडलें आहे. वस्तुतः त्रुटिक काव्यरचना हा आधुनिक ‘पोरखेळ’ आहे ही कल्पनाच चुकीची. “काव्याचा उगम पुराणांत किंवा महाकाव्यांत नसून प्रासंगिक स्फुट भावगीतांत आहे अशीच संस्कृत साहित्याची परंपरा होती. †” प्राकृताने ही परंपरा चालविली आणि पुढें मराठीने. मुद्रणाच्या अभावामुळे बरीच स्फुट कविता अल्पजीवी ठरली असावी आणि सलग पाठांतरासाठीं दीर्घ कविता सोयीच्या वाटणारच. मुद्रणकलेचा इतका प्रसार झाला आणि सामाजिक जीवनावर तिचे खोल परिणाम झाले तरी ते नसल्याचा बहाणा करून परंपरेचा कांगावा करीत राहणारे टीकाकार दुराराध्यच म्हटले पाहिजेत.

‘कविपंचकां’त आधुनिक कवितेचा गौरव करणाऱ्या माडखोलकरांनी पंधरा वर्षें उलटल्यावर ‘अर्वाचीन मराठी साहित्यां’त तिच्यावर हल्ला चढविला आहे. ‡ त्यांच्या

---

पुरुषोत्तम मंगेश लाड, ‘मधुपर्क’, पृष्ठें ७३–७८.

‡ ‘अर्वाचीन मराठी साहित्य’, पृष्ठें ६–९.

मतें ह्या कवितेची " हांक फक्त इंग्रजी शिकलेल्या पांढरपेशा सुशिक्षितांपुरतीच मर्यादित आहे ", आणि ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, इत्यादि जुन्या कवींचें सामर्थ्य व " भावनांची आणि विचारांची विशालता " तिच्यांत नाहीं. तसेंच ती " प्रणयप्रधान, आत्मपर, त्रुटित " आहे. ह्यापूर्वीच्या विवेचनांत अशा आरोपांना उत्तर दिलेलेंच आहे. आधुनिक कवितेने ज्या पंडिती परंपरेविरुद्ध बंड केलें तिचा उल्लेख माडखोलकरांनी टाळला आहे. साधारणतः जुनी कविता बहुजनसमाजासाठीं होती, ती " साऱ्यांच्या काळजाला हात " घालत असे हा एक नवा भ्रम आहे. तिच्यांत सत्य आहे तें अत्यंत मर्यादित आहे, — भक्तिविषयक कवितेपुरतेंच! एरव्हीं, त्या समाजाप्रमाणेंच त्याच्या साहित्याचेहि जातवार तुकडे पडल्याचें वर: आलेंच आहे. प्रणयप्रधान काव्य माडखोलकरांना पसंत नाही. तें त्यांना ' स्त्रैण ' वाटतें. हा खाजगी आवडीचा प्रश्न आहे. पण जुन्या काव्यांतील प्रणयाची चर्चा झालीच आहे. आधुनिक काव्य परभृत आहे, म्हणजे त्यांत इंग्रजांची गुलामगिरी आहे, हा त्यांचा आक्षेप सर्वच जीर्णप्रेमी सर्वच नव्या गोष्टींविरुद्ध घेत असतात. त्याने आपल्या जीवनाचा अथवा साहित्याचा विकास थांबलेला नाही! उलट इंग्रजी काव्याच्या तोडीचें सामर्थ्य मराठींत आणण्याची ज्यांची ईर्ष्या, व तें कांही प्रमाणांत ज्यांनी आणिलें, त्यांच्या स्वाभिमानाचाच गौरव केला पाहिजे! पण येथें वासुदेव बळवंत पटवर्धनांचीं जुन्या कवितेसंबंधीं आणखी कांहीं वाक्यें उद्धृत करावींत. " एक भक्तिभाव हा विषय सोडून दिला म्हणजे, मराठी वाङ्मयांतील बाकीची सारी कविता प्रायः कथानकात्मक आहे; आणि तीहि परपुष्ट आहे. स्वतःच्या अक्कलेने रचिलेल्या कथा, स्वतःच्या कल्पनेने उभारलेलीं चरित्रें आमच्या वाङ्मयांत क्वचित् आढळतील...... सांगितलेल्या गोष्टी पुनः सांगणाऱ्या मुलांची हुषारी आमच्या कवींच्या अंगीं विशेष होती. " * एकूण उसनवारी करावयाची, ती अशा मूळांत परपुष्ट पण आतां मृतप्राय झालेल्या परंपरेंतून करावयाची, कीं इंग्रजी वाङ्मयाच्या जीवंत परंपरेंतून इतकाच प्रश्न उरला! " तातस्य कूपोऽयम् "चा वास मारणारा असला अभिमान साहित्यांत तर अगदींच अनाठायीं आहे. पण खुद्द माडखोलकरांनीं हे आक्षेप उच्चारण्यापूर्वीच एक तप त्यांना उत्तर देऊन ठेविलें आहे. §

इंग्रजींतून कांहीं उसनवारी नव्या मराठी कवितेने केली असेल ती पचवली आणि तिचा पुरा कस आपल्या रक्तांत आणिला. पुनरुज्जीवित कवितेंत जी रग

* 'काव्य आणि काव्योदय', पृ. ४१–४२.

§ 'काव्यविचार', केशवसुतांवरील निबंध पाहा.

आहे तिचा कितीसा अंश त्यापूर्वीच्या शतकांतील परंपराग्रस्त पद्यांत आहे ? किंबहुना, ही नवी कविता त्या जुन्या कवितेपेक्षां बाण्याने अधिक मराठी आहे. जुन्या परीटघडीच्या कृत्रिम रचनेच्या तुलनेने तिचा रांगडेपणाहि मराठमोळा आहे. अनेक वेदनांनी गांजलेल्या मराठी माणसांचे व्याकुल निःश्वास आणि त्यांतूनहि सुंदर भविष्याचीं स्वप्नें निरखणारी आशा यांची ऊब ह्या नव्या काव्यांत आहे.

ही नवी कविता केशवसुतांपाशीच थबकून राहिली नाही. तिचा ओघ त्याच जोमाने चालू आहे. तिचीं सर्वच वळणें सर्वांना आवडलीं नाहीत. कांही उच्छृंखळ वाटलीं. तरी या वळणांवळणांतूनच तिचें सौंदर्य आणि चैतन्य वाढत आहे. ह्या पुस्तकांतील पांच कवींचा डौल पांच वेगवेगळ्या तऱ्हांचा आहे. केशवसुतांचें नांव इतरांनी घेतलें तरी तें आदरभावाने; आंधळी नक्कल केल्याची कबुली म्हणून नव्हे. म्हणून ‘ केशवसुतांचा संप्रदाय ’ हा शब्दप्रयोग विशेष न ताणतां तारतम्याने घ्यावयाचा. त्या अर्थाने तो संप्रदाय अजून जागा आहे. केशवसुतांच्या मृत्यूला चाळीस वर्षे लोटलीं तरी त्याचा जोम ओसरलेला नाही. कवींच्त्रींतून तो पुढे झेप घेत आहे.

# ५

# कवि

# १ केशवसुत

## [ कृष्णाजी केशव दामले, १८६६–१९०९ ]

“ केशवसुता, तूंही कवींचा कवि.”

आधुनिक कवितेचा हा जनक निश्चित कोणत्या दिवशीं मृत्यु पावला ह्यासंबंधीं कालपरवांपर्यंत वाद होता. जो कधी मेला हें नीट ठाऊक नाही, तो कसा जगला ह्याची माहिती अगदींच अपुरी आहे ह्यांत आश्चर्य कसलें ! ही अनास्था केशवसुतांना खुपत असावी असें अनुमान काढण्यास हरकत नाही. त्यांची वृत्ति किंचित् एकलकोंडेपणाची असली तरी त्यांच्या अस्थिर आयुष्यांतहि त्यांना मित्र लाभले. शाळकरी दिवसांत हरि नारायण आपटे, नारायण वामन टिळक, पुढें प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन, नरहर शंकर रहाळकर, कवि विनायक, किरात, माधवानुज, हे त्यांचे नांव मिळविलेले मित्र. इतर अनेक असतीलच. ह्यांपैकीं रहाळकरांशिवाय केशवसुतांविषयीं कोणी लिहिलेलें नाही आणि रहाळकरांनीहि केशवसुत ह्या व्यक्तीऐवजीं कवीविषयींच प्रामुख्याने लिहिलें आहे. त्यांच्या कवितांचा संग्रह १९१७ मध्ये प्रथम हरि नारायण आपटे ह्यांनी प्रकाशित केला; पण त्यांत कवीविषयीं त्यांनी मौनच पाळलें. मात्र ह्या संग्रहाच्या प्रकाशनाने काव्यरसिकांत केशवसुतांविषयीं जागृति उत्पन्न होऊन, मुख्यतः वासुदेवराव पटवर्धनांच्या परिश्रमांमुळें, ‘ केशवसुतदिन ’ साजरा करण्याची प्रथा पडली. कवींचे कनिष्ठ बंधु सीतारामपंत ह्यांनी १९२१ मध्ये पुनश्च समग्र संग्रह प्रसिद्ध करून त्याला कविचरित्रविषयक विस्तृत प्रस्तावना जोडली. ह्या बंधूंच्या वयांतील बारा वर्षांचें अंतर, केशवसुतांचीं नोकरीनिमित्त वारंवार झालेलीं स्थलांतरें आणि मूळ घराशी सुटलेला संबंध ह्यांमुळें त्या चरित्रांत ऐकीव माहितीचा तुटकपणा आला असला तरी त्याची स्थूल रेखा मनांत ठसते.

कोंकणांतील आडगांवीं जन्म आणि बालपण; शिक्षणासाठीं बडोदें, वर्धा, नागपूर पुणें; पुढें शिक्षक म्हणून मुंबई, फैजपुर, भडगांव, सावंतवाडी व धारवाड, – अशी यात्रा परिस्थितीच्या जुलमाने त्यांना पडली. कोठें पाऊल टिकलें नाही. दारिद्र्याला मानीपणाची धार, म्हणून वरिष्ठांशी सहसा पटलें नाहीच, पण सुस्थितींतील बंधूंचीहि मदत स्वीकारली नाही. “ निःस्पृह, बाणेदार, करारी ” हीं टिळकांनी त्यांना लावलेलीं

विशेषणें पोकळ उपचारांचीं नाहीत. केशवसुतांच्या काव्याचें जिवंतपणीं कौतुक तर झालें नाहीच पण त्याच्या वेगळ्या स्वरूपामुळें त्याची टवाळीच फार झाली असावी. त्यांना खंती वाटली असेल तर ती आपली अवहेलना झाली ह्यापेक्षां खऱ्या कवितेची वूज महाराष्ट्रांत राहिली नाही ह्याचीच असेल. पहिला आधुनिक आत्मपर कवि म्हणून त्यांना आपण गौरवितों तरी केवळ खाजगी तक्रारींचीं रडगाणीं त्यांनी लिहिलीं नाहीत. आपल्या इवल्याशा संसारांतील नफ्या-तोट्याच्या स्वार्थापर्यंत आत्मपरत्वाचा संकोच करणाऱ्या कांहीं कवींशी तुलना केल्यास केशवसुतांच्या कविवृत्तीची धीरगंभीर विशालता ध्यानांत येईल. त्यांचें छायाचित्र कधी निघालें नाही; काढून घेण्याचें त्यांनी कटाक्षाने टाळलें. 'कवि तो होता कसा आननीं' ह्याचें कल्पनाचित्र रेखाटण्या इतकाहि तपशील कोणी मागें ठेविलेला नाही. फक्त रहाळकरांनी त्यांचे डोळे 'पाणीदार' असल्याचें म्हटलें आहे. त्या पाणीदारपणांत त्यांच्या आंतरिक काव्य-जीवनाची रूपरेषा प्रतिबिंबित झाली असावी.

पण विशाल संसाराची ओढ लागलेल्या ह्या कवीला आपल्या संसाराविषयीं आसक्ति नव्हती असा उथळ निष्कर्ष कधींकधीं काढला जातो, तो खरा नव्हे. त्यांच्या प्रणयगीतांतील उन्माद हा कल्पनेच्या ठरीव संकेतांतून उपजला असणें शक्य नाही. तसेंच आपले आई-वडील व भावंडें यांच्या ताटातुटीचे कढ कांही कवितांत इतक्या स्पष्टपणें उमटले आहेत कीं सामाजिक बंडखोरीची आणि अलौकिकाच्या शोधाची ओजस्वी कविता लिहिणाऱ्या ह्या माणसांत अथांग कोमलपणा होता ह्याचा प्रत्यय येतो.

केशवसुतांना समाजसुधारणेची तळमळ लागली होती, तस्मात् राजकीय स्वातंत्र्याविषयीं ते उदासीन होते, हें माडखोलकरांचें तर्कशास्त्र दोन तपांपूर्वी बहुजनसमाजाच्या सहज पचनीं पडलें असतें. मेळ्यांची सवंग देशभक्ति लोकप्रिय असण्याचा तो काळ होता. नवे विचार म्हणजे देशद्रोह हें तेव्हांचें सोपें समीकरण! पण केशवसुतांच्या कविता फक्त वाचल्या तरी सुजाण माणसाला असल्या आरोपांतील फोलपणा कळून येईल.

आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो!
ऐकायाला श्रुतिहि नसती पारतंत्र्यामुळें हो!

........................................

आनंदाचे समयिं मजला पारतंत्र्य स्मरून
वाटे जैसें असुख, तितुकें अन्य वेळीं गमे न!

हे विद्यार्थिदशेंत केशवसुतांनी काढलेले उद्गार फार तर नाटकीपणांतच कमी पडतील, इतका त्यांचा आवेग प्रामाणिक आहे. पुढच्याच वर्षी लिहिलेल्या एका कवितेला ‘स्वतंत्रतेची पहांट’ केव्हां उगवेल ह्याच्या आंसवांनी भिजलेल्या गोष्टी करीत ज्याच्या-बरोबर रात्री जागून काढल्या तो मित्र देशसेवेसाठीं कोठें नाहीसा झाला ह्याची दुःखी कहाणी आहे. तिच्या इमानाची शंका घेणें धाडसाचें काम आहे. केशवसुतांच्या चरित्रांतील हीं अज्ञात प्रकरणें कधींकाळीं प्रकाशांत आलीं तर त्यांचें व्यक्तित्व किती उजळून निघेल !

केशवसुत निर्व्यसनी होते ह्याचा कटाक्षानें उल्लेख केला पाहिजे. कारण सुधारका-विषयीं समाजाची दृष्टि तेव्हां इतकी गढूळ असे कीं पराचा सहज कावळा बनावा आणि कुत्सित टोंचणी सुरू व्हावी. आगरकरांसारखा शीलाचा कणखरपणा असल्याशिवाय त्याला तोंड देणें अशक्य. पण माडखोलकरांना केशवसुतांत ‘स्त्रैणपणा’ आणि ‘विकलपणा’ आढळला ! स्त्रीविषयक काव्य लिहिलें म्हणून ‘स्त्रैणपणा’ आणि उदात्त ध्येयाच्या अप्राप्तीने लागलेली हुरहूर म्हणजे ‘विकलपणा’ इतकाच त्यांचा अर्थ असावा. केशवसुतांना व्यसन होतें तें कवितेचें. “हीन दीन झालों छंदी फंदी मी तुझिया नामीं.” त्यांच्या गरिबीच्या आणि भटक्या आयुष्याच्या मानाने त्यांनीं काव्याचा अभ्यास पुष्कळ केला असें दिसतें. मराठी कवींपैकीं तुकाराम हे त्यांचे विशेष आवडते. त्यांच्या वृत्तीचा बळकटपणा आणि शैलीचा फटकळ साधेपणा केशवसुतांत उतरला असें म्हणतां येईल. इंग्रजी कवींचा व्यासंगहि त्यांनी कसोशीने केला. विशेषतः Golden Treasury हा प्रसिद्ध कवितासंग्रह त्यांना फार प्रिय असल्याचे अनेक उल्लेख आहेत. त्यांतील कांही कवितांची आठवण केशवसुत वाचतांना होते, ह्या गोष्टीला फार ताण देऊन त्यांच्यावर प्रच्छन्न रूपांतरें केल्याचा आरोप क्वचित् होतो तो अगदींच व्यर्थ आहे. सांगून-सवरून पो कवीच्या Raven वरून लिहिलेली ‘घुबड’ ही कविता मूळाहून सरस असल्याची माधवराव पटवर्धनांसारख्या, केशवसुतांबावत पक्षपाताची ज्यांच्यासंबंधीं शंका घेता येणार नाही अशा, टीकाकारानेहि कबुली दिली आहे. प्रतिभेची उसनवारी करितां येणें शक्य असतें तर खरें काव्य इतकें दुर्मिळ झालें नसतें ! केशवसुतांची एकच इंग्रजी कविता आपणांस माहित आहे. ती व त्यांच्या इंग्रजी पत्रांतील कांही उतारे वाचून त्या भाषेंतहि ते डौलदार लिहू शकत असें दिसतें. संस्कृत भाषेचा त्यांचा अभ्यास गाढ असावा ह्याचा पुरावा भाषांतरांपेक्षांहि त्यांच्या संस्कृत शब्दांच्या रेखीव योजनेंत आढळेल. अशा विविध व्यासंगाने त्यांच्या कवित्वाचा ताजेपणा हरपला नाही. त्याचें सत्त्व त्यांनी शोषून घेतलें पण कवि म्हणून आपलें स्वत्व गमावलें नाही !

कवि आणि काव्य हा केशवसुतांच्या सुमारें वीस कवितांचा विषय आहे. कवीला दिव्य दृष्टीचें देणें असतें; तिच्या सामर्थ्यानें तो निर्जीवांतील जीव पाहतो आणि दिक्कालाचा भेद करून मुक्तात्म्याप्रमाणें विश्वांत अनिरुद्ध संचार करतो. पण अशा अक्षय आनंदाने बेहोष होणारा कवि " जगांतील महाक्रान्तीचें तें भविष्य सांगाया " जागृत असतो. जुलुमांविरुद्ध क्रान्तीची उठावणी करण्यास, सत्तांध माणसांइतकेंच देवाविरुद्धहि झगडण्यास, दलितांना स्फूर्ति देणें हें त्यांचें कार्य. हा कविगौरव माधवराव पटवर्धनांना§ 'चमत्कारिक' व 'रोगटपणाचें लक्षण' वाटतो. माडखोलकरांच्या मतें हा " एक मानसिक विकलतेचा किंवा विकृतीचा प्रकार " आहे. +पटवर्धनांना जो 'रोग' वाटतो त्याची लागण आजवर बी, टिळक, तांबे, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, बालकवि, इत्यादि अनेक श्रेष्ठ कवींना झाली असें प्रा. कुसुमावती देशपांडे ह्यांनी या आरोपांना दिलेल्या मार्मिक उत्तरांत म्हटलें आहे. † त्याच लेखांत केशवसुतांच्या काव्यविषयक विचारांचें वेधक विवरण आढळेल. अर्वाचीनांचा दाखला माडखोलकरांसारख्या प्राचीनांच्या अभिमान्याला पटला नाही, तरी कवीला 'मुमुक्षूचें अंजन' आणि 'सामर्थ्यवंताची सत्ता' अशा किंवा ह्यांहून चढ्या शब्दांत वंदन करणाऱ्या रामदासांनाहि ते दुबळे ठरविणार? केशवसुतांच्या " वैवाहिक जीवनांत कांहीं तरी न्यूनता उत्पन्न " झाल्याची माडखोल-करांची शंका धाडसी आहे! काव्याचा शब्दशः अर्थ लावून असले भडक निष्कर्ष काढणें धोक्याचें आहे. केशवसुतांनी कवीचें सामर्थ्य वर्णन केलें म्हणजे त्यांनी स्वतःभोंवतीं दिवे ओंवाळून घेतले असें नाही. 'भृंगा' ह्या कवितेंत 'मी गणमात्रा जुळणारा', तेव्हां-

" 'कवि' आम्हांलागुनि म्हणणें
कविशब्दार्था लोळवणें !
अस्मद्गान नव्हे 'गान'
तें गाना चिंध्यादान. "

—अशी त्यांनी स्वतःची केलेली संभावना वाचून त्यांना न्यूनगंडाची बाधा झाली होती असा घोर अंदाज बांधणें तेवढेंच अनुचित ठरेल. कविप्रतिभेच्या अपार तेजोबलाची केशवसुतांना जाणीव झाली होती; उपासकभावाने, कधीं साधकाच्या ओजस्वी श्रद्धेने,

---

§ 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' प्रथम खंड, पृष्ठ १०६ व पुढें.

+ 'अर्वाचीन मराठी साहित्य', पृ. १२.

† 'कवींची काव्यदृष्टि', मौज, दिवाळी अंक, १९४५.

त्यांनी तिचें संकीर्तन केलें; आपलें नव्हे. उपास्य दैवतावर प्रणयिनीचा आरोप करण्याची प्रथा सनातन आहे; ती केवळ हिंदी नसून इस्लामीहि आहे. मात्र, केशवसुतांत वावळट भक्तीचें ढोंग नाही. त्या तेजाची एक ठिणगी तरी आपल्यांत उतरावी ही त्यांची दुर्दम मनीषा; कारण त्या तेजाने भोंवतालचें कोंदाटलेलें आणि ‘ रोगट ’ जग त्यांना धुवून काढावयाचें होतें! काव्याविषयीं मेलेल्या कल्पना उराशी आवळणाऱ्या त्या जगाला जिवंत काव्याची झळाळी सहन होणें शक्य नव्हतें. त्याची मनधरणी करणारे प्रवाहप्रतित होतेच. केशवसुतांनी बेडर आत्मविश्वासाने त्या समाजाशी झुंज घेतली. त्यासाटीं पाजळलेलें त्यांचें कवित्वशक्ति हें अस्त्र; त्याची ही चमक आहे. येथें क्षुद्र अहंकार नाही. जगन्नाथपंडिताच्या अथवा “ भवभूतीच्या बेपर्वा अहंमन्यतेचा ध्वनि ” केशवसुतांच्या अशा ओळींत उठतो हें म्हणणें § अन्यायाचें आहे.

अशीच राठ टीका केशवसुतांच्या ‘ गूढगुंजना ’वरहि झाल्याचें वर आलेंच आहे. येथें त्या प्रश्नाचा विस्ताराने उकल करणें शक्य नाही. इंद्रियें अथवा बुद्धि यांना अगम्य अशा भव्य सौंदर्याची केशवसुतांना आलेली प्रतीति तुम्हांआम्हांला सहसा येत नाही म्हणून ती प्रतीतीच खोटी, म्हणजे केशवसुत खोटे, असलीं विधानें धूर्तता दाखवितात, रसिकता नव्हे. पण त्या ‘ अगम्य ’तेचाहि फार बाऊ केला जातो. जगांतील अनेक सौंदर्यांना मठ्ठपणामुळें आपण मुकतों. केशवसुतांसारख्या कवीच्या तरल दृष्टीला तीं दिसलीं व तसें त्यांनी म्हटलें हा त्यांचा दोष खास नव्हे! ह्या लौकिक सौंदर्यांत त्यामागील अलौकिक सौंदर्याची चाहूल घेणारा कवि गूढतेंत शिरतो हें खरें. ती लागली तर विलक्षण हर्ष आणि चुकली तर विदारक खेद असे भावनांचे अमर्याद हेलकावे ‘ भीड भाड ’ सोडून घेणाऱ्या त्या कवीला पाहून व्यवहाराला जुंपलेल्या संभावित संसारी माणसाला भोंवळच येणार. ‘ झपूर्झा ’ अथवा ‘ हरपलें श्रेय ’ यांसारख्या काव्याच्या रहस्याचा माग काढण्यास उदंड तकवा हवा आणि विनीतवृत्ति हवी. त्याच्या परिमळानें भारावलेल्या अनेक कवींनी पुढे ती दिशा धरली; कांही चार पावलें पडलीं नाहींत तोंच गूढ-मधुर शब्दांच्या भोंवऱ्यांत सांपडून आपल्याच भोंवतीं गिरक्या घेत राहिले. पण अशा सर्व आधुनिक कवींना केशवसुतांनी काव्याचे वंद तोडून टाकले ह्याची नेहमी कृतज्ञ आठवण राहिली व राहील. केशवसुतांच्या प्रतिभेच्या ह्या भेदकतेचा योग्य गौरव कांही कवींनी केला आहे.

---

§ बाळकृष्ण अनंत भिडे, ‘ काव्यचर्चा ’, पृष्ठ २१७.

"ये ये कृष्णा ! चढव अपुला सूर जो मौतिकाला
विंधी, जाई वरति-वरती भेदुनी अंतराला"

— टिळक.

"जिनें आतांही मारितां भरारी
गूढ गगनें भेदुनी पार सारीं
तत्त्वरत्ना उघडिल्या दिव्यखाणी
तीच कृष्णाची महाराष्ट्रवाणी"

— गोविंदाग्रज.

— ही स्वातंत्र्याची लालसा काव्याच्या सर्व अंगांना स्पर्श करते. फार काळ विद्वज्जड टीकाकारांच्या आणि नीरस पद्यकारांच्या करड्या हुकमतीखालीं वागलेलें मराठी काव्य केशवसुतांत चवताळून उठलें.

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे ? पुसतों तुम्हांला.

— प्रीतीच्या तंत्राप्रमाणें काव्याचें तंत्र सांगणाऱ्या पढतमूर्खांचा केशवसुत उपहास करतात. कविता स्वच्छंद असते; कोणाच्या खुशामतीसाठीं ती नटीप्रमाणें रंगणार नाही असें ते बजावतात. तोंवर बाह्यांगाची केवढी आञ्चता होती ! केशवसुत त्यासंबंधीं उदासीन आहेत. अंतरंग हेंच काव्याचें सर्वस्व ही त्यांची निष्ठा कृतींत उतरली. त्यांचें काव्य हा शब्दांचा खेळ नाही. उत्कट भावना आणि त्यांतून स्फुरलेल्या कल्पना ह्यांचीच फक्त प्रतिष्ठा. शब्द आणि पद्य हीं केवळ त्या व्यक्त करण्याचीं साधनें; म्हणून गौण. अलंकारांचें दडपण त्यांनी झुगारून दिलें. काव्यविषयाने मनांत निर्माण केलेल्या प्रतिमा हेंच काव्याचें खरें ऐश्वर्य ही त्यांची व बहुतेक आधुनिक कवींची भूमिका आहे. शब्दाऐवजीं अर्थाला प्राधान्य दिल्यामुळे केशवसुतांच्या कवितेंत सामान्य वाचकाला मोहिनी घालणारा शैलीचा गोडवा आढळत नाही. त्यांची रचना खडबडीत, गद्यप्राय आणि म्हणून नीरस आहे अशी टीका होते. तींत तथ्य आहे पण तें फार थोडें. बालकवींच्या भाषेंतील सहज-माधुर्य केशवसुतांत नाही. केवळ नादानेच

डोलवयास लावतील अशीं तांब्यांसारखीं गीतेंहि त्यांनीं लिहिलीं नाहीत. पण केशवसुतांच्या काव्याची प्रकृति विचारशील आहे; तांबे-बालकवींची तशी नाही. ज्या काव्यांतील ओळीओळींत विचाराच्या गाम्भ्याला हात घालवयाचा तेथें नादाची गुंगी हा दोषच ठरेल. तेथें शब्दाचें काम बुद्धीला चेतना देणें हें आहे; तिच्यावर गोड फुंकर घालून तिला भूल घालणें हें नव्हे. अशा कवितेला हीं बाह्यसौंदर्यें अनावश्यकच नाहीत तर अपायकारक ठरतात. भाषेच्या धुंदींत बालकवीसारखा सच्चा कलावंतहि क्वचित् घसरतो; कल्पना आणि शब्द ह्यांची पुनरावृत्ति होते. केशवसुतांत ती होत नाही इतकी त्यांची ओळन् ओळ स्वतंत्र आहे ह्याचें महत्त्व जाणलें पाहिजे. गोविंदाग्रजांत तर भाषेच्या वेडाने काव्याची अनेक ठिकाणीं हानि झाली आहे हें बहुतेक टीकाकार मान्य करतात. नादमाधुर्याच्या हव्यासामुळे गेल्या कांही वर्षांतील मराठी 'भावगीतें' कोणत्या अर्थहीन अवस्थेपर्यंत पोंचलीं आहेत हें पाहिल्यावर केशवसुतांच्या साधेपणाचें मर्म मनांत भरेल. आवेश हा ज्या कवितेचा पहिला गुण तिला नरम आणि नखरेल शैली कशी शोभणार? रॉबर्ट ब्राउनिंग ह्या प्रसिद्ध इंग्रजी कवीचें केशवसुतांशी ह्या बाबतींत साधर्म्य आहे: ब्राउनिंगविरुद्धहि अशीच हाकाटी करण्यांत येत असे.

ह्यामुळे केशवसुतांची कविता समजावयास थोडी कठिण जाते हें खरें. पण कृत्रिम आणि क्लिष्ट रचनेमुळे न समजणारी कविता निराळी आणि अर्थपूर्णतेमुळे न समजणारी ही कविता निराळी. दोष असलाच तर तो गुणांतून उद्भवतो. थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ हा तो गुण. त्यासाठीं केशवसुतांनी ओबडधोबड, काव्यांत अस्पृश्य किंवा ग्राम्य समजले जाणारे, शब्द धडाडीने वापरले; कारण ते बोलींत जिवंत म्हणून अर्थवाहक होते. काव्यमय समजल्या जाणाऱ्या गोंडस शब्दाचें तेज अतिरिक्त उपयोगामुळे 'मळलें' हें जाणून त्यांनीं आपल्या शैलींत त्यांना स्थान दिलें नाही. अर्थात् भाषादोष केशवसुतांत आहेतच. वैजनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांनी दाखविले ते असे: अक्षरपूर्तीकरितां सर्वनामाचा दुरुपयोग (उदाहरणार्थ: तसेंच, बरें, इत्यादि); क्वचित् अशुद्धें (सख्यत्व); रूढ नसलेले शब्द (कृतज्ञता); अपरिचितार्थी शब्द (कल्पना ह्या अर्थी क्लृप्ति – पण अर्थ चुकीचा नाही!); 'कौरूप्य' सारखे बेढब प्रयोग; इंग्रजी वळण; शिथिल यमकें; परसवर्णाचा उपयोग; इत्यादि.

केशवसुतांच्या असाधारण गुणांपुढें हे वर-वरचे दोष फिके पडतात. त्यांच्या काव्याचा आशय इतका गाढ आहे कीं तो व्यक्त करण्याचें साधन ह्यापलीकडे भाषेला त्यांत महत्त्व नाही. शब्दशृंगारापेक्षां येथें विचारवैभवाची मातबरी अधिक. त्या

धगधगत्या विचारांनी गोठून गेलेल्या मराठी काव्यांत जीव आणिला. अनेक कवींचें तें स्फूर्तिस्थान. 'तुतारी मंडळें' स्थापन झालीं आणि नव्या, स्वतंत्र विचाराच्या समाजाचीं सुख-दुःखें आणि आशा-निराशा चितारणाऱ्या, काव्याची ओजस्वी परंपरा सुरू झाली. म्हणून हा "कवींचा कवि". केशवसुतांच्या मृत्यूची वातमी ऐकून टिळक उद्गारले, "आपल्यांतला वर्ड्स्वर्थ् आज गेला." वर्ड्स्वर्थ्च्या अर्ध्यानें आयुष्य आणि अल्पांशानें स्वास्थ्य मिळालेल्या ह्या कवीचें ऐतिहासिक कार्य अधिक मोठें आहे. तें त्यांनी एकलेपणानें विरोधाच्या वावटळीला तोंड देऊन पार पाडलें होतें. केशवसुतांची काव्यज्योत अखेरपर्यंत तेवत राहिली, – मंदावली नाही. स्नेहशून्यता, अनास्था अथवा उपहास यांची बाधा तिला झाली नाही. मृत्यूनंतर सुमारें पंधरा वर्षांचा काळ जाईपर्यंत केशवसुत बहुसंख्य वाचकांना अज्ञातच राहिले. इतक्या उशिरां जाग आली तरी मराठी रसिकतेनें त्यांचें ऋण मान्य केलें व आधुनिक काव्याचा मुकुट त्यांना निष्ठेनें अर्पण केला. केशवसुतांच्या संग्रहाचें पहिलें प्रकाशन १९१७ मध्यें झालें तेव्हां डॉ. पांडुरंग दामोदर गुणे ह्या प्रसिद्ध पंडितानें लिहिलें, 'अचाट कल्पनाशक्ति, प्रचंड निरीक्षण, पराकाष्ठेची सहृदयता, प्रासादिक वाणी, 'भाषेवरील प्रभुत्व, तिला वाटेल तशी लववावयाचें सामर्थ्य व आपणाला आपल्या देशबांधवांना सृष्टीचा, परमेश्वराचा, उदात्त संदेश सांगावयाचा आहे ही दृढ भावना ही महाकवि होण्याला लागणारी सामग्री केशवसुत ह्यांच्यामध्यें होती." †

† मनोरंजन, ऑक्टोबर १९१७. "केशवसुतांची कविता परीक्षण."

## १ मजुरावर उपासमारीची पाळी

धारेवरी जाउनि देव पोंचला,
हा रंगही मावळतेस साजला,
सर्वत्र ही मौज पहा ! दिसे ; परी
माझ्याच कां दुःख भरे बरें उरीं ? १

साऱ्या दिनीं आजचिया नसे मुळीं
हातास माझ्या कवडीहि लाभली ;
पोटा, करोनी मजुरीस मी भरीं ;
कोणीं दिलें आज न काम हो परी ! २

हीं मन्दिरें हो खुलतात चांगलीं ;
माझ्या वडीलींच न काय बांधिलीं ?
मी मात्र हो आज मरें भुकेमुळें ;
श्रीमंत हे नाचति मन्दिरीं भले ! ३

हेवा तयांचा मजला मुळीं नसे,
जाडी मला भाकर ती पुरे असे ;
कष्टांत देवा मरण्यास तत्पर
कां मारिसी हाय ! भुकेमुळें तर ? ४

सर्वांस देवा ! बघतोसि सारखा,
होतोस कां रे गरिबांस पारखा ?
कांहींस सुग्रास सदन्न तूं दिलें,
साधी अम्हां भाकरही न कां मिळे ५

घेवोनि चारा अपुल्या पिलांप्रति
जाती अहा ! पक्षि सुखी घरीं किती ;
बाळांस हें दावुनि कारभारिण
कैसें तयां देत असेल सांगुन ? – ६

" पक्षी जसे हे घरट्यास चालती
घेवोनि चारा अपुल्या पिलांप्रती,
घेवोनि अन्ना, तुमचा तसा पिता
येईल तो लौकरि हो रडूं नका ! " ७

हे लाडके ! आणिक लाडक्यांनो !
दावूं तुम्हां तोंड कसें फिरोन ?
जन्मास मी काय म्हणोनि आलों ?
येतांच वा कां न मरोनि गेलों ? ८

★

## २ कवितेचें प्रयोजन

" शान्तीचें घर सोडुनि प्रखर त्या हाटीं प्रयत्नाचिया,
प्रीतीचाहि निकुंज सोडुनि रणीं जीवित्व नांवाचिया,
सर्वांहीं सरसावणें झटुनियां हें प्राप्त झालें असे ;
या वेळे न कळे कवे ! तुज सुचे गाणें अहा रे कसें ! १

माता ही सुजला स्वभूमि सुफला, तीच्या परी लेंकरां
खायाला पुरतें पहा नच मिळे कीं हाल आहे पुरा ;
झांकायास तनूस वस्त्रहि न तें आतां पुरेसें मिळे ;
या वेळेस कसें कवे ! तुज सुचे गाणें न मातें कळे ! " २

हें कोणीं म्हणतां जवें कविमनीं खेदोर्मि हेलावल्या,
नेत्रांतून सवेंचि बाष्पसरिता वाहावया लागल्या ;

त्याचा स्त्रैणपणा असा प्रकटला वाटेल कोणा, परी
धीरोदात्त असेचि तो श्रुत असे हें दूरही भूवरी !
सोन्याचे सरले अहा ! दिवस ते, आली निशा ही कशी ?
सौख्याचा नद तो सुकून पडलों या दु:खपंकीं फशीं !
कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त कांहीं नसे ;
प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवींचा असे ४

बाष्पान्तीं तरलस्वरें मग कवी नि:श्वासुनी बोलिला—
" जो पूर्वीं गुण पुण्यभूमिवरि या अत्यंत वाखणिला,
तें हें दिव्य कवित्व दुर्विधिवशें हीनत्व कीं पावलें,
त्याची वूज करावया न अगदीं कोणी कसें राहिलें ! ५

गाणें जें परिसावया कविपुढें राजेशही वांकले,
यन्नादेंच लहान थोर सगळे गुंगून वेडावले,
त्याला मान नसे, नसो पण, अतां त्याची अपेक्षा नसे—
हें कोणी म्हणतां विषाद अहिसा मन्मानसाला डसे ! ६

आलेल्या दुरवस्थितींतुन तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी
उद्योगीं रत व्हावया धरितसां औत्सुक्य चित्तीं, तरी
गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल ;
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल ! ७

हातीं घेउनियां निशाण कवि तो पाचारितो बान्धवां—
' या हो या झगडावयास सरसे व्हा, मेळावा वाहवा !'
प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करी
आतां नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ? ८

आशा, प्रेम, तसेंच वीर्य कवनीं ती आपल्या गाइल ;
गेलें वैभव गाउनि स्फुरण तो युष्मन्मना देइल,
द्या उत्तेजन हो कवीस, न करा गाणें तयाचें मुकें ;
गाण्यानें श्रम वाटतात हलके, हेंही नसे थोडकें ; ९



926
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
धनक्रम ७३५७० वि: काव्य
१९२९ नों: दि: २५।२।७

आतां जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी,
याची खूणच गान जें निघतसे तें साच जाणा मनीं;
तारा ताणिलियावरी पिळुनियां खुंट्यांस वाद्याचिया,
त्यांच्यांतून अहा! ध्वनी उमटती जे गोड ऐकावया!" १०

★

## ३ पुष्पाप्रत

पुष्पा! सुन्दर किति तूं दिससी!
सौकुमार्य माधुर्यहि धरिसी!
तुजला बघतां मन माझें तूं वेडें रे करिसी १

तूं आणिक मी पूर्वी होतों
खेळगडी रे! स्मरुनि अहा! तो
काळ सुखाचा, आतां चित्ता खेद फार देतो! २

मुग्ध मधुरता चित्तीं घेतां
पूर्वी अपुली होती समता,
गेला गेला काळ अहह तो! फेर किती आतां ३

सौकुमार्य तव अजुनी आहे!
हंसतच आहे हास्य तुझें हें;
परि मम भाळीं ढग अश्रूंचा हाय! डंवरलाहे! ४

तुजला पाहुनि मीं नाचावें,
दुड-दुड धांवत तुजशीं यावें,
प्रेमें तुजला स्वकरीं घेउनि सखया चुंबावें! ५

आतांहि गमे घ्यावें तुजला,
परी सुटतसे कंप कराला!—
दिव्यत्वाला स्पर्श कराया भय वाटे मजला! ६

रम्य धुक्याची अद्भुत सृष्टि
तींत उघडिसी अपुली दृष्टि,
मग तो भास्वन् तुजवरि करितो तेजाची वृष्टि ! ७

मरुद्गण तुझ्या पाळणियाला
तत्पर आंदोलन द्यायाला
पक्षिमुखांहीं स्वर्ग तुझ्यावरि गाई गीताला ! ८

रम्य तुझें व्हा जिणें कितीतरि,
परिमलयश तव जाय भूवरी,
काळहि तुझिया दिव्यत्वाला वाटे नमन करी ! ९

चिरतरुणा रे ! चिररुचिरा रे !
तुजसंनिध तो वास बरा रे !
तुज-मजमध्यें परी केवढी आहे रुंद दरा रे ! १०

काळोखाच्या जगामधें या
मृत आशांच्या चितांवरुनि या
पिशाच्च माझें भटकत आहे, शांति नसेचि तया ! ११

मच्चित्ताच्या क्षितिजावरतीं
नृत्याला जीं स्वप्नें करिती
निदान, त्यांच्यामध्यें मजला भासो तव मूर्ति ! १२

सौभाग्य पुष्पा ! तव गावयाला
मी पात्र नाहीं गमतें मनाला ;
भृंगे तुझें स्तोत्र सुरेख गाती
ऐकूनि तें सर्व पळोत खंती ! १३

☆

## ४ शब्दांनो ! मागुते या !

तेजाचे पंख वाऱ्यावरि हलवित ती चालली शब्दपंक्ति,
देव्हारा शारदेचा उचलुनि गगनांतूनि ती नेत होती ;
शब्दांहीं चित्तभूमी विकसित हिरवी तों मदीया बघूनी
देव्हारा माझिया तो उतरुनि हृदयीं स्थापिला गौरवूनी. १
शब्दांसंगें तदा मीं निजहृदयवनामाजि संचार केला,
तेथें मीं कल्पपुष्पें खुडुनि नमुनि तीं वाहिलीं शारदेला,
शब्दांच्या कूजितानें सहजचि मम हृत्प्रान्त गुंगूनि गेला ;
मी त्या स्वप्नांत गद्यग्रथित जग मुळीं लोटिलें तुच्छतेला ! २
रागानें या जगानें अहह ! म्हणुनियां शापिलें या जनाला,
तेणें चिन्ताग्नि माझी हृदयहरितता नाशिता फार झाला ;
गाणारे शब्द सारे झडकरि उडुनी दूरदेशास गेले,
वाग्देवीपीठ येथें परि मम हृदयीं दिव्य तें राहियेलें. ३
वाग्देवी शारदे गे ! फिरवुनि अपुले शब्द पाचार येथें !
साहाय्यावीण त्यांच्या भजन तव कसें सांग साधेल मातें ?
आशामेघालि चिन्तानल अजि विझवूं जाहलीसे तयार,
शब्दांनो ! मागुते या ! बहर मम मनीं नूत्न येईल फार ! ४

★

## ५ तुतारी

एक तुतारी द्या मज आणुनि.
फुंकिन मी जी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें
दीर्घ जिच्या त्या किंकाळीनें ;
अशी तुतारी द्या मजलागुनि. १

अवकाशाच्या ओसाडींतिल
पडसाद मुके जे आजवरी
होतिल ते वाचाळ सत्वरीं
फुंक मारितां जीला जबरी
कोण तुतारी ती मज देइल ? २

सारंगी, ती सतार सुंदर
वीणा, बीनहि, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज माझ्या
कसचीं हीं हो पडतिल काजा ?
एक तुतारी द्या तर सत्वर. ३

रूढी जुल्म यांचीं भेसुर
सन्तानें राक्षसी तुम्हांला
फाडुनि खातीं, ही हतवेला
जलशाची का ? पुसा मनाला !
तुतारिनें द्या सावध व्हा तर ! ४

अवडम्बरलीं ढगें कितीतरि,
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहोर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकांवरि सर्वत्र दिसे !
गाफीलगिरी तरिहि जगावरि ! ५

चमत्कार ! 'तें पुराण तेथुनि
सुंदर, सोज्वळ, गोडें, मोठें !'
'अलिकडलें तें सगळें खोटें !'
म्हणती धरुनी ढेरीं पोटें
धिक्कार अशा मूर्खांलागुनि ६

जुन्या नभीं या ताजे तारक,
जुन्या भूमिवर नवी टवटवी,
जुना समुद्रहि नव रत्नें वी;
जुन्यांतून जी निष्पत्ति नवी
काय नव्हे ती श्रेयस्कारक ? ७

जुन्या धरेवर नव तरु सुंदर,
जुन्या तरूवर नवी कळी ती,
जुन्या कळ्यांतुनि फळें उपजती,
फळांतून त्या नवरस गळती–
कां न म्हणावे मधुर खरोखर ! ८

जुनें जाउं द्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरुनी टाका,
सडत न एक्या ठायीं टाका,
सावध ! ऐका पुढल्या हाका !
खांद्यास चला खांदा भिडवुनि ! ९

उंच अशा बैसुनि तक्तावर
एक वैभवा थोर भोगितो,
धुळीमध्यें तो अन्य लोळतो,
हाल न कुत्रा त्याचे खातो !
काय असे ही स्थिती बरोबर ! १०

वंदुनियां ह्या देवांलागुनि
धायीं-धायीं मानव रडती !
पायपोस त्यां हाणा संप्रति !
देव कशाचे ! अश्रु जे पिती
क्रूरतर न का ते असुरांहुनि ! ११

रुधिरा दानव, अश्रूंला सुर
पिती, रक्त हें देहामधुनी
वाहे, अश्रु पण मेंदूंतुनि ;
श्रेष्ठ अश्रु ते शोणिताहुनी ;
असुरांहुनि हे देवचि आसुर ! १२

स्त्रीवर्गाला दास्यीं दडपुनि,
दासीपुत्रचि मानव होतो,
स्त्रीला अज्ञानांत ठेवितो ;
परिणामीं दुर्दशेस जातो,
धिक्कार अशा चालींलागुनि ! १३

पत्नीनिधनीं अन्य वरी नर,
परि पति मरतां स्त्रीचा, तीतें
बळेंचि देतो संन्यासातें
विसरुनि हें ; जनिं साफल्यातें
अवश्य आहे संसृति भूवर ! १४

पडली छाया मनुजाची जर
विटाळ होतो तर मनुजाला,
व्हावें स्नानचि सचैल त्याला ;
काय म्हणावें या मूर्खाला ?
नरेंच केला हीन किती नर ! १५

प्राप्तकाल हा विशाल भूधर,
सुंदर लेणीं तयांत खोदा,
निजनामें त्यांवरतीं नोंदा
बसुनी कां वाढवितां मेदा ?
विक्रम, कांहीं करा, चला तर ! १६

अटक कशाची बसलां घालुनि ?  
पूर्वज वदले त्यां गमलें तें,  
ऐका खुशाल सादर चित्तें;  
परंतु सरका विशंक पुढते  
निरोप त्यांचा ध्यानीं घेउनि. १७

निसर्ग निर्घृण, त्याला मुरवत  
नाहीं अगदीं पहा कशाची !  
कालासह जी क्रीडा त्याची,  
ती सकलांला समान जाची;  
चुरूनि टाकी प्रचंड पर्वत ! १८

त्यांशीं भिडुनी, झटुनी झगडत  
उठवा अपुले उंच मनोरे,  
पुराण पडक्या सदनीं कां रे !  
भ्याड बसुनियां रडतां पोरें ?  
पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत ! १९

संघशक्तिच्या भुईंत खंदक  
रुंद पडुनि शें तुकडे झाले,  
स्वार्थानपेक्ष जीवीं अपुले  
पाहिजेत तर सत्वर भरले,–  
घ्या त्यांत उड्या तर बेलाशक ! २०

धार धरिलिया प्यार जिवावर  
रडतिल रडोत रांडा पोरें;  
गत शतकांचीं पापें घोरें  
क्षालायाला तुमचीं रुधिरें  
पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर ! २१

जाऊं बघतें नांव त्याप्रत
तशांत बनलां मऊ मेंढरें,
अहह ! घेरिलें आहे तिमिरें,
परंतु होऊं नका बावरे ;—
धीराला दे प्रसंग हिंमत ! २२

धर्माचें माजवूनि डम्बर
नीतीला आणिती अडथळे.
विसरुनियां हें जातात खुळे—
'नीतीचें पद जेथें न ढळे
धर्म होतसे तेथेंच स्थिर.' २३

हल्ला करण्या तर दंभावर—तर बंडांवर,
शूरांनो ! या, त्वरा करा रे !
समतेचा ध्वज उंच धरा रे
नीतीची द्वाही पसरा रे !
तुतारिच्या ह्या सुराबरोबर ! २४

नियमन मनुजासाठीं, मानव
नसे नियमनासाठीं जाणा ;
प्रगतिस जर तें हाणी टोणा
झुगारूनि तें देउनि बाणा
मिरवा निज ओजाचा अभिनव ! २५

घातक भलत्या प्रतिबंधांवर
हल्ला नेण्या करा त्वरा रे !
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे !
वीरांनो ! तर पुढें सरा रे
आवेशानें गर्जत 'हर हर !' २६

पूर्वींपासुनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
संप्रति दानव फार माजती,
देवांवर झेंडा मिरवीती !
देवांच्या मदतीस चला तर ! २७

★:

## ६ झपूर्झा

हर्ष–खेद ते मावळले,
हास्य निमालें,
अश्रु पळाले,
कंटकशल्यें बोथटलीं,
मखमालीची लव वठली;
कांहीं न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला
तिमिर हरपला;
काय म्हणावें या स्थितिला ?
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! १
हर्ष-शोक हे ज्यां सगळें,
त्यां काय कळे;
त्यां काय वळे ?
हंसतिल जरि ते आम्हांला,
भय न धरूं हें वदण्याला.
व्यर्थीं अधिकचि अर्थ वसे
तो त्यांस दिसे,
ज्यां म्हणति पिसे.

त्या अर्थाचे बोल कसे ?
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! २

ज्ञाताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून,
उड्डाण करून,.
चिद्धनचपला ही जाते,
नाचत तेथें चकचकते;
अंधुक आकृति तिस दिसती,
त्या गाताती
निगूढ गीतीं;
त्या गीतींचे ध्वनि निघती—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ३

नांगरल्याविण भुई बरी
असे कितितरी;
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा ?
हजारांतुनी एकादा !
तरी न, तेथुनि वनमाला
आणायाला
अटक तुम्हांला;
मात्र गात हा मंत्र चला—
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ४

पुरुषार्शी त्या रम्य अति
नित्य प्रकृति
क्रीडा करिती

स्वरसंगम त्या क्रीडांचा
ओळखणें, हा ज्ञानाचा
हेतु; तयाची सुंदरता
म्हाया चित्ता –
प्रत ती ज्ञाता,
वाडें-कोडें गा आतां –
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ५

सूर्य चन्द्र आणिक तारे
नाचत सारे
हे प्रेमभरें
खुडित खपुष्पें फिरति जिथें
आहे जर जाणें तेथें,
धरा जरा निःसंगपणा
मारा फिरके,
मारा गिरके,
नाचत गुंगत म्हणा म्हणा –
झपूर्झा ! गडे झपूर्झा ! ६

★

## ७ स्फूर्ति

कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या !
प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या !
अमुच्या भाळीं कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची,
म्हणेल जग आम्हांस मद्यपी, पर्वा कसली मग याची !
जिव्हेचीं बंधनें तर ढिलीं करा तीव्र या पेयानें,
यदुष्णतेनें द्यावा-पृथ्वी द्रवुनि मिसळती वेगानें !

होउनियां मग दंग मनीं,
व्हावें तें आणा ध्यानीं,
गा मग सुचतिल तीं गाणीं ;
परिसुनि त्यांचे शब्द, रूढिचे दास झणीं ते खवळूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ! १
सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनीं उकळीला,
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला !
औचित्याच्या फोल विवेका ! जा निघ या दुरवस्थेनें
अम्हां घेरिलें म्हणुनी घेतों झिंगुनियां या पानानें !
कल्पनेची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं
उडुरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेंकुनियां देऊं !
अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं
हार न खाऊं रतीभरी !
देव-दानवां नरें निर्मिलें, हें मत लोकां कळवूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ! २
पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देउं कसें !
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे-तिकडे !
उडवुनि देउनि जुलमाचे या करूं पहा तुकडे-तुकडे !
‘ महादेव ! हर हर ! ’ समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येउनि घुमतो अमुच्या कर्णीं; निजती ते ठारचि मरती !
उठा ! उठा ! बांधा कमरा !
मारा किंवा लढत मरा !
सत्त्वाचा ‘ उदयोऽस्तु ’ करा !
छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ! ३

★

## ८ नवा शिपाई

नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें,
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !
ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं, न मी एक पंथाचा,
तेच पतित कीं जे आंखडिती प्रदेश साकल्याचा !
खादाड असे माझी भूक,
चतकोरानें मला न सूख;
कूपांतील मी नच मंडूक;
मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ! १
जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेंही जा – पायांखालीं तृणावृता भू दिसते ;
कोठेंही जा – डोईवरतें दिसतें नीलांबर तें.
सांवलींत गोजिरीं मुलें,
उन्हांत दिसती गोड फुलें,
बघतां मन हर्षून डुले.
तीं माझीं, मी त्यांचा, – एकच ओघ अम्हांतुनि वाहे !
नव्या मनूंतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहें ! २
पूजितसें मी कवणाला ? – तर मी पूजीं अपुल्याला,
आपल्यामध्यें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला ;
मी हा शब्दच मजला नलगे ; संपुष्टीं हे लोक
आणुनि तो, निजशिरीं ओढिती अनर्थ भलते देख !
लहान-मोठें मज न कळे
साधु-अधम हें द्वयहि गळे,
दूर-जवळ हा भाव पळे

सर्वच मोठें – साधु – जवळ, त्यां सकलीं भरुनी राहें !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें ! ३
हलवा करितां तिळावर जसे कण चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केन्द्राभवतें वेष्टन तेंवि जडाचें ;
आंत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक,
परि अन्यां बोंचाया धरिती कांटे कीं प्रत्येक !
अशी स्थिती ही असे जनीं !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनीं.
शान्तीचें साम्राज्य स्थापूं बघत काळ जों आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहें ! ४

☆

## ९ नैऋत्येकडला वारा

जे जे वात नभांत या विचरती पुण्यप्रदेशावरी
नैर्ऋत्येकडला तयांत वितरी सौख्यास या अंतरीं ;
येतां तो मम चित्त हें विसरुनी प्रत्यक्ष वस्तूंप्रति,
अर्धोन्मीलित लोचनीं अनुभवी स्वप्नस्थिती मागुती ! १
तो वारा मम जन्मभूमिवरुनी येतो जवें वाहत,
हें माझ्या हृदयांत येउनि सवें मी ठाकलों चिन्तित ;
माझ्या जन्मधरेचिया मग मनीं रूपास मी आणितों,
तीचे डोंगर उंच खोलहि नद्या डोळ्यांपुढें पाहतों. २
मोठे उच्च, शिला किती पसरल्या सर्वत्र ज्यांच्यावरी,
तुंगें तीं शिरलीं यदीय शिखरें तैशीं नभाभीतरीं,
आस्वर्गात् चढती सदोदित महात्म्यांचीं जशीं मानसें,
या दृष्टीपुढते पुनः बघतसें अद्रीश ते हो असे ! ३

ज्यांच्या रम्य तटांवरी पसरल्या झाड्या किती सुन्दर,
ज्यांच्या थोर शिलांतुनी धबधबां जाती तसे निर्झर
वाणीचे कविदुर्दशामधुनियां ते ओघ यावे जसे ;—
या दृष्टीपुढते पुनः बघतसें अद्रीश ते हो असे ! ४

त्यांचे उंच शिरांवरी विलसती किल्ले मराठी जुने,
देवी पालक त्यांतल्या मज पुनः धिक्कारिती भाषणें !—
" कोठें पूर्वज वीर धीर तव ! तूं कोणीकडे पामरा !
ये येथें ! इतिहासपत्र पडकें वाचूनि पाहीं जरा ! " ५

जागोजाग विराजती चलजलें पाटस्थलें तीं किती,
केळी, नारळि, पोफळी, फणस ते, आंबे तिथें शोभती ;
पक्षी त्यांवरुनी नितान्त करिती तें आपलें कूजित,
स्वप्नीं हें बघतां फिरूनि, मन हें होतें समुत्कण्ठित. ६

जागोजागहि दाटल्या निबिड कीं त्या राहट्या रानटी,
ते पाईरहि, खैर, किंजळ, तिथें आईनही वाढती,
वेली थोर इतस्ततः पसरुनी जातात गुंतून रे,
चेष्टा त्यांमधुनी यथेष्ट करिती नानापरी वानरें ! ७

जन्मस्थान मदीय सुन्दर असे त्या माल्यकूटांतल्या
आनंदें वनदेवता मधुर जीं गानें भलीं गाइल्या
मज्जन्मावसरास, तीं पवन हा वेगें पहा तेथुनी !
मातें पोंचवितो, तया अपुलिया पंखांवरी वाहुनी !— ८

" गाऊं या ! हृदयांत या अमुचिया प्रीती असे दाटली !
गाऊं या ! हृदयांत या अमुचिया कां स्फूर्ति ही वाढली ?—
वाग्देवीसुत जन्मला अपुलिया ग्रामांत ; यालागुनी
जैजैकार करा, सुरां परिसवा हा मंगलाचा ध्वनि ! " ९

वेगानें जगदुद्धरानदिचिया तीरांहुनी वात तो
आशीर्वाद मदीय तातजननी यांचे मला आणितो ;

वात्सल्यास तयांचिया परिसुनी माझ्या मनीं येतसे—
तान्हा बाळचि राहतों तर किती तें गोड होतें असें ! १०

आईच्या नयनांत नित्य मग मी स्वर्गास त्या पाहतों,
तातांकावरि नित्य मी मग जगद्राज्यासना भावितों,
कां हो यापरि वाढलों फुकट मी ? हा—हन्त ! मी नष्ट हा !
तान्हा बाळचि राहतों तर किती तें गोड होतें अहा ! ११

जन्मा येउनि मीं उगा शिणविलें आई ! तुला हाय गे !
ताता ! भागविलें तुला फुकट मीं मत्पोषणीं हाय रे !
वार्धक्यीं सुख राहिलें, विसरणें तुम्हांस कोणीकडे !
झालों कष्टद मात्र—या मम शिरीं कां वीज ती ना पडे ? १२

पुष्पें वेंचित आणि गोड सुफलें चाखीत बागांतुनी
जेथें हिंडत शैशवीं विहरलों निश्चिन्त मी, तेथुनी—
हा वारा ममताप्रसाद मजला आजोळचा आणितो
चित्तीं विव्हल होतसें स्मरुनि, मी मातामहां वन्दितों ! १३

बन्धूचींहि मला तशीं पवन हा आशीर्वचें आणितो,
चिन्ताग्रस्त तदीय पाहुनि मुखा अश्रूंस मी गाळितों !
भाऊ रे ! तुजलागिं लाविन कधीं मी हातभारा निज ?
तूतें सेवुनि मी सुखें मग कधीं घेईन का रे निज ? १४

श्वासांहीं लिहिलीं, विराम दिसती ज्यांमाजि बाष्पीय ते
प्रीतीचें बरवें समर्थन असे संस्पृह्य ज्यांमाजि तें,
कान्तेचीं असलीं मला पवन हा पत्रें अतां देतसे ;
डोळे झांकुनि वाचितां त्वरित तीं सम्मूढ मी होतसें ! १५

आतां प्रेमळ तीं पुन: परिसतों थोडीं तिचीं भाषणें,
चित्तीं आणुनि मी तिला अनुभवीं गोडीं तिचीं चुम्बनें !
ओठां हालवितां न मी वदतसें मागील संवाद तो ;
मी काल क्रमुनी असा, जड जगा काडीवजा लेखितों ! १६

नाहीं चैन तुला मुळीं पडत ना माझ्याविना मत्प्रिये ?
तूतें आठविल्याविना दिवसही माझा न जाई सये !
केव्हां येतिल तीं दिनें न करण्या ताटातुटी आपुली ?
केव्हां त्या रजनी ? – जियांत विसरूं मीतूंपणाला मुळीं ! १७

माझ्या जन्मधरेपुढें दिसतसे वारांशि विस्तीर्ण तो,
त्याचें रम्य तरंगताण्डव पुनः पाहूनि आल्हादतों,
जें हृद्रम्य तरंगताण्डव मला तैशापरी वाटतें
अज्ञेयावरतीं जसें क्षणिक हें अस्तित्व हो खेळतें ! १८

हा अब्धीवरतूनि जात असतां बाल्यांत नौकेंतुनी
गाणीं जीं म्हटलीं मला निजविण्या वारिस्थ देवीगणीं,
त्यांचे सूर अतां अलौकिक असे जे वात हा आणितो—
ते ऐकून अहा ! सुषुप्ति चिर ती घ्यायास मी इच्छितों ! १९

प्रीती या जगतांत कण्टकयुता ही एक वल्ली असे,
शूलारोपणयूप त्यावरिल ही कीर्तिध्वजा कीं दिसे ;
तेव्हां या जगतीं नकोत मजला ते भोग भोगायला,
वाटे नाटक शोकसंकुल असें जिवित्व हें याजला ! २०

देवी सागरिका ! तुम्ही तर अतां तीं गायनें गाइजे,
त्यांच्या धुंद अफूगुणें किरकिऱ्या बाळास या आणिजे
निद्रा दीर्घ – जिच्यामधीं न कसलीं स्वप्नें कधीं येतिल,
ती निद्रा निजतां न मन्नयन हे ओले मुळीं होतिल ! २१

★

# १० सतारीचे बोल

काळोखाची रजनी होती,
हृदयीं भरल्या होत्या खंती ;
अंधारांतचि गढलें सारें
लक्ष्य, न लक्षी वरचे तारे ;
विमनस्कपणें स्वपदें उचलित
रस्त्यांतुनि मी होतों हिंडत ;
एका खिडकींतुनि सूर तदा
पडले – दिड दा, दिड दा, दिड दा ! १

जड हृदयीं जग जड हें याचा
प्रत्यय होता प्रगटत साचा ;
जड तें खोटें हें मात्र कसें
तें न कळे ; मज जडलेंच पिसें
काय करावें, कोठें जावें,
नुमजे मजला कीं विष खावें !
मग मज कैसे रुचतील वदा
ध्वनि हे – दिड दा, दिड दा, दिड दा ! २

सोसाट्याचें वादळ येतें
तरि तें तेव्हां मज मानवतें ;
भुतें भोंवतीं जरि आरडतीं
तरि तीं खचितचि मज आवडतीं ;
कारण आंतिल विषण्ण वृत्ति
बाह्य भैरवीं धरिते प्रीति ;
सहज कसे तिज करणार फिदा
रव ते – दिड दा, दिड दा, दिड दा ! ३

ऐकुनि ते मज जो त्वेष चढे
त्यासरशीं त्या गवाक्षाकडे
मूठ वळुनि मीं हात हिसकिला ;
पुटपुटलोंही अपशब्दांला ;
म्हटलें — " आटप, आटप मूर्खा !
सतार फोडुनि टाकिसी न कां !
पिरपिर कसली खुशालचंदा,
करिसी — दिड दा, दिड दा, दिड दा ! " ४

सरलों पुढतीं चार पावलें,
तो मज न कळे काय जाहलें ;
रुष्ट जरी मी सतारीवरी
गति मम वळली तरि माघारी ;
ध्वनिजालीं त्या जणूं गुंगलों
असा स्ववशता विसरुनि बसलों —
एका ओट्यावरी स्थिर तदा
ऐकत — दिड दा, दिड दा, दिड दा ! " ५

तेथ कोंपरें अंकीं टेंकुनि
करांजलीला मस्तक देउनि
बसलों ; इतुक्यामाजी करुणा —
रसपूर्ण गती माझ्या श्रवणां
आकृष्ट करी ; हृदय निवालें,
तन्मय झालें, द्रवलें आलें, —
लोचनांतुनी तोय कितिकदां
ऐकत असतां – दिड दा, दिड दा ! ६

स्कन्धीं माझ्या हात ठेवुनी
आश्वासी मज गमलें कोणी,

म्हणे — " खेद कां इतुका करिसी ?
जिवास कां बा असा त्राससी ?
धीर धरीं रे ! – धीरा पोटीं !
असती मोठीं फळें गोमटीं !
ऐक मनींच्या हरितील गदा
ध्वनि हे—दिड दा, दिड दा, दिड दा ! " ७

आशाप्रेरक निघूं लागले
सूर तधीं मीं डोळे पुशिले ;
वरती मग मीं नजर फिरविली,
नक्षत्रें तों अगणित दिसलीं
अस्तित्वाची त्यांच्या नव्हती
हा वेळवरी दादच मज ती !
" तम अल्प–द्युति बहु " या, शब्दां
वदती रव ते — दिड दा, दिड दा ! ८

वाद्यांतुनि त्या निघती नंतर
उदात्ततेचे पोषक सुस्वर ;
तों मज गमलें विभूति माझी
स्फुरत पसरली विश्वामाजीं ;
दिक्कालासहि अतीत झालों ;
उगमीं विलयीं अनंत उरलों ;
विसरुनि गेलों अखिलां भेदां
ऐकत असतां — दिड दा, दिड दा ! ९

प्रेमरसाचे मधुर बोल ते
वाद्य लागतां बोलायातें,
भुललों देखुनि सकलहि सुन्दर ;
सुरांगना तों नाचति भूवर,

स्वर्ग धरेला चुम्बायाला
खालीं लवला – मजला गमला!
अशा वितरिती अत्यानंदा
ध्वनि ते — दिड दा, दिड दा, दिड दा! १०

शान्त वाजली गती शेवटीं,
शान्त धरित्री, शांत निशा ती,
शान्तच वारें, शान्तच तारे
शान्तच हृदयीं झालें सारें!
असा सुखें मी सदना आलों
शान्तींत अहा! झोंपीं गेलों;
बोल बोललों परी कितिकदां
स्वप्नीं – दिड दा, दिड दा, दिड दा! ११

☆

## ११ आम्ही कोण

आम्ही कोण म्हणून काय पुससी? – आम्ही असूं लाडके —
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टि पहाया शके!
सारेही बडिवार येथिल पहा! आम्हांपुढें ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया —
सौन्दर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें!
शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते?

ते आम्हीच ; सुधा कृतींमधुनियां ज्यांच्या सदा पाझरे ;
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभतें !
आम्हांला वगळा – गतप्रभ झणीं होतील तारांगणें ;
आम्हांला वगळा – विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

## १२ हरपलें श्रेय

त्रिखंड हिंडुनि धुंडितसें,
न परि हरपलें तें गवसे ! ध्रु०
होत्यें अजाण माहेरीं
तों खेळ खेळल्यें परोपरी
लुटुपटीच्या घरदारीं
लटकिच जाहल्यें संसारीं ;
तेव्हांचें सुख तें आतां
खऱ्या घरींहि न ये हाता !
चुकचुकल्यापरि
वाटे अन्तरिं,
होउनि बावरि
निज श्रेय मी पाहतसें,
न परि हरपलें तें गवसे !
प्राप्त जाहलें तें तुजला
तूं मागितलें जें देवाला,
ज्याचें मोल तुवां दिधलें
तेंच तुझ्या पदरीं पडलें,
या वचनें चुकला सौदा
उमगुनि हृदया दे खेदा !

दिलें हिरण्मय,
हातीं मृण्मय :
हा हतविनिमय !
परत मला मम मिळे कसें ?
न परि हरपलें तें गवसे ! २

किरण झरोक्यांतुनी पडे,
अणूंसवें त्यांतून उडे —
परोक्षविषयीं मन माझें
विसरुनियां अवधीं काजें,;
हयगय त्यांची मज जाची
परि न मला पर्वा त्याची !
वेडी होउन
वसल्यें अनुदिन
एकच घेउन —
मज माझें लाभेल कसें ?
न परि हरपलें तें गवसे ! ३

जेथें ओढे वनराजी
वृत्ति रमे तेथें माझी ;
कारण कांहीं साक्ष तिथें
मज त्या श्रेयाची पटते
म्हणुनी विजनीं मी जात्यें,
स्वच्छन्दें त्या आळवित्यें.
स्वभास दावुनि
परि तें झटदिनि
जाई लोपुनि !

मग मी हांका मारितसें !
न परि हरपलें तें गवसे ! ४

भीड भाड माझी फिटली,
जग म्हणतें कीं ‘ ही उठली ! ’
जनमर्यादा धरुनि कसें
अमर्याद तें मज गवसे ?
एक शब्द बोलेन जरी
सकलां कुण्ठित करिन तरी !
        अशी आगळी
        परी बावळी
        आहें दुबळी ;
कांकीं त्याविण सुचत नसे
न परि हरपलें तें गवसे ! ५

स्वपतिचितेवरि उडी सती
संसृतिविमुखी घेई ती
दीपशिखेवरि पतंग तो
प्रेमें प्राणाहुति देतो ;
मी न करिन का तेविं तधीं—
माझें मज लाभेल जधीं ?
        मजपासोनी
        हाय ! हिरोनी
        नेलें कोणीं ! —
म्हणुनि जीव पाखडीतसें
न परि हरवलें तें गवसे ! ६

★

# नारायण वामन टिळक
## [ १८६५–१९१९ ]

(टिळकांचें कवितेइतकेंच एक मोठें कार्य हें कीं त्यांच्या सहवासाने पदरीं पडलेला ‘ वेडा गोळा ’ मराठी साहित्यांतील एक अमर पुस्तक लिहून ‘ साहित्य–लक्ष्मी ’ या पदवीला पोचला ! लक्ष्मीबाई टिळकांच्या ‘ स्मृतिचित्रें ’ या आत्मचरित्राला मराठींत तोड नाही. त्याच्या केस पिकलेल्या लेखिकेचें शुद्धलेखनाशीं तर जमलें नाहीच पण कांही अक्षरांचें वळण तिला नीट समजत नसे ! बालकवींनी खट्याळपणें लिहिलेल्या “ लक्षुंबाईच्या कांदब्री ”ची जाहिरात कोण विसरेल? पण कसल्याही पांडित्याचा संपर्क झाला नाही म्हणूनच इतकें अकृत्रिम पुस्तक लक्ष्मीबाई लिहूं शकल्या असाव्या. त्यांत टिळकांची स्पष्ट प्रतिमा उठली आहे. कवीच्या जातींत इतका संसारी पुरुष विरळा ! पण या कवीला फकिरीचे झटकेही आले; आणि इतक्या प्रेमानें संसार केला तरी त्याचा निस्संगपणा तसाच राहिला ! )

( टिळकांचें लहानपण वाईटच गेलें. कर्दनकाळ बापाचा जाच आणि प्रेमळ आईची वेळीं तोकडी पडणारी पांखर; त्या जाचानें ओढवलेला तिचा मृत्यु; त्या छोट्या वयांत गृहत्याग; दारिद्र्य आणि हालअपेष्टा;–हा लक्ष्मीबाईंनी रंगविलेला चित्रपट पाहिल्यावर, कशाचीही कडवट आठवण न बाळगतां, संसाराच्या आनंदाचीं गाणीं गाणारे टिळक आदरणीय वाटतात. मोठेपणींहि त्यांच्यामागील विवंचना सुटल्या नाहीत. “ उद्यांची काळजी ” बहुशः असेच; पण आजच्या समाधानांत तिची फिकीर त्यांनी केली नाही. तिसाव्या वर्षी या नाशिकच्या ब्राह्मणाने ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तेव्हां काय कल्लोळ उडाला असेल याची कल्पना करतां येईल.) त्याला तोंड दिलें व ‘ मराठीपणा ’ कायम ठेवण्याच्या आग्रहामुळें रुष्ट झालेल्या मिशनमधील वरिष्ठांशीहि सामना दिला. टिळक ख्रिस्ती झाले ते रोजगाराच्या लोभानें नाही तर प्रचलित हिंदु समाजरचनेंत न लाभणारी आंतरिक शांति तेथें लाभेल या आशेनें. ती लाभली असावी असें त्यांच्या भक्तिकाव्यावरून वाटतें. ख्रिस्ती होण्यापूर्वी, हिंदुधर्मांतच एखादा नवा पंथ आपण स्थापूं अशी त्यांची आकांक्षा होती; पण ती फळास आली नाही. धर्मांतरामुळे सामाजिक संबंधांत त्यांची अस्पृश्य म्हणून ओढाताण झालीच असेल; पण साहित्यक्षेत्रांतहि त्याची सावली त्यांना सुटली असें नाही. बाप्तिस्मा घेतांच ते मराठी परंपरेला पारखे झाले ही ओरड चुकीची आहे. उलट, ती परंपरा त्यांनी

इतक्या कसोशीने राखली ही त्यांची कर्तबगारी ! “ धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे ” असें ते नेहमी म्हणत. वऱ्यावाईट कारणांमुळे ख्रिस्ती झालेल्या मराठ्यांना त्यांनी आपल्या शिकवणीने व उदाहरणाने मराठी बाणा सोडूं दिला नाही ; मराठी ही आपली मातृभाषा हें ठसवून तिची जोपासना करविली ; गोऱ्या मिशनऱ्यांना अभिमानाने तिचे पाठ दिले आणि ख्रिस्ती साहित्याच्या नव्या शाखेची मराठी साहित्यांत मोलाची भर टाकली. हें ऋण विसरणें कृतघ्नपणाचें होईल. विनायकाप्रमाणें टिळकांनी ‘ दिव्य ’ पूर्वकाळाचा उदोउदो केला नाही हें खरें. पण ती भूतकाळांत संतोष मानणारी वृत्ति टिळकांत असती तर त्यांनी धर्मान्तर केलें नसतें. केशवसुतांप्रमाणें त्यांनाहि समाजाचीं दुःखें खुपत होतीं. जिचा त्याग केला ती धर्मपरंपरा त्यांनी पूर्ण अभ्यासिली होती हें नागपूर येथें ‘ ऋषि ’ मासिकाचें संपादन व संस्कृत धर्मग्रंथांच्या भाषांतरांचें त्यांनी केलेलें कार्य सिद्ध करतें. )

“ तत्त्वज्ञान आणि काव्य हे विषय धर्मभेदातीत आहेत ” म्हणून “ मोहरीएवढ्या मनाच्या आचरट धर्मवेड्यांनी उपस्थित केलेल्या वेडगळ वितंडवादाचा विचारसुद्धा ” करू नये असें ‘ वनवासी फुला ’ संबंधीं लिहितांना माडखोलकर म्हणतात † तें खरें आहे. पण केवळ धर्मान्तरामुळें टिळक “ महाराष्ट्र–धर्माला, महाराष्ट्र–परंपरेला आणि महाराष्ट्र–भावनांना ” मुकले असें त्यांनीच पुढें विधान केलें आहे. यांतील विसंगति ‘ महाराष्ट्र–धर्म ’ इत्यादि शब्दांचा किती संकोच करावयाचा यावर अवलंबून राहील. ज्या नव्या जीवनाची टिळक, केशवसुत, वगैरे कवि ललकारी देत होते त्यांत तशा शब्दांचा अर्थ फार विशाल होता. त्याअन्वयें टिळकांचा महाराष्ट्र–धर्म अनेक वेगडी भक्तांपेक्षां अधिक प्रामाणिक मानला पाहिजे.

केशवसुतांप्रमाणेंच टिळकांच्या देशाभिमानासंबंधीहि शंका घेतली गेली आहे. विशेषतः त्यांच्या राजनिष्ठेच्या कवनांमुळें तिला बळकटी प्राप्त होते. रानड्यांसारख्या देशभक्तांतहि तशी राजनिष्ठा दिसते. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासांतील त्या पहिल्या पायऱ्यांवर ती आज वाटते तेवढी विरळ नाही. तिच्या आणि टिळकांच्या धर्माच्या आधारावर पारतंत्र्याचें प्रेम त्यांना चिकटविणें अन्यायाचें होईल.

‘ फुलांमुलांचे कवि ’ हें टिळकांचें वर्णन अनेक वर्षें चालत आलें आहे. त्यांच्या मुलांसंबंधीं कविता आपल्या आजच्या अपेक्षा पुरविणार नाहीत ; त्यांतील उपदेशाची छटा नकोशी वाटते. पण त्यांचें वात्सल्य शंकातीत आहे आणि त्या काळीं त्याला

† आधुनिक कविपंचक, पृष्ठ ३५.

नावीन्याचे रंग होते. फुलांविषयींच्या टिळकांच्या कविता विशेष लोकप्रिय झाल्या ; पण त्यांतही बोधपरतेकडे स्पष्ट कल आहे. हा वर्ड्स्वर्थच्या वाचनाचा परिणाम हें खरें मानलें तरी कवीच्या स्वभावधर्माचा त्यांत बराच भाग असला पाहिजे. धार्मिक वृत्तीचें तें एक अंग आहे.

निसर्गप्रेमापेक्षांहि 'घरचें प्रेम' टिळकांच्या बाबतींत अधिक महत्त्वाचें आहे ; त्यांचें निसर्गसौंदर्य घराच्या आसऱ्यानें अधिक खुलतें ; संसारांतून सुटकेचें तें साधन नाही. घराची इतकी ओढ फार थोड्या कवींत आढळेल. सहसा काव्याला घराबाहेरचें वारेंच अधिक मानवतें ! आणि टिळकांचें घर ज्या व्यक्तींत केंद्रित झालें होतें त्या 'कुणीतरी' विषयीं त्यांनी अनेक रसाळ कविता लिहिल्या. त्यांचा नूर इतका सोज्वळ आहे कीं त्यांना 'प्रेमगीतें' म्हणतांना मन कचरावें, इतकें काव्यक्षेत्रांतील प्रेमाचें उत्तानतेशीं साहचर्य आहे ! त्यांनी स्त्रीला 'महारथी' म्हटलें, संसारांतील तिचें स्थान ओळखलें, पण प्रेमाच्या तुफानी आवेगांत तिची अचाट स्तुति केली नाही ! 'माझी भार्या' या कवितेंत कोठें शब्दांचा पाल्हाळ वाटला तरी भावनेचा संयम सुटला नाही. तिची लांबी कंटाळवाणी होत नाही यांतच तिच्या सच्चेपणाची तारीफ आहे. तें पत्नि-प्रेम केशवसुतांच्या तसल्या कवितांप्रमाणें मादक नाही. म्हणूनच कदाचित् तें अधिक गाढ वाटतें.

"एकीं प्रीती हीच खरोखर वैचित्र्याची मुक्ति !"

असलें प्रीतीचें समाधान टिळकांच्या काव्यांतून ओसंडत आहे. खेळकर विनोदाची जी झाक त्यांत आहे, तिनें प्रेमाच्या उत्कटतेला भारदस्तपणाची आणि घरगुतीपणाची जोड मिळवून दिली आहे.

टिळक केशवसुतांहून एक वर्षानें वडील, आणि नागपूर येथील टिळकांच्या सहवासांत केशवसुतांच्या काव्यशक्तीला विशेष उत्तेजन मिळालें असें म्हणतात. पण त्यापूर्वी टिळकांनी लिहिलेली कविता संस्कृत भाषेंतील अथवा जुन्या थाटाची होती. केशवसुत व त्यांचें काव्य यांचा परिचय झाल्यावर टिळकांनी नवा थाट आणला, म्हणून काव्यां-तील वडीलकी केशवसुतांकडे दिली जाते. नवीन काव्याची धुरा आरंभाला वाहणाऱ्या या दोन कवींत साम्याइतकेंच भेद आहेत. निसर्गभक्ति, समाजसुधारणेची तळमळ, साधी रचनाशैली हीं साम्यस्थळें उघड आहेत. कविप्रतिभेच्या अलौकिक सामर्थ्या-चीहि, केशवसुतांइतकी प्रखर नसली तरी, टिळकांनाहि जाणीव होती ; "वेडा" कवि रुक्ष व्यवहारापार असलेल्या शहाणपणांत व आनंदांत रमतो ; तेथें क्षुद्रपणाची झळ त्याला

# १ वनवासी फूल

[ ओळी २९१–३९२ ]

परिसुनि वच हें पुष्प हांसुनी वदलें ‘ बा कविराया !
ही माझी स्थिति पाहून वरिशी शोक कशाला वायां ?
निवास माझा जनांत होता कारण अपकारांला,
थोडेंसें मी तुला सांगतें, मोज बघूं दे त्याला
मदीय गन्धें व्यापारांना असते जन विस्मरले,
अनाघ्रात मम शरीर मग हें कोठुन असतें उरलें ?
विमल, दिव्य, मधु सुमनें जितकीं त्यांचा रस शोषावा
याविण ज्यांना निजजन्माचा अन्य हेतु नच ठावा ;
माझ्या मोहें त्या भ्रमरांच्या कुळांत भांडण होतें,
इतिहासज्ञां ठाउक आहे, – काय काय तें करितें.

माझ्या छन्दें फलद तरूंची करिता माळि उपेक्षा,
मींच रहावें गिरिकन्दरिं हें मज रुचतें त्यापेक्षां !
कोणा ठाउक सर्प भयङ्कर वेष्टुन मज बसता,
उद्याना मम सहज आणिता मृत्युमुखाची समता.
विकास माझा पुरा न झाला, तोंच कुणी अधिरानें
नेलें असतें मला खुडोनी लीलेनें अदयानें.
वृद्ध ब्राह्मण किंवा कोणी मजला घेउन जाता,
एक एक दळ माझें तोडुन देवार्चन साधीता !
मम सौन्दर्या पाहुन मजला बुद्धिपुरःसर नेते,
प्रेतासंगें पुरिते मजला, किंवा दग्ध करीते !

कुणी नेउनी मला वहाता कोणाच्या हृदयाला,
गाढालिङ्गनसमयीं येता विनाश मम देहाला !

किंवा तल्पीं इतर फुलांसम मजही नेउन रचिती,
जशी तयांची तशीच होती मम जन्माची माती !
विरहताप शमवाया अपुला मजला हृदयीं धरिती
कुणीतरी, तनु त्या हृदयासह माझी वाळुन जाती.
किंवा होता स्त्रीपुरुषांच्या प्रेमकलहिं मम अन्त,
येथें रानीं उगा न जन्मा मजला घालि अनन्त !'

'फार कशाला? तुझ्याच हातीं जरि मी येऊन पडतें,
कोमुन जातां तरी मला तूं फेंकुन दिधलें असतें !
म्हणशिल नाहीं, देशिल वचनें, घेशिल शंभर आणा !
अनुभव परि हा आजवरी ये बहुधा सर्व फुलांना
विचार तैसा उच्चारांचा प्रवाह कोठें वाहे ?
उच्चारांसम आचारांची श्रेणी कोठें आहे ?
मनांत भलतें, जनांत भलतें, हा तुमचा व्यवहार
कापट्याचा सागर म्हणजे हा तुमचा संसार !
प्रफुल्ल अथवा म्लान सारखें प्रिय मी जगदात्म्याला,
येथें राहिन कसें तरी मी सेविन नित्य तयाला,

सुख सुख म्हणती परन्तु नाहीं सुख मनुजांना ठावें ;
व्यर्थ मृगजळामागें तृषितीं त्यांनीं नित्य फिरावें !
काय सुखाची व्याख्या करिशी सर्व जगा सामान्य ?
क्षार जला त्यजि मानव, त्यांतच मीन म्हणे मी धन्य !
वनांत मी हें तुला वाटतें मम मोठें दुर्दैव,
परन्तु हें मम सुख, सार्थकता, हेंच मदीय अहेव !
व्यर्थ कल्पना कविराया ! तूं सोडुन असल्या देई ;
वनांत अथवा जनांत दैवीं असेल तें तें होई.'

हांसुन बोले कवी ‘ तरी चल करील दैव हवें तें,
उगाच चिन्ता भलत्यासलत्या कां तव चित्त करीतें !
अनुभव नाहीं तुला कशाचा, असम्बद्ध तव वाणी,
खरें सांग तुज वैराग्याची दीक्षा दिधली कोणीं !

जगांत आम्ही सदा रहातों, अमुचीं वचनें खोटीं !
एकाकी तूं बाळ कालचें, ज्ञप्ति तुझी परि मोठी !
शुद्ध सुखाची आशा खोटी, नच तें जनिं वा विजनीं
फोल तुझे हे बोल ! जा पहा गुरुला अपुल्या पुसुनी !
तृषेवांचुनी पाणी नाहीं, क्षुधेवांचुनी अन्न,
उष्म्यावांचुन चन्दन नाहीं उपभोगार्ह ! कदा न !
ध्वान्तावांचुन सूर्याचाही प्रकाश विश्वीं नाहीं,
दुःखावांचुन नको सुखाची, व्यर्थ कल्पना पाहीं !

‘ क्षुधा, तृषा, शीतोष्ण उपाधी जनीं रहा, वा रानीं,
चुकले नाहिंत कधीं कुणाला, दुःख सौख्य वा मानीं !

अखण्ड निद्रित राहुन यांना चुकवावें ही मुक्ति,
म्हणोत कोणी ; फुला ! मृती ही ! नोहे मुक्ति ! भुक्ति !
तुला सांगतों ज्यांस सङ्कटें म्हणती त्या बघ ऊर्मि
भवसिन्धूच्या, – पोहणार मी, मजला दिसती नामी !
विजयनाम जो दुर्ग तयाचा किंवा हा सोपान,
मला आवडे चढावया हा, कुणी म्हणो सोपा न !
मनोवृत्तिच्या पायावरती रचिलेला हा दुर्ग,
याच्या शिखरीं विराजमाना हांकेवरती स्वर्ग !
चल मजसङ्गें ! जाऊं तेथें ! म्हणशिल मग “ हें काय !
उलटे हितकर, सुखकर सुन्दर दिसती सर्व अपाय ! ”

सुख येथें नच, सुख तेथें नच, सुखदु:खाचे कर्ते
आपण ! सुमना ! परमेशाच्या पूर्ण कृपेचे भोक्ते !

‘ अनुरागाचा सुन्दर तरुवर दु:खकर्दमीं रुझतो,
अश्रुजलाच्या सारणिमाजी फोंफावत तो जातो
परि तो कर्दम, किंवा जल तें, आणी पुष्पफलें तीं,
तया तरूचीं कोठें हरिती कल्पतरूची महती !
वनभूमीवर जगे न तरु हा, जनभूमीवर जगतो ;
त्रिभूतिनें निज संसाराला सार जगाचें करितो !
छायेखालीं याच्या वसतां जग हें सुखमय सारें,
दु:खाचा लव न दिसे कोठें, सारे रम्य पसारे !
या वृक्षाच्या शाखेमध्यें तुला निवेशित करितों,
चल ये पाहूं ! ’ म्हणून अपुले हात कवी पसरी तो.

दिसेदिसेना अशा रीतिनें किञ्चित् निजशिर चळवी,
हो नाहीं हें नच कळवी सुम ; परि सन्देहा कळवी.
स्थिती मनाची जाणुन त्याची थोडासा रागानें
म्हणे कवी, ‘ मज ओळखिलें नच तुझिया मुग्ध मनानें.
काम निराळा, प्रेम निराळें, सदैव वाटे ज्यातें,
कधीं कल्पिलें नसे जयानें विषामृताचें नातें ;
प्रफुल्ल अथवा विशीर्ण असला भेद जयाचा गेला,
प्रेम आणखी सुन्दरता हीं एक सदाचीं ज्याला ;
प्रेम विरमलें, कमी जहालें, मळलें, हरवुन गेलें,
म्हणणारे ते अजाण सारे मतें जयाच्या ठरले ;
असा जरी तुज रसिक जगीं या पहावयाचा झाला
तरी फुला ! तूं भेट येउनी असेल तेथें मजला !

पुन्हां सांगतों, जीवन आणि प्रेम भिन्न नच, एक !
प्रेमहीनता मृति, केवळ तो स्वार्थाचा अतिरेक !
प्रेमासाठीं सुखा विसरणें हीच सुखाची पूर्ति !
प्रेमासाठीं देहविसर्जन हीच खरोखर मुक्ति !
प्रेमासाठीं मुक्तिसुख, परमेश्वर हा, स्वर्ग हाच, ये पाहूं,
प्रेमरूप ये होऊं आपण, देवासन्निध राहूं ! १००
प्रेमनाम जगदीश फुला रे ! काय आणखी सांगूं ?'
पुरे करीं वनवास, याहुनी काय दुजें मी मागूं ?'

★

## २ माझी भार्या

त्रिवर्गाची दात्री, भवजलधिची केवल मुदी,
सुखा दुःखा हस्तीं धरुन बसलेली सवलघी ;
जिच्या योगें लोकीं शुभ अशुभ हें कर्म घडतें,
तया स्त्रीजातीला मम मति मुदा आधिं नमिते ! १
नमीतों मातेला—जगत गणितें दैवत तिला ;
नमीतों कांतेला—नृपपद उणें जीस तिजला ;
नमीतों मैत्रीला—परगृहगताही भगिनिला,
नमीतों कन्येला—सतनु ममता तीच विमला ! २
मला कोणी कोणी उगिच जन हे स्त्रैण म्हणती
न जाणोनी, कीं स्त्रीपुरुष मिळुनी दोन नसती ;
अहा ! अंगें जीचीं, अनुपम अशी शक्ति विलसे !
पसारा तीचा हा ! तिजविण कुठें कांहिंच नसे ! ३
असो, हें राहूं द्या ; परि खचित सांगा मज कुणी,
कुडीला जीवानें अलग गणणें काय म्हणुनी ?

मला सांगा वाणीसह युत सदा अर्थ असला
म्हणोनी तो स्त्रैण प्रकट ! बुध, हा न्याय कसला ?
असो हेंही ; माझ्या प्रिय सखिस मी प्राण गणितों,
गणीतों कंठींचा प्रिय अतुल, निर्मूल्य मणि तो !
अहा ! याची आहे रसिक जनहो कारणतति,
पुढें ठेवीतों ती सविनय, पहा पात्र पुरती ! ५

न चन्द्राची किंवा मुख न कमळाची करि सरी,
न वर्ण स्वर्णाचा लवहि दयितेचा मद हरी ;
न तीच्या मध्याला बघुन हरि रानांत लपला,
अती साधी रूपें प्रिय मम सखी एक अबला ! ६

नटावें कैसें तें मुळिंच न कधीं ठाउक तिला,
न ती वेडी भोळी शिकलि कधिं मत्तेभगतिला !
विलासांनीं युक्त स्मित नच तिचें, तें सहज ये,
कटाक्षक्षेपाची रुचिर सरणी ती तिज न ये ! ७

उषा साधी स्मेरीं भरित मधु साधेपण तिच्या,
अहा ! हारी साधी म्हणुन मन सायंतनरुचा;
स्वभावोक्ती साधी म्हणुन अलंकारिं सरसा,
प्रिया माझी साधी म्हणुन मम तो स्वर्गच जसा ! ८

तिची वाणी साधी परम मधुरा यास्तव मला !
रहाणी ती साधी म्हणुनच तिला—जीव भुलला !
जशी सृष्टी तुष्टिप्रद सरल, अव्याज म्हणुनी !
तशी माझी वाटे मज सुखद ती रम्य गृहिणी ! ९

मुखीं शांति, प्रीती विनय अकृतोपाय दिसती,
अहा नेत्रीं तीच्या सतत सहजानंद वसति !
अहा औदार्याचें प्रियसदन तें भाल दिसतें
कपोलीं साध्वीच्या शुचि, विमल माधुर्य रमतें ! १०

सुवर्णा ज्या कामी, कृपण, अथवा चोर विकले,
सुवर्णी त्या माझें अनुरत कधीं चित्त कसलें ?
करी ज्याच्या योगें मजसि अपुला याचक जसा !
सुवर्णा त्या तीच्या जगिं न उपमा लभ्य सहसा १९
कवि प्राणा देती – कवि म्हणति – सौन्दर्य बघतां,
प्रभू सौन्दर्याचा जगदधिप विश्वेश रचिता ;
न मी निन्दीं त्याला, समज उलटा हा नच करा,
न मी सांगायाला सबल अपुलें चित्त इतरां. १२
वरी शुक्ती मोठी सुबक, तरि ती गण्य न मला,
तिच्या पोटीं मुक्ताफल मम तया जीव भुलला !
बरा जो पीयूषें दिसत मज मृत्कुंभ भरला,
न रत्नस्वर्णाचा मधुरहि जलाचा घट भला ! १३
'अरे, वेडा गोळा पदरिं पडला, त्याप्रति जरी
असा जीवापेक्षां अधिक जपसी मोडुन, तरी
किती नेणों रम्भा मिळति मग होतासचि पिसा,'
अशा छद्मोक्तीनें किति जन मला टोंचिति जसा. १४
न वाटे रम्भांचें कुतुक मजला रेसभर तें,
पुढें तीच्या त्यांचें सकळ रसतें, तेज, तुरतें !
कलांचा रूपांचा किति जरि मुलामा चढविला,
खरें जें त्याची ये तरि कधिं तयाला नच तुळा ! १५
स्वभावांतोनी जें, नच कधिं गळ्यांतून निघतें,
अशा गाना रम्भा अपरिचित हें ज्ञान पुरतें !
प्रिया माझी गाते मग सकळ हें विश्व डुलतें !
अहा अन्तःसृष्टी हसत सुटते ! पूर्ण फुलते ! १६
कुणा नाहीं ठावें, परि मम सखी नर्तनपरा !
तिच्या नृत्यीं झाला मजसि दिसला खण्ड न जरा !

सदा प्रेमें तीचें हृदय भरलेल्या नदिपरी
पुढें माझ्या वाहे मधुनिमधुनी तांडव करी ! १७
अशा या नृत्याचें मिळवुन न वैदग्ध्य मिळणें,
शिकोनी रम्भांना नच असतिना हें उमजणें !
कला त्यांची त्यांना, असतिल तयांचे अनुग जे —
तयांना, आम्हांला अरसिक जनां काय समजे ? १८
तपस्या भंगावी सुमति गत व्हावी, सकल भा
विरावी, कीं व्हावी, अशुभसरणी मात्र सुलभा;
असें तें रम्भांचें अमरनुत लावण्य असलें,
तरी तें व्हावें हो मज अरसिका मान्य कसलें ? १९
जिच्या लावण्यानें तम दुर पळे, चित्त उजळे,
उषेच्या लावण्यें जगत उजळे जेविं सगळें !
असो काळी गोरी, त्रिभुवनिं तिचें रूप वहिलें !
निळें वा गोरें वा मज पुरवलें रत्न असलें ! २०
जगीं निर्द्रव्याला जनकहि गणी शत्रुच जसा,
न देती मानाला, समजति तया बान्धव पिसा;
जगो किंवा जावो मरुन जग त्याला नच पुसे,
तयाची भार्याही बहुतकरूनी त्या छळितसे. २१
परी माझी भार्या सकलधन जीचें स्वपति ती
अहा ! या दारिद्र्या परम सुखदायी म्हणविती !
अशा या अन्धारीं मम गृहशशी तो उगवला,
द्रवे ज्याच्या तेजें उपल मज ऐसा नरमला, २२
जियेची आहे कीं मजवरति निष्काम ममता,
सुखी वा दुःखीं वा अवगत न जीतें विषमता;
सखी माझी ऐसी मज गणितसे प्राण दुसरा !
अशी भाग्यें हीना सहज मिळणें — गोष्ट विसरा ! २३

अहा प्रीती प्रीती म्हणुन धरुनी वृत्ति भलती
करीती नृत्यातें विकट नरनारी जगिं किती !
जळो तें कामाचें विलसित ! पुरा कौशिकमुनि
अशा या प्रीतीनें अधम ठरला हाय ! अजुनी ! २४
अशा या प्रीतीनें भट, बुध, मुनी, भूत फसले,
अशा या प्रीतीनें यश, गुण, सुधी, सर्व रुसलें !
अशा या प्रीतीनें जगतिं किति झाली कुलहति !
अशा या प्रीतीनें अरसिक खुलेना मम मति ! २५
अशा या प्रीतीनें अमरपतिचे हेतु पुरती,
अशा या प्रीतीनें तरी न जित वेडी मम मति,
अशा या प्रीतीनें प्रिय न मजला माझि गृहिणी,
तिची प्रीती नाहीं अवगत कुणालाच अजुनी ! २६
तिच्या त्या प्रीतीनें मजपुढतिं शुद्धत्व विलसे,
तिच्या त्या प्रीतीनें कृपणपण सारेंच निरसे;
तिच्या त्या प्रीतीनें विलय बघतो स्वार्थ अवघा,
तिच्या त्या प्रीतीनें मम सकल हो वृत्ति अनघा ! २७
तिच्या त्या प्रीतीनें शुभमय जगीं स्त्रीत्व दिसतें,
दिसे तें स्वर्गीचें ! धरणिवरचें दिव्य नुसतें !
कशाचें स्वर्गीचें ! अहह ! चुकलों, त्याहुन किती
विशुद्धेची प्रीती अभिनव सदा, उच्चतर ती ! २८
विचारोच्चारांना लवभरहि जे आकळति ना,
अहा ज्याचे त्याला ! इतर कवणाला कळति ना,
असे कांहीं कांहीं अनुभव तयांमाजि पहिला
तयाला प्रीती मी म्हणत, उपमा नाहीं हिजला ! २९
अशा या प्रीतीची कधिं न सरणारी खनि सती
मला लाधे, तीची किति किति तरी गाउं महती ;

नको कांहीं ! नाहीं तिजविण अपेक्षा जगिं मला !
हंसा ! निंदा ! बोला ' विगलितमति मूर्ख कुठला ! ' ३०

प्रियासाठीं ' मी ' चा विसर पडणें हेंच पहिलें
स्ववृत्तें प्रीतीचें मज शिकवि तें लक्षण भलें,
दिसेना कीं मानी पति म्हणुन ती दैवत मला,
मलाही पूजेची रुचि न, रुचते प्रीति विमला ! ३१

तिचा स्वामी मी ती मम चरणदासी न अथवा,
न देतें हें नातें तिज मज कधींही सुखलवा !
खरी प्रीती, सेवा उभय अनवद्या सहचरी !
हिला ती, तीला ही, त्यजुन वसती ना क्षण दुरीं !! ३२

अणूंहीं केलेलें वितत अवघें हें जग जसें,
मिळोनी झालेलें लघु लघु कृती जीवित तसें ;
ममत्वाच्या लाटा मृदु लघु असंख्यात उठती
गृहार्थी मर्त्यीं हे अमरहि सुखानें वितरती ! ३३

तिच्या अल्पा स्वल्पा कृति, लघु तिचीं चाटुगदितें
तिचीं प्रेमस्वप्नें मनिं, नयनीं, वाणींत उदितें ;
तिच्या दीनासाठीं अविरत दयेच्या लघु कृति,
तिचे ते हेतू जे सहज हळु बाहेर पडती. ३४

तिचें थोडें थोडें पडत हंसु जें बाहिर पडे ;
तयासंगें थोडें मिसळत मिळे जें मृदु रडें ;
तिचें थोडें थोडें रुसुन बसणें, तें त्यजुनियां
पुन: रंगीं येणें परि धरुनियां पूर्ण विनया. ३५

तिचें थोडें थोडें नकळत मला बोध करणें,
मला थोडें थोडें परि दृढ सुमार्गांत धरणें ;
तिचें थोडें थोडें अमृतकण सारें चरित तें !
अनन्या रत्नांची खनि मज वृथा ती न दिसते ! ३६

प्रसू बाल्यीं गेली त्यजुन अमराच्या वसतिला,
नको शंका, चिंता छळि मम तिथेंही सुमतिला !
तिच्या त्या चिन्तेचें हरण करणारी तिज परी
सखी माझी भेटे सदय गृहिणी एकच खरी. ३७
नका ठेवूं नांवें मम वचन ऐसें परिसुनी,
पुरा बोलीजेले गृहिणिसह 'भोज्येषु जननी !'
समस्ता नात्यांची दिसत मज ती पूर्ति सुमति !
प्रतीती ही माझी परि तिजहुनी हीहि कमती ! ३८
अहो तत्त्वज्ञांनो ! किति जरि समीक्षेंत गढलां
तरी तो आहे का अनुभव घडे जो मधु मला ?
सखी माझी द्वैतीं विमल मज अद्वैत पढवी !
न राहे धन्या ती पढवुन परी अर्थ पटवी ! ३९
पुरें झालें ; भूती अनुपम, अनिर्वाच्य सतिची,
धजावें वर्णूं ही पुरि मम परीक्षाच मतिची !
क्षमा कीजे आर्ये ! तुज न रुचते त्वद्गुणनुति,
करूं कैसें ? माझ्याकडुन दुसरे हें करविती ! ४०
अरे माझ्या मित्रा, चतुर सचिवा, हे गुरुवरा,
प्रिये शिष्ये, भार्ये, मम सकल रे पुण्यनिकरा !
पहा हे प्रेमाश्रू तव चरणयुग्मीं वितरती !
मनोवृत्ती माझ्या मधुसुमनवृष्टीच करिती ! ४१

★

## ३ अगाध कांहींतरी !

अगाध कांहींतरी,
समज हें अजरामर सुन्दरी !
व्योमधरेचा चुंबनविधि हा,

सरे न कल्पान्तरीं !
समज हा अजरामर सुन्दरी !
निसर्ग आणि उषा सुहास्या
निष्कामत्वें करी,
समज हें अजरामर सुन्दरी !
कोठें प्रस्तर ! कुठें कौमुदी !
अन्योन्यीं रति तरी,
समज ही अजरामर सुन्दरी !
रूप निराळें, नाम निराळें,
अभिन्न उभयें परी ;
समज ही अजरामर सुन्दरी
मीपण, तूंपण अपुलें म्हणजे
प्रिये एकता खरी !
समज ही अजरामर सुन्दरी !

★

## ४ कुणास्तव कुणीतरी

सरोष घन वर्षती, तरुलतांशिं वारा झुजे,
विराम नच ठाउका क्षणहि नाचतांना विजे
भयानकचि संचरे सकल सृष्टि हो घाबरी
कुणास्तव कुणीतरी सभय वाट पाहे घरीं !
स्वप्रतिरवामुळें बधिर जीव सारे जरी,
निनाद करिते अहा ! श्रवण चाहुलीचा तरी ;
उठे दचकुनी तडित् दुसरि नर्तनाला करी,
कुणास्तव कुणीतरी कितिक येरझारा करी !

खुशाल कर वृष्टिला, तुज न तो भिणारा घना !
पिशाचसम तूं खुशाल कर गे विजे नर्तना !
महीधर समीरणा ! धरुनि लोळवी भूवरी,
कुणास्तव कुणीतरी निघत जावयाला घरीं !

घनप्रसर माजला, नभिं न एक तारा दिसे,
परंतु हंसरा सदा सुखद चंद्र गेहीं वसे;
अहा द्रवविता कुणा सहज चंद्रकान्ताप्रती
कुणास बघुनी कुणीतरि हंसेल हर्षें किती !

अहा चरणधावना कलशपूर्ण उष्णोदकें
रुचिप्रद वरान्न जें करिल हो सुधेला फिकें !
फुलांहुनि मऊ असें शयन रम्य मंचावरी,
कुणास्तव कुणीतरी घरिं अशी तयारी करी.
रसाळ वचनावली विविध तोंडिं लावावया
मिळेल, उपमा उरे मग न भोजनाला तया
पडेल मग विस्मृती सकलहि श्रमांची क्षणी,
कुणाप्रति कुणीतरी निरखितां प्रसन्नेक्षणीं !

तया प्रणयनिर्झरा प्रणयनिर्झरीला तिला
सदा सुखद भोंवरा विहरण्यास ऐशा मुला
बळेंच उठवी कुणी ! उभयतांस आलिंगुनी
कुणीतरी धरील तैं विषय अन्य कैंचा मनीं !
तमास अपसारुनी उन पडेल त्या मंदिरीं,
तशांत पडतील हो मधुनि पावसाच्या सरी,
कुणीतरि धरोनियां कर करीं कुणाचा तरी,
स्तवील परमेश्वरा जलद, सूर्य ज्याच्या करीं !

★

## ५ गुलाब

गुलाबांनो ! न्यायास तुम्हां आलों,
असें म्हणुनी मी हंसत पुढें झालों ;
हंसुनि माना त्यांनींहि डोलवील्या,
वृत्ति माझ्या सप्रेम हालवील्या.
जगीं अवघ्या अनुपम्य, रम्य कान्ति,
सरस, कोमल, आनंदमयी वृत्ति ;
सुखद सौरभ, यांपुढें क्षुद्र कांटे.
कुणा त्यांचें रसिकास काय वाटे ?
किती पर्णांसह गुच्छ घेउनी मी
परत आलों आपुल्या सुखें धामीं ;
पुष्पपात्रीं ते सर्व ठेवियेले,
सदन आणी उद्यान एक केलें !
जसा माझा आवास तसा मीहि
धंन्य झालों त्या रम्य गुलाबांहीं !
सर्व सोडोनी त्यांजकडे पाहीं !
वेळ किति गेला स्मरण मला नाहीं !
असो ; केला मीं प्रश्न गुलाबांला,
'जन्मदेशा मुकविलें मीं तुम्हांला ;
सर्व तुमचे सम्बन्धि दूर केले,
स्थलीं परक्या आणून बैसवीलें.
तुम्ही रमतां तरि मला रंजवीतां,
स्थला परक्याही नवश्रीस देतां ;
शील तुमचें हें धन्य, गुलाबांनो !
कोण वानिल तो कवी यास वानो !'

प्रश्न ऐकुन त्यांतलें पुष्प एक
पूर्ण फुललेलें, कान्तिनें सुरेख,
पुढें होउन थोडकें म्हणे 'देव
म्हणे, कोठेंही सुखद व्हा सदैव !'
शब्द इतुके बोलुनी स्तब्ध झालें,
पुन्हा पहिल्यासम हंसत उभें ठेलें ;

जणूं प्रश्नोत्तर जाहलेंच नाहीं !
पुढें माझ्या निश्चिन्त असें राही.
मीहि सोडुन गृह दूर अन्यदेशीं
स्वयें होतों तैं अन्यगेहवासी ;
मीहि वदलों 'सांगतो मला देव
जगीं कोठेंही सुखद व्हा सदैव !'

पुन्हा वदलों मी तया गुलाबाशीं,
'सख्या ! आपण सारेच रे विदेशी ;
गेह अपुलें राहिलें दूर, येथें
देउं सर्वां, सर्वत्र, चल, सुखातें !'

★

## ६ केवढें हें क्रौर्य !

क्षणोक्षणिं पडे, उठे परि बळें, उडे बापडी,
चुके पथहि येउनी स्तिंमित दृष्टिला झांपडी ;
किती घळघळां गळे रुधिर कोमलांगांतुनी,
तशीच निजकोटरा परत पातली पक्षिणी.
म्हणे निजशिशूंप्रती 'अधिक बोलवेना मला,
तुम्हांस अजि अंतिंचा कवळ एक मीं आणिला ;

करा मधुर हा ! चला ! भरवितें तुम्हां एकदा
करो जतन यापुढें प्रभु पिता अनाथा सदा !
अहा ! मधुर गाउनी रमविलें सकाळीं जना,
कृतघ्न मज मारितील नच ही मनीं कल्पना !
तुम्हांस्तव मुखीं सुखें धरुनि घांस झाडावरी
क्षणैक बसलें न तों, शिरत बाण माझ्या उरीं !
निघून नरजातिला रमविण्यांत गेलें वय,
म्हणून वधिलें मला ! किति दया ! कसा हा नय !
उदार बहु शूर हा नर खरोखरी जाहला
वधून मज पांखरा निरपराध कीं दुर्बला !
म्हणाल भुलली जगा, विसरली प्रियां लेंकरां,
म्हणून अतिसंकटें उडत पातलें मी घरा ;
नसे लवहि उष्णता, नच कुशींत माझ्या शिरा,
स्मरा मजबरोबरी परि दयाघना ईश्वरा !'
असो ; रुधिर वाहुनी नच भिजो सुशय्या तरी
म्हणून तरुच्या तळीं निजलि ती द्विजा भूवरी ;
जिवंत बहु बोलकें किती सुरम्य तें उत्पल
नरें धरुनि नाशिलें, खचित थोर बुद्धी, बल.
मातींत ते पसरले अतिरम्य पंख,
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक !
चंचू तशीच उघडी, पद लांबवीले,
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले !

★

## ७ पांखरा ! येशिल का परतून ?

पांखरा ! येशिल का परतून ?
मत्प्रेमानें दिल्या खुणांतुन
एक तरी अठवून ? पांखरा !
हवेसवें मिसळल्या माझिया
निःश्वासा वळखून ? पांखरा !
वाऱ्यावरचा तरंग चंचल
जाशिल तूं भडकून ! पांखरा !
थांब, घेऊं दे रूप तुझें हें
हृदयीं पूर्ण भरून ! पांखरा !
जन्मभरी मजसवें पहा ही
तव चंचूची खूण ! पांखरा !
विसर मला, परि अमर्याद जग
राहीं नित्य जपून ! पांखरा !
ये आतां ! घे शेवटचे हे
अश्रू दोन पिऊन ! पांखरा !

★

## ८ आंधळा झालों तर –

मेला होशिल तूं जगास म्हणती 'झालों जरी आंधळा ;
खोटें हें भय काय चित्त सकलव्यापी नसे हें मला ?
सृष्टीचें मधु बाह्य रूप न दिसो डोळ्यांस चिंता न ते
ती हंसीसम मानसीं मम सदा सानंद हो खेळते !
मूर्ती मोहक ज्या पुढेंच दिसती स्वप्नांत जागेपणीं
त्या त्या काय विलोकितों सकल मीं, सांगा, मला लोचनीं !

ज्या अत्युत्तम लाडक्या अधिक त्या संस्पष्ट होती मला
जेव्हां मी नयना मिटून बघतों प्रेमें पुढें त्यांजला.
होती शंभर कोस दूर मजला सोडून मूर्ती प्रिया,
मध्यें डोंगर उंच उंच टपले दृष्टीस झांकावया,
होतों पाहत मी तिला परि सदा, आश्चर्य हें काय न ?
नेत्रें इष्ट मला; परंतु नच हें नेत्रावलंबी मन !
जरी नेत्रें गेलीं तरि अनुरती काय सरली ?
जरी नेत्रें गेलीं तरि मती मला का विसरली ?
जरी नेत्रें गेलीं तरि हृदय हें का हरपलें ?
जरी नेत्रें गेलीं तरि अशुभ तें काय घडलें ?
सृष्टी अमर्याद नवीन कांहीं
पुढें तुला रे दिसणार नाहीं
खरें ; परंतु नवसृष्टिकर्त्री
माझी सखी दूर न काव्यशक्ति
आजवरी सम जी सुखदुःखीं,
अंधपणीं कशि ती मज टाकी ?
दाविल नित्य नव्या मज गोष्टी,
देइल ही कविता नव तुष्टी.
ज्याला कोणि जगांत मौन म्हणती, किंवा कुणी स्तब्धता
त्याची ही श्रवणांविण परिसतों मी गोड वाचालता ;
किंवा अक्षयता जयेस म्हणती आद्यन्त तीचा दिसे,
झालों मी जरि आज अंधबहिरा तें दुःख मातें नसे
अनेकविध दर्शनीं मन चळे तुझ्यापासुनी,
म्हणून जग चिंतितें तुज विलोचना झांकुनी ;
बघेन तुजलाच मी सतत अंध झालों तरी,
नकोत नयनें ! प्रभो ! वसति मन्मनीं तूं करीं !

★

## ९ रणशिंग

गिरिवर माझ्या मी चढतों
शिंग एकदा फुंकीतों !
जा, जा ! पड तिकडे सनई !
काम तुझें येथें नाहीं.
सकल गुणांहीं सदा नवें
हें माझें रणशिंग हवें
स्तब्ध बैसले,
थकले, निजले,
भुलले, मेले
अवघे उठतिल तें करितों
शिंग एकदा फुंकीतों ! १
' नवयुग ! नवयुग ! नवयुग हो !'
शिंग फोडितें हा टाहो !
या रणवाद्या शरण रिघा
जा नाहीं तर मरा निघा !
पूर धावला
कोण तयाला
अडवायाला
समर्थ बघुं पुढती येतो
तरेल जो पोहेलचि तो.
हात धरील कालानें
धावा त्यासह हौसेनें ;
नेइल वा फरफटीत हा
करील जीवाची अपहा.

व्यर्थ घोंगडें
करिल लंगडें
बरवें न मढें
खांद्यावर ! सावध करितों
शिंग एकदा फुंकीतों ! ३

‘ मेले मेल्यां मुठमाती
देतिल’ ही वाणी घुमती
नव्या युगाची विश्रांत,
तीच माझिया शिंगांत ;
चला पुढें व्हा !
जगास दावा
करुनी नांवा !
हिंदपुत्रहो ! मी म्हणतों
शिंग एकदा फुंकीतों ! ४

अंधारांतुन उजेड ये
तत्त्व नवें हें सदा नवें
अशुभ निराशेच्या उदरीं
देवी आशा जन्म वरी,
हिचे भक्त ते
विजयी पुरते !
तयांस नुसतें
क्रीडांगण हा भव दिसतो
शिंग एकदा फुंकीतो ! ५

परिस्थितीहुन मी माझ्या
मोठा ; मजपुढती गमज्या—

काय चालतिल काळाच्या
दैवाच्या ! दुःखस्वप्नाच्या !
नवयुग आलें,
माझें झालें,
मन्मन धालें !
म्हणून जयगीता गातों
शिंग एकदां फुंकीतों ! ६

नवयुग अर्पी नवेंपण
घे घे तें अपुलें करुन ;
कितीक आले मग निपुण
तरी जिंकिशिल तूंच पण !
हें न दुज्याचें,
असेल लघुचें —
परंतु कविचें
भाकित, तुजला बजावितों !
शिंग एकदां फुंकीतों ! ७

★

## १० ब्राह्मण किंवा महार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 92626
शाखा

मी ब्राह्मण वा महार मी,
गणीं न कवणालाच कमी ;
या सृष्टींतिल दिव्यपण ;
तेंच तेंच हें मनुजपण ;
मांगल्याची ही ठेव,
हीस्तव देइन मी जीव ;

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
१०१ अनुक्रम ....43540 वि: ....काव्य.
....1929.... नों: दि: 26/2/5

हिच्याहि मोला
गणी न त्याला,
महाखलाला
नीच, नीचतर गणीन मी
जन्मभूमिसेवाधर्मी. १

हिंदभूमि माझी जननी,
आले हीच्या कुशींतुनी
हिरेच अवघे माझे ते
मन्मन त्यां मोहुन जातें;
मलांत पडले,
खनींत दडले,
मुकुटीं जडले,
अवघे उचलुन घेइन मी
जन्मभूमिसेवाधर्मी. २

विपन्नता ज्यांच्यापाठीं
जीव कळवळे त्यांसाठीं ;
अज्ञपणा ग्रासी ज्यांतें
प्रियतर दुर्बल मज ते ते !
त्यजुनी सकलां,
रुग्ण दुर्बला
उचली बाला
जननी ; तीसम वेडा मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ३

मानामानाचें गोवें !
कसें असें कवणा ठावें !
खाइन अवघ्यांच्या लाथा,
देइन सेवेला माथा ;

निजभूचें ऋण,
अवघें फेडिन,
मरून जाइन !
रक्षिन गुरुपद माझें मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ४

होइन नीचाहुन नीच
करीन अवघ्यांना उंच
ते ब्राह्मण मग महार मी
कोण गणी मग मला कमी
कमी गणीना
कांहिं म्हणेना
कुणी, तयांना
विचारितों मग कसला मी
जन्मभूमिसेवाधर्मी ? ५

पांच कशाचे, हे जितुके
हिंदभूमिबालक तितुके
मम देहाचे प्राण खरे
कसेहि असले तरि सारे
जें वाटे तें
सांगायातें
शब्द न पुरते,
धरितों मौना यास्तव मी
जन्मभूमिसेवाधर्मी. ६

★

## ११ पुरें जाणतों मीच माझें बळ !

हा एक कक्षेंत छावा गजाचा, दुजीमाजिं हा सिंह केकावतो,
हा जाहला अर्धमेला भयानें लपोनी महाव्याघ्र डोकावतो;
हे पर्वतांचे उभे क्षुद्र धोंडे, महासागरांचे पुढें पल्वल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बळ !

भूगोल हा दोन बोटांत माझ्या, नको अन्तराला तुझी थोरवी !
पाहीन एके दिनीं मीच सारे कुठें झांकलेले तुझे ते रवि !
हीं पंचभूतें मला सेविणारीं, खरें सांगतों मी न गर्वाकुल;
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बळ !

मी भासतों कीट, ही भूति माझी परी भेदि सूर्याचिया मंडळा,
तूं हास काळा मला, मी तुलाही सदा हांसतों गर्विता, चंचला;
हे आधिंनो, व्याधिंनो मक्षिकांनो ! तुम्ही बापुडीं कायशीं दुर्बल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बळ !

हें विश्व सारें विहारास माझ्या पुरेसें न होईल शंका नको,
हा मर्त्य, हा देहकारानिवासी, बळें हीन हा, कांहिं कोणी बको !
मी मर्त्य, मी मृत्युला जिंकणारा ! जगीं धूळ, मी दिव्यता उज्ज्वल !
बोला हवें तें, मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बळ !

मीं ओळखीलें मला पूर्ण; आतां कशाला मला पाहणें आरसे ?
माझ्यापुढें नित्य आत्मानुभूती; पटावे दुजे तर्क आतां कसे ?
मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खरी हेतुचीं पूर्तता मंगल !
बोला हवें ते मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बळ !

★

# विनायक

## [ विनायक जनार्दन करंदीकर, १८७२-१९०९ ]

मनही ज्यांचें दास परांचें
ध्वनी तयांना तव गीतांचे
क्षणांत कारितिल धनी मनाचे !
चित्ततारका ! कवि 'विनायका ! — माधव

विनायकाच्या कवितेइतकीच त्याच्या रंगेलपणाचीहि चर्चा झाली आहे; फक्त ती जरा दबल्या सुरांत होते इतकेंच. टिळकपंथाचा पगडा महाराष्ट्रावर बसूं लागला तशी खासगी चारित्र्याची बूज वाढली. या चारित्र्याच्या कल्पना रूढिग्रस्त होत्या ; त्यामुळें समाजसुधारणेला त्यांनी कडवा विरोध केला, तरी एकंदरीने मराठी जीवनाचें शील उंचावलें यासंबंधीं शंका नाही. सुधारकांच्या दुराचाराचीं काल्पनिक अथवा अतिशयोक्त वर्णनें जीर्णोद्धारवाद्यांनी केलीं आणि बहुजनसमाजाच्या गळीं उतरवलीं. पण आगरकरांहून भव्य शील कोठे आढळेल? केशवसुतांच्या चारित्र्याबद्दलही वाद नाही. विनायक त्यांचा स्नेही, पण स्नेहापोटीं त्यांनी विनायकाच्या व्यसनांकडे काणाडोळा केला नाही. उलट " कवि काव्यांत दिसतो तसाच कृतींत असेल तर किती गोड होईल ! " असे दुःखाचे उद्गार त्यांनी काढले. पण कवीपेक्षा त्यांच्या कवितेचेंच आयुष्य जास्त असतें हेंच समाधान, असें त्यांचें म्हणणें. खुद्द विनायकाच्या मनाला त्याची सारखी टोंचणी होती. अर्वाचीन कवितेच्या एका संग्रहासाठीं दत्त कवींनी विनायकाकडे कांही कविता व चरित्र यांची मागणी केली होती, ती नाकारतांना विनायकाने कळविलें, " माझें चरित्र इतकें विचित्र आहे कीं कोणी ऐकूं नये. ऐकिल्यास माझी कविता तो वाचणारच नाही; तरी चरित्र हवें असल्यास कविता पाठवितां येत नाहींत ! " केशवसुत, टिळक अशा स्नेह्यांपासून तो दूरदूर राहिला. नवीन शिस्त बाणली नाही आणि जुना ढंग पुरा मावळला नाही अशा त्या संधिकालाचा विनायक प्रतिनिधि होता. " जनांतला महाराष्ट्र आणि मनांतला महाराष्ट्र वेगवेगळा पडे. महाराष्ट्राच्या संसाराचा हा दुरंगी वेष सामाजिक व राजकीय पुढाऱ्यांच्या चरित्रांत स्पष्ट दिसेच दिसे. . .विनायकाचें लौकिक चरित्र आणि अंतस्थ चरित्र यांतील विरोध म्हणजे त्या वेळच्या महाराष्ट्राचें प्रतिबिंब होय असें पर्यायाने म्हणतां येईल, "

हें वासुदेव बळवंत पटवर्धन † यांचें मत विचार करण्यासारखें आहे. विनायकाचें काव्य सत्प्रवृत्त आहे. जुन्या काळांतील शीलवतींचा मुक्तकंठानें गौरव करतांना स्त्रीजाती-संबंधीची आपली भावना हलकी नाही, याचा त्याने पुरावा दिला. "स्त्री आणि पुरुष" ही कविता त्यांत भरच टाकते. या विलासी कवीच्या कवितांत असें एकहि स्थळ नाहीं कीं जेथें सदभिरुचीला संकोचल्यासारखें व्हावें. मग खरा विनायक कोणता, सैल वागणुकीचा कीं कणखर कवितांचा? या दुरंगीपणांत ढोंग नाही, कारुण्य आहे. जडलेल्या छंदांचे पाश इच्छा असून तोडतां येत नाहीत या अगतिकतेच्या जाणीवेने उत्पन्न झालेली विव्हलता "प्रत–" या स्वपत्नीस उद्देशून लिहिलेल्या कवितेंत पाहावी. "दुर्दैवें जडलें मला व्यसन जें, तें साहवेना तुला;" पण जन्माचा संबंध जोडला तो "घ्यावा गोड करून ह्यांतच भलें हें कां कळेना तुला?" असा कळवळून प्रश्न विचारला आहे. त्या काळचें रुक्ष, सहानुभूतिशून्य गृहजीवन आणि रक्तांतील निसर्गस्फूर्त रंगेलपणा यांतील ओढाताणीनें दुखावलेल्या दिल्दार माणसाची ही कहाणी वाटते.

केशवसुत, टिळक व विनायक या त्रिकुटाने नव्या कवितेला चालना दिली हें खरें असलें तरी त्यांच्या तऱ्हा निरनिराळ्या आहेत व विनायकाचा 'नवेपणा' मर्यादित स्वरूपाचा आहे हें विसरू नये. हा नवेपणा अंतरंगापेक्षा बहिरंगांत ढळेल. जुन्या कवितेची वृत्तबद्ध आणि शब्दजड, म्हणून कृत्रिम भासणारी, रचना टाळून विनायकाने ओघवती जातिरचना केली. शीघ्रकवित्वाचा गुण त्याच्यांत शाळकरी दिवसांपासून होता; पण शीघ्रकवित्वाबरोवर बहुशः येणारे अर्थहीनता, शब्दबाजी आणि रचनाशैथिल्य हे अवगुण त्याच्यांत नाहीत. त्याच्या शैलींत सहजता इतकी आहे कीं ती आहे हेंच चटकन् उमगत नाही. जुन्या कवितेंतील शैलीचें अवडंबर आठवल्यावर विनायकाची ही आधुनिकता पटते.

पण काव्याच्या आशयाबाबत विनायकाची आधुनिकता अपुरी आहे. आत्मपरता त्याच्या फार थोड्या कवितांत आढळते. 'सुवास' ही त्यांपैकी एक आहे. तिच्या शेवटच्या ओळी—

स्वानुभूत वासाचें दान
करावयाला जोंवर ये न
तोंवर कवितालतिकेवरती
कर्णिकार सुमनांची भरती!

---

† विनायकाची कविता, प्रस्तावना, पृष्ठ १६.

काव्यांतील अनुभूतीचें स्थान त्याने ओळखलें होतें याची ग्वाही देतात. पण त्याच्या बहुतेक कवितांना अशा वैयक्तिक अनुभूतीचा स्पर्श झालेला नाही. कथाकाव्यांत तिची अपेक्षा नसते; पण इतर कवितांत ती क्वचित् पुरविली गेली आहे. याचें एक प्रमुख कारण असें कीं कसलाहि काव्यविषय असो, त्यांतून शेवटीं बोध काढण्याचा कवीला हव्यास होता. बोध ज्याच्यासाठीं काढावयाचा त्या सर्वसाधारण माणसांच्या दिशेने कवितेने तोंड वळविलें कीं ती अंतर्मुख होणें कठिण, आणि "उत्तेजन द्या विनायकाला बोधाचीं गाया गाणीं" इतकीच कवीची आकांक्षा आहे.

विनायकाच्या काव्यविषयांची कक्षाहि कोती आहे. पूर्ववैभवाचें स्तवन, तें हरवल्याचें दुःख, त्याच्या पुनप्राप्तीची आस हेच त्याचे मुख्य विषय. पारतंत्र्याने बेचैन झालेला हा कवि इतिहासांत शिरतो; "सुवर्णभू"चीं स्वप्नें पाहातो आणि आजच्या विरोधी व विदारक आठवणीने स्वप्नाची समाप्ति झाल्यावर त्याची बेचैनी वाढते. यापूर्वीच वर्णन केल्याप्रमाणें इतिहासाला, विशेषतः मराठे आणि रजपूत यांच्या इतिहासाला, त्या काळांत नवें आकर्षण प्राप्त होऊं लागलें होतें. नव्या परिस्थितीचा तो जुना दाखला अनेक लेखकांना स्फूर्तीचा जणूं झरा वाटूं लागला. तो इतिहास अतिरंजित होता, त्याला धर्माभिमानाचें अधिष्ठान मिळाल्यामुळें राष्ट्रीय ऐक्यभावनेला तो बाधक होता, आणि नवी परिस्थिति ही त्याची केवळ पुनरावृत्ति आहे हा समज भोळा आहे, इत्यादि आक्षेप आज सबळ वाटले तरी त्या काळीं त्यांची मातबरी नव्हती. विनायकाचीं कथाकाव्यें अशा या स्वप्नाळु इतिहासाने भारलेलीं आहेत. फक्त त्यांतील तीव्र स्वातंत्र्यलालसा आता हृदयाला भिडते; दृष्टान्तांतील तपशील फोल वाटतो. राजकीय स्वाभिमान जागृत करणें हें अशा कवितांचें उद्दिष्ट मात्र बऱ्याच अंशीं सफल झालें असेल. इतर कवींनाहि विनायकाच्या या तडफदार कवितांतून स्फूर्ति मिळाली. त्या स्फूर्तीच्या बऱ्यावाईट लहरी मराठी काव्यांत गेल्या पिढीपर्यंत खेळत होत्या.

या भूतकाळांतील स्वप्नरंजनामुळें समाजाच्या वर्तमान दुःखाची झळ विनायकाच्या कवितेला लागली नाही. या पांच कवींत सामाजिक अन्यायाच्या निषेधाचें काव्य न लिहिणारा एकटा विनायक. फक्त एक टूम किंवा केशवसुतांची नक्कल म्हणून इतरांनी तें लिहिलें हा परिचित आरोप ध्यानीं घेतां विनायकाला तसेंच करण्याचा मोह टाळल्याबद्दल प्रामाणिकपणाचा गुण हवा तर चिकटविता येईल! पण इतिहासाच्या प्रेमामुळे जुन्या परंपरेचीं स्तोत्रें गाणाऱ्या या कवीला कसलेंच मूर्तिभंजन शक्य नव्हतें!

झालों आम्ही घरकोंबडे
घिणितों शब्दजाल कोरडे

असें त्याने म्हटलें त्याचा संदर्भ समाजाच्या मागासलेपणाकडे लागत नसून, नेहमीप्रमाणें पूर्वजप्रशस्तीकडे लागतो! अशा प्रशस्तीच्या घोषांत समाजाच्या नावडत्यांचे आणि उपेक्षितांचे उसासे ऐकू येणे कठीण आहे. विनायकाने स्त्रीजातीचा गौरव केल्याचें वर आलेंच आहे; पण त्याची नीट छाननी केली पाहिजे. "पुण्याची केवळ खाणी" स्त्री ही गुणांची पुतळी, नीतीची म्हणजे रूढ रीतीची रक्षणकर्त्री, अशी तिची पूजा बांधून तिला 'देवी' बनविणें या प्रकारांत गौरव होतो तो अतिमानुष स्त्रीचा. जुन्या काळीं तसल्या स्त्रिया आढळत, आतां आढळणें कठीण, असाहि सूर त्यांत असतो. म्हणजे या पुराण्या आणि अतिमानुष आदर्शात आपलें प्रतिबिंब पाहून साधारण स्त्रीला अभिमानाच्या उकळ्या फुटणें शक्य नाही. स्त्री म्हणून तिचा वैयक्तिक दर्जा वाढत नाही. विनायकाच्या नायिका 'सती' आहेत, त्या कसलेंहि दिव्य सहज करूं शकतात पण आपण 'दासी' आणि 'अबला' असल्याचा त्यांचा आग्रह आहे! "असे पति माझें दैवत" ही त्यांची श्रद्धा; म्हणजे त्यांचा 'देवीपणा' फार ताणावयाचा नाही! कवि त्यांचीं चरित्रें गातो तीं 'बोधफलां'साठी. बोध हाच कीं आर्यस्त्रिया अशा असाव्या. "जागृत गृहीं स्त्रिया मानीं" असें विनायक ऐतिहासिक स्त्रियांसंबंधीं आदराने लिहितो; पण त्या जागृतीची धाव 'आर्य' गुणांपुरतीच परधर्मी दुर्जनापासून व तशाच इतर दुष्टापासूनहि आपलें संरक्षण करणें हा त्यांतील मुख्य गुण. म्हणजे 'परनारी' ची धोक्याची अवस्था प्राप्त झाल्यावरच तिच्यांतील उत्तमोत्तम गुण प्रकाशांत यावयाचे! एरव्हीं विनायकाच्या दृष्टीने ती "शृंगार-पुतळी' दासी, अबला, वगैरे. विनायक व इतर नवे कवि यांत येथें केवढें अंतर पडतें!

विनायकाच्या सर्व नायिका एकाच मुशींतून काढलेल्या आहेत. नांवापलीकडे कोणतेंच वैशिष्ट्य त्यांत नाही. व्यक्तित्वाचा निराळेपणा अंगलटींत नाही, साजांत नाही, बोलण्यांत तर नाहीच. सर्वच आदर्श स्त्रिया म्हणून कोणतीच 'स्त्री' नाही!

आधुनिक कवितेचें आणखी एक अंग विनायकांत कमी पडतें. सृष्टिसौंदर्याचें आकर्षण त्याला नाही. ऐतिहासिक कवितेला दऱ्याखोऱ्यांच्या आणि डोंगरांच्या रानवट वैभवाची पार्श्वभूमि पुरविण्याचा प्रघात अजून सुरू झाला नव्हता. विनायकाच्या कवितेंत त्या कल्पनारम्यतेला अवसर नाही. ती केवळ माणसाच्या पराक्रमांत रंगते. माणसाभोवतालचा निसर्ग अथवा त्यापार वसलेलें गूढ सौंदर्य यांची ओळखहि कवीला नाही. केशवसुतांनी विनायकाला 'महाराष्ट्राचा बायरन' म्हटलें; पण बायरनला सृष्टींतील तुफानीपणाचें प्रेम होतें तें विनायकांत नाही. खरें म्हणजे त्या दोघांतील साम्य अगदींच अल्प आहे.

# १ महाराष्ट्र लक्ष्मी

महाराष्ट्र-लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष दाटे. ध्रु०

पुन: पुन्हा परचक्रानें ताडिली बिचारी,
दीर्घ काल खचली होती पारतंत्र्यभारीं
द्वादशाब्द दुष्काळानें जाहली भिकारी,
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथें १

मावळांत वास, न ठावें जया बाह्य वारें,
नेमधर्म ज्यांचे लोकीं कृषीकर्म सारें,
विळा कोयतीच जयांचीं काय तीं हत्यारें,
तेच वीर बनले समयीं मावळे मराठे. २

नये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी,
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ? ३

साधुसंत झाले, असती, तयांची न वाण,
मात्र रामदासा लाधे समर्थाभिमान,
जो मनीं स्वदेशहिताचें धरोनी निशाण,
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटें. ४

कढीभातखाऊ म्हणती ब्राह्मणा जगांत,
ढिली कांस ज्यांची म्हणुनी हांसती, हंसोत,
तयांनींच करणी केली प्रसंगीं अचाट,
खोल गढे परसत्ता ती ढासळली लाथें. ५

पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ,
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं मग जहाल,
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्ववाटे. ६

★

## २ हतभागिनी

तळहातीं टेकुनी ही स्वशिरातें बैसली ! ध्रु०
मस्तकीं केश विखुरले,
श्वास चालले, अश्रु लोटले,
गळे जल गालीं — चिंतेनें पोळली ! १
वस्त्रें तीं अपुरीं जुनीं,
तेथ कोठुनी, असावा मणी,
दीनता ल्याली — दुःखानें कावली ! २
दारिद्र्य, घरीं जागतें,
अन्न काय तें, दिसेना कुठें,
वायुजलवाली — गगनाची साउली. ३
होती ती सिंहासनीं,
भाग्यशालिनी, धनी विजयिनी,
परी तिज खालीं — दुर्दैवें ओढिली. ४
एकाश्रुबिंदुकारणें,
तियेच्या रणें, झुंजले मनें !
असे सुत व्याली — जयकालीं माउली. ५
कारटीं करंटीं तिथें,
निपजलीं भुतें ! मातृशोणितें —
स्वतांला लाली — आणाया धांवलीं ! ६

कल्याण काय नेणती,
नित्य भांडती, आपसांत तीं
परां वश झालीं — स्वत्वाला विसरलीं ! ७
गेले दिन यावे कसे,
वर्तनें असे, एकदां फसे —
गाय जी गाळीं -- चेपत ती चालली !

★

## ३ यापुढें

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी — यापुढें !
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी — यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी — यापुढें !
मावळे, जयांनीं दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं — यापुढें ! १
निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही — यापुढें !
रडवील कोण रणरंगीं,
यवनांना धायीधायी, — यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायींठायीं — यापुढें !
राखिलें राज्य आपलें, असें व्यापिलें जया यवनांहीं —
कोण असा प्रसवे आई — यापुढें ! २

फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण — यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण — यापुढें !
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण — यापुढें !
जें शिवें, स्थापिलें नवें, राज्य त्या जवें वाढवी बाजी
सर करील त्याची कोण — यापुढें ! ३

अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी — यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हा
भाऊंची शौर्य भरारी — यापुढें
फडनवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी — यापुढें !
जी खनी, प्रसवली मणी, यापरी जनीं, बहुगुणी भारी,
झाली ती हाय भिकारी — यापुढें. ४

ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं — यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं — यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली — यापुढें !
यापरी, नाडलों तरी, लोचनांतरीं नीज, जी भरली —
ती निघेल कवण्या काळीं — यापुढें ! ५

★

## ४ संयोगिता

१

ऐका कैसा ओघ भारतीं यवनांचा लोटला,
देश हा परवशता पावला. ध्रु०
कनोजाधिपति — जयचंद्रसुता सौंदर्याची कळी,
चतुरता अंगिं जिच्या वाणली;
जिच्या मुखावर वीरत्वाची प्रभा दिव्य फांकली;
सदा जी विनयानें वांकली;
नामें संयोगिता सती ती उपवरता पावली,
काळजी नृपहृदया लागली;
लालसा धरूनी त्या स्त्रीची अंतरीं,
मागणी घातली तिला बहुत नृपवरीं,
एकही न आला जयचंद्रमना परी,
यास्तव त्यानें स्वयंवराचा घाट तिच्या घातला,
भूपगण सादर आमंत्रिला.

२

गर्वें अव्हेरिलें मागणें जयचंद्रें आपलें,
वृत्त हें पृथ्वीराजा कळे;
अपमानाचें शल्य तयाचे हृदयाला झोंबलें,
पेटलें चित्त क्रोधानलें.
कनोज नगरा गेला नाहीं स्वयंवरा तो बळें,
न हें जयचंद्राला साहलें.
तच्चित्तीं शिरला अनर्थमूलक कली,
सद्विचारशक्ति दूर तयें हांकिली,
अविचारें केली भूपदृष्टि आंधळी.

पृथ्विराजवेषानें पुतळा नृपें एक सजविला,
मंडपद्वारीं तो स्थापिला.

३

दूरदूरच्या भूपें केली रंगसभा साजिरी,
जियेला जोड नसे भूवरी.
नवरत्नांची सुंदर माला घेवोनी ती करीं,
पातली स्वयंवरा सुंदरी.
दृष्टीं पडतां लोकोत्तर लावण्यवती ती परी
जाहले भूप दंग अंतरीं.
टाकीत चालली मंदमंद पावलें,
ती; तों तों आशा भूपांची मावळे,
तत्प्रयत्न सारे निष्फलता पावले,
येऊन तिनें द्वारीं प्रेमें त्या पुतळ्याच्या गळां,
दिव्य तो रत्नहार घातला.

४

यापरि उल्लंघून अडथळे प्रेमाचे निर्झरी,
मिळाली शौर्याच्या सागरीं,;
सर्व भूप विस्मयें जाहले तटस्थ चित्रापरी,
निराशा म्लानवदन त्या करी,
कोप जाहला मावेनासा जयचंद्राच्या उरीं
तयाचें मन निष्ठुरता वरी,
कोपाची संगति जन हो ! बरवी नसे,
सुज्ञही नरां तो करितो वेडे पिसे,
किति अनर्थ घडती जगतीं याच्या वशें,
या कोपाच्या पायीं कन्या नव्हे प्राण आपला,
नृपानें कारागृहिं लोटिला.

५

क्रोधें चवताळतो ज्यापरी जातिवंत तो फणी,
तयाचा कोणी हरितां मणी
जयचंद्रावर तैसा गेला पृथ्विराज धांवुनी
पराभव केला त्याचा रणीं.
वधू आपली बंधविमुक्ता करि दिल्लीचा धनी,
स्वनगरा जाय तिला घेउनी.
मन जयचंद्राचें कोपाग्नीनें जळे,
त्याजला काय तो सूड दिसे; त्यामुळें,
जाऊन भूप तो यवनपतीला मिळे,
राणी—संयोगिताहरण हें नव्हे—नव्हे—साधिला,
कलीनें डाव असा आपला !

६

भारत जिंकावयास घोरी आला होता परी,
जाहला पराभूत संगरीं;
त्या समयापासून जयाची मनीं लालसा धरी
बैसला टपून सीमेवरी;
तों अवचित जयचंद्र तयाच्या गेला असतां घरीं,
कां न तो खुशालेल अंतरीं;
जयचंद्राच्या सहवर्तमान त्यावर,
घेऊन महंमद निज सेनासागर,
यावया निघाला दिल्ली नगरावर,
पृथ्वीराजही युद्धाला शीघ्र सज्ज जाहला,
रणीं संग्राम घोर माजला !

७

पुरुषवेष परिधान करूनी राणी संयोगिता,
पातली होता जेथें पिता.
‘ कन्येच्या सौभाग्यमंदिरा अग्नि कसा लावितां ? ’
पित्याला वदे धैर्यदेवता;
‘ धर्म जनक हा जन्मभूमिका मूर्त मातृदेवता,
तयां कां यवनकरीं अर्पितां ?
करण्यास्तव निज देशधर्मसंरक्षण,
संगरीं करावें जीवितही अर्पण,
नरजन्मसफलता अन्य नसे याहुन,
वृथा धर्म बुडवाया, तैसा मातृभूमिचा गळा —
चिराया, शत्रु घरा आणिला ! ’

८

बुद्धिमती कन्यका पित्याला बोध करी या परी.
तयें तो वळला नाहीं परी;
लढली, पडली, वीरस्त्री ती स्वपतीसह संगरीं,
अरीतें लोळवून भूवरी;
दिल्लीचें साम्राज्य लागलें महंमदाच्या करीं,
लालसा झाली त्याची पुरी.
जयचंद्र नृपाचें दुष्ट कृत्य त्या नडे,
तद्राज्य हारिलें यवनपतीनें पुढें,
तो देशद्रोही दुःखसागरीं बुडे,
चरितामृततरू बोधफलांनीं दिसतां ओथंबला,
विनायक कूजाया लागला !

★

# ५ ध्यास तो भास

१

स्तंभासमीप होता तो त्या समयास एकटा बसला.
नव्हती वृत्ति ठिकाणीं; चिंतेच्या सागरीं दिसे फसला. १
तेज मुखावर नव्हतें, गळिली होती उरस्थळीं मान,
हृदय उडे, आंत कढे, चिरडे जैसें पडून पाषाण. २
तंतूच्या वाद्यावर इष्ट सुरास्तव फिरे जसा हात,
भालीं करतो फिरवी वरचेवर, मग्न निज विचारांत. ३
तेथें एक तयाच्या पडला निःश्वास तेधवां कानीं,
न कळे त्यास उमटला, कैसा, कोठून कीं तया स्थानीं, ४
हा काय भास झाला, कीं कांहीं खेळ कल्पनाच करी ?
सांदींतून असावी आली कीं काय वायुची लहरी ? ५
शिर वर करून फिरवी दृष्टि तलावाकडे परंतु जल,
स्थिरचि दिसे पडलेला तेजाचा आरसा जसा अचल. ६
तृण वाढलें चळेना – तरुचें हाले न एकही पातें,
दुर्गध्वज न फडफडे – आली कीं झोप त्याजला वाटे. ७
सर्वत्र दिसे स्थिरता – ऐकूं येई न वायुचें नांव,
निःश्वास मग कशाचा ? कैसा त्याचा कळून ये ठाव ? ८
वर खालीं दृष्टि करी – इकडे तिकडे पुनः पुन्हा पाहे,
चाळा तोच तयाला लागे, त्यांतच तयास सुख लाहे. ९
परि एकदां सहज तो पाहे डावीकडे वळून जसा,
तरुणी रमणी बसली दिसली तो चकित होय त्यासरसा. १०
घेऊन शस्त्र हातीं शत्रु उभा तेथ ठाकला असता,
तत्रापि या परी तो पुरुष भयाभीत जाहला नसता. ११
हें काय चिन्ह ? न कळे स्त्री ही कैशी कुठून अवतरली ?
भरली सौंदर्यानें मूर्तिमती तरुणता पुढें सरली. १२

धन्या रसिकंमन्या हैं मंगलदायिनी अमरकन्या ?
अन्यायवर्तिनी कीं स्मशानवासी ? पिशाचिका वन्या ? १३

उकले ना गूढ तया, न फिटे पडली मनास जी भ्रांती,
पाहे, पुन्हा न्यहाळी तें मुख, तें रूप, दिव्य ती कांती १४

ती मोहना तयाची सखी, तिचि खूण त्याजला पटली.
प्रीति करी त्याजवरी; आतां परि सर्वथा तया विटली. १५

परिणय त्यांचा झाला असतां तीं नांदलीं सुखें असतीं,
परि यवनधर्म धरिला तयें, तया बुद्धि जाहली असती. १६

२

होता गुलाब गालीं — ओष्ठावरती तशी तिच्या लाली,
चिंतेचा ढग भालीं धरि त्यावर सांवली परी काळी. १७

नेत्रांत तेज होतें, परि निश्चल त्या सरोवरावाणी,
चंचलता मावळली, शून्यपणा काळजी तया आणी. १८

साधेसुधेंच पातळ, हिरवी अंगांत कंचुकी ल्याली,
कृष्ण कुरल केश तिचे ते अस्ताव्यस्त विखुरले भालीं. १९

बोलावयास्तव तिनें कर वर केला तयांतुनी पार,
दिसता चंद्र तुम्हांला — असा तिचा काय दिव्यतासार. २०

३

‘ भक्ति जयावर करितें आलें मी त्याकडे स्थलीं वन्य,
हेंतु मला सुख व्हावें — वाटावें त्याजला जगीं धन्य. २१

उल्लंघिलें तटाला — आलें वंचून रक्षका दक्ष,
तुज भेटलें सुरक्षित येथ करायास सोक्ष कीं मोक्ष. २२

वदती कुमारिकेच्या पवित्रतेनें अपूर्व तेज जनीं,
विजनीं उग्र मृगेंद्रहि तिज दिपती — लागती तिच्या भजनीं. २३

जो श्वापदांत रानीं राखी ईश्वर तिची अशी लाज,
त्यानेंच मज सुरक्षित यवनचमूंतून आणिलें आज. २४
हेतु धरून मनीं मी आलें चालून आपल्या पायीं,
होता तो विमल मला जाण, दिशा शून्य जाहल्या दाही. २५
तूं मुकलास मला; मी अंतरलें तुज अखंड अंतरलें,
ही शेवट भेट समज; येथेंच प्रेम आपलें स्थिरलें. २६
पूज्य स्वधर्म त्याचा नित्य वहावा मनांत अभिमान.
मान तयांतच; धर्मा, न चळावें कापितां कुणी मान. २७
श्रेयस्कर मनुजातें आलें निज धर्मरक्षणीं मरण,
सिंहासनास्तव नको परि करणें धर्मबाह्य आचरण. २८
निज धर्म त्यजिला त्वां, यवनाचा निंद्य धर्म तुज रुचला,
टाकून अमृतवल्ली आवडिनें घेतला करीं कुचला. २९
कर जोडितें; पसरितें पदर; तुझे चरण मस्तकीं धरितें,
आज्ञापशील तें तें करितें; परतें; न दुर्जनांत रतें. ३०
हा धर्म नको तुजला, यवनांचाही नको नको छंद,
नलगे कुराण; बरवें पुराण; भज रामकृष्ण गोविंद. ३१
होईल तुझी दासी—त्वत्पदकमलीं विलीन राहीन,
व्हाया सुख उभयाला आड असे यवनधर्म हा हीन. ३२
होऊं उद्यांच आपण एकत्र विवाहबंधनें पुण्य,
राहूं आजन्म सुखी; घेऊं म्हणवून या जगीं धन्य.' ३३

४

'होणार विवाह कुठें? जिथें चितेवर कलेवरें जळती,
मळती धुळींत कोणी—कीं जीवितसंशयांत तळमळती. ३४
कारण हिंदुत्वावर पडणार उद्यांच आमची टोळी,
नलगे विलंब तुमचीं देवघरें व्हावयास वाटोळीं. ३५

वाळ असो, तरुण असो, स्त्री किंवा पुरुष जख्ख म्हातारा,
त्याजवरी असिधारा धरूं, करूं देश शून्य हा सारा. ३६

तूं प्राणप्रिय मजला तुझे, सखे सोयरे कृपापात्र,
समरांतून उद्यांच्या सत्तेनें वांचणार ते मात्र, ३७

तुमच्यांत जन्मलों मी — मजमध्यें हाडमांस तुमचेंच,
तुम्हांस न त्यजावें; परि मज तुमचीच लागली ठेंच. ३८

तुमचा नव्हेचि — माझा होता जो पूज्य धर्म आजंवरी,
त्याजवरी मी उठलों — काय करूं ? हाय ! हृदय लाज वरी. ३९

परि एक देव जाणें याचा माझ्याकडे नसे बोल,
फोल प्रयत्न केले; कळलें माझें न बांधवां मोल. ४०

देशहितास्तव झटलों; धर्माचें वाहिलें शिरीं काज,
माजविला दंभ न मीं, केला न जनांत शुष्क आवाज ४१

कर्तव्य मनःपूर्वक केलें तें बांधवां न आवडलें,
नडलें येऊन मला, ते मम मार्गांत आडवे पडले. ४२

ते नीच मत्सरी ते दुर्व्यसनासक्त दुर्गती कपटी,
नांव नको, गांव नको त्यांचें, त्यांना असो दुरून नती. ४३

विटलों — विटलों त्यांना; झालों मी त्यांजपासुनी दूर
होईन शांत तेव्हां त्यांचा पाहीन जाहला चूर ४४

व्हावा जर मी तुजला, माझा सहवास वाटता गोड,
जोड मला, सोड तयां — हितकर ही सुचविली तुला तोड. ४५

भ्राता मी, भगिनी मी, देव, पिता, माउली तुझी मीच,
माझ्यांत सर्व नातें — मी असतां तुज कशास हे नीच ?' ४६

५

स्कंधीं शिर आधारी, त्याच्या ती मृदुल कर गळां घाली,
भ्याली भीरु उसासे, स्फुंदे, अत्युष्ण आसवें ढाळी. ४७

वाहे मंद समीरण ; अमृताची वृष्टि तो शशांक करी,
एकांतिं अशा समयीं रमणीचा कोण लालसा न धरी ? ४८
त्यांतुनि ही अनपेक्षित, सहज अनाहूत भेटली जर ती,
नाहीं येणार कशी पुरुषाच्या हृदयसागरा भरती ? ४९
परि सुप्रसंग ऐसा त्या वीरा हेतु जाहला असुखा,
भुजवलय नव्हे, पडला, गमलें नागीणिचा गळां विळखा. ५०
झालें प्रशांत मस्तक, होतें जें सागरापरी क्षुब्ध
हृदय उडेना ; त्याचे सारे व्यापार तेधवां स्तब्ध. ५१
पाहे त्या स्त्रीचें मुख तो पालट केवढा दिसे त्यांत !
ती मोहना प्रियतमा आहे किं नसे अशी पडे भ्रांत ! ५२
रूप तिचें तेंच असे ; फिकटपणा ये परंतु त्याजवरी,
जीवांश त्यांत न दिसे—प्रकाश जो सकल अवयवा वितरी, ५३
वदन निमीलित झालें ——कीं बैसे मृत्युची तयास खिळी,
बोले बोल जरी ती श्वास उमटतां दिसे तिचा न मुळीं. ५४
हृदय न उडे– पडे तें गार– न नाडींत राहिला त्राण.
नेत्रीं तेज ललाके, परि न दिसे त्यांत जीव कीं प्राण. ५५
चित्रें स्वकल्पेनेनें वातावरणीं करून निर्माण,
होती छांदिष्ट कवी त्यांच्या अवलोकनांत रममाण. ५६
नटती नवीं नवीं तीं विराटरूपें क्षणोक्षणीं नाना ;
तीं कल्पनाविनिर्मित जाणुनिही भय न वाटतें कोणा ? ५७
तैसेंच लाडकीचें स्वरूप एका क्षणांत पालटलें,
अवलोकून भयें त्या तरुणाचें हृदय तेधवां घटलें. ५८

६

‘ छे, छे नको नको हा अविचार करूं, विवेक कर कांहीं !
ती स्त्री वदली, ‘ मम– सत्प्रेमाची क्षिति तुला नसो– नाहीं. ५९

चाड धरी पितरांची, स्वकुलाची, पूज्य मातृदेशाची,
धर्माची–ईशाची–अनुकंपा नित्य पाहिजे ज्याची. ६०

मी स्त्री अनाथ, अबला, वृक्षाचा कोणत्या तुला पाला ?
एकाकीच तुझ्यास्तव राहीन करीत चिर विपाला. ६१

जन्म दिला, वाढविलें, तुजसाठीं नित्य वाहिले कष्ट?,
त्या मातापितरांना स्वकरें कां पाहसी करूं नष्ट ? ६२

तव वीरकुल, जयाच्या शौर्याची गाजते जगीं ख्याती,
त्याची स्वनिंद्य कृतिनें करणार जगांत काय तूं माती ? ६३

देश तुझा ज्यासाठीं वीरांनीं वाहिल्या किती माना !
तूं एक मात्र, त्याच्या, जन्मा आलास, हेतु अपमाना ! ६४

तव धर्म लघु मुखानें म्यां त्याची काय थोरवी गावी ?
तो टाकून हिरा त्वां अंधपणें गार काय ही घ्यावी ? ६५

परमेशप्राप्तीची तीच खरी सुलभ एकटी वाट.
असतिल – असोत दुसरे पंथ नसे तथ्य यापरी त्यांत. ६६

हा निंद्य मार्ग तुजला ईशापासून नेतसे दूर,
पडशिल, रडशिल तुझ्या जेव्हां फांकेल दृष्टिचा धूर. ६७

होईल ईश्वराचा कोप तुझ्यावर धरून परशील,
तरशील कसा तेव्हां ? कवणाचे चरण सांग धरशील ? ६८

स्वजन त्यजून धरिले हृदयीं म्हणवून यवन जे आप्त,
ते धांवतील तुज, का गमतें; पाहून संकटव्याप्त ? ६९

बुडवून तुझ्या धर्मा, तव देशाची करून रांगोळी
आले हे येथ सुखें पिकवाया नित्य आपली पोळी. ७०

तूं आयताच त्यांना नवसाला पावलास कीं देव
तद्धेतु परी पुरतां होशिल पाषाण समजुनी ठेव. ७१

तुज तुच्छतील मग ते करितील पदोपदीं तिरस्कार
तेव्हां नको नको हें होईल जिणें तुला तुझें भार. ७२

स्वजन त्यजून धरिली परकीयांची जयें स्वयें कांस,
ते परकीय तयाचा धरिती न; धरूं नयेचि विश्वास. ७३

स्वजना अंतरलासच; परही होतील पारखे तुजला,
भाग तुझा मग फिरणें भूवर ढाळीत नित्य अश्रुजला. ७४

कां संकटांत पडशी? करशी दुं:खास कासयास गडी?
कां घालितोस कळतां कळतां प्रक्षुब्ध सागरांत उडी? ७५

हा चंद्रमा विलसतो निजतेजें व्योममंडळीं नील
हा कृष्ण घन जवळचा त्याला एका क्षणांत झांकील. ७६

जें अभ्र आड आलें यथावकाशें पडेल तें पार
चंद्रप्रभा पुन्हा या टाकील करून भूतला गार. ७७

या अवधींत तुझें जर मोहापासून या न मन ढळलें
वळलें सुविचारास न, अक्षय तव समज, विमल यश मळलें. ७८

पितरांचे, आप्तांचे, इष्टांचे भोंवतील शाप तुला
ईश्वर कोपून तुझ्या पडतील शिरीं अखंड तप्त शिला. ७९

जागा हो, जागा हो, नको नको हा करूं दुराचार
नाहींतर दासीचा शेवटचा तुज असो नमस्कार! ८०

७

म्हणती म्हणोत कोणी, विकार गुणरूप होय अभिमान,
विस्मरती ते झाली त्याजमुळें जी जगांत धुळधाण. ८१

उदधीनें भूकंपें, विद्युत्पातें अनर्थ जे घडले,
अभिमानवश नराच्या कृतीपुढें सर्व ते फिके पडले. ८२

अभिमानें वाहविले रक्ताचे या जगांत पाट किती!
गळले अश्रु तयांची करवेल सरस्वतीसही न मिती. ८३

किति संसार बुडाले, किति पडलीं नांदतीं घरें ओस;
किति मंदिरें मिळालीं धूळीला, माजला असंतोष. ८४

विसरे स्वापत्य पिता; भाऊ भावावरी उठे रुष्ट
स्नेह लयाला गेला; उदयाला कलह पावला नष्ट. ८५

चुकलें, कळे उमजतें चुकणें कवणास या जगीं चुकलें,
'चुकलों' परी न म्हणती अहंपणानें सुखास ते मुकले. ८६

होती पुराणकालीं जन म्हणती, स्वर्गभूमि अविभक्त
भजती परस्परांला भावें देवास ज्यापरी भक्त. ८७

'उभयांत कोण मोठा' उद्भवला सहज वाद त्यांमाजीं
भूमि म्हणे मीं मोठी; स्वर्ग वदे थोरवी असे माझी ८८

कोणीच हार नेघे, उभयांची दृष्टि मीपणे अंध
होय कलह वादाचा, कलहानें प्रीतिचा तुटे बंध. ८९

जीं एकरूप होतीं, रोषें जाऊन दूर तीं बसलीं,
फसलीं अहंपणानें; संतोषें परि न आजवर हंसलीं. ९०

स्वर्ग समर्थ बली, तें स्वगुणें वरवरच चाललें आहे
अबला भू खचत असे; परि ताठा केवढा मनीं वाहे ! ९१

जे मातापितरांचे प्राप्त अपत्यांस तेच गुणवान
वृक्ष तसें पुष्प मिळे; कंठ जसा त्यापरी निघे तान. ९२

माता भू अभिमानी, पुत्र तिचा पुरुष तोहि अभिमानी,
भू स्वर्गा अंतरली; पुरुषाचीही तशीच हो हानी. ९३

बोध प्रियकरिणीचा त्या वीराच्या मनास मानवला
तूं स्त्री मी पुरुष अशा अहंपणें तो परी न त्या लवला. ९४

'जें झालें तें झालें; आतां हा बोध होय वायफळ
वदनांतून निघाला कवण करी ग्रहण तो पुन्हा कवळ ? ९५

धर्म नको मज तुमचा, देश नको, लोकही नकोत मला
वाटेल तर रहा वा जा तूं तव पथ नसेचि आडविला.' ९६

सहज वदून असें तो स्मितवदनें प्रियतमेकडेस बघे
तों ती गुप्त जहाली; न कळे भूमींत वा नभांत रिघे. ९७

चोळी नयन पुन्हा तो पाहे विस्मितपणें सभोवार
परि ती कोठेंचि नसे, न दिसे त्या, केवढा चमत्कार ! ९८

आसन नव्हे तयाचें चळलें, नव्हती परिस्थिती फिरली
होते शांत पहुडले चंद्रकिरण पूर्ववत् तडागजलीं. ९९

नव्हता दुर्ग सरकला स्तंभ जसाचा तसाच तेथ उभा,
ध्वज आपल्या पटानें होता सप्रेम पालवीत नभा. १००

आश्चर्य थोर; झाली गुप्त कशी तीच एकली रमणी
ऐसा करीत बसला खिन्नपणें तरुण तो विचार मनीं. १०१

आलें कळून त्याला हा सारा खेळ कल्पना नटली
ज्याचा ध्यास मना तो भास सदा होय गोष्ट ही पटली. १०२

☆

## ६ दसरा

आला दसरा दिवस सुखाचा
आनंदाचा सण सोन्याचा
सुमुहूर्त शींव लंघून पुढें होण्याचा
ध्वज विजयाचा आंगणांत उभवायचा. १

झाला महिषासुर खल बली
निर्दय दीन गोद्विजां छळी
याच दिनीं त्याचा बळी आदि माउली
घेऊन, घरा शांतवी, करी सावली. २

रामें याच मुहूर्तावरी
पडली स्वस्त्री रावणकरीं
बहु पराक्रमें मिळवून धुळीला अरी
निज गृहलक्ष्मी यशवंत आणिली घरीं ३

सरले आजच दिन वांकडे
पांडव निधडे सरले पुढें
कुरुपुत्रांची रणमखीं आहुती पडे
गत राज्यलाभ पांडवां साहजीं घडे. ४

आजच वीर मराठे गडी
करुनी जिवांची घडी
परधर्मांचीं रगडून सांकडीं खडीं
ध्वज भगवा फडकाविती सिंधुचे थडीं. ५

आम्ही हिरे तयांचे कुळीं;
जैसी ज्योतीला काजळी
हारवून सर्वस्वास फाकितों धुळी;
स्वर्णभू आमचे करीं राख जाहली ! ६

फिरतें कालचक्र भूवरी
दसरा ये प्रतिसंवत्सरीं
पूर्वजस्मरण आम्हांस देतसे परी
सोडवे न धाम:ग्राम राहिलें दुरी. ७

झालों आम्हीं घरकोंबडे
विणितों शब्दजाल कोरडें
शब्दाचें वादळ कृतीबिण फिकें पडे
आमचेंच वर्तन आम्हां नित्यशा नडे. ८

★

## ७ प्रीति निमाली तर –

नादें मंजुळ आपल्या रिझविते जी मन्मना नेहमीं
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मी !
अंगातें जडवून पंख उसने जाईल कीं सत्वर —
मी येथून उडून उंच गगनीं प्रीती निमाली तर ! १

माझी कोण करील उत्सुक मनें मार्गप्रतीक्षा घरीं
प्रेमें बालक कोण सुंदर वदा देईन माझ्या करीं
आतां भासतसे मला भवन जें सर्वस्व चेतोहर —
त्या येईल खरोखरीच वनता प्रीती निमाली तर ! २

काव्याला अनुरूपसा विषय तो कोठून राहे जनीं
स्फूर्तीच्या उठतील नित्य लहरी कैशा कवीच्या मनीं
वाहावीं कवणास काव्यसुमनें त्यानें वदा भूवर ?
कोठूनी जगतीं उरे रसिकता प्रीती निमाली तर ? ३

अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जें जीवन,
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन ;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर,
भीतीनें मरतील मानवकुलें, प्रीती निमाली तर ! ४

★

## ८ सुवास

हिंडत असतां निर्जन रानीं
स्वैरगतीनें गुंगत गाणीं
मधुर सुवास घ्राणीं आला
त्या योगानें आत्मा धाला.

उद्भवला हा परिमल कोठें ?
पडलें मजला कोडें मोठें.
फिरलों – थिरलों ठायीं ठायीं
मूळ तयाचें कळलें नाहीं.
कार्य आणि कारण या जगतीं
तीच वस्तु नटलेली दिसती,
तैसें माझें मानस आतुर,
शंका काढी — देई उत्तर. १

सुगंध जो का अंगीं दाटे
पुष्पमिषें प्रकटावें त्यातें ;
पुष्पें– ज्यांना नाहीं जोड–
रंगें, रूपें, वासें, गोड,
हुंगीना परि कोणी त्यांतें,
त्यांच्या आस्वादी न रसातें,
खेळावीं हीं रसिका-हातीं,
होते त्यांची संतत माती
ओसाडींतील गुलाबातें,
खिन्नपणा याकरितां वाटे.
टाकि उसासे सारा वेळ,
त्याचा हा का गंध असेल ? २

वागविली निज हृदयप्रान्तीं
भक्तीनें रमणाची मूर्ती,
भजली अर्पण करुनी त्याला
प्रेमाच्या पुष्पांची माला

काय होय तें परि पुरुषाला,
नव पुष्पावरच्या भ्रमराला ?
विमुख तिला तो हाय जहाला !
अंतरली स्त्री सर्वस्वाला
बाला भग्नमनोरथ झाली,
मौक्तिकांपरी अश्रू ढाळी.
दु:खानें एकांतीं स्फुंदे;
काय तेंच या स्थानीं गंधे ? ३

मात्सर्याचा भरला वारा,
अहंपणाचा सर्व पसारा,
अज्ञानाची मिरवे द्वाही,
रसिकत्वाला थारा नाहीं.
काय अशा जनतेंत रहावें ?
काय पहावें ? काय चढावें ?
बरें राहणें निर्जन रानीं,
ओढ्यासंगें गाणें गाणीं.
यापरि वैतागून कवीनें,
ओसाडींत स्वच्छंदानें—
वाजविला तो सुस्वर पांवा,
त्याचा का हा वास असावा ? ४

परिमलकारण कळलें नाहीं,
उगमस्थल आढळलें नाहीं;
व्यर्थ हिंडलों झालों वेडा !
वेडा ! वेडा ! वेडा ! वेडा !

परिमलकारण मजला कळतें,
उगमस्थळ किंवा आढळतें—
सांठवितों कवितेंत तयाला
वाग्देवीला सुखवायाला !
स्वानुभूत वासाचें दान
करावयाला जोंवर ये न
तोंवर कवितालतिकेवरतीं
कर्णिकार सुमनांची भरती ! ५

★

## ९ स्त्री आणि पुरुष

फुललिं फुलें। त्यायोगें उपवन खुललें.
दरवळला। परिमल सुखवाया सकलां.
स्वैरगती। अलिगण उडती - बागडती,
मधुनादें। गाती प्रभुगुण आनंदें.
मंदगती। स्त्री तेथें हिंडत होती.
विचराया। पुरुषहि आला त्या ठायां.
कौतुकला। हंसला, बाग मनीं ठसला.
नव फुललें। पुष्प एक त्या आवडलें.
प्रेमभरें। खुडिलें तेणें तें स्वकरें,
हुंगियलें। चुंबियलें, माथां धरिलें.
क्षणमात्रें। होय नकोसें तें त्यातें.
कुसकरिलें। फेंकुनि धरणीवर दिधलें
सर्व कृती। स्त्री ती अवलोकित होती.
गहिंवरली। टिपें तिचीं टपटप गळलीं.
कां तीं ? तें। काय कथूं मी रसिकांतें !

★

# १० नदी आणि कवि

असो कवीचें कुल अप्रसिद्ध !
होई कवीच्या कवनें प्रसिद्ध,
तसा नदीच्या उगमस्थलाला
नदीमुळें गौरवलाभ झाला. १

काव्यें कवीचीं जगतांत गावीं;
त्याचें न त्यांच्या परि चोज गांवीं.
नदी सुदूरस्थ जनां पवित्र
विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र. २

बाल्यांत उच्छृंखलवृत्ति दोन्ही
ठावा नसे आडथळा म्हणोनी,
लागो दरी खोल, उभा पहाड,
जातात तीं धावत धाड धाड ! ३

जाई जसें अंतर होत खोल
गांभीर्य ये वृत्ति निवे विलोल.
रेखून मार्ग क्रमितात संथ
करीत कल्याण जगीं अनंत. ४

अभंग त्यांच्या हृदयीं तरंग
नि:संग ते त्यांत सदैव दंग.
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं;
ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं. ५

स्वजीवनानें उगवून दाणे
नदी जिवा दे चिर जीवदानें.
तैसें कवीच्या कविताप्रवाहें
जीवांत संजीवन दिव्य लाहे. ६

राष्ट्रें बुडालीं, नृप थोर गेले;
    नदी कवी मात्र अनंत ठेले !
भागीरथीला खळ लेश नाहीं
    अखंड रामायण लोक गाई. ७

महाकवी थोर नदाप्रमाणें;
    मी बापडा ओघळ अल्प जाणें.
धाकें न ओढा झुळझूळ वाहे !
    माझी तशी ही गुणगूण आहे ! ८

★

# गोविंदाग्रज

## [ राम गणेश गडकरी, १८८५–१९१९ ]

“ केशवपुत्राचा महशूर
गोविंदाग्रज चेला सच्चा ! ”

आधुनिक कविता साधारण वाचकांपर्यंत नेण्याचें कार्य गोविदाग्रजांनी केलें. त्यांना अजोड लोकप्रियता लाभली. त्यांच्या रंगभूमीवरील यशामुळे त्यांच्या काव्याचें कौतुक झालें असें नव्हे. विशेषतः तरुणवर्गाला काव्यरचनेची चटक लावणारा, कवितेच्या अपेक्षेने मासिकांच्या अंकांची आतुरतेने वाट पाहावयास लावणारा, हा पहिला आधुनिक कवि. इतरांना भक्त मिळाले ते संख्येने इतके थोडे कीं त्यांचा जणू जगावेगळा पंथ वाटावा. हे भक्त बहुशः स्वतःच कवि असत. गोविंदाग्रजांनी साधारणांत काव्याची आवड उत्पन्न केली. पद्याप्रमाणे गद्यांतहि त्यांच्या अनुकरणाची सांथ पाहतांपाहतां फैलावली. ह्या त्यांच्या यशाला त्यांच्या गुणांइतकेच त्यांचे कांही दोषहि जबाबदार आहेत.

ह्या विलक्षण लोकप्रियतेमुळे गोविंदाग्रजांच्या चरित्राचा पुष्कळच तपशील आपणास ठाऊक आहे. त्यांच्यासंबंधींच्या आठवणींचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. हें भाग्य दुसऱ्या कोणत्याहि मराठी कवीच्या वांट्याला अजून आलें नाही ! असल्या ‘आठवणीं’त कांटेकोर सत्य लिहिण्याच्या कर्तव्याचा विसर पडलेला कधी दिसत असला तरी स्थूलमानाने त्या व्यक्तीचें स्वरूप तेथे आढळतें. यांतील बहुतेक आठवणींचा भर गोविंदाग्रजांच्या विनोदबुद्धीवर आहे. ‘ बाळकराम ’ म्हणून महाराष्ट्राला त्यांच्या चमकदार विनोदाचा परिचय आहेच. ह्याशिवाय त्यांच्या नाटकांतील विनोदाने हजारों प्रेक्षकांना स्तिमित केलें आहे. त्यांच्या काव्यांतहि ही विनोदबुद्धि डोकावते. पण हा बेडर विनोदी लेखक रात्रीं-बेरात्रीं एकट्याने बाहेर पडावयास भीत असे आणि सामाजिक रूढींवर उपहासाचें शस्त्र तिखटपणें चालविणारा हा सुधारक अतिशय देवभोळा होता. पण अशा विसंगतीने त्यांच्या चित्राला अधिक रंगत येते आणि त्यांतील माणुसकीहि उठून दिसते. ‘ अनामिकाच्या अभंगां ’त देवभोळेपणाची ओळख पटेल; तर भित्रेपणाचें उफराटें रूप घुबड आणि स्मशान यांच्या भेसूर गाण्यांतील रौद्र-बीभत्स वर्णनांत सांपडेल !

## गो विं दा ग्र ज

गोविंदाग्रजांचा जन्म गुजरातेंत झाला व बालपण तेथेंच गेलें. त्यांच्या लिहिण्यांत एखादी गुजराती लकब आढळते ती ह्यामुळेच. पुढें कर्जत व पुणें येथे त्यांचें शिक्षण झालें. पदवीपरीक्षा गांठण्याची त्यांची आकांक्षा अपुरी राहिली; त्याला विकट परिस्थितीइतकाच त्यांचा तऱ्हेवाईकपणा कारण असावा. 'किर्लोस्कर नाटक मंडळीं'त शिक्षकाची नोकरी करून त्यांनी अभ्यास चालविला होता. सुदैवाने त्यांचा अभ्यास परीक्षार्थी नसल्यामुळे जुन्या-नव्या मराठी साहित्याचा त्यांनी गाढ व्यासंग केला व त्यांतून आपलें साहित्य सजविलें. पदवीने प्रतिष्ठा मिळवयाचा तो काळ असला तरी तिची इतकी हळवी आराधना त्यांच्यासारख्या तीक्ष्ण विनोदबुद्धीच्या माणसाने करावी हा चमत्कार वाटतो. फर्ग्युसन कॉलेजबद्दलचा त्यांचा जिव्हाळा समजणें कठिण नाही; त्यांत टिळक-आगरकरांविषयींचा आदर अंतर्भूत होता. वर्ग चालू असतां "अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस" ही कविता लिहिणारे गोविंदाग्रज आतां ठळकपणें आठवतात.

गोविंदाग्रजांनी जुनी कविता प्रेमाने वाचली. अभंग, लावण्या, पोवाडे, पंडिती कविता हे सर्व प्रकार त्यांत आले. त्यांच्या पहिल्या कवितांपैकी एक मोरोपंती घाटाची आहे. लावणी-पोवाड्यांची रसाळ शब्दकळा त्यांनीं इतकी आत्मसात् केली कीं पुढें ती त्यांच्या काव्यांत न मावून गद्यांतहि सांडली! बखरींचें वाचनहि येथे कामीं आलें. ही ढंगदार शैली आणि तिच्या अनुकरणाने माजलेली कृत्रिमता यांचा विचार पुढें होईलच. पण काव्याच्या बहिरंगाला केशवसुतांनी दिलेली गौणता गोविंदाग्रजांत नाहीशी होऊन पंडिती काव्याइतकी नसली तरी बरीच प्रतिष्ठा त्याला परत लाभली. गोविंदाग्रज स्वतःला अभिमानाने केशवसुतांचा 'चेला सच्चा' म्हणतात. केशवसुतांना त्यांनी फार मानिलें आणि त्यांच्याविषयी दोन कविताहि लिहिल्या. या सर्व गोष्टींतला प्रामाणिकपणा आदरूनहि हा केशवसुतांचा चेला असलाच तरी कच्चा होता, असें आज अनेक टीकाकारांस वाटतें. एका दृष्टीने हा चेला गुरूच्या मुळावर आला. १९२० सालच्या सुमारास केशवसुतांबाबत महाराष्ट्राला जाग येऊं लागली होती व पूर्वीच्या अनास्थेची फेड तो करील अशी आशा वाटत होती; तोंच गोविंदाग्रजांच्या विलक्षण लोकप्रियतेने ती आशा मावळली. गोविंदाग्रजांच्या झळाळीपुढे केशवसुतांचें काव्य क्षणभर फिकें आणि ओबड-धोबड वाटूं लागलें. त्यांतच ह्या नव्या कवीच्या अकालनिधनाची हळहळ आल्यावर वेडाला सीमा राहिली नाही. केशवसुत आणि इतर आधुनिक कवि कांही काळ दृष्टिआड झाले.

केशवसुतप्रणीत काव्यांत ज्या अंतर्मुखतेचें एवढें माहात्म्य ती गोविंदाग्रजांत शुद्ध स्वरूपांत दिसत नाही. काव्यविषयाशीं आणि तत्स्फूर्त भावनेशीं ते सहसा

समरस होत नाहीत. कधीं भाषाप्रभुत्वाचा त्यांचा गुण त्याआड येतो; कधीं कल्पनेच्या अनिर्बंध भराऱ्यांत अवधान सुटतें. भाषेच्या ओघांत, नादाच्या भुलावणींत, ते कसे वाहत जातात ह्याचीं उदाहरणें ठिकठिकाणीं आढळतील. एकदा धारेला लागले कीं कोठे जावयाचें ह्याचें भान त्यांना राहिलें नाही; ह्याचा वारंवार प्रत्यय येतो. उत्प्रेक्षांचें त्यांना इतकें व्यसन कीं त्यापायीं आपली कविता वेताल होत आहे ह्याची त्यांनी दखल घेतली नाही. कृत्रिमतेला पुनश्च मराठी कवितेंत प्रवेश मिळाला! बालकवींच्या अरुणावरील उत्प्रेक्षा आणि त्याच विषयावरील गोविंदाग्रजांच्या उत्प्रेक्षा यांची तुलना केल्यास सहजसौंदर्य आणि कृत्रिम रंगरोगण यांतील अंतर कळेल. आपण ही कसरत करतों, लीलेने करूं शकतों, ह्याची जाणीव कवीला आहे हें ओळीओळींतून समजतें. ही जाणीव भाव-काव्याला घातक आहे; नाट्य-गीतांना आणि कथन-काव्याला ती कदाचित् उपकारक ठरेल. भाषेच्या नादीं लागलेला हा कवि मधुर शब्दपंक्ती आणि धुंद ओळी इतक्या मुलायमपणें लिहून जातो कीं रसिकाचें क्षणभर भान हरपावें. पण अशी ओळ ओळींत आणि शब्द शब्दांत मिसळून एकजीव होत नाही आणि कविता म्हणजे सुंदर तुकड्यांची गोधडी बनते! 'प्रेम आणि मरण' सारख्या कवितेंत मुख्य आशयावरील ध्यान न ढळल्यामुळे भाषा आणि कल्पना यांचें वैभव काव्याच्या अंगीं लागलें आहे; 'राजहंसा'सारख्या अनेक कवितांत तें काव्यदृष्टीने वायां गेलें आहे.

'गोविंदाग्रजांची कविता' ह्या मार्मिक निबंधांत ‡ दत्तात्रेय लक्ष्मण गोखले यांनी ह्या प्रश्नाची चिकित्सा केली आहे. "त्यांच्या नवरंगी कल्पनेला शुद्ध भावगीतां-सारखीं एकरंगी, एकजाती, एकपोती प्रावरणें चालत नाहींत" हें त्यांचें म्हणणें महत्त्वाचें आहे. केशवसुत आणि गोविंदाग्रज ह्यांत येथें फार मोठा फरक पडतो. गोविंदाग्रजांत उत्कटता असेल पण संयमाच्या अभावामुळे तिचा परिणाम होत नाही. अवांतर अंगांना काबूंत राखून केवळ मध्यवर्ति आशयाला उठाव दिल्यामुळे केशवसुतांच्या कवितेंत ओज दिसतें.

"रसोत्कटता व प्रमाणबद्धता यांचा अभाव गडकऱ्यांच्या कवितेंत अनेक स्थळीं आढळतो. कल्पनेला फुलवितां फुलवितां त्यांनी तिला पिंजून काढल्याचींहि उदाहरणें सांपडतील" हें विष्णु सखाराम खांडेकर † ह्यांचें मत योग्यच आहे. कल्पनाशक्तीचें

‡ 'काव्यचर्चा', पृष्ठें २८१–३०४.

† 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक', खंड १, पृ. २०६,

हेवा वाटण्यासारखें देणें ह्या कवीपाशीं होतें; पण तिच्याच आहारीं गेल्यामुळें काव्याची आबाळ झाली.

एकतानतेच्या अभावामुळेच गोविंदाग्रजांच्या 'गूढगुंजनां'तहि कच्चेपणा राहिला आहे. 'फुटकी तपेली' सारख्या कवितेंत गूढ वाटणाऱ्या शब्दांच्या भोंवऱ्यांत सांपडल्यामुळे अर्थाची तारांबळ उडाली आहे आणि वाचक गोंधळांत पडतो. 'मुरलीं'त गूढरम्यतेचें जें मोहक धुकें निर्माण झालें आहे त्याआड दडलेला अर्थ तेवढा गूढ नाही. अशा कवितांचीं जीं पुढे सवंग अनुकरणें झालीं त्यामुळे टीकाकारांना चेव येऊन खरे कवीहि भरडले गेले.

'प्रेमाचे शाहीर' ही गोविंदाग्रजांची आणखी एक पदवी प्रख्यात आहे. त्यांच्या प्रेमविषयक कवितांनी त्या वेळीं तरुण महाराष्ट्रावर मोठीच मोहिनी घातली होती. त्यांचीं प्रेमभंगाचीं गीतें वाचल्यावर तीं केवळ कल्पनेचा खेळ नसावींत असें वाटतें. त्यांतून निघालेली निराशा अनेक कवितांवर पसरली आहे. पण नैराश्यांतहि तरुण मनाला कसली तरी गोडी वाटत असते! म्हणून ह्या कवितांबद्दल अनेकांना वाटणारी ओढ! 'प्रेम आणि मरण' ह्या कवितेच्या उत्कृष्टपणाचा उल्लेख वर आलाच आहे.

तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणहि त्याला ॥ हें असें ॥

–हा त्याचा मुख्य सूर हळव्या भावनाप्रधानतेला विशेष मानवतो. गोविंदाग्रज प्रेमाकडे अलिप्ततेने पाहत असतील का अशी कधींकधीं शंका येते व ते विनोदी लेखक होते हें आठवतें! त्यांच्या कांही कविता प्रेमापेक्षां 'प्रेमाच्या प्रेमां'तून स्फुरल्या असाव्यात. प्रेमाच्या कल्पनेभोंवतींच रुंजी घालून तिच्याविषयीं अतिरिक्त भावनामयतेने लिहिण्याची ही वृत्ति आहे.

विश्व बहिरलें । विश्व महिरलें ।
प्रेमजलाचा भडिमार । करि जीवा गारीगार ॥

–हेंच खरें. तरुण मनाला महिरून टाकणाऱ्या आणि 'गारीगार' करणाऱ्या ह्या काव्याचें इतकें कौतुक झालें ह्यांत नवल नाही.

'कृष्णाकाठीं कुंडल' ह्या अपूर्ण राहिलेल्या ऐतिहासिक कथन-काव्यावरून त्या दिशेने गोविंदाग्रजांनी फार मजल मारली असती असा अंदाज बांधतां येईल. शाहिरी

वाङ्मयाच्या अभ्यासाने संपन्न झालेली विषयाला शोभेल अशी रसपूर्ण भाषाशैली आणि नाट्याची आवड ह्यांतून कदाचित् उत्कृष्ट सौंदर्य निर्माण होऊं शकलें असतें. इतिहासाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि कांहीशी विनायकासारखी आहे. पण गोविंदाग्रजांचें लक्ष सौंदर्याकडे होतें; विनायकाप्रमाणे बोधाकडे नव्हे. गोविंदाग्रजांची कल्पनाशक्ति क्वचित् अमूर्ताचा शोध घेऊं लागली तरी ती मूर्ताच्या आधारानेच. त्यांच्या कवितेंत सुंदर शब्दचित्रांची पखरण आहे. कधी आंतील मानसिक प्रतिमा रेखींव नसली तरी शब्दांनी थरारलेला वाचक आपल्या कल्पनेने ती जाणून घेतो. केवळ शैलीने साध्यासुध्या वाचकांतीलहि कवि जागृत करणारी ही कविता आहे.

☆

# १ अनामिकाचे अभंग

[ ज्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें आहे तेथील रहिवासी साधु-संतांना तुमचा-आमचा स्पर्श अनामिकापेक्षाहि अमंगळ आहे; शिवाय ' मराठीचिये नगरीं ' ह्या पंढरीच्या पाहुण्यांची श्रीचंद्रभागातटीं जी प्रेमळ पंगत झाली, तिच्या उष्टया-खरकट्या-साठीच हात पसरण्याचा जिथे संकल्प आहे, तिथे नांवाचा अभिमान अनाठायीं आहे. मराठी रसवंतीच्या पवित्र अभंगस्वरूपाला माझ्या अनामिकवृत्तीच्या पामरवाणीने स्पर्शदूषित करण्याच्या ह्या अतिप्रसंगाची जनस्वरूप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे. ]

नमो पांडुरंगा नमस्ते श्रीरंगा । रुक्मिणीच्या रंगा नमोनमः ।। १ ।।
सर्वां मंगळांचा एकरूप निधि । तूंच देव विधि-हरि-हर ।। २ ।।
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी । तीं रूपें गोमटीं देवा तुझीं ।। ३ ।।
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त । दोन्ही ठायीं कीर्त एका तुझी ।। ४ ।।
म्हणे " ×× " अगा पंढरीच्या देवा । अनामिकसेवा ध्यावी आतां ।। ५ ।।

१

कवित्वाचा येथें वाहिला मींपणा । लक्ष्मीनारायणा तुझे पायीं ।। १ ।।
गणां-मात्रांचा तो नको ताळेबंद । नको वृत्त छंद नाम गाया ।। २ ।।
विना काना-मात्रा आणिक वेलांटी । लेखनकामाठी मांडिली हे ।। ३ ।।
साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत । शुद्धाशुद्धातीत नाम तुझें ।। ४ ।।
म्हणे " ×× " जें जें मनीं-मुखीं आलें । तें-तें येथें झालें ब्रह्मार्पण ।। ५ ।।

२

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा । अहो पांडुरंगा कृपावंता ।। १ ।।
मनाचा मुहुर्त साधूनि हा आज । सोडूनियां लाज बोलतों मी ।। २ ।।
माझ्यावरी मीच मांडीन फिर्याद । तुझ्या पायीं दाद मागावया ।। ३ ।।

नका देवराया धरूं भाड-भीड । कराल तो निवाडा मान्य आहे ॥ ४ ॥
म्हणे "××" देवा रखुमाईच्या कांता । परी दूर आतां नका राहूं ॥ ५ ॥

३

जीवें-भावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नांवें ॥ १ ॥
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥ २ ॥
व्रत एकादशी मात्र हें देहाशीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ॥ ३ ॥
नांवाचेच साव आम्ही थोर-थोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ॥ ४ ॥
तुझे पायीं आतां चोरी नसे कांहीं । म्हणे "××" नाहीं भय-भीति ॥ ५ ॥

४

मागायाची आहे मेख । तुजपाशीं हीच एक ॥ १ ॥
सुख-दुःखें हीं केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥ २ ॥
इंद्र-चंद्रा कर्मरेखा । तेथें माझी कोण लेखा ॥ ३ ॥
हेंचि एक द्यावें दान । घडो कांहीं तुझें गान ॥ ५ ॥
म्हणे "××" हीन-दीन । मृगजळींचा हा मीन ॥ ५ ॥

५

नाहीं भक्ति-भाव नीट । तरी हांक मोडली धीट ॥ १ ॥
नाहीं मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥ २ ॥
नेम-धर्म कोणा ठावा । एकरूप उजवा-डावा ॥ ३ ॥
तुम्हीं यावें आम्हांसाठीं । कवित्वही न ऐसें गांठीं ॥ ४ ॥
म्हणे "××" हांके साच । अधिकार पाप हाच ॥ ५ ॥

६

आलां गोप-गोपींसाठीं । देवा तुम्ही यमुनाकांठीं ॥ १ ॥
पुंडलीका द्याया भेटी । देव आले वाळवंटीं ॥ २ ॥
नामयाच्या कारणीं । राउळाचीही फिरवणी ॥ ३ ॥
दामाजीच्या संकष्टीं । विठू घेड होई कष्टी ॥ ४ ॥
म्हणे "××" माय-बापा । भीशी काय माझ्या पापा ॥ ५ ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपेंआप ॥ १ ॥
माझ्या पातकांची रास । देवा पाडील इरेस ॥ २ ॥
"आजवरी थोर-थोर । पायीं नेले पतित घोर– ॥ ३ ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो का उद्धार" ॥ ४ ॥
म्हणे "××" ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥ ५ ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझा माझा उभा दावा ॥ १ ॥
नामें उद्धरिले सारे । मीच एक राहिन बा रे ॥ २ ॥
तुझ्या नांवा गालबोट । सुखें खावे दांत-ओठ ॥ ३ ॥
पाहूं बोलाविल्यावीण । हरी का तें माझा शीण ॥ ४ ॥
देवा तुझी घ्याया लाज । "××" ठाकलासे आज ॥ ५ ॥

९

काय महिमा नामांकित । आज दाखवा प्रचीत ॥ १ ॥
पूर्वी नांव झालें फार । नको त्याचा वडिवार ॥ २ ॥
दावीं मज प्रत्यय कांहीं । नको संतांची ती ग्वाही ॥ ३ ॥
देणें-घेणें हातो-हात । उधारीची नाहीं बात ॥ ४ ॥
धन्य "××" भाग्यवंत । देवा तुझा पाही अंत ॥ ५ ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दडी पाण्यापोटीं देणें ॥ १ ॥
धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥ २ ॥
काच बळीचा अगोचर । देवा झालां मूठभर ॥ ३ ॥
परि येतां पापें माझीं । कुठें दडाल देवाजी ॥ ४ ॥
म्हणे "××" धीटपाठ । येथें अस्सलाशीं गांठ ॥ ५ ॥

★

# २ राजहंस माझा निजला !

पतिनिधनानंतर अल्पावधींतच बापडीवर एकुलत्या एक मुलाचें निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम कां होणार नाहीं ?

हें कोण बोललें बोला ?– ।
'राजहंस माझा निजला !' ।।

दुर्दैवनगाच्या शिखरीं । नवविधवा दुःखी आई ।
तें हृदय कसें आईचें । मी उगाच सांगत नाहीं ! ।
जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होई – ।
हें कुणीं कुणां सांगावें !
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें-
मग ऐकावें या बोला । 'राजहंस माझा निजला !' ।। १

मांडीवर मेलें मूल । तो हृदया धक्का बसला ।
होउनी कळस शोकाचा । भ्रम तिच्या मानसीं बसला ।
मग हृदय बधिरची झालें । अति दुःख थिजवि चित्ताला ।
तें तिच्या जिवाचें फूल !
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल–
वाटतची होतें तिजला । 'राजहंस माझा निजला !' ।। २

जन चार भोंवतीं जमले । मृत बाळा उचलायाला ।
तों काळ नाथनिधनाचा । हतभागि मना आठवला ।
तो प्रसंग पहिला तसला । हा दुसरा आतां असला ! ।

तें चित्र दिसे चित्ताला !
हें चित्र दिसे डोळ्यांला !
निज चित्र चित्तनयनाला,
मग रडुनि वदे ती सकळां । ' राजहंस माझा निजला ! ' ॥ ३

करुं नका गलबला अगदीं । लागली झोंप मम बाळा ।
आधींच झोंप त्या नाहीं । खेळाचा एकच चाळा ! ।
जागतांच वाऱ्यासरसा । खेळाचा घेइल आळा ! ।
वाजवूं नका पाऊल !
लागेल तया चाहूल !
झोपेचा हलका फूल !
मग झोंपायाचा कुठला ! । ' राजहंस माझा निजला ! ' ॥ ४

हें दूध जरासा प्याला । आतांसा कोठें निजला ! ।
डोळ्याला लागे डोळा । कां तोंच भोंवतीं जमलां ? ।
जा ! नका उठवुं वेल्हाळा । मी ओळखतें हो सकलां ! ।
तो हिराच तेव्हां नेला !
हिरकणीस आतां टपलां !
परि जिवापलिकडे याला—
लपवीन ! एकची मजला । ' राजहंस माझा निजला ! ' ॥ ५

कां असलें भलतें-सलतें । बोलतां अमंगळ त्याला ? ।
छबकड्यावरुनि माझ्या या । ओंवाळुनि टाकिन सकलां ! ।
घेतें मी पदराखालीं । पाहूंच नका लडिवाळा ! ।
मी गरीब कितिही असलें !
जरि कपाळ माझें फुटलें !
बोलणें तरी हें असलें
खपणार नाहिं हो मजला । ' राजहंस माझा निजला ! ' ॥ ६

हें असेंच सांगुनि मागें । नेलात जिवाचा राजा ! ।
दाविलाहि फिरुनी नाहीं । नाहिंत का तुम्हां लाजा ? ।
न्यावयास आतां आलां । राजहंस राजस माझा ! ।

हा असा कसा दुष्टावा ?
कोणत्या जन्मिचा दावा ?
कां उगिच गळा कापावा–

पाहुनी गरिब कोणाला । 'राजहंस माझा निजला !' ॥ ७

हे काळे कुरळे केश । खेळतात डोक्यावरती ।
ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी ही असती ।
हें तेज अशा रत्नाचें । झालें का आहे कमती ? ।

कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल–

मी असाच झांकिन याला । 'राजहंस माझा निजला !, ॥८

या अर्ध्या उघड्या नयनीं । बाळ काय पाहत नाहीं ? ।
या अर्ध्या मिटल्या तोंडीं । बाळ काय बोलत नाहीं ? ।
अर्थ या अशा हंसण्याचा । मज माझा कळतो बाई ? ।

हें हंसें मुखावर नाचे !
जणुं बोल दुग्धपानाचे !
कीं मुक्या समाधानाचे

इतुकेंहि कळे न कुणाला –। 'राजहंस माझा निजला !' ॥ ९

या माझ्या मानससरसीं । सारखें प्रेमजल वाही ! ।
त्या तरंगलहरींवरतीं । राजहंस पोहत राही ! ।
सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला बाही ! ।

नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रूंचे मौक्तिकसुमणी,
मीं दिले तया काढोनी,

मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला ! ॥ १०

ते वैकुंठेश्वर गेले । पदिं त्यांच्या अर्पायाला ।
ही अखंड या अश्रूंची । वैजयंति मोहनमाळा ।

कौस्तुभ हा माळेमधला !
हृदयाचें कोंदण याला
तो चोराया कां आला !

दैत्यांहुनि दैत्यचि झाला । 'राजहंस माझा निजला !' ॥ ११

हें असें जाहलें म्हणतां । तरि देवचि निजला का हो ? ।
जरि निर्दय होउनि निजला । आळवीन फोडुनि टाहो ।
कीं असा पोटचा गोळा । 'पोटांतचि देवा राहो !' ।

ही कुऱ्हाड आकाशाची,
मजवरती पाडायाची,
नाहींच कल्पना त्याची,

हा तुमचा कावा सगळा । 'राजहंस माझा निजला !' ॥ १२

जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायाला ! ।
ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला ! ।
हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला ।

मी मुका असा घेतांना–
हा पहा–पुन्हा हंसला ना !
कां अशा फिरवितां माना ?

सुख खुपे काय डोळ्यांला ? । 'राजहंस माझा निजला !' ॥१३

हें सर्वस्वाचें फूल । त्याभंवतीं झालां गोळा ।
मी बघतें–कधिंचा आहे । त्यावरतीं तुमचा डोळा ! ।
एकदा करावा त्याचा । वादानें चोळा-मोळा ! ।
सर्वांच्या मनिंचा लाहो,
हाच ना ? स्पष्ट बोला हो.,
मी इतकी वेडी का हो–
कीं हेंहि कळेना मजला । 'राजहंस माझा निजला !' ॥ १५

जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं !
पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई ! ।
तो देह खांच-दगडांत । -छेः ! नको नको ग बाई ! ।
हृदयाची खणुनी खांच
झांकिन मी बाळ असाच !
दुःखांचे फत्तर साच !
जा ! जाउनि सांगा काळा । 'राजहंस माझा निजला !' ॥ १५

जरि काळाचाही काळा । बाळाला न्याया आला ! ।
तरि नाहीं मी द्यायाची । या जीवाच्या जीवाला ! ।
सारखीं गाउनी गाणीं । निजवीन कल्पवर याला ! ।
जा ! करा आपुलें काळें !
माझेही दमले डोळे !
प्राणांचें पसरुनि जाळें–
मी निजतें घेउनि याला । "राजहंस माझा निजला !" १६

सांगुनी असें सकलांशीं । मृत बाळ उराशीं धरुनी ।
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी । चुंबिलें एकदा फिरुनी ।
पाहिलें नीट निरखोनी । झणिं तीही गेली निजुनी ! ।

मग पुन्हा कधीं ती उठली,
जाणीव कुणा ही कुठली !
परि मति या प्रश्नें हटली–
"बोलेल कोण या बोला । राजहंस माझा निजला !'" ॥ १७

मग माता- पुत्रांवरि त्या ! तरु गाळिति कोमल पानें ।
ढाळिती लता निज सुमनें । पशु-पक्षिहि रडती गानें ।
दशदिशा दगडही कढती । मन दुभंगुनी शोकानें ।
दुमदुमतें स्थळ तें अजुनी,
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानीं !
ऐकाल याच बोलाला– । "राजहंस माझा निजला !" ॥ १८

★

## ३ दसरा

[ रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा ]

चला आज हा आला दसरा !
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमधें सण हाच खरा ! १

चौमासाला आतां विसरा !
मुसळधार तो पाउस वरला,
तुडवित पायांखालीं चिखला,
शेत पेरिलें येत पिकाला,
येतां आनंदाचा दसरा ! २

पहिल्या दुभत्या गाई विसरा !
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना ?
त्या गाईच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं द्या पहांटचारा ! ३

करा जरासा मुखडा हंसरा !
आतां कां हीं तोंडें रडवीं ?
कडवीं बीजें करी गोडवीं,
फुटलें-तुटलें पुन्हाहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा ४

चला रूढिवर आतां घसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या ;
सीमोल्लंघनकालचि दसरा ! ५

जुन्या मतांचा जाळा कचरा !
नव्या मताचे जे राऊत,
खरे-खुरे मायेचे पूत,
येऊं द्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा ! ६

नका हातचा दवडूं दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा, तिकडे नेइल हा दसरा ! ७

श्रुति-स्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि-तोडुनि उपडा पाडा !
पाताळीं तो नेउनि गाडा !
करा साजरा यापरि दसरा ! ८

नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उप्लाणी सोडा !
जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकालच दसरा ! ९

जुन्या-पुराण्या चिंध्या विसरा !
जरिपटका घ्या सुधारणेचा !
भगवा झेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्माचा हा दसरा ! १०

नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर ; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज
चला जमूं द्या जमाव तुमचा. ११

काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोड्याला अमीन टांचा,
वाऱ्यावरच्या करवा नाचा,
कापा रस्ता आटो-काट ! १२

चला निघूं घ्या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां त्या आधीं हाणा!
घ्या कृष्णाची करीं 'तुतारी'! १३

रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,
'अगरकरां'ची झडवा नौबत!
'भागवतां'ची धराच हिंमत!
'केशवचंद्रा'चें घ्या चिलखत!
फुंका 'कृष्णा'चीच 'तुतारी'. १४

रूढीचा गड खालीं उतरा,
पाकोळ्या-घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा,
असा साजरा कराच दसरा! १५

कसले पूर्वज घेउनि बसलां!
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें!
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें!
शिक्का कायमचा तो कसला! १६

उगाच खाउनि बसतां हाय!
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले?
त्यांना पूर्वज नव्हते काय? १७

कुंभारासारखेच लोटे
खोटें ठरतें तत्त्व आज तें,
पूर्वज संतत पुढें चालते
घायघूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे ! १८

रडत बैसले महार-मांग
दीनपणाला गर्वे छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
त्या वर घ्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग ! १९

थांबा, ऐका देउनि कान —
सुकल्या हातीं बाला कोमल,
तशाच विधवा करिती तळमळ
फत्तर फुटतिल येउनि कळवळ
कुठला पोकळ गताभिमान ? २०

चला उठा रे बांधा कंबर !
तुमच्यापुरती ही घी-शक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर !
युद्ध माजवा रे घनचक्कर !
फोडा कुजकें हें अवडंबर ! २१

गेल्या धर्माचें हें भूत
पाहुनि बसलां कां रे भीत ?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत
नातरि रडते व्हा राऊत ! २२

अंतकाळाचें मैदान,
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करिं तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान ! २३

सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशीं,
भिडवा नेउनि स्वर्गापाशीं
पूर्णपणाशीं ईशपदाशीं,
तरीच होइल दसरा छान ! २४

कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्याचे गाउनि सूर
'केशवपुत्रा'चा महशूर
'गोविंदाग्रज' चेला सच्चा। २५

★

## ४ विरामचिन्हें

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मी मांडिला,
जो-जो दृष्टिंत ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा बागडे,
तेव्हां 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोहींकडे ! १

आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?
जें तें पाहुनि यापरी भकतसें ; दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसें तैं 'प्रश्नचिन्हां'कित ! २



५३५६८ दि: काव्य

अर्धांगी पुढतीं करी वश मना, शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे;
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये!
केला ‘ अर्धविराम ’ तेथ; गमलें जेथून हालूं नये! ३
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी!
सूक्ष्म-स्थूलहि सारखीं भ्रमविती; लागे मुळीं अंत न,
त्या काळीं मग जाहलें सहजची ‘ उद्गार ’वाची मन! ४
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश,
हीं एकेक समर्थ आज नसती चित्ता कराया वश!
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा! ‘ पूर्णविराम ’ त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला! ५

## ५ ती कोण?

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे!
भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धावतो दिवसही, कीं भेट व्हावी कुठें?
जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी!
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे!
मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकार्त होतों परी?
कां, कीं या मम लक्ष्यशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे?
ओठांशीं भिडतें रहस्य मनिंचें – सांगूं कुणाला परी?
अश्रू हे नयनींहि माळ – करुनी घालूं कुणाच्या गळां?
आलें हें भरुनी रितें हृदयही – देऊं कुणाच्या करीं
आला दाटुनि कंठ – हाय! रडुनी कोठें करूं मोकळा?

जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही, आधार जी जीवनीं
देवा ! भेटविं– दाखवीं तरि– मला ती कोण देवी जनीं ?

★

## ६ प्रेम आणि मरण

“ जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झडप घालून प्राण देतो दीपकाचे वरी ॥ ” – श्रीहोनाजी

कुठल्याशा जागीं देख ।
मैदान मोकळें एक ॥ पसरलें ॥
वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुऱ्या जोमांत ॥ सारखा ॥
चहुंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें ॥ तेथलें ॥
झुडुपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली ॥ माजती ॥
रोज तीं । कैक उपजती । आणखी मरती ।
नाहिं त्यां गणती । दादही अशांची नव्हती । त्याप्रती ॥ १ ॥

त्यासाठीं मैदानांत ।
किती वेली तळमळतात ॥ सारख्या ॥
परि कर्माचें विंदान ।
कांहीं तरि असतें आन ॥ चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरतीं ।
मेघांत वीज लखलखती ॥ नाचली ॥
त्या क्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी नकळतां ॥ २ ॥

तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव जिव्हारीं बसला ॥ प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला ॥ त्यावरी ॥
जातिधर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशीं तुटला ॥ त्यापुढें ॥
आशाहि । कोठली कांहिं । राहिली नाहिं ।
सारखा जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं ॥ एक तो ॥ ३ ॥

मुसळधार पाउस पडला ।
तरी कधीं टवटवी त्याला ॥ येईना ॥
जरि वारा करि थैमान;
तरी हले न त्याचें पान ॥ एकही ॥
कैकदा कळ्याही आल्या ।
नच फुलल्या कांहीं केल्या ॥ परि कधीं ॥
तो योग । खरा हटयोग; । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लागतें जगावें त्याला ॥ हें असें ॥ ४ ॥

ही त्याची स्थिति पाहुनियां ।
ती दीडवितीची दुनिया ॥ बडबडे ॥
कुणि हंसे कुणि करी कींव ।
तडफडे कुणाचा जीव ॥ त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती ॥ त्याप्रती ॥
निंदिती । कुणी त्याप्रती । नजर चुकविती ।
भीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी ॥ होइ तो ॥ ५ ॥

इश्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥

टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें
जीवाला न कळत जगणें ॥ वरि-वरी ॥
पटत ना । जगीं जगपणा । त्याचिया मना ।
भाव त्या टाकी । देवांतुनि दगडचि बाकी ॥ राहतो ॥ ६ ॥
यापरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती ॥ राहिली ॥
इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला ॥ भीतिनें ॥
आश्चर्यें ऋषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे ॥ पाहुनी ॥
तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । " वरं ब्रूहि " झाली वदती ॥ त्याप्रती ॥ ७ ॥
" तप फळास आलें पाहीं ।
माग जें मनोगत कांहीं ॥ यावरी ॥
हो चिरंजीव लवलाहीं ।
कल्पवृक्ष दुसरा होई ॥ नंदनीं ॥
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ॥ तरुवरा ॥
तो वदे । " देवि सर्व-दे, । हेंच एक दे– ।
भेटवीं मजला । जीविंच्या जिवाची बाला ॥ एकदा " ॥ ८ ॥
सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी ॥ मग तया ॥
" ही भलती आशा बा रे ।
सोडिं तूं वेड हें सारें । घातकी ॥

स्पर्शासह मरणहि आणी ।
ती तुझ्या जिवाची राणी ।। त्या क्षणीं ।।
ही अशी । शुद्ध राक्षसी । काय मागसी ।
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं ।। जें कधीं ।। ” ।। ९ ।।

तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वेंच वदला त्रासें ।। त्यांप्रती ।।
“ निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाही मिळतें ।। धिक् तया ।।
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा ।। मग पुढें ।। ”
निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी ।। वृक्ष तो ।। १० ।।

तो निग्रह पाहुनि त्याचा
निरुपाय सर्व देवांचा ।। जाहला ।।
मग त्याला भेटायाला ।
गगनांतिल चंचल बाला ।। धाडिली ।।
धावली उताविळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत ।। त्याकडे ।।
कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला ।। त्या क्षणीं ।। १० ।।

परि पडतां-पडतां हंसला ।। एकदा ।।
हर्षाच्या येउनि लहरी ।
फड-फडुनी पानें सारीं ।। हांसलीं ।।
त्या कळ्या, सर्वेही फुटल्या ।
खुलल्या त्या कायम खुलल्या ।। अजुनिही ।।

तो योग । खरा हटयोग ; प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ॥ हें असें ! ॥ १२ ॥
स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी ।
मराठी रसिकांसाठीं ‘ गोविंदाग्रज ’ पाठवी ॥

★

## ७ कवि आणि कैदी

[ संसृतीच्या पाशांत सांपडलेला आत्मा एखादे वेळीं तरी आपल्या परिस्थितीच्या वर जाण्याचा विचार करितोच; पण मायावश आत्ममूढता त्याला खालीं ओढिते; अविकारी आत्म्याच्याच ‘ कवि ’ व ‘ कैदी’ अशा दोन बाजू आहेत. ]

मार भरारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ध्रु० ॥
पायीं गंजत बेडी पडली ;
नकळे कोणीं केव्हां घडली ;
पुढची चाल परी तव अडली,
व्याद भिकारी । जल तोड बंधनें सारीं ! ॥ १ ॥
अवजड बेडीसह जड पाय,
अनाथ जीवांवरतीं हाय !
टाकुनि चिरडसि कोमल काय,
निर्दय भारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ २ ॥
नसतां मुळींच तूं अपराधी,
कोण तुझ्या ही पायीं बांधी ?
करुनी निधडा निश्चय आधीं,
फटका मारीं । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ३ ॥
तुटतां असली भिकार बेडी,
हंसतिल तुजला भणंग वेडीं,
कोणी तुजशीं धरितिल तेढी.
तयां धिक्कारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ४ ॥

मारी गरुड भरारी गगनीं,
सुख तें शेणकिडा का जाणी !
जाई शेणामध्येंच कुजुनी !
सुखाचा वैरी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ५ ॥

असल्या शेणकिड्यांच्या जाती,
जिकडे-तिकडे बुज-बुज करिती,
केवळ मरण्यासाठीं जगती,
येत ओकारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ ६ ॥

प्रकाश बघतां घुबडें दडती,
एकांताची आवड वरिती,
रातीं-बेरातीं परि फिरती,
घाण ही भारी ! चल तोड बंधनें सारीं ! ॥ ७ ॥

भिडती गरुड सदा गगनाशीं,
वातावरणीं वसतिहि खाशी
लावुनियां टक तेजोराशि
बघती घारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ८ ॥

जाऊं त्यांमागुनि धीरानें,
काढूं शोधुनि लपलीं भुवनें,
गगनामागुनि निघतिल गगनें,
करीं तयारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ९ ॥

रविकिरणांचे दोर मोकळे,
बांधूं नवमेघांचे दोले,
वारा देइल त्यांतें झोले,
धन्य संसारीं ! चल तोड बंधनें सारीं ॥ १० ॥

बसुनी तेथें तीन्ही काळीं,
पाहुनि मूर्खपणाच्या चाली,
जगता हंसु गालींच्या गालीं,
ब्रह्मानंदीं । रंगुनी स्वैर स्वच्छंदीं ! ॥ ११ ॥

★

## ८ एक समस्या

असे एकदा दोघे-चौघे कामाला प्रात:काळीं
घरांतुनी बाहेर निघालों, घाई जाण्याची सगळी.
तोंच धडकली समोर येउनि वृद्धा विधवा दारांत,
अपशकून हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत.
" वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती
या विद्रुप अवदसा सारख्या अश्या चहुंकडे वणवणती "

चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारें झोंकांत,
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत.
अडवुनि बोले " वाचुनि दावा दादा कागद हा इतका. "
त्रासुनि वदलों " बाबा, आम्हां दुसरीं कामें नाहिंत का ?
गिचमिड ओळी भिकार अक्षर लावित बसणें हें कोणीं !
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी.
येईना वाचितां तुम्हांला तरि पत्रांचा व्यवहार
कां करितां मग उगाच हा अव्यापारेषु व्यापार ?"
दिलें चिटोरें त्याच्या अंगावरतीं टाकून;
चालू झालों गप्पा मारित कांहीं-कांहीं हांसून.

जातां किंचित् पुढें आढळे—नांव न घेणें कवनांत,
डोकीवरतीं पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात.

त्या घाणीनें मस्तक फिरलें, रागहि आला भरपूर;
बोलत कांहीं आम्हीं झालों त्यापासुनि आधीं दूर.

" इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात;
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसे वावरतात.
उर्मट तर हे इतके असती बेमुर्वत देतिल धक्का ;
बंदोबस्तच या लोकांचा नाहीं केला कुणी पक्का."

जातां-जातां पुढें यापरी एक दिसे पिंपळपार ;
दत्ताचें देवालय खालीं छोटेसें शोभे फार.
सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या भंवतालीं ;
निरखुनी बघतां – हरहर ! होती विधवा ती बाला असली !
उचंबळूनी ये करुणारस नेत्रहि अश्रूंनीं भिजले ;
निर्दयता दैवाची बघुनी हृदय बिचारें तें थिजलें.

न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच.
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच ?
धिग् धर्माला – धिग् रूढीला – तेतिस कोटी देवांना – "
किती बोललों – नको सांगणें ! पाठ असे तें सर्वांना.
काम कशाचें ! धाम कशाचें ! एक प्रश्न मग हृदयांत !
" सुधारणा होणार तरी कधि या दुर्दैवी देशांत ? "
प्रश्नाच्या उत्तरासाठीं रसिकां जोडुनी करां ।
'गोविंदाग्रज' प्रार्थी कीं समस्या पूर्ण ही करा. ॥

★

# ९ कृष्णाकांठीं कुंडल

" तुझ्या कपाळीं सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी;
करवंदीची कांटेजाळी परी आमुच्या भाळीं. "
" रायगडावर उघड्या पडल्या नव्या हिऱ्यांच्या खाणी;
नटेल त्यांनीं रायबागच्या रायाजीची राणी. "
" टकमक टोंकावरी राहणें चढण उभी ती फार
पडेल खालीं बघतां असली नाजुक नवती नार. "
" प्रीतीच्या पंखांनीं येइल, टाकुनि मागें गगना
रायबागच्या राघूमागें ही मान्यांची मैना. "
" थंडीची हुडहुडी निवाली, सरता झाला माघ;
रायगडावर जागा झाला जंगलांतला वाघ.

शहरगांवच्या हिरव्या फिरत्या पोरी चुकल्यावाणी
उनाड रानीं पडल्या तर त्या लागतील ना झरणी ? "
" चला विचारा त्या वाघाला, कधीं लागली पाठीं
तुझी रानची राणी कुंडलच्या बाजारासाठीं. "
" वाघाची किंकाळी मोगल घोड्याची कीं टाप
ऐकुनि छातीवरच्या चोरां सुटेल ना थरकांप ! "
" तरीच कां ही कमरेवरची नागिण इतकी रोड ?
रायबागच्या रणमर्दाची जन्माची ही जोड.
शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच दिली कां शीक ?
रायबागचे राघू पडले पोपटपंची ठीक !

नाहीं कोणी फसावयाचें बोल असे ऐकुनियां !
दुसरी ग्राही गाते आतां, अलम दखनी दुनिया. "

★

# बालकवि

## [ त्र्यंबक बापूजी ठोमरे, १८९०–१९१८ ]

“ सौंदर्याची द्याहि फिरविण्या वा तव अवतार ”

—गोविंदाग्रज

लक्ष्मीबाई टिळकांच्या ‘स्मृतिचित्रां’त बालकवीचें चटका लावणारें चित्र आहे. “ठोमरे बालकवि होता; पण कवीपेक्षांहि तो बाल अधिक होता.” या लक्ष्मीबाईंच्या शब्दांत बालकवीच्या आयुष्याचें आणि काव्याचेंहि सार आलें. दारिद्र्य, शिक्षणाची आबाळ, अस्थिरता, हाच पाढा ह्या कवीबाबतहि खरा आहे. पण टिळकांनी त्याला मुलासारखा वाढविला आणि त्यांच्या घरीं तो मुलासारखा हसला, खिदळला; स्वतःचें घर असें फारसें नव्हतेंच.

“ सुख-दुःखांच्या व्यामोहाच्या, ‘सुटला फेऱ्यांतुनी’
नसे जग याच्या ध्यानीं-मनीं ”

– आणि हा मुशाफिर एके दिवशीं आपल्याच तंद्रींत चालत असतां आगगाडीखालीं सांपडून मरण पावला. ह्या वार्तेने टिळक कुटुंब हादरलें आणि गडकऱ्यांना कांही दिवस वेड्यासारखें झालें. ती “क्षीण हसतमुख मूर्ति” पुन्हा दिसणार नाही ह्या विचाराने अनेक स्नेह्यांनी अश्रु गाळले. ह्या कवींतील गोडवा असा कीं ज्याला त्याला तो हवासा वाटे. तोच गोडवा त्याच्या कवितेंत भरून राहिला आहे. प्रल्हाद केशव अत्र्यांनी लहानपणीं बालकवींच्या कपट्यावर खरडलेल्या कविता वाचून आपणास कसें धुंद वाटत असे ह्याचें वर्णन केलें आहे. झरझर कविता लिहावयाची, कोणी मनापासून ऐकली नाही तर चुरगाळून फेकून द्यावयाची असा त्यांचा खाक्या. आज त्यांच्या पुऱ्या दीडशें कविताहि उपलब्ध नाहीत. किती चुरगळून गेल्या असतील ह्याची कल्पना करीत विषाद मानावयाचा! ‘एका उन्मनस्काला पाहून’ ह्या कवितेंत टिळकांनी बालकवीच्या काव्यसमाधीचें चित्र काढलें आहे. ती समाधि उतरल्यावर हा मुलांबरोबर खेळावयाला मोकळा! “पहिल्या व दुसऱ्या निर्झरांपैकीं कोणता चांगला हें माझें मलाच कळत नाही” असें बालकवि म्हणत. असा कांहीसा बालसुलभ सरळपणा त्यांच्यांत शेवटपर्यंत होता. कसलाच निबरपणा त्यांच्यांत आला

नाही. त्यांच्या शैलीचें नाजूक सौंदर्य अगदीं सहजस्फूर्त आहे, हा तिचा मोठा गुण. त्यांनी लिहावें तें सुंदर व्हावें असें त्यांना सौंदर्याचें देणें होतें.

बालकवींची विशेष ख्याति त्यांच्या सृष्टिवर्णनपर कवितांसंबंधीं. ह्याबाबत ते आणि इतर कवी यांतील फरक असा. इतर कवी समोर दिसणाऱ्या किंवा कल्पनेने उभ्या केलेल्या सृष्टीचें वर्णन करितात; बालकवि स्वतःच त्या सृष्टींत जणूं विरून जातात. "कवीच झाला सृष्टि, सारी सृष्टि झाली कवि" अशी त्या सौंदर्याशीं त्यांना सायुज्यता लाभत असे.

" निर्झरमय काननमय गायनमय दिव्य जाहला देह
सृष्टीचेंहि पुरेना विचराया स्वैर त्याजला गेह
मग गूढ अमूर्तीचीं मधुगीतें गोड गावया लागे
आनंदरूप झाली मानवता मृत्यु राहिला मागें. "

ह्यावरून कीटस् ह्या इंग्रजी कवीची आठवण होते. बाहेर दाणे टिपणाऱ्या चिमण्या पाहिल्या कीं आपणच दाणे टिपीत आहों असा भास त्याला होत असे.

बालकवींना वेड होतें तें सौंदर्याचें. "सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें" ही त्यांची लालसा. पण पूर्ण सौंदर्य आणि आपण यांच्या आड ह्या जडदेहाचीं आवरणें येतात. "अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे" ह्याची त्यांना तळमळ लागते. वयाबरोबर ही तळमळ वाढली. पहिल्या उत्साहांत 'इकडे तिकडे चोहिंकडे' केवळ आनंद दिसत होता. इतकें सौंदर्य भोवतालीं विखुरलेलें आहे तरी "स्वार्थाच्या बाजारांत" अडकलेला माणून तें पाहत नाही आणि दुःख करीत बसतो. लडिवाळपणें कवि त्यांना तें सौंदर्य उकलून दाखवितो. पण हळूहळू हा उल्हास मावळला आणि

" काय बोचतें तें समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला "

—अशी अवस्था येऊं लागली. "या उदासीनतेच्या गीतांकडे महाराष्ट्राचें अक्षम्य दुर्लक्ष्यच झालें आहे" असें माधवराव पटवर्धन * म्हणतात. बालकवि म्हणजे फक्त सौंदर्याच्या आनंदाचीं गाणीं असा आपला आवडता समज आहे. "परि आला तीव्र विषारी, हा न कळे कुठचा वारा?" आणि कसल्या तरी दुःखाची छाया ह्या कवीवर पडूं लागली. 'कवि-बाळें'मध्यें ही दुःखी काहाणी आहे. जग हें

* 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक'; खंड २.

आनंदमय आहे ही श्रद्धा दुबळी झाली. जीवनाला ज्याचा आधार वाटत होता तें फसवें ठरलें आणि पूर्वी कधीं न सुचलेल्या शंका मनांत घरें करूं लागल्या. पंचविसाव्या वर्षीं ही टोचणी लागली. "पुढें काय? आत्मा, ईश्वर, ब्रह्म, माया, पुनर्जन्म, सगळीं स्वप्नें आहेत. तीं बालमनाचें समाधान करूं शकतील...पण निदान माझा तरी त्यांच्यावर विश्वास नाही.," जें सौंदर्य गवसलें म्हणून आनंदाच्या लहरी उठत होत्या तें दूर दूर चाललें.

"जीव ओढतो वर वर जाया चैतन्यापाठीं
हाय! सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठी."

संसाराच्या पहिल्या तापानेच करपून जाऊं लागलेला हा बालकवि त्यांतून सुटण्याची धडपड करीत होता. मृत्यूची छाया मनांत तरळत होती; तिची भीति वाटत होतीहि आणि नव्हतीहि.

"स्वप्नींहि स्वप्नें बघत
स्वप्नांतच व्हावा अन्त"

कदाचित मृत्यूच्या पार वसलेल्या प्रदेशांत त्या सौंदर्याचा माग लागेल ही आशा होती.

बालकवींचे संसाराशीं धागे-दोरे फारसे जुळले नव्हते. टिळकांच्या घरांत वावरूनहि ह्या बाबतींत ते कोरडेच राहिले. म्हणून धर्मवीरांतील त्यांच्या वाणींत पुरी तडफ येऊं शकली नाही. आपलींच दुःखें नीट उमगलीं नाहीत तर दुसऱ्यांच्या दुःखांची जाणीव ह्या निष्पाप कवीस कशी व्हावी? पण हळुवार मनाने जें कांही टिपलें त्यांतून ती कविता स्फुरली आहे.

बालकवींच्या शैलींतील कल्पनांची व शब्दांची पुनरुक्ति यांसारखे दोष दाखविले गेले आहेत, ते खरे आहेत; पण त्यांना कृत्रिमतेचा वासहि येत नाही. इतकी नाजूक आणि प्रसन्न शैली कोटूनहि कमावून आणिलेली नाही. तिला स्वतःच्या सौंदर्याची जाणीव नाही. गोविंदाग्रजांना तिने भुरळ घातली, पण त्यांना ती सहजता लाभली नाही.

शब्दांतून जिवंत चित्रें निर्माण करण्यांत गोविंदाग्रजांहून बालकवींनी अधिक यश मिळविलें. गोविंदाग्रजांची कारागिरी थक्क करिते, पण ती कारागिरी आहे हें लपून राहत नाही. बालकवीच्या रचनेचा नितळपणा असा कीं त्यांत तपशीलाच्या

विचक्षणेला जागा नाही. जणूं चित्रेंच शब्दरूप घेऊन आलीं असा भास होण्याइतका एकजीवपणा तेथें आढळतो. गोविंदाग्रजांप्रमाणें अनुप्रासासारख्या कृत्रिम उपायांनी बालकवि नादसौंदर्य बांधीत नाहीत; त्यांचें शब्दसंगीत अधिक नाजूक आणि अधिक तरळ आहे. रंगांचें आकर्षण हें बालकवींचें वैशिष्ट्य इतर फार थोड्या मराठी कवींत दिसतें. ‘ औदुंबर ’ सारखी छोटी कविता रंगछटांनी कशी न्हाऊन निघाली आहे ! रंग, नाद आणि रेखा यांची इतकी गोंडस संगति फुलविणारा कवि शतकांत एखादाच निघावयाचा.

शेवटीं शेवटीं बालकवि ऐतिहासिक विषयांकडे वळले. अशा कवितांचे कांही तुकडेच आज आपल्या हातीं आहेत; त्यांवरून कवीच्या प्रतिभेला त्यांत किती अवसर मिळाला असता ह्यासंबंधीं निश्चित अंदाज बांधतां येत नाही. पण बालकवींच्या आत्मकेंद्रित वृत्तीला कथनकाव्याचा प्रकार मानवला नसता असें वाटतें. त्या अपूर्ण कवितांतहि एक लक्ष वेधण्यासारखी गोष्ट आहे. तोंपर्यंत केवळ “ मधुर ” आणि “ दिव्य ” सौंदर्यांत बालकवि रमले होते; तीं विशेषणें त्यांचीं आवडतीं होतीं हें त्यांच्या पुनरावृत्तीवरून स्पष्ट दिसतें. आतां सृष्टीच्या रौद्र रूपांचेंहि चित्र काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तेथेंहि त्यांनी सौंदर्य पाहिलें.

केशवसुतांसंबंधीं बालकवींना फार आदर होता. पण ‘ धर्मवीरां ’तील केशवसुतांच्या सुधारणावादाची छाया आणि कसल्यातरी सौंदर्याची दोघांनाहि लागलेली ओढ ह्यापलीकडे त्या दोघांत विशेष साम्य नाही. हा कविप्रतिभेच्या दोन वृत्तींतील निसर्गसिद्ध भेद आहे. केशवसुतांची कविता अधिक विचारशील आहे. बालकवींची कविता मुख्यतः सौंदर्यरत आहे. ती पुढे निराशेने काळवंडली. “ जळफळतें सारें धगधगुनी अशांतीच्या वणव्यांनी ” असें म्हणूं लागली तरी ती अशांति केशवसुतांच्या मानाने कोमट आहे; नवतारुण्याच्या स्वप्नभंगांतून ती उत्पन्न झाली. केशवसुतांप्रमाणें विचारांचा पीळ तिला नाही.

## १ अरुण

पूर्वसमुद्रीं छटा पसरली रम्य सुवर्णाची
कुणी उधळिली मूठ नभीं ही लाल गुलालाची ?
पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं.
क्षितिजाची कड सारवली ही उज्वल दीप्तीनें,
सृष्टिसतीनें गळां घातलें कीं अनुपम लेणें ?
हे सोन्याचे, रक्तवर्ण हे, हे पिवळे कांहीं,
रम्य मेघ हे कितेक नटले मिश्रित रंगांहीं.
उदरांतुनि वाहते कुणाच्या सोन्याची गंगा,
कुणीं लाविला विशुद्ध कर्पुररस अपुल्या अंगा ?

❦ ❦ ❦

अरुण चितारी, नभःपटाला रंगवितो काय,
प्रतिभापूरित करी जगाला कीं हा कविराय ?
कीं नव युवती उषासुंदरी दारीं येवोनी
रंगवल्लिका रम्य रेखते राजस हस्तांनीं ?
दिवस-यामिनी परस्परांचें चुंबन घेतात—
अनुरागांच्या छटा तयांच्या खुलल्या गगनांत !
स्वर्गींच्या अप्सराच अथवा गगनमंडलांत
रात्रीला शेवटचीं मंगल गीतें गातात ?
किंवा " माझी चोरुनि नेली मोत्यांची माला"
म्हणूनि नभःश्री रुसली, आली लाली गालांला ?

कीं रात्रीचें ध्वांत पळालें, आशेची लाली
उत्साहाशीं संगत होउनि ही उदया आली ?

किंवा फडके ध्वजा प्रीतिची जगता कळवाया ?
कीं अपणावर आज पातली हीच खरी विजया !
कीं स्वर्गींच्या दिव्यांचें हें फुटलें भांडार ?
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार !
प्रगट जाहलें श्रीरामाचें पुष्पक किंवा हें ?
कीं सोन्याची पुरी द्वारका लखलखते आहे ?

“ तेजानें न्हाणितें जगाला कोण सखे बाई ?
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीही ! ”

परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं
“ विरह-काल संपला गा गडे, प्रेमाचीं गाणीं !
या मेघाच्या कुंजामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा – पुरे गडे ग ! हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदय-रसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्णगडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूं या पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शंकित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या ? हांसावें मग कोणाला कोणीं ?

गोफ चालला गगनमंडळीं, रंग नवा आला,
त्यांत लागला कृष्णाचा कर पूर्वेच्या गाला.
विनयवती ती पूर्वदिशा मग अधोवदन झाली,
तों प्रेमाची अद्भुत लहरी वसुधेवर आली !

या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें
हें आम्हांला, ब्रह्मांडाला, देवाला ठावें.
परंतु ही बघ भूदेवी तर वेडावुनि गेली,
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगल कालीं !
दंवबिंदूचा—नव्हे नव्हे—हा पडदा लज्जेचा,
मुग्धपणाचा, बालपणाचा, कोमल हृदयाचा—
निजवदनाहुनि या प्रौढेनें दूर पहा केला,
योग्यच, अथवा प्रेम न मोजी क्षुद्र लौकिकाला !
प्रेमातिशयें मला वाटतें विसरुनि जाइल ही
प्रिय नाथाचा आगमनोत्सव हा मंगलदायी.
कविते ! तिजला तूंच साह्य हो, तूंही पण वेडी !
परंतु वेडाविण सुटतील का हृदयाचीं कोडीं ?
जा जा ! आतां लाजुं नको ग ! पाहुं नको खालीं !
—लाजच अथवा, खुलशिल तूंही या मंगल कालीं.
या लज्जेनें कविमानस हें होउनियां लोल,
प्रेमचंचले ! प्रेमच तुजवर मग तें उधळील !
प्रेमावांचुनि फेड कशानें प्रेमाची व्हावी ?
हा बघ सविता प्रेमळ भूतें प्रेमानें नटवी !

हा प्रेमाचा लोंढा वरुनी आला हो आला
भव्य गिरींनो ! निजशिखरांवर झेलुनि घ्या याला.
नील झग्यावर वेलबुटी तो तुमच्या चढवील,
‘ निगा रखो ! ’ येईल तुम्हांला सरदारी डौल !
कविवाणीचा स्फूर्तियुक्त मग होतां अभिषेक,
तटस्थ होउनि तुम्हांस बघतिल हे सारे लोक !

सुवासिनींनो, वनदेवींनो डोला ग डोला !
नटवा सजवा वनमालेला तुमच्या बहिणीला !

वनमालांनो, हळूच हलवा हा हिरवा शेला,
सूत्रधार हा नभीं उदेला, उधळा सुमनांला !
' जय ' शब्दानें आळविण्याला लोकनायकाला
नभोवितानीं द्या धाडुनि ही विहगांची माला !
सरोवराच्या फलकावरती स्वर्गाच्या छाया
कुणी रंगवा, कुणी फुलांवर लागा नाचाया !
वेलीच्या वलयांत बसोनी गा कोणी गाणीं,
या झाडावर त्या झाडावर हंसत सुटा कोणी.
कुणी कुणी या नदीबरोबर नाचत जा बाई,
प्रपातांतही बसुन गा कुणी मंजुळ शब्दांहीं.

उषःकालच्या सुगंध, शीतल, मृदुल मंद वाता !
विहार कर, ये पराग उधळित अवनीवर आतां !
या कोमल रविकिरणांवरती स्वर्ग बसुनि आला,
सख्या मारुता, गाउनि गाणीं झोंके दे त्याला !

ऊठ कोकिळा ! भारद्वाजा ! ऊठ गडे आतां,
मंगल गानीं टाका मोहुनि जगताच्या चित्ता !
सरिते ! गाणें तुझें, सुरामधीं या मिळवीं बाई !
साध्या-भोळ्या तुझ्या गायना खंड मुळीं नाहीं !
पिवळीं कुरणें या गाण्यानें हर्षोत्कट झालीं,
गाउं लागलीं, नाचुं लागलीं, वेडावुनि गेलीं !

चराचराच्या चित्तीं भरलें दिव्याचें गान ।
मूर्त गान हें दिव्य तयाला गाणारे कोण ?

दिव्य गायनें, दिव्य शांतता, दिव्याचे झोत,
वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें,
त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !
मंगलता ती दिव्य कवीला टाकी मोहोनी,
वाग्देवीनें सहज गुंफिलीं मग त्याचीं गाणीं.

☆

## २ निर्झरास

गिरिशिखरें वनमालाही दरी-दरी घुमवित येई !
कड्यावरुनि घेऊन उड्या खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरती फिर गरगर अंगाभंवतीं
जा हळुहळु वळसे घेत लपतछपत हिरवाळींत.
पाचूंचीं हिरवीं रानें झुलव गडे, झुळुझुळु गानें
वसंत मंडप-वनराई आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिवळीं शेतें सळसळतीं-गातीं गीतें.
झोंप कोठुनी तुला तरी, हांस लाडक्या ! नाच करीं
बालझरा तूं—बालगुणी बाल्यचि रे ! भरिसी भुवनीं !

वालतरू हे चोंहिकडे ताल तुला देतात गडे !
प्रेमभरें त्यांवर तूंही मुक्तामणि उधळुनि देई !
बुदबुद-लहरी फुलवेली फुलव सारख्या भंवतालीं.
सौंदर्यें हृदयांमधलीं दे विश्वीं उधळून खुलीं !
गर्द सावल्या सुखदायी वेलींची फुगडी होई !
इवलालीं गवतावरतीं रानफुलें फुलतीं हंसतीं.

झुलवित अपुले तुरे तुरे निळी ल्व्हाळी दाट भरे.
जादूनेंच तुझ्या बा रे वन नंदन बनलें सारें !
सौंदर्याचा दिव्य झरा बाल वसंतचि तूं चतुरा ;
या लहरी-लहरीमधुनी स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं.

आकाशामधुनी जाती मेघांच्या सुंदर पंक्ती ;
इंद्रधनूची कमान ती ती संध्या खुलते वरतीं ;
रम्य तारका लुकलुकती नीलारुण फलकावरतीं ;
शुभ्र चंद्रिका नाच करी स्वर्गधरेवर एकपरी ;
हीं दिव्यें येती तुजला रात्रं-दिन भेटायाला !
वेधुनि त्यांच्या तेजानें विसरुनियां अवघीं भानें,
धुंद हृदय तव परोपरी मग उसळी लहरी लहरी.
त्या लहरींमधुनी झरती दिव्य तुझ्या संगीततती !
नवल न, त्या प्राशायाला स्वर्गहि जर भूवर आला !
गंधवा ! तव गायन रे वेड लाविना कुणा बरें !

पर्वत हा, ही दरी दरी, तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें, वर खालीं गाणें ! गाणें !
गीतमय स्थिर-चर झालें ! गीतमय ब्रह्मांड डुले !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें !
मुरलीच्या काढित ताना वृंदावनिं खेळे कान्हा ;
धुंद करुनि तो नादगुणें जडताही हसवी गानें ;
दिव्य तयाच्या वेणुपरी तूंहि निर्झरा ! नवल परी–
गाउनि हें झुळझुळ गान विश्वाचें हरिसी भान !
गोपि तुझ्या हिरव्या वेली रास खेळती भंवतालीं !
तुझ्या वेणुचा सूर तरी चराचरावर राज्य करी !

काव्यदेविचा प्राण खरा तूंच निर्झरा ! कवीश्वरा !
या दिव्याच्या धुंदिगुणें दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं दिव्यांची असली श्रेणी !
जडतेला खिळुनी राही हृदयबंध उकलत नाहीं !
दिव्यरसीं विरणें जीव जीवित हें याचें नांव.
तें जीवित न मिळे मातें मग कुठुनी असलीं गीतें ?
दिव्यांची सुंदर माला ओंवाळी अक्षय तुजला !
तूंच खरा कविराज गुणी सरस्वतीचा कंठमणि !
अक्षय तव गायन वाहे अक्षयांत नांदत राहे !

शिकवीं रे शिकवीं मातें दिव्य तुझीं असलीं गीतें !
फुलवेली–लहरी असल्या मम हृदयीं उसळोत खुल्या !
वृत्तिलता ठायीं-ठायीं विकसूं दे सौंदर्यांहीं !
प्रेमझरी–काव्यस्फूर्ति ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चौदा भुवनीं दिव्य तिचें पसरी पाणी !
अद्वैताचें राज्य गडे ! अविच्छिन्न मग चोहिंकडे !
प्रेमशांतिसौंदर्यांहीं वेडावुनि वसुधा माई,
मम हृदयीं गाइल गाणीं रम्य तुझ्या झुळ-झुळ वाणी
आणि जसें सगळें रान गातें तव मंजुळ गान
तेंवि सृष्टिची सतारही गाइल मम गाणीं कांहीं !

## ३ फुलराणी

हिरवे-हिरवे गार गालिचे — हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरतीं — फुलराणी ही खेळत होती.
गोड निळ्या वातावरणांत — अव्याज मनें होती डोलत.

प्रणयचंचला त्या भ्रूलीला — अवगत नव्हत्या कुमारिकेला !
आईच्या मांडीवर बसुनी — झोंके घ्यावे, गावीं गाणीं ;
याहुनि ठावें काय तियेला — साध्या-भोळ्या फुलराणीला ? १

पुरा विनोदी संध्यावात — डोल-डोलवी हिरवें शेत.
तोच एकदां हांसत आला — चुंबून म्हणे फुलराणीला :–
" छानी माझी सोनुकुली ती — कुणाकडे ग पाहत होती ?
कोण बरें त्या संध्येंतून — हळुच पाहतें डोकावून ?
तो रविकर का गोजिरवाणा — आवडला अमुच्या राणींना ? "
लाज-लाजली या वचनांनीं — साधी-भोळी ती फुलराणी. २

आंदोलीं संध्येच्या बसुनी — झोंके-झोंके घेते रजनी ;
या रजनीचे नेत्र विलोल — नभीं चमकती ते ग्रहगोल !
जादू-टोणा त्यांनीं केला — चैन पडेना फुलराणीला ;
निजलीं शेतें, निजलें रान — निजले प्राणी थोर-लहान.
अजून जागी फुलराणी ही — आज कशी ताळ्यावर नाहीं ?
लागेना डोळ्याशीं डोळा — काय जाहलें फुलराणीला ? ३

या कुंजांतुन त्या कुंजांतुन — इवल्याशा या दिवट्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयीं — खेळ-खेळते वनदेवी ही.
त्या देवीला ओंव्या सुंदर — निर्झर गातो; त्या तालावर.
झुलुनि राहिलें सगळें रान — स्वप्नसंगमीं दंग होउन !
प्रणयचिंतनीं विलीनवृत्ति — कुमारिका ही डोलत होती.
डुलतां-डुलतां गुंग होउनी — स्वप्नें पाही मग फुलराणी:– ४

“ कुणी कुणाला आकाशांत —प्रणयगायनें होतें गात.
हळुंच मागुनी आलें कोण — कुणी कुणा दे चुंबनदान ! ”
प्रणय-खेळ हे पाहुनि चित्तीं — विरहार्त फुलराणी होती !
तों व्योमींच्या प्रेमदेवता — वाऱ्यावरती फिरतां-फिरतां
हळूच आल्या उतरुन खालीं — फुलराणीसह करण्या केली,
परस्परांना खुणवुनि नयनीं — त्या वदल्या अमुची राणी ! ५

स्वर्भूमीचा जुळवित हात — नाच-नाचतो प्रभातवात ;
खेळुनि दमल्या त्या ग्रहमाला — हळुहळु लागति लपावयाला
आकाशींची गभीर शांति — मंद-मंद ये अवनीवरतीं.
विरूं लागलें संशयजाल — संपत ये विरहांचा काल.
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी — हर्षनिर्भरा नटली अवनी.
स्वप्नसंगमीं रंगत होती — तरीहि अजुनी फुलराणी ती ! ६

तेजोमय नव मंडप केला — लखलख पांढरा दहा दिशांला.
जिकडे-तिकडे उधळित मोतीं — दिव्य वऱ्हाडी गगनीं येती
लाल सुवर्णी झगे घालुनी — हांसत-हांसत आले कोणी;
कुणीं बांधिला गुलाबि फेटा — झकमकणारा सुंदर मोठा !
आकाशीं चंडोल चालला — हा वाङ्निश्चय करावयाला !
हें थाटाचें लग्न कुणाचें — साध्या-भोळ्या फुलराणीचें !

गाउं लागले मंगलपाठ — सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा — कोकिळ घे तानांवर ताना !
नाचुं लागले भारद्वाज — वाजविती निर्झर पखवाज,
नवरदेव सोनेरी रविकर — नवरी ही फुलराणी सुंदर !

लग्न लागतें! सावध सारे! — सावध पक्षी! सावध वारे!
दंवमय हा अंतःपट फिटला — भेटे रविकर फुलराणीला! ८

वधू-वरांना दिव्य रवांनीं — कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें — परस्परांचें, प्रेम! अहा तें!
आणिक तेथिल वनदेवीही — दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं — फुलराणीची गोड कहाणी!
गुंगत-गुंगत कवि त्या ठायीं — स्फूर्तीसह विहराया जाई.
त्यानें तर अभिषेकच केला — नवगीतांनीं फुलराणीला! ९

☆

## ४ तारकांचें गाणें

कुणि नाहीं ग कुणि नाहीं । आम्हांला पाहत बाई
शांति दाटली चोहिंकडे । या ग आतां पुढें पुढें
लाजत लाजत । हळूंच हासत
खेळ गडे खेळूं कांहीं । कोणीही पाहत नाहीं १

सुंदरतेला नटवून । कोमलतेला खुलवून
प्रेमाच्या वसतीकरितां । जगदंतर फुलवूं आतां
दिव्य सुरांनीं । गीतें गाउनि
विश्वाला निजवायाला । वाऱ्याचा वनवूं झोला २

फेकुनि द्या इकडे-तिकडे । थोडेसे दंवबिंदु गडे
या निर्मल अवकाशांत । प्रेमाचें पेरूं शेत
दिव्यमोहिनी । सर्वे गुंगुनी
विश्वाला वत्सलतेनें । प्रेमाचें गाऊं गाणें ३

सरितांच्या लहरींवरती । नाचूं या निर्भयचित्तीं

अर्धोन्मीलित फुलवोनी । लपूं चला कलिकांत कुणी
कवि-हृदयांत । गिरके घेत
जाउनियां खेळूं आतां । हीं गाणीं गातां-गातां
एखादी तरुणी रमणी । रमणाला आलिंगोनी
लज्जामूढा भीरुच ती । शंकित जर झाली चित्तीं
तिच्याच नयनीं । कुणी बिंबुनी
धीट तिला बनवा बाई । भुलवा ग रमणालाही ५
सुस्वप्नांनीं गुंगवुनी । पुण्यात्मे हंसवा कोणी
आशा ज्या त्यांच्या चित्तीं । त्याच रचा स्वप्नांवरतीं
दयितचिंतनीं । विरहभावनीं
दिवसां ही झुरली बाला । भेटूं द्या स्वपती हिजला ६
अनेक असले खेळ करूं । प्रेमाशा विश्वांत भरूं
सोडुनियां अपुले श्वास । खेळवुं नाचवुं उल्हास
होउनियां आपण राहूं । लोकांच्या मौजा पाहूं ७

☆

## ५ संध्यातारक

दिन-रजनींच्या हृदयावरलें
प्रेमसंगमीं उद्भवलेलें
मुग्ध तान्हुलें फूलच पहिलें !
कोमल किरणीं, नभ फुलवोनी, खेळ खेळतें त्यांत. १

लहरींच्या सुंदर आंदोलीं
लहानग्याची शय्या केली,
रजनी ओंव्या गाउं लागली :—
तूं लडिवाळा ! निज निज बाळा ! मातेच्या हृदयांत. २

विश्वाचें विश्रांतिस्थान
तें माझ्या गुणिलाचें गान
अशी गडे अक्षय गाईन
तूं वेल्हाळा ! निज निज बाळा ! गा मम गीतसुरांत. ३
तेजाला आन्दोलन देत
मन्दपणें विचरे सर्वांत
शांत शांत अवघ्या गगनांत
दिव्य अप्सरा, सुगुणागारा, प्रीतिगीति गातात. ४
त्या गीतींच्या मधु लहरींनीं
गुंगी चढुनी या तव नयनीं
लागो डोळा तुझा म्हणोनी—
मीही गातें, अस्फुट गीतें, हृदयाच्या हृदयांत,
झोंप कशी ती परी अजुनिही
आज गडे तुज लागत नाहीं ?
सांग करूं तरि आतां काई ?
बघ ना बा रे ! विश्वच सारें ; निजलें प्रभुहृदयांत, ६
आन्दोलीं तुज नीज न येई--
घेतें तर उचलुनि मी बाई.
झांकियलीं ग मधुनेत्रें हीं
पदराखालीं झोंपीं गेलें, बाळ कसें इतुक्यांत ? ७

## ६ श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोंहिकडे ;
क्षणांत येतें सर-सर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे
वरतीं बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधिलें नभोमंडपीं कुणि भासे !

झालासा सूर्यास्तव वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे ;
तरुशिखरांवर, उंच घरांवर, पिवळें–पिवळें ऊन पडे !
उठती वरतीं जलदांवरतीं अनंत संध्याराग पहा !
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा !
बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरतीं ग्रहगोलचि कीं एकमतें !
फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती ;
सुंदर हरिणी हिरव्या कुरणीं निजबाळांसह बागडती.
खिल्लारें हीं चरती रानीं, गोपहि गाणीं गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें !
सुवर्णचम्पक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला
पारिजातही बघतां भामारोष मनींचा मावळला !
सुंदर परडी घेउनि हातीं पुरोपकंठी शुद्धमती
सुंदरबाला या फुलमाला रम्य फुलें पत्री खुडती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत !
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत !

★

## ७ बाल-विहग

[ अष्टदिशांचा गोफ ]

सांज खुले सोन्याहुनि पिवळें हें पडलें ऊन
चोहींकडे लसलशित बहरल्या हिरवाळी छान !
पांघरली जरतार जांभळी वनमाला शाल
सांध्यतेज गिरिशिखरीं विखरी संमोहनजाल
त्या तेजाचा प्राण चिमुकला संध्येचा दूत
बाल-विहग आनंद मूर्तिमान् झुलतो गगनांत ! १

क्षणभर येथें क्षणभर तेथें भिंगोरी साची
अवकाशीं जशि काय फिरविली फिरकी जादूची !
खेळाडू कविबाळ करुनि जणुं भावांची होडी
मूर्तरूप देउनी तिला या वाऱ्यावर सोडी
गिरिशिखराचें गोड फूल हें सांध्य तरंगांनीं
झुलुनि त्यांतला पराग कीं हा भरभरतो गगनीं ! २

ǒ ǒ ǒ

अष्टदिशांचा गोफ सभोंतीं हा भिरि-भिरि पाहे
मंद झुले वनमाल वाहतां शांत झरा वाहे.
समाधिस्थ जणुं काय जाहले हा गिरि हें रान
हा आनंदोद्रेक नाचरा गगनीं पाहून !
सुंदरतेचा जलसा असला पाहुनियां धाला
कालहि वाटे विस्मित चित्तें स्तब्ध उभा ठेला ३

ǒ ǒ ǒ

सृष्टिदेविच्या सगुणा बाळा स्वर्गाच्या तान्ह्या
नांवहि रे तव ठाउक नाहीं मज गोजिरवाण्या !
निजदेहाचा करुनि असा हा सुंदर आंदोल
आत्मरंगिं रंगल्या मनाला झुलविसि कीं बोल ?
किंवा कोणी दिव्य देवता जरि न दिसे मज ती
लीलेनें तुज हालविते का घेउनियां हातीं ? ४

ǒ ǒ ǒ

सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें
चैतन्याच्या गोड कोंवळ्या उन्हांत हिंडावें
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं
बनवावें मन धुंद रंगुनी काव्यसुधापानीं !

अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे
चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें ५

भवदु:खाच्या अनंत डोहीं परि बुडतों पाहीं,
शांति मिळेना क्षणभर जीवा विश्रांती नाहीं.
काव्य-देवता अंतरली मज गरिबाला आज ;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
भ्राते माझे वातावरणीं तुजपरि भरभरती
पंख तुटुनियां विव्हल पडलों मी धरणीवरती. ६

सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें,
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं
हाय ! सुटेना दृढ देहाची परि बसली गांठी !
दिव्यानंदीं म्हणुनि उमाळा दु:खाचा वाटे
सत्यहि जो आनंद कल्पनामय केवळ दाटे. ७

अपूर्णताही यापरि मजला जरि बुडवी शोकीं
चित्र मनोहर खगबाला परि मी तव अवलोकीं.
अपूर्ण अपुलें ईप्सित झालें पूर्ण दिसे जेथें
मनुजाचें मन सहज पावतें आकर्षण तेथें.
तुजला बघतां भरभर उडतां कविता आठवली
कशी-बशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली. ८

## ८ पांखरास

पाखरा, गाइलें तुला कधींहि न कोणी
नच अश्रु गाळिले कुणीं वनीं येवोनी !
निःश्वास धावती सौख्यामागें सारे
दुःखाचा वाली कुणा कुणीहि न बारे ! १

मधु सुखद उष्णता मिळतां रविरायाची
हीं पवनांदोलीं कमलें उमलायाचीं.
तेव्हांच कोकिला मैना गातिल गाणीं ;
होतील फुलें स्मरविव्हल त्या गीतांनीं. २

त्या मधुर मुखींचें अश्रुमाळ चुंबीत
झुलतील फूल-पांखरें निजानंदांत.
रविवदनावरचा रंग जरा परि बदले,
मम गान, सर्व सौंदर्य, सर्व हें थिजलें ! ३

या मत्त कोकिळा गिरिकुहरीं रडतील ;
कोंवळ्या कळ्या मोडोनि मान पडतील ;
लवदार मनोहर वेलबुटी नवलाची.
त्या काळीं कोठें नाहीं प्रगटायाची ४

रवि वरतीं-वरतीं चढत-चढत गगनांत
अंगार भरिल या मंद शीत पवनांत ;
निष्प्रेम मनाचें गाणें केविलवाणें
तें तुझें मात्र राहील जसेंच्या तैसें. ५

ती पूर्वतारका प्रभातरेषेवरतीं
जशि काय उभी सौंदर्यदेवता होती ;
पीतांबर कसिले, रानवेत्र धरि हातीं
शिरिं मुकुट कळ्यांचा त्रिलोकसुखदा मूर्ति ६

हळुवार हिमाचें अवगुंठन हलवोनी
बोलेल सर्व निद्रिस्त विश्व म्हणवोनी.
सारून जरा कचभार बालिका पाहे,
एकेक तारका समाधिचें सुख लाहे ७

निद्रिस्त भूमिला स्वप्न जणों हें दिसलें,
स्वप्नांत लाडके, सुंदर डोळे भिजले.
स्मरतांहि जया हो रोमांचाची भरती
मधु मंद अहा ती घटिका सौख्यद होती. ८

परि तोहि काळ तव हृदया नच सुखदायी,
निष्प्रेम मनाला कोठेंही सुख नाहीं.
चुंबीत गुलावी गाल मधुर संध्येचा
कर वरतीं आला सुंदर कविरायाचा. ९

जग समाधिस्त जणुं सर्व सर्व हें होतें,
परि शांतिलेशही नव्हता ठाउक तूंतें !
बैसून कुठें तरि कांटेरी झुडुपांत
तव हूं हूं हूं चें होतें गीत वहात ! १०

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अंत तुझ्या गीताचा.
फिरवून भरारा गोफण तो झाडील
कांट्यांवर उपडें भग्न हृदय पाडील ! ११

मग एकच धडकी, एकच अंतिम बोल
बोलून तुझें हें जळतें हृदय निवेल !

# ९ बाळें तीं खेळत होतीं

स्वर्गाच्या तेजोगर्भीं । बाळें तीं खेळत होतीं.
वत्सलता प्रभुरायाची । जोजवी तयां निज हातीं.
झुलवी त्या पाळणियांत । छायामय मधु रजनी ती
संध्येची सुंदर तार
भरि त्यावर विंझणवारा
लडिवाळें परमोदारा-
देवास बहू आवडतीं । बाळें तीं खेळत होतीं. १

बैसून सूर्यकिरणांत । सोन्याच्या कारंज्यांनीं
कधिं जलदजाल खुलवावें । स्वर्गीय सुधेनें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजवावी । नवरंगी हार विणोनी
शांतीचा करुनी पांवा
अवकाशीं सूर भरावा
नक्षत्रलोक झुलवावा
सौंदर्यें उधळित होतीं । बाळें तीं खेळत होतीं. २

एकदा सडा संध्येचा । शिंपून महोत्सव केला;
वनविलें वीन बाळांनीं । ओढोनि सूर्यकिरणांला
तें वाद्य वाजवायाला । अनिवार हर्ष हृदयाला
ते सांध्यगिरी बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
गजबजल्या सुरललनांनीं
परिसाया देवहि येती । बाळें तीं खेळत होतीं. ३

वाद्याचे ये झंकार । एकेक जसे उदयाला
एकेक सृष्टिचें फूल । लागे मग उमलायाला
निःस्तब्ध मूक गगनाला । निमिषांतच मोहर आला.

आनंद गडे आनंद
गाण्याचा एकच छंद
स्थिर भरला परमानंद
ये रंगनाथ संगीतीं । बाळें तीं खेळत होतीं. ४

परी हाय ! कुठुनि तरि आला । अति तीव्र विषारी वारा
कंपित हो एकाएकीं । मधु दिव्य देश तो सारा
बाळांचे गळले हात । बीनाच्या तुटल्या तारा
ती स्वप्नसृष्टि जळाली
गाण्याची तार गळाली
काजळी चढे वर-खालीं
झाली हो माती माती । बाळें तीं खेळत होतीं ५

या खोल भूमिगर्तेंत । अंधार खळाळत होते
मोहाचे वीख विखारी । बेभान करी सकलांतें
वाऱ्यावर भेसुर भारी । अंधुकता पसरित ये तें !
वाफा़रा तो लागोनी
तीं रम्य बालकें ताऱ्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनी खाली येती । बाळें तीं खेळत होतीं. ६

नग भयद काळडोहांत । भोंवंडुनि गरके खाती
फणि डंख विखारी मारी । वर लाट चपेटा दे ती
अंगार ! तडकते लाही । जंजाळ जिवाचे होती
तडफडती माशावाणी
आक्रंदित करुणागानीं
हा हा ते हाल बघोनी
पाषाणहि भंगुनि जाती । बाळें ती खेळत होतीं. ७

कळवळुनि शेवटीं आला । यमधर्म सुमस्नेहाळ
जर्जरीत बाळ गाळांत । निश्चेष्ट दृष्टि तेजाळ
मालवती जीवज्योत । लवली ती किंचित्काळ
अप्सरसा निर्भर चित्तीं
गंधर्व गायनें गाती
स्वर्गीत दिवाळी होती
जाती न परंतू वरतीं । बाळें तीं खेळत होतीं.

★

## १० धर्मवीर

आद्य ऋषींनीं जी केली, तेजाची पूजा पहिली
ती करणें ज्या-ज्या लोकां, ते सारे सावध ऐका !
गर्जू द्या हिंदिस्तान ऐकुनि हें माझें गान.
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण.
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानी
ते सारे सावध ऐका, सत्यधर्म कथितों लोकां—
ज्या तेजामध्यें भिनले, आद्य ऋषी जाउनि सगळे.
तेंच तेज हृदयीं भिनतां आद्य ऋषी बघतां-बघतां—
अवतरुनी तुमच्या हृदयीं, स्फूर्तिमंत्र गातिल कांहीं !
जडतेचें लागुनि भूत, सृष्टि करी हळहळ येथ.
उणीव तेजाचीच जगीं, भासतसे जागोजागीं
क्षुद्र तुम्ही बनलां कां रे ? मायेनें भुललां सारे !
तेजाला अवमानुनियां, अंधारीं मरतां वायां
मरणाचें काढुनि मरण, घ्या मिळवा जीवंतपण !
वाट करा तेजाला रे ! फोडुनि हीं कारागारें !
प्रकाश द्या दृष्टीला तो, जो तुम्हांवरतीं येतो !
धर्माचारांची माती कां धरुनी बसलां हातीं !

मातीवर चढतें कीट, सत्य धरा ध्यानीं नीट
सत्य सदा निर्मळच तें, आज उद्यां येथें तेथें.
रूढीचें चढलें कीट धर्मावर, परजा नीट !
सत्याची समशेर धरा; असत्य सारें पार चिरा !
आद्य ऋषींचा सद्धर्म,—हेंच मात्र त्याचें वर्म—
सत्य प्रस्थापित व्हावें, देह-मनें जीवें-भावें.
जडतेची काढा कीट, तेजाची उजळा वाट.
धर्मपताका घ्या हातीं, उदार व्हा देहावरतीं !
अहंकार जिरला नाहीं, मोह पुरा विरला नाहीं—
धर्माच्या वाफा नुसत्या, दवडितसां भलत्या-सलत्या !
तोंडावर बसली माशी, शक्ति न ती उडवायासी !
विषयांचा नयनीं धूर, धर्म मात्र तुमचा थोर
दिडकीला सतरा पापें, धर्म धर्म म्हणणें सोपें !
ब्रह्मचर्य तुमचें थोर, चौदाव्रे वर्षी पोर !
देहाचा बनला दास, मायेचा बसला फास,
स्वार्थानें वेडे झालां, धर्माचा मुडदा केला !
धर्म नव्हे संध्या-स्नान, धर्म नव्हे आसन-ध्यान,
तत्त्वज्ञानाचे बोल, तें धर्मावरचें फोल !
अंतरंगीं तुमच्या वसतो, आचरणीं तुमच्या दिसतो,
धर्म खरा तुमचा तोच, बाकीचे शाब्दिक नाच !
वर्णाया सुंदर फार, धर्म नव्हे नाजुक नार.
जीवाचें द्यावें मोल, धर्म तेधवां समजेल.
तोंवरि या वाफा सोडा, धर्म म्हणे छाती झोडा—
अधःपात टळणें नाहीं, धर्म खरा कळणें नाहीं !
रूढि अशी कोणी दावा, बदल जिला नाहीं ठावा.
नाम-रूप बदलायाचें ! चंचलता जगतीं नाचे !

ही वरची पोपटपंची, अजुनि किती घोकायाची ?
आंत चला उघडा डोळे, मोहाचे सोडा चाळे.
परात्पराची कांस धरा, तेजाची समशेर करा !
अंधकार तोडा मोडा, धर्म खरा पदरीं जोडा.
बाधक ते तोडुनि बंध, सत्याचा मिळवा छंद.
भिऊं नका कलिकाळाला; धर्मवीर ! जय जय बोला !
अग्नीनें जळणें नाहीं, शस्त्रानें तुटणें नाहीं
पाण्यानें बुडणें नाहीं, वाऱ्यानें उडणें नाहीं;
दिक्कालापरते तुम्हीं, विश्वाचे अवघ्या स्वामी !
धर्म तुम्हांसाठीं बनला, धर्म तुम्ही तुमचा केला.
सत्याला नांदायाला, देव जगीं स्थापायाला ;
तेज जनीं पसरायाला, धर्म तुम्ही तुमचा केला.
देवाला विसरुनि कां रे, या पोकळ धर्माचारें
सत्याचा अवमान करा ? अध:पात हा खरा-खुरा !
सत्य खरें स्थिरलें जेथें, तेज खरें मुरलें जेथें,
देव खरा विलसे जेथें, धर्म खरा अमुचा तेथें,
सत्यासाठीं नित्य नवे धर्मनियम आम्हांस हवे
तेजाचीं आम्हीं बाळें, सत्यरूप आम्ही सगळे
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण,
बाळ तयाचे जे कोणी, धर्मवीर हिंदिस्तानी,
स्वार्थाला देउनि लाथ, तेजाचा धरुनी हात,
खरे विरागी धीरवर, गांभीर्याचे महीधर,
दिव्य चिंतनीं रमणार, स्वयंपणें विश्वाकार ;
विश्वकुटुंबी विश्वधनी, तेच खरे हिंदिस्तानी,
धर्मवीर हिंदिस्तान, देवाचा कलिजा प्राण !
सत्य बोल हे करा, उठा - धर्मवीर अद्वैत लुटा !
शुद्ध सत्य हृदयांत धरा, तेजाचा उपदेश करा !

मायामय कारगारा तोडा, मोडा, पार करा !
आचारांची प्रौढि नसे, सत्य ठसावें करा असें
धर्मपताका घ्या हातीं, व्हा सगळे तेजोमूर्ति
व्हा सगळे विश्वा नेते, धर्मतत्त्व अमुचें हें तें
सत्य धर्म निरहंकार, सर्वांचें समता सार
सत्य धर्म जगतीं प्रेम, चोंहिकडे आत्माराम.
स्वार्थाचा नुरला लेश, देहाचा गळला पाश,
मरणाला आलें मरण, सत्यधर्म जीवंतपण !
सत्यधर्म कळणें नाहीं, जोंवर ही जडता राही,
धर्माचें जोंवर सोंग, जा मिरवा नुसतें ढोंग !

मेलेल्या सजवा रूढी, गात बसा त्यांची प्रौढी !
शूद्रांचे सोसा शाप, देशावर लादा पाप !
विधवांना रडतचि ठेवा, धर्माच्या मिरवा नांवा !
कोणि असो कसली जात, आम्ही तर पसरूं हात !
देशाचाही बंध नसे, विश्व सर्व अमुचेंच असे.
चोहिंकडे आत्माराम, सर्वांवर अमुचें प्रेम.
खाणारे आम्ही मोतीं, राजहंस भूमिवरतीं.
आद्य ऋषींनीं सांगितलें, संतांनीं अमुच्या कथिलें.
धर्मतत्त्व हें खरें खरें, आम्हांला कळलें सारें !
धर्मवीर भूमीवरतीं, धर्मतत्व अमुच्या हातीं
देवाचे आम्ही प्राण, आम्हांला भिवविल कोण
काळाचे आम्ही काळ, काळदिशा अमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें ! नेउं जगा तेजामागें !
हिमगिरिचा काढा कांटा, एकिकडे सागर लोटा;
वाट करा आम्हांला रे, कां मरतां व्यर्थचि सारे !
तेजाचे आम्ही दास, सत्याची धरिली कांस;

देवाला फिरवूं मागें, दाखवितां कसलीं सोंगें ?
देहाची परवा नाहीं, नांवाची परवा नाहीं;
धर्मवीर भूमीवरतीं, त्यां अमुची असली गीति ! ९९

★

## ११ प्रेम-लेख

मेघाचें करिं भूर्जपत्र धरुनी अस्ताचलीं प्रत्यहीं
स्वर्गींचे नव लेख कुंकुमरसें ती सांध्यदेवी लिही,
रात्रीं शांत गभीर अंबुनिधिच्या आनील पृष्ठावरी,
लज्जालेख लिही विकंपित करें ती तारकासुंदरी ;
श्यामा निर्झरिणी पुन:पुनरपी सारीत नीलांचला
मुग्धालेख सुरम्य सैकतिं लिही मंदोर्मिमालाफुला,
वेलींचें स्वकरें कराग्र धरुनी त्या मंदमदानिलें
क्रीडालेख वनस्थलीहि लिहिती कांहींतरी आपुले.
हे सारे मधुलेख घेउनि जगीं नाचोत वेडे कवी,
गावो गीतशतें तयांस, मजही त्यांची कळे थोरवी.
लज्जामुग्ध परी शिर:कमल तें ठेवून माझ्या उरीं
श्वासांच्या कवनीं लिही प्रियतमा ही प्रेमलेखावलि.
सारे ते मग लेख तुच्छ गमती चित्ताचिया लोचनीं,
तीचा अक्षय लेख एकच, उभा मी मग्न पारायणीं !

★

## १२ औदुंबर

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळा-सांवळा झरा वाहतो बेटा-बेटांतुन
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे ;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें.

पायवाट पांढरी तयांतुनि अडवी-तिडवी पडे
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे
झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

★

## १३ कांहीं अपूर्ण गीतें

### तूं तर चांफेकळी

" गर्द सभोंतीं रान साजणी, तूं तर चांफेकळी !
काय हरवलें सांग शोधिसी या यमुनेच्या जळीं ? "
ती वनमाला म्हणे, " नृपाळा, हें तर माझें घर.
पाहत बसतें मी तर येथें जललहरी सुंदर.
हरिणी माझी तिला आवडे फारच माझा गळा;
मैना माझी गोड बोलते तिजला माझा ळळा,
घेउन हातीं गोड तिला त्या कुरणावरतीं फिरे
भाऊ माझा, मंजुळवाणें गाणें न कधीं विरे."
" रात्रीचे वनदेव पाहुनी भुलतिल रमणी तुला;
तूं वनराणी, दिसे न भुवनीं तुझिया रूपा तुला.
तव अधरावर मंजुळ गाणीं ठसलीं कसलीं तरी
तव नयनीं या, प्रेमदेवता धार विखारी भरी.
क्रीडांगण जणुं चंचल सुंदर भाल तुझें हें गडे
भुरु-भुरु त्यावर नाचत सुंदर कुंतल कुरळा उडे.
अर्धस्मित तव मंद मोहने, पसरे गालांवरी,
भुललें तुजला हृदय साजणी, ये चल माझ्या घरीं. "

★

## वीर मराठा कुमार

वीर मराठा कुमार कोणी बघे सहज पलिकडच्या रानीं ;
भयाण दरडी घोर कऱ्हाडीं किर्र दाट अंधारी झाडी
कृष्ण राक्षसी शिला पसरती गर्द मातल्या गवतावरतीं
ढासळलेले कडे भयंकर तुटुनि घसरले परस्परांवर
त्यांत चेपला वननिर्झर तो कालभुजंगासम सळसळतो
कृष्ण भयानक तीं गिरिशिखरें त्या खिंडी तीं रानभुयारें
विरूपाक्ष कालाचें तेथें भेसुर रूप दिसे कोणातें ?

काळमुखीं पण वावरणारा रणदेवीचा पंचीप्यारा
वीर्याचा अतिरेकच नुसता वीर बाल तो कुमार होता
रणक्षेत्र तें बघुनी नयनीं प्रस्फुरला वीर्याग्नि कणांनीं
ज्योत नवी फोफावुन झाली लाल-लाल वदनावर आली
दृष्टींतुनि फूत्कारच ओती उग्र नागिणी मनस्विता ती
रणदेवीचा हृदयमणी तो विचारीं यापरि झुलतो.

*

## मेघांचा कापूस

फिकट निळीनें रंगविलेला कापुस मेघांचा
वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंब्याचा
त्यांतहि हंसली मंदपणें ती चंद्रकला राणी
कडे-कडेच्या मेघांवर ये मोत्यांचें पाणी.
इंद्रनिळाचा रंग बहरवी गिरिच्या अंगाला
मधुर जळाची शुभ्र शोभते ती मोहनमाला.
चौबाजूंला थाट दाटला हा हिरवाळींचा
सृष्टिसतीनें साज घेतला पाउसकाळीचा.

*

# टीपा

★

# १ केशवसुत

## १ मजुरावर उपासमारीची पाळी

इंद्रवंशा वृत्तांतील सात श्लोक व आठवा इंद्रवज्रा

ही कविता १८८९ सालची हें लक्ष्यांत घेतल्याशिवाय तिचें पुरें महत्त्व उमगणार नाही. त्याच सुमारास लिहिलेली 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही कविताहि पाहावी. भोंवतालच्या दुःखांची आंच लागून निर्माण झालेल्या ह्या कविता केवळ हळव्या नाहीत. फार काळ मराठी 'शिष्ट' काव्याचा हाडा-मांसाच्या माणसांशी लागा-बांधा उरला नव्हता. तो माणूसघाणा सोवळेपणा येथें झुगारून दिला जात आहे. ह्या कवितेंतील मजुराला ऐदी श्रीमंताचा हेवा वाटत नाही; त्याला जाडी भाकर पुरे आहे आणि तो कष्टांत मरण्यास तयार आहे. हें माधवराव पटवर्धन म्हणतात तसें 'अवास्तव' आणि 'काल्पनिक' नाही. मजुरांची असली अल्पसंतुष्टता आजच्या पुरोगामी मापाने मागासलेली वाटली तरी तिसरा श्लोक त्या काळच्या प्रागतिकतेच्या मानाने पुढारलेला म्हटला पाहिजे. तेंच पांचव्या श्लोकांतील देवाच्या उल्लेखाबाबत. पुढे खुद्द केशवसुतहि देवाविषयीं निराळ्या वृत्तीने लिहूं लागले! पन्नास वर्षांपूर्वी उपासमारीने मरणाऱ्या मजुराच्या तोंडांत देवाचें नांव येणें स्वाभाविकच वाटतें.

ही कविता ओबड-धोबड आहे, तिच्यांत शब्दांची सफाई नाही, असले आक्षेप वारंवार घेतले जातात व ते कांही अंशीं खरे आहेत. तशी सफाई पुढे केशवसुतांत थोडी-फार आली. पण हा आशय – आणि तोहि असल्या त्वेषांत – व्यक्त करणाऱ्या कवितेला छानछोकीची रचना कदाचित् मारक ठरली असती.

## २ कवितेचें प्रयोजन

शार्दूलविक्रीडित

अन्न-वस्त्राच्या विवंचनेंत असलेल्या परतंत्र देशाला काव्य, अथवा कला, वगैरे ढंग शोभत नाहींत ही तक्रार आजकालची नाही. सुमारें आठ वर्षांपूर्वीच तिला हें

तडफदार उत्तर देतांना केशवसुतांनी आपल्या काव्याची भूमिका स्पष्ट केली आहे. 'स्फूर्ति', 'धूमकेतु आणि महाकवी' इत्यादि कविता तिला जोड देतात. काव्य हा केवळ विलास अथवा कैफ नसून ती एक धगधगणारी सामाजिक शक्ति आहे. नव्या जगाला त्याची जाणीव झाली आहे. "...the socially educative, the educationally militant role of all literature as a whole and Poetry in particular"–हे बुखारीन ह्या साम्यवादी समीक्षकाचे शब्द पाहा.

२ 'सुजला' सुफला' हीं विशेषणें स्वयंस्फूर्त, वंकिमचंद्रांचें 'वन्दे मातरम्' प्रचारांत येण्यापूर्वीचीं, आहेत असें सी. के. दामले ह्यांचें म्हणणें.

४ ह्यांतील शेवटची ओळ वारंवार उध्दृत केली जाते. तिचा आशय विविध रूपाने त्यांच्या इतर कवितांत उतरला आहे. केशवसुत बालपणाचा गौरव करितात तो वर्ड्स्वर्थ वाचूनच, असा निष्कर्ष काढण्याची आवश्यकता नाही.

६ "त्याला मान नसे ..."
"सांप्रत गाण्यास किंवा काव्यास मान राहिला नाही असें एकाकडून ऐकतांच त्यांनी तत्काळ "त्यांना मान नसे, नसो; पण अतां त्याची अपेक्षा नसे" असें निर्भीडपणें उत्तर दिलें असें नारायण वामन टिळक ह्यांनी सांगितल्याचें श्री. न. शं. रहाळकर लिहितात. ('मनोरंजन' १९१८)

९ "गेलें वैभव गाउनि स्फुरण" देण्याची ही भाषा विनायकाला अधिक जवळची आहे. लवकरच 'जुनें जाउं द्या मरणालागुन' ('तुतारी') असें केशवसुत लिहूं लागले.

१० पहिली ओळ : त्या वेळीं नुकत्याच सुरू झालेल्या राजकीय आणि सामाजिक चळवळींच्या पहिल्या खुणा, पुसटपणें कां होईना, पटूं लागल्या होत्या.

## ३ पुष्पाग्रत

**अंजनीगीताचीं बारा कडवीं व इंद्रवज्रेचा समारोपाचा श्लोक. अंजनीगीताच्या रूढ यमकरचनेंत थोडा फरक.**

अकराव्या कडव्यांतील आर्ततेला विरोधाने उठाव देण्यासाठीं अमर आनंदाची मूर्ति म्हणून फुलाची थोरवी येथें गाइली आहे. अवघ्या सव्विसाव्या वर्षी कवीचें जग अंधारून आलें होतें व त्याचें पिशाच 'मृत आशांच्या चितांवरुनि' भटकत राहिलें, हा कांहींना वाटतो तसा अतिरंजित रडवेपणा नाही; हें काळीज जाळणाऱ्या अशांतीचें गाणें आहे. केशवसुतांसारख्या द्रष्ट्या कवीची प्रकाशाची कल्पना प्रखर

म्हणून त्याला काळोखाची खंत फार. आशा भव्य म्हणून निराशा भयाण. व्यवहाराच्या धोपट सावलीला सरावलेल्या मंद दृष्टीला ही अंतिमता मानवणें कठिण.

१० पुष्पाच्या चिर-तारुण्यावर आक्षेप घेतले गेले आहेत. वैजनाथ काशीनाथ राजकाब्यांसारख्या रसिक पंडितानेंहि "उगाच कल्पना लढवून रडण्यांत काय अर्थ? ही सर्व आंग्ल तऱ्हा." असा शेरा मारून क्षणभर तर्ककर्कश पांडित्याला आपल्या अभिजात रसिकतेवर मात करूं दिली. ही कविता एका विशिष्ट पुष्पावर नाही, तर पुष्प-पणावर आहे. कवीला सांगावयाचें आहे तें वनस्पतिशास्त्रांतील तर्कशुद्ध सत्य नसून प्रतिभा-सत्य ( imaginative ( truth आहे. पक्ष्यांविषयीं कांहीं कवींनी तेंच म्हटलें आहे. 'फुलपांखरूं" ह्या केशवसुतांच्या कवितेंत "फुलपांखरूं-मरण पाहिलें आहे का कोणीं?' असा प्रश्न विचारिला आहे. तसेंच तें इंग्रजी कवींचीहि मालमत्ता नाही, कारण कल्पनासृष्टि तशी 'अखंड' आहे. "The flowers, the flowers, last always" लिहिणारा व्हिक्टर ह्यूगो फ्रेंच होता. "नाही खरें जगतीं मरण, काव्य-पांखरूं वघा खुण" ही वालकवींची ओळ आठवते.

## ४ शब्दांनो ! मागुते या !

**स्रग्धरा वृत्त**

आपली कवित्वशक्ति मावळली किंवा मावळत आहे अशी कांहीशी भीति कविमनाला वारंवार वाटते; आणि काव्य हेंच ज्याचें जीवितकार्य अथवा आसरा त्याला तिची तीव्रता असह्यच होणार. शेलीसारख्या श्रेष्ठ कवीलाहि तिची बाधा झाली आहे. राजवाड्यांनी 'उत्कृष्ट' म्हटलेल्या ह्या कवितेंतील 'मूर्तिकरण' माधवराव पटवर्धनांना 'क्लिष्ट' वाटतें. तें सिद्ध करण्यासाठीं त्यांनी ज्या रीतीने ह्या कवितेची मोड-तोड केली आहे ('अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' प्रथम खंड, पृ. १३९–१४२) ती रसशून्य व ग्रहदूषित आहे. तिचें अंशतः निराकरण प्रो. रा. श्री. जोग ह्यांनी ('केशवसुत' पृ. ६४–६५) केलें आहे. पण श्री. जोग घेतात तसा 'शब्द' ह्याचा केवळ कोता अक्षरसिद्ध अर्थ न घेतां काव्यस्फूर्त शब्द म्हणजेच काव्य असा घ्यावा. शब्द हेंच काव्यव्यक्तीचें एकमेव साधन. केशवसुतांना काव्य लिहावयाचें होतें पण योग्य शब्दरचना सुचेना हा अर्थ त्यांनाच नव्हे तर कोणाहि खऱ्या कवीला अन्यायकारक होईल.

दिव्य भोगांच्या खाणी
गाय मनोमय वाणी
कशी वदेल राठ वैखरी – ग

–हा बी कवींचा विचार येथें अभिप्रेत आहे ?

४ श्री. न चिं. केळकरांना ‘ नूत्न ’ हा शब्द चिंत्य वाटतो; पण तो शुद्ध आहे.

## ५ तुतारी

जाति पादाकुलक

“ केशवसुतांच्या साऱ्या कवितांत हिच्याएवढी लोकप्रसिद्ध कविता दुसरी नाहीं. तिच्या बाह्यांगाचें आणि अंतरंगाचें अनुकरण पुढील कवींनीं केलें. तिच्या नांवानें एक मंडळ स्थापिलें गेलें, तिचा एक वाङ्मय-संप्रदायच झाला. ” ( रा. श्री. जोग )

“ इतकी जोरदार कविता मराठी भाषेंत दुसरी नसेल ” असें १९२० सालीं वैजनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांनी लिहिलें. तिच्या ओळी-ओळींतून जी तळमळ दिसते तिला तोड मिळणें कठिण. आगरकरांच्या सामाजिक बंडखोरीला मराठी काव्यानें ही पहिली तेजस्वी साद दिली. तुतारीला माधवराव पटवर्धनांनी “ प्रगतीची एक आर्ष ऋचा ” म्हणून गौरविलें तें योग्यच. पण पुढें हा केवळ शेलीच्या बंडाचा अनुवाद असें बिनबुडाचें विधान करून “ पाश्चात्य विद्येच्या प्रभावानें महाराष्ट्रांत जें नवीन तेज अवतरलें होतें त्या तेजाची प्रभा तुतारी ह्या कवनावर पडली आहे ” ह्या माडखोलकरांनी उल्लेखिलेल्या सत्याचा घोर विपर्यास केला आहे. आगरकरांनाहि स्फूर्ति पश्चिमेकडूनच मिळाली ! आणि सामाजिक सुधारणांप्रमाणेंच देशाभिमानाची कल्पना येथीलच ! ! पण ह्या कवितेंतील तपशीलच नव्हे तर तिचा नूरहि पुरा मराठी बाण्याचा आहे. ‘ पद्यपंक्तीची तरफ ’ वापरून सामाजिक दंभाला उलथून टाकण्याच्या ह्या प्रयत्नांत ‘ कवितेचें प्रयोजन ’ पटतें. ही, ‘ स्फूर्ति, ’ ‘ मूर्तिभंजन ’, ‘ गोफण ’, ‘ नवा शिपाई ’ इत्यादि कविता वाचिल्यावर केशवसुतांनी मराठी कवितेंत नवें वारें कसें खेळविलें ह्याची ओळख पटेल व त्यांचीं जीं अनेक अनुकरणें झालीं त्यांमागील रहस्य उमगेल.

ह्या कवितेची रचना व शैली ह्याहि लक्षणीय आहेत. पादाकुलकाच्या पंचपदीचीं ही घडण केशवसुतांनीं नव्यानें केली व ती अनुरूप ठरली. पुढें गोविंदाग्रजांनी

'दसरा' ह्या ह्याच स्वरूपाच्या कवितेंत ती सफाईने वापरली व माधव जूलियन ह्यांनी 'सुधारक' ह्या दीर्घ काव्यांत तिच्यांतील खटक्यांचा उपरोधासाठीं ठसकेबाजपणें उपयोग करून घेतला. 'तुतारीं'तील भाषाशैली अर्थाची साथ करण्याच्या दृष्टीने अप्रतिम आहे. "गंगौघापरि भव्य, केशवसुता, सावेश वाणी तुझी" ह्या रेंदाळकरांच्या उक्तीचा येथें प्रत्यय येतो. जातिरचनेचा लवचिकपणा आणि विचारांची तळपती धार ह्यांचा एकजीव मेळ जमल्यामुळें सारीच कविता ओजस्वी आणि ओघवती उतरली आहे.

ह्या कवितेंतील ८ वें व १०ते १५ हीं सात कडवीं कवीने दुसऱ्या आवृत्तींत गाळलीं होतीं; पण येथें तीं घेतलीं आहेत.

३ नव्या मूर्तिभंजक काव्याला असलीं नाजूक आणि गुंगी आणणारीं वाद्यें नकोत; चेव आणणारी तुतारी हवी.

५ ढगें: तिरस्कारार्थीं नपुंसकलिंगी प्रयोग ( ? )

११-१२ "देव-दानवांची ही तुलना रचनादृष्ट्या क्लिष्टच" असली तरी काव्यदृष्ट्या चांगली आहे असें रा. श्री. जोग म्हणतात. ह्याच सुमारास ( १८९३ ) केशवसुतांच्या नास्तिकपणाचा असा बेडर उद्रेक होण्याला कोणती परिस्थिति कारण झाली ह्याचा सुगावा कधींच लागणार नाही का ?

१९ पोरें: स्त्रीला 'भूपृष्ठस्थित आद्य दैवत' मानणारे केशवसुत 'स्त्रियांसारखे रडूं नका' असें म्हणणार नाहीत !

२५ पहिल्या दोन ओळींत बायबलचा पडसाद आहे व नारायण वामन टिळकांचा 'ज्ञानोदय' कचेरींतील सहवास त्याला कारण होय असें सुचविलें गेलें आहे; पण त्याचा फार बाऊ करूं नये.

## ६ झपूर्झा

**बालानंदाचीं कडवीं. प्रत्येकांत अष्टमात्रिक द्विपद्यांचे दोन अंतरे**

विलक्षण शीर्षक व गूढ विषय ह्यांमुळें गाजलेल्या ह्या कवितेवर टीकाकारांचीं रणें माजलीं आहेत. कांहींना ती अति उदात्त वाटते, कांहींना सोंगाडी. बहुतेकांना ती नीटशी समजत नाही. "We are all poets when we read a poem well" हें कार्लाइलचें वचन येथें अगदीं खरें आहे. समरस होऊन, क्षणभर जणूं

कवितेला आत्मार्पण करून, ती वाचल्याने परम काव्यानंदाने जीव थराहून उटेल उलट, माधवराव पटवर्धनांसारख्या कवीने तिचा हडेलहप्पी पंचनामा मांडून ('अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक', प्रथम खंड, १११ – १२२) तिला कृत्रिम आणि विसंगत ठरवून टाकिलें आहे. हा काव्यदृष्टीचा प्रश्न आहे. येथें कोण कोणाला बुझावूं शकणार ?

ही कविता प्रथम 'करमणुकीं'त प्रसिद्ध झाली ती 'हर्ष-खेद ते मावळले' ह्या मथळ्याखालीं व 'झपूर्झा, गडे झपूर्झा' पालुपदाशिवाय! कारण संपादक हरि नारायण आपटे ह्यांना 'झपूर्झा हें काय प्रकरण आहे, याचेंच ... कोडें पडलें,' म्हणून त्यांनी ते चमत्कारिक शब्द गाळूनच टाकिले! हरिभाऊ आपट्यांसारख्या विद्वान् आणि रसिक स्नेह्यालाहि तें गूढ उकललें नाही तेव्हां कवितेची दुर्बोधता कमी करण्यासाठीं केशवसुतांनी आरंभी पुढील टीप जोडली :

"आपल्याला जें कांही नाही असें वाटतें त्यांतून महात्मे कल्याणाच्या चिजा बाहेर काढितात. त्या महात्म्यांची स्थिति लक्ष्यांत वागवून पुढील गाणें वाचिल्यास तें दुर्बोध होऊं नये असें वाटतें."

पण ह्या टीपेने कांहीच सुबोधता येत नाही. ती "अप्रस्तुत, निरर्थक किंवा चुकीची आहे" ही राजवाड्यांची तक्रार पटते. किंबहुना 'महात्मे' आणि 'कल्याण' ह्या शब्दांनी ही संतविषयक कविता असावी असा संशय उत्पन्न होऊन आणखी गोंधळ उडतो.

लहान मुली झिम्मा खेळतांना 'जा पोरी जा' असें म्हणतात; त्यांत तल्लीन होऊन लय वाढवीत त्या 'झपूर्झा'च्या अर्थहीन नादांत गिरक्या घेऊं लागतात. पण वरकरणीं निरर्थक वाटणाऱ्या त्या नादांत जगाला विसरणाऱ्या अत्यानंदाची अवस्था सुचविली आहे. ती अवस्था शब्दातीत आहे म्हणून 'झपूर्झा' सारखीं जणूं सांकेतिक अक्षरें, शब्द नसलेला शब्द, तिची स्वल्प प्रचीति रसलीन वाचकांस देऊं शकतील. बाळबोलींत तसलेंच अबोध सौंदर्य असतें. हर्ष आणि खेद, प्रकाश आणि तिमिर, ह्या द्वंद्वापार असणाऱ्या निःसंग स्थितीचें हें बोलावणें आहे. तें ज्याला ऐकूं आलें नाही असा "वाचक आपल्या अज्ञानाचा दोष कवीच्या माथीं लादून मोकळा होऊं पाहतो" (श्री. म. वर्दे). मूल झाल्यानंतरहि बाहुलीचा खेळ तन्मयतेने खेळणाऱ्या लक्ष्मीबाई टिळकांची अविकृत स्थिति ह्यासारखीच असावी.

ज्या धुंदीचें हें चित्र आहे तिला रूढ अर्थानें समाधि म्हणण्याचें अथवा तिला वेदान्ताच्या चौकटींत बसविण्याचें कारण नाही. तसेंच प्रास्ताविकांतील महात्मे ह्या शब्दाच्या आधारावर तिच्याभोंवतीं धार्मिक गूढतेचें फसवें वलयहि निर्माण करूं नये. हा अनुभव अलौकिक खराच; पण तो अशा अर्थानें कीं संसाराच्या क्षुद्र उपाधींत आपण गुंतून पडतों त्या क्षणीं तो पुरा दुरावतो. पण त्या अनुभवाचा अधिकार कोणालाहि आहे. मधून-मधून त्याची कमी-अधिक चाहूल लागत असते. जेथें मी-तूं-पणाचें भान हरपतें अशा मूल-पणांत ती सर्वांत अधिक लागते. म्हणून अज्ञाताची ओळख ही केवळ थोड्यांची मिरास नाही.

'झपूर्झा'तील पद्यरचना अर्थानुकूल आहे. बालानंदाच्या धावत्या चालींत, दोन तोकड्या द्विपद्या घालून विविधतेबरोबर नृत्याची छटा आणिली आहे. त्यासाठीं यमकांचा चतुर उपयोग केला आहे. केशवसुतांची असली सूक्ष्म कारागिरी पाहिल्यावर रचनेबाबत त्यांजवर केल्या जाणाऱ्या आरोपाचा फेरविचार झाला पाहिजे ह्याची खात्री होते.

रेंदाळकरांची 'झपूर्झा' ह्याच नांवाची ह्याच पद्यप्रकरणांतील एक कविता आहे, पण तिच्यांत ही भव्यता नाही. बी कवींच्या 'पिंगा' ह्या सुंदर कवितेचें स्फूर्तिस्थान 'झपूर्झा'च असावें; तीहि बालानंदांत लिहिली आहे. ह्या रचनेंतील वैचित्र्य तिच्यांत नाही. केशवसुतांच्या मृत्यूनंतर टिळकांनी त्यांच्यावर लिहिलेल्या कवितेचें शीर्षक 'झपूर्झा' असें आहे.

३ पहिल्या तीन चरणांतील अन्त्य 'न'चा उच्चार निसरडा. 'ज्ञानाच्या' ह्या 'करमणुकी'तील पहिल्या पाठाऐवजी 'ज्ञाताच्या' हा अधिक चांगला.

'चिद्धनचपला':चैतन्यरूपी वीज म्हणजेच प्रतिभा. "घन शब्द निरर्थक आहे" (ना. म. भिडे)

४ नांगरल्याविण भुई : अज्ञाताचा प्रदेश ; त्यांतील सौंदर्य (वनमाला) हजारांतील एखाद्यालाच गवसतें; पण तो मुक्त प्रदेश आहे.

५ पुरुष आणि प्रकृति ह्या सांख्यदर्शनांतील सृष्टिकारक जोडीच्या उल्लेखामुळे हें एक वादस्थळ झालें आहे. राजवाड्यांना ह्या कवितेंत "वैशेषिक आणि वेदान्त ह्यांची भेसळ" दिसते. वेदान्त्यांच्या ज्ञानाचा हेतु पुरुषास ओळखणें हा आहे. पुरुष-प्रकृतीच्या क्रीडांचा 'स्वरसंगम' ओळखणें हाच ज्ञानाचा

हेतु असा येथील अर्थ. त्यावरून ड्रायडन् कवीच्या एका गीताचें पालुपद आठवतें.

> " From harmony, from heavenly harmony,
> This universal frame began."

हें विश्व-संगीत ऐकूं येणें ही पाश्चात्य गूढवादांतील एक महत्त्वाची पायरी आहे. वाडें-कोडें : कौतुकाने, लडिवाळपणें.

## ७ स्फूर्ति

**जाति हरिभगिनी, बालानंदाच्या त्रिपदीसह. ह्या प्रकारांतील असल्या आवेशपूर्ण रचनेस फटका असेंहि म्हटलें जातें.**

केशवसुतांच्या उत्कृष्ट कवितांपैकीं ही एक. तिच्यांतील " उन्मत्त आत्मविश्वासाची वंडखोर उमेद " पटवर्धनांनी वाखाणली आहे. ' कवितेचें प्रयोजन ' ह्या कवितेंतील आशय येथें अधिक व्यापकपणें आला आहे; ही ' स्फूर्ति ' केवळ काव्य-विषयीं घ्यावयाची नाही. प्रतिभा ह्या सुनीतांत मुक्ति देणारी तीच " अत्यद्भुत गूढ शक्ति " वर्णिली आहे. साहित्य, अथवा कला, ह्यांच्या ह्या सामाजिक कार्याची ही जाणीव क्रांतिकारक आहे. " A poem is an agitational piece " ह्या मायकॉव्हस्कीच्या सूत्राचें प्रत्यंतर ह्या कवितेंत यावें.

रेखीव बांधणीमुळें ह्या कवितेची परिणामकारता अधिकच वाढली आहे. शब्दयोजनाहि ह्या जोरदार अर्थाला शोभणारी आहे. गोंडस शैली येथें विसंगत दिसली असती.

२ क्लृप्ति : म्हणजे कल्पना अथवा प्रतिभा. कांही शब्द रूढ अर्थाऐवजीं मूळ संस्कृत अर्थाने वापरण्याची केशवसुतांची लकब येथें दिसते.

देवांशीं झगडूं म्हणजे केवळ वरिष्ठ वर्गाविरुद्ध वंड करून समता स्थापूं इतकाच मर्यादित अर्थ घेतल्याने केशवसुतांच्या प्रामाणिक निरीश्वरवादाकडे दुर्लक्ष्य होईल.

## ८ नवा शिपाई

**जाति लवंगलता, बालानंदाच्या त्रिपदीसह. प्रत्येक कडव्याच्या शेवटची द्विपदी ध्रुपदाशीं सयमक.**

विश्वबंधुत्वाची ही घोषणा ह्या घटकेलाहि लागू पडण्याइतकी प्रभावी आहे. केशवसुतांचा ‘नवा’ मनु अजूनहि आपल्या आंवाक्यांत आलेला नाही. पन्नास वर्षांपूर्वी जीर्णोद्धारवाद्यांचा महाराष्ट्रावर पगडा बसत असतांनाच ‘ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं,’ असें बेदरकारपणें लिहिणाऱ्या कवीचें धैर्य असाधारण असलें पाहिजे. राष्ट्रवादाला देखील जात्यभिमानाची बैठक ह्याच काळांत मिळूं लागली हें लक्ष्यांत घ्यावें. म्हणून ह्या धर्म-पंथातीत विशालतेचें महत्त्व मोठें.

१ त्रिपदींतील शेवटचें अक्षर निसरडें न म्हटल्यास चरण पादाकुलकाचे होतील.

३ संपुष्टीं...देख : “मी ह्या शब्दाच्या अर्थाचा अतिसंकोच करून लोक स्वतःवर अनर्थ मात्र ओढवून घेतात” (ना. म. भिडे)

४ ह्यांतील उपमा कांहींशी क्लिष्ट आहे.

अहंस्फूर्तिच्या...जडाचें : “अहंवृत्ति ही जात्या निर्गुण आहे. तथापि तिच्यावर अज्ञानाचें आवरण पडलें असल्याने ती जाचक होते” (ना. म. भिडे) “सारीं माणसें मुळांत तिळासारखीं विशेष भेद नसणारीं व मनाने चांगलीं असतात. त्या तिळांवर मानवी संस्कृतीचा चांगला पण सगुण म्हणजे भेदकारण होईल असा पाक चढविला जातो. त्याचा परिणाम म्हणून त्यांवर बोचणारे कांटे दिसूं लागतात व ह्या भिन्न-भिन्न संस्कृती भिन्नभिन्न धर्म किंवा पंथ वा जाती कलहकारण होऊन बसतात.” (रा. श्री. जोग)

## ९ नैर्ऋत्येकडला वारा

शार्दूलविक्रीडित

‘गोष्टी घराकडिल मी वदतां गड्या रे—’ ह्या दहा वर्षें अगोदर लिहिलेल्या कवितेप्रमाणें येथेंहि जुन्या आठवणींचा गहिंवर आहे. परिस्थितीमुळें झालेली ताटातूट मानीपणा आणि कदाचित् मतभेद ह्यामुळें सांधतां येईना; पण ह्या दुरावलेपणामुळें आपुलकी वाढली आणि विरहाचें दुःख वाढलें. आम्रांच्या सावलींतील तें बालपण जागेपणींच स्वप्नासारखें डोळ्यांपुढून सरकूं लागलें व ओलावलेल्या डोळ्यांनी तें पाहात असतां जुन्या सौंदर्याला नवी झिलई आली. कोंकणांतील एका खेड्याला स्थळ-काळाच्या दूरतेची किमया चालून भव्य सौंदर्य आलें; मालगुंडाचें माल्यकूट झालें, आणि जगबुडीचें जगद्गुरा. पण त्या स्वप्नांतहि आजची निराशा



६३५५० ... वि: ...काव्य...
.१९२९ ८६१२१०

सलूं लागली, आणि तिने काळवंडलेल्या शेवटच्या श्लोकांत आयुष्य हें 'शोकसंकुल नाटक' आहे ह्याच विचाराला प्राधान्य आलें.

केवळ खाजगी स्वरूपाच्या ज्या थोड्या कविता केशवसुतांनी लिहिल्या त्यांपैकीं ही एक. समाजाविरुद्ध, आणि देवांविरुद्धहि, वंड करणाऱ्या ह्या लढाऊ कवींत आपल्या घराविषयीं असला गाढ जिव्हाळा होता. ह्यांतच तें एखाद्या संसारद्वेष्ट्याचें विध्वंसक वंड नव्हतें ह्याचा पुरावा आहे.

निसर्गसौंदर्य शब्दरूपाने उभें करण्याचें बालकवींचें सामर्थ्य केशवसुतांत नाही हें निर्विवाद आहे. येथें कांहीं श्लोकांत थोडा तपशील आहे, पण एकंदर कवितेचा रोख अशा वर्णनांवर नसून आठवणींच्या दुःखांवर आहे.

२ तुंग : टिळकांप्रमाणें केशवसुतहि विशेषणाला, संस्कृत धर्तीवर, विशेष्यानुवर्ति करतात.

४ दुःखांतूनच काव्य उफाळतें. हा फक्त इंग्रजी रोमॅन्टिक कवींचा संकेत आहे असें समजण्याचें कारण नाही.

## १० सतारीचे बोल

जाति पादाकुलक

"ही कविता वाचिल्यावर Dryden च्या Alexander's Feast ची आठवण होते" हें राजवाडे ह्यांचें म्हणणें खरें असलें तरी तिच्यांत कसलेंहि अनुकरण आहे असा सूर त्यांतून निघत नाही. आहे तें अल्प साम्य अकल्पित समजावें.

संगीताच्या प्रभावामुळें विषाद सरून आशा, आनंद आणि शांति ह्यांचा संचार कसा झाला हा ह्या कवितेचा विषय आहे. सतारीच्या स्वरमेळाने कवीच्या क्षुब्ध अंतरांत स्वरमेळ उपजला. त्याने झालेली स्वत्वाची नवी आणि उदात्त जाणीव येथें सुंदर वर्णिली आहे. श्री. वर्तक ह्या कवितेंतून तत्कालीन सामाजिक व राजकीय स्थितीचे अर्थ काढतात, ते योग्य वाटत नाहीत.

पालुपदवजा 'दिड दा'ची अर्थसूचक नादयोजना आकर्षक वाटते. पादाकुलकाची द्रुत गति 'सतारीच्या बोलां'तील व्यंजना व्यक्त करावयाला अनुरूप आहे. अर्थाप्रमाणें शैलीहि विषण्ण, उदात्त, आनंदी अथवा शांत कशी होते हें कडव्याकडव्यांतून सूक्ष्मपणें पाहण्यासारखें आहे.

६ 'लोचनांतुनी तोय 'वर घेतलेला बोजडपणाचा आक्षेप खोटा नाही. ग्रांथिक मराठी संस्कृतच्या कचाट्यांतून हळूहळू मुक्त होत होतें.

९ ह्या कडव्याची विशिष्ट तत्त्वज्ञानाशीं सांगड घालण्याची आवश्यकता नाही. स्थल-काळाचा विसर पाडणारी तल्लीनता अथवा धुंदी हा लौकिक अर्थ पुरेसा आहे.

११ 'शान्त शब्दाच्या सहेतुक पुनरुक्तीनें शान्त भावनेची खरोखरच प्रतीति होते व शेवट फारच परिणामकारक होतो." (रा. श्री. जोग)

# ११ आम्ही कोण?

## सुनीत – शार्दूलविक्रीडित

"अर्थगौरव, रचनासौष्ठव आणि समुचित शब्दयोजना ह्या तीनहि बाबतींत केशवसुतांची इतकी चांगली कविता एखादी-दुसरीच असेल." (रा. श्री. जोग) पण ह्या कवितेची विडंबनेंहि फार झालीं, आणि पटवर्धन आणि माडखोलकर ह्यांच्या-सारख्या टीकाकारांनी तिच्यावर गहजब केला आहे. प्रतिभावंतांचें, अथवा कवींचें, माहात्म्य सांगणाऱ्या ह्या कवितेंत पटवर्धनांना "आत्मश्लाघेचा कळस" आणि "अचाट, क्लिष्ट अत्युक्ति" आढळली; व माडखोलकरांना तो "एक मानसिक विकलतेचा किंवा विकृतीचा प्रकार" वाटतो. ही कविता केवळ कवींसंबंधीं आहे असें समजलें तरी "केशवसुत म्हणजे कृष्णाजी केशव दामले ही व्यक्ति मी दिक्कालांतुन आरपार पाहूं शकतों वगैरे-वगैरे म्हणत आहे असें कोणाला वाटत असेल असें वाटत नाही." (आ. रा. देशपांडे, फुलवात, प्रस्तावना). पण पटवर्धनांना आणि माडखोलकरांना तसें वाटतें! इतर कांही कवितांतहि केशवसुतांनी कवीविषयीं अशीच श्रद्धा प्रकट केली आहे. "धोंड्यांमधूनीहि दिसे कवीला" कारण ते "नरजातिचे खरे नेत्र-कर्णचि" "अम्हां भ्रमिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया!" पण हा पोकळ अहंकार नव्हे. हें ज्या कवींचें सामर्थ्य ते हें कुजलेलें जग उलथून टाकून त्याऐवजीं नवें सुंदर जग उभारतील ह्या आशेंतून स्फुरलेली ही उद्दाम भाषा आहे. देवांवर सर्व कांही सोंपवणाऱ्या त्या क्रियाशून्य आणि विकल काळांत माणसाचा उद्धार माणूसच करणार असा केशव-सुतांनी पुकार केला. त्यासाठीं प्रतिभेला देवपण दिलें. "माझी जशी कवितेवर

आसक्ति जडली आहे. तशीच मग ती परमेश्वराच्या ठिकाणीं जडेल " ह्या त्यांच्या म्हणण्यांतील ' आसक्ति ' शब्दाचा विपर्यास केला नाही तर त्यांच्या काव्यविषयक भूमिकेचें मर्म ध्यानीं येईल. पण कविता हें खेळणें नाही, तें सतीचें वाण आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या केशवसुतांच्या एका पत्रांतील पुढील ओळी ह्या दृष्टीनें मननीय आहेत. " कविता म्हणजे आकाशींची वीज आहे. ती धरूं पाहणारे शेंकडा ९९ आपणांस होरपळून मात्र घेतात. मी अशा ९९ पैकींच आहें " मरणापूर्वी कांही महिने हें लिहिणाऱ्या कवीवर आत्मश्लाघेचा आरोप सांभाळूनच केला पाहिजे. बी कवींच्या ' आम्ही 'सारख्या कांही कविता ह्याच वर्गांत येतात. आणि टिळकांनीहि कवीसंबंधीं अशाच थाटांत लिहिलें आहे.

सौ. कुसुमावती देशपांडे ह्यांनी ह्या कवितेचें मर्म " आम्ही कोण ? " ( अभिरुचि ' दिवाळी अंक, १९४६ ) ह्या लेखांत सुंदर उकलून दाखविलें आहे.

## १२ हरपलें श्रेय

**बालानन्दाच्या द्विपद्या आणि अष्टमात्रिक त्रिपदी ह्यांचें कडवें.**

मरणापूर्वी कांही महिने लिहिलेल्या ह्या कवितेंत केशवसुतांना निश्चित काय सांगावयाचें होतें ह्याविषयीं जितके टीकाकार तितकीं मतें आहेत. तरीहि तिचा गाभा हातीं आला आहे असें वाटत नाही. कडव्याकडव्यांतून जीं रूपकें आलीं आहेत त्यांमधील दुवे उमगत नाहीत. भाषा रूपकालाच शोभेल अशी गूढ आणि तरळ. तिने कवितेभोंवतीं जणू धुकें निर्माण होतें. त्यांतून आंतील अर्थाची चाहूल लागल्यास पाहावयाची.

केशवसुतांचे बंधु सीताराम केशव दामले ह्यांच्या मतें मुमुक्षु जीवात्म्याची तळमळ हा ह्या कवितेचा विषय आहे. आरंभींचेंच माहेराचें रूपक आणि पुढें येणारे कांही शब्द ह्यांचा ह्या जीवा--शिवाच्या सनातन भक्ति-प्रतिमेला आधार असला तरी सर्व रूपकांची संगति त्याने लागत नाही. पण केशवसुत रूढ अर्थानें देवभक्त नसले तरी ह्या रूपकांतील व्यापक भाव त्यांना परका असण्याचें कारण नाही ! ह्या कवितेनंतर त्यांनी फक्त चार अभंग लिहिले ; त्यांत तर ' केशवसुत म्हणे देवा दीननाथा तुझे पायीं माथा वाहियेला ' म्हणून चंचल वृत्ती स्थिरावल्या, हीच शरणता आहे. वैजनाथ काशीनाथ राजवाडे ह्यांना ही कविता वर्ड्स्वर्थच्या

Ode on the Intimations of Immortality ह्या प्रसिद्ध कवितेंतून स्फुरली असावी असें वाटतें. हें अशक्य नसलें, किंवहुना वर्ड्स्वर्थ्च्या कांही ओळींची दाट छाया येथें ओळखतां येत असली तरी, ह्या दोन कवितांत अंतरहि फार कमी आहे. बालपणांतील स्वर्गीय आनंद वाढत्या वयाच्या निबरपणांत हरपूं लागतो ही वर्ड्स्वर्थ्ची हळहळ; पण कसली तरी श्रद्धा त्याला सांवरते. केशवसुतांना ज्या अनामिक कळा लागल्या आहेत त्यांची तीव्रता कोठेंच उतरत नाही. रामचंद्र श्रीपाद जोग ह्यांनाहि ल्हानपणाचा आनंद हरवून मोठेपणींच्या चिंता ओढवून घेतल्याचें दुःख ह्या कवितेंत आहे असें वाटतें. ही कविता प्रतिभेला उद्देशून असावी असा डॉ. माधवराव पटवर्धन ह्यांचा कयास आहे. ' स्वप्नरंजनानंतरचा ' भकासपणा त्यांना येथें दिसतो. पण ह्या अर्थांत सगळींच कडवीं बसत नाहीत , मग कितीहि ओढा-ताण करा. श्रीधर विनायक वर्तक ह्यांचा ग्रह असा कीं ही कविता स्त्रीस्वातंत्र्यावर आहे; पण त्याला कवितेंत फारसा पुरावा नाही. केशवसुतांच्या सर्वच कविता 'तुतारी'चे एकसुरी पडसाद आहेत अशी त्यांची कल्पना. असो.

कवितेच्या आरंभीं केशवसुतांनी जी टीप दिली आहे तिच्यावरून ह्यांपैकीं बहुतेक टीकाकारांचें अवधान उडालें असावें अशी शंका येते. ती टीप अशी: "उदात्त बुद्धीला संसारांत राम नाही. अलौकिक असें जें कांही तिला पाहिजे असतें, तें तिच्या हक्काचें असून देखील त्याच्या प्राप्तीकरितां तिला झुरत पडावें लागत नाही काय ?" केवळ प्रतिभा, किंवा काव्यशक्ति, पारखी झाल्याचें हें दुःख नाही, पण काव्य हेंच ज्याचें सर्वस्व त्याला तो उणेपणा जिव्हारींच लागणार. " लक्षांत नाहीसें होणारे दिव्य भास " ह्या केशवसुतांच्या कवितेंत " कवि, चित्रकार आणि तानसेन ह्यांस जी अलौकिक स्वप्नें " दिसतात ती धरून ठेवितां आलीं तर पृथ्वीचा स्वर्ग होईल असा निर्वाळा आहे. ज्याची बुद्धि त्या कोटीला पोंचली आहे त्यालाच ह्या भव्यतेचे कांही भाग्यक्षणीं साक्षात्कार होतात. ज्याला ते झाले तो संसारांतून उठला.

घडीभर पडे मध्येंच ऊन<br>
अभ्रीं तेंही जातें उडून,<br>
हृदय हें उले त्यामुळें निराशा जडून ! जिवलगे !

—असल्या प्रकाशवेड्या निराशेचें हें गाणें आहे. अलौकिकाला शब्दरूप द्यावें ही आस; पण तें लख्कन् डोळे दिपवून नाहीसें झालें. ज्याला तें दिसलेंच नाही त्याला निदान अज्ञानाचें सुख आहे. ' संसृतीचें दडपण ' हाच त्याचा आसरा.

ह्या कवितेसंबंधीं आपले स्नेही रहाळकर ह्यांना लिहितांना–" A crab in the heart! But, alas! where is the restorative?"–असे शब्द केशसुतांनी वापरले. ह्याचा अर्थ त्यांची काव्यस्फूर्तिच संपली असा माधवराव पटवर्धन घेतात! तो खोटा नव्हे, पण 'काव्य' आणि 'स्फूर्ति' ह्यांचा अर्थ फक्त पद्यलेखन इतकाच नाही! वरील वाक्यांचा संदर्भ ध्यानीं घेतला पाहिजे. मोठें काव्य हातीं घ्यावें असें रहाळकरांनी सुचविल्यावरून केशवसुत लिहितात–" I am sorry I am a dwarf and don't show any signs as yet of outgrowing. I therefore hate myself and don't like others who attempt only small things" ह्यांतील 'small things' वर समाधान मानणाऱ्यांचें श्रेय कधींच हरपत नसतें! कसल्यातरी विलक्षण आकांक्षेने भारलेला हा कवि तिची पूर्तता होऊं शकत नाही ह्या निराशेने तळमळत आहे.

केशवसुतांच्या वरील वाक्यांतील एका शब्दावरून ब्राउनिंगच्या एका वाक्याची आठवण होते. Pauline ह्या आपल्या पहिल्याच (आणि अपूर्ण) काव्याच्या स्वतःच्या प्रतींत ब्राउनिंगने पुढील वाक्य लिहून ठेवलें. "Only this crab remains of the shapely Tree of Life in my fool's Paradise."

१ 'अजाण माहेरीं' म्हणजे बाळपणीं हा अर्थ वर्ड्स्वर्थच्या आठवणीमुळें घेतला जातो, पण तो थोडाफार जमतोहि. बुद्धीला उदात्तता प्राप्त होण्यापूर्वीची निष्पाप अवस्था असें त्यांचें विवरण करितां येईल. "स्वर्ग जगाला गणती वाळें मानुष इतरें पाहीं!" ही टिळकांची ओळ ('वनवासी फूल') ह्या निरागस आनंदाविषयींच आहे.

२ हा दुर्दैवी सौदा कोणता? 'अजाण माहेरीं'चा निर्मळ आनंद देऊन संसाराचीं दिखाऊ सुखें (आणि खोटी प्रतिष्ठा) घेतली.

३ ह्या अपूर्ण संसारांतहि पूर्णाची हाक ऐकूं येते आणि वेड्यासारखें होऊन संसारावरील लक्ष उडतें.

४ मर्यादा झुगारून देणाऱ्या स्त्रीचा हा संकेत जुना खराच; पण केशवसुतांच्या सुधारणावादाने त्याला विशेष अर्थ दिला.

★

# २ नारायण वामन टिळक

## १ वनवासी फूल

साकी लवंगलता

चारशेंहून अधिक ओळी असलेल्या टिळकांच्या ह्या सुप्रसिद्ध कवितेंतील कांही भाग येथें घेतला आहे. "शास्त्रज्ञांच्या, तत्त्वज्ञांच्या पलीकडे संचार" आणि "दिक्कालानें अप्रतिहत... स्वैर विहार" करणारा कोणी एक कवि आणि निर्जन रानांतील एक फूल ह्यांचा प्रवृत्ति-निवृत्तिविषयक संवाद ह्या कवितेंत आहे. जन-वासाचें कवीचें आमंत्रण नाकारतांना फूल स्वार्थी जगाचा धिक्कार करितें. असल्या कार्यसाधु आणि भ्रमरवृत्ति जगाऐवजीं निसर्गाचें निष्काम प्रेम त्याला हवें आहे. कवि फुलाशीं वाद घालतो. जगाशीं फटकून परकेपणानें वागणें हा "भ्याडपणाचा, स्वार्थाचा वा परमावधि" होय असें कवीचें म्हणणें. जग स्वार्थी असलें तरी सज्जन त्याच्यासाठीं झिजतात; निसर्गहि तेंच करितो. फूलहि अनेक सत्कार्ये करू शकेल. ह्याला उत्तर म्हणून जगाच्या कपटीपणाची उदाहरणें फूल देतें. त्यांचें निरसन करण्यासाठीं कवि सुख-दुःखमीमांसा करून प्रेमाची महती गातो. फुलाला तें पटत नाहीं; पण त्या विरक्तींतहि त्याची कवीशीं मनमिळवणी होते.

ख्रिस्ती होण्यापूर्वी टिळक नागपुर येथें होते; तेव्हां ह्या काव्याचा त्यांनी आरंभ केला व पुढे कांही वर्षे त्यांचा हात ह्या काव्यावर फिरत राहिला. धर्मांतरामुळे कांही काळ लक्ष्मीबाईपासून विभक्त व्हावें लागलें तें नंतर; म्हणून त्यांच्या "मनश्चक्षूंसमोर भार्या" असल्याचा वामन मल्हार जोशी ह्यांचा अंदाज निराधार आहे. ही केवळ तत्त्वचर्चेची कविता आहे कीं माधवराव पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणें त्यांतील फूल "हें एका अजाण संसारविमुख भीरु सुंदर ब्रह्मचारिणीचें प्रतीक आहे" हा वाद वरील कवि-फुलांतील वादाप्रमाणें अनिर्णित राहणार. मात्र खंबीर पुराव्याच्या अभावीं आपण त्या चर्चेवर भर देणें योग्य होईल.

प्रवृत्ति आणि निवृत्ति ह्यांतील झगडा येथें परंपरानिष्ठ पद्धतीनें रंगविलेला नाही; उभयतांचें एक नवेंच स्वरूप सुचविलें आहे. "फुलाचें भीष्म वैराग्य आणि कवीचें दिव्य प्रेम हीं दोन्हींहि आपापल्या परीनें अत्यंत श्रेष्ठ कोटींतील आहेत आणि तीं सामान्य माणसाच्या आवांक्याबाहेर आहेत. परंतु प्रेमानें ओलसर झालेलें वैराग्य आणि वैराग्यानें कणखर बनलेलें प्रेम ह्यांची जोड माणसासहि जोडतां

येण्यासारखी आहे; आणि अशी जोड ज्यांनी मिळविली त्यांनी स्वर्गाचा संसार केला व संसाराचा स्वर्ग केला असें म्हणण्याला कोणती हरकत नाही." (बाळकृष्ण अनंत भिडे) लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रां'त रेखाटलेला टिळकांचा संन्याशाचा संसार हें ह्या कवितेवरील जिवंत भाष्य वाटतें. खुद्द टिळकच म्हणतात, "मी एक ख्रिस्ती संन्यासी आहें-म्हतजे विरागाच्या नव्हे तर अनुरागाच्या मार्गे जाणारा संन्यासी आहें." ह्या कवितेंत हिंदु आणि ख्रिस्ती तत्त्वज्ञानांचा कोठवर मिलाफ झाला आहे हाहि एक वाद असला तरी काव्यसेवनाशीं त्यांचा अन्वय दूरचाच. ह्या पांच कवींत संसाराशीं पुरे समरस झालेले असे एकटे टिळकच. तो सगळा अथांग प्रेमळपणा ह्या कवितेंत आला आहे. "प्रवृत्तीचा पोवाडा" हें कवि माधवांनी केलेलें तिचें वर्णन योग्य आहे.

६८ विराजमाना – अशुद्ध प्रयोग.

१०१–२ नगरच्या Divinity School मध्यें ही साकी बेहोप आनंदांत म्हणून बालकवींनी पुढील विवरण केलें; "खरा मोक्ष प्रेम आहे. प्रेम केव्हांहि गुलाम होत नसतें. प्रेमांतून सुटावें म्हणून तें फूल आपल्याला स्वार्थाच्या बंधनांत बांधून घेतें. देव प्रेमस्वरूप आहे ह्यांतच जगाचें सारें तत्त्वज्ञान आलें आहे."

## २ माझी भार्या

**शिखरिणी**

ह्या कवितेच्या प्रथमावृत्तीच्या शेवटीं –

केलें काव्य, परंतु यांत मम हो संबंध कांहीं नसे,
मित्रांनो ! जरि वाचतांच अपुल्या वाटेल चित्ता तसें.
येथें नायक कल्पिला करितसे भार्यागुणांची स्तुति,
तेणें ती नकळे मदीय अथवा मद्गेहिनीची स्थिति !

– असा श्लोक आहे तो खरा मानून हा सगळा कल्पनेचा खेळ आहे असें समजणें भावडेपणाचें होईल. टिळकांच्या इतर कांही कविता व लक्ष्मीबाईंचीं 'स्मृतिचित्रें' ह्यांची साक्ष काढण्याचीहि आवश्यकता नाही. पुढें सहाव्या श्लोकाप्रमाणें येथेंहि टिळकांच्या विनोदाचीच ओळख पटते. तो सौम्य आणि घरगुती आहे. म्हणूनच सगळा जिव्हाळा त्याने उठून दिसतो.

ह्या भार्याप्रशस्तींत स्त्रीप्रशस्तिहि सामील आहे, किंबहुना तिनेंच कवितेला आरंभ होतो. ज्याला स्त्रीत्व शुभमय दिसलें असा हा साठ वर्षांपूर्वींच्या लोकांना स्त्रैण वाटणारच. केशवसुतांप्रमाणेंच टिळकांच्याहि असल्या कवितांत स्त्रीविषयक ही नवी उदार दृष्टि आहे. रचनेचें वळण मात्र जुनें आहे; पुढें हळूहळू टिळकांनी तें सोडलें.

१ त्रिवर्ग : धर्म, अर्थ आणि काम.

१३ "शिम्पला जनें निन्दिला म्यांच उचलिला ! त्यांतलें मोतीं । मज धन्य करी हो धन्य धन्य धनवन्ती ॥" ('मला काय मिळालें आहे !')

१४ "तुम्हि कवी, भिकारिण मी हो तुमच्या द्वारीं !' असें म्हणणारास–" ही कविता पाहा.

३६ पहिली ओळ: 'कान्तासंमिततयोपदेशयुजे' या मम्मटाच्या काव्यप्रयोजनाची येथें आठवण होते.

## ३ अगाध कांहींतरी

समुदितमदना ( सूर्यकान्त ) जातीचा चरण तोडून कडवें केलें आहे. ध्रुपद ('अगाध. . .सुन्दरी') अकराव्या मात्रेनंतर विराम असणाऱ्या सूर्यकलेचें आहे. प्रेमाच्या अभिन्नतेचें हें गाणेंहि वरील कवितेप्रमाणेंच नव्या वृत्तीचें द्योतक आहे.

## ४ कुणास्तव कुणीतरी

पृथ्वी

ह्या कवितेला एका इंग्रजी कवितेचा आधार उजगरे ह्यांना सांपडला असला तरी ह्यांतील 'कुणींतरी'विषयींची ओढ इतकी गाढ आहे की ती अंगचीच असली पाहिजे.

## ५ गुलाब

दिंडी

फुलांविषयींच्या टिळकांच्या कविता प्रसिद्ध आहेत. पण त्यांत सहसा बोधालाच महत्त्व असतें. फूल हा जणूं चारित्र्याचा आदर्श. गुलाब ह्या फुलाचाच हा खास गौरव नाही. आठव्या ओळींतील 'कांटे' काढल्यास कोणत्याहि फुलास ही कविता लागू पडेल.

## ६ केवढें हें क्रौर्य !

**पृथ्वी. शेवटचा श्लोक वसंततिलक.**

मुक्या प्राण्यांनाहि करुणरसाचा विषय करणारा हा भावनेचा हळुवारपणा पाश्चात्य वाङ्मयांतून सुचला असला तरी तो पोरका न वाटण्याइतकी समरसता ह्या व अशा कवितांत आहे. नव्या माणुसकीचें तें एक अंग आहे. वसंततिलकेच्या विलंबित गतीमुळें शेवट परिणामकारक झाला आहे.

## ७ पांखरा ! येशिल का परतून ?

**चन्द्रकान्ताच्या एका चरणाचें कडवें. ध्रुपद भुवनसुन्दराचें.**

बालकवि नगर सोडून पुण्यास गेले ह्या ताटातुटींतूनच ही आर्त कविता स्फुरली हा समज कदाचित् खरा नसेल. पण वर्षानुवर्षें ह्या पांखरांत बालकवींचें रूप रसिकां-प्रमाणें टिळक-कुटुंबानेंहि पाहिलें. तो विरह पुढें कधींच पुरा सांधला गेला नाही आणि चार वर्षांनी बालकवींचा भयंकर मृत्यु ओढवला. ह्या घटनांनी कवितेला अधिकच तीव्रता आली. टिळक ती वाचून दाखवीत होते तेव्हां बालकवींचे डोळे भरून आले. असा कांहीसा त्यांचा ह्या कवितेशीं गूढ लागाबांधा आहे.

असला भावनेचा ओलावा फार थोड्या मराठी कवितांत आढळेल. प्रत्येक शब्द त्यानें ओथंबल्यासारखा वाटतो. भावना आणि भाषा इतक्या मिसळून गेल्या आहेत.

## ८ आंधळा झालों तर–

**१-३ शार्दूलविक्रीडित ; ४ : शिखरिणी ; ५ : उपजाति ;**
**६ : दोधकवृत्त ; ७ : शार्दूलविक्रीडित ; ८ : पृथ्वी.**

कांहीं विकारामुळें डोळे जाण्याची भीति उत्पन्न झाली असतां लिहिलेली ही कविता टिळकांच्या खंबीर आशावादाचा पुरावा आहे. कसलें तरी अक्षय समाधान भोगणाऱ्या ह्या कवीला लौकिक दुःखांची तमा नव्हती. तें समाधान ह्या ओळींतून ओसंडत आहे.

आंधळा महाकवि मिल्टन् सॅम्सन्च्या मुखानें –

> " He that hath light within his own clear breast
> May sit in the centre and enjoy bright day. "

–असें म्हणतो तें येथे आठवतें.

यशवंत कवींचीहि ह्याच मथळ्याची एक कविता आहे. तिच्यांतील पुढील ओळी पाहा :

"देवाच्याच मनांत येउन जरी मी जाहलों आंधळा
चित्तीं भीति न वाटते लव तरी, गाईल माझा गळा."

अथवा

"ज्याचें दर्शन नेइ ओढुनि मना पापी विचाराकडे
आपोआप टळेल तें मज गमे सद्भाग्य हें केवढें !"

असल्या कवितांतील रचनेची विविधता हा जुन्या कवींचा संस्कार आहे.

## ९ रणशिंग

**जाति बालानंद. अष्टमात्रिक त्रिपदीचा अंतरा.**

ह्या कवितेचें केशवसुतांच्या 'तुतारी'शीं शीर्षकाबाबतच नव्हे तर इतर कांही तपशिलाबाबत उघड साम्य आहे. पण ह्यावरून टिळकांनी केवळ आंधळें अनुकरण केलें असें म्हणणें अयोग्य होईल. ज्या विचारांतून 'तुतारी' स्फुरली त्यांचा थोडा-फार स्पर्श टिळकांनाहि झाला होता. रूढीने किडलेल्या समाजाची विचारवंतांना घृणा येऊं लागली होती. तिला काव्यांत प्रथम आणि जोरदारपणे तोंड फोडलें केशवसुतांनी. त्याने चेव येऊन मग इतर कवी पुढें सरसावले. टिळक 'तुतारी मंडळा'चे सभासद होते. ही व इतर कांही कवींच्या अशाच कविता 'तुतारी'-संबंधींच्या उत्साहांतून निर्माण झाल्या, किंबहुना तिच्या घाटाच्या वाटल्या, तरी त्या जणू एकाच साच्यांतून कृत्रिमपणे काढल्या असें नाही. 'तुतारी'चा आवेश 'रणशिंगां'त नाही. ह्याचें कारण ह्या दोन कवींतील प्रकृतिभेद. केशवसुतांच्या बंडखोरीला त्यांच्या फटिंग आणि नास्तिक वृत्तीने तिखटपणा आणिला. टिळकांची बंडखोरी त्यांच्या समाधानी आणि धर्मनिष्ठ वृत्तीमुळे तुलनेने मवाळ वाटते. ह्या फरकाचें प्रतिबिंब शैलींतहि आढळेल. 'तुतारी'चा आवेश 'रणशिंगां'त नाही ह्याला वृत्तप्रकारांतील भेद कोठवर कारण असेल ?

## १० ब्राह्मण किंवा महार

**वरीलप्रमाणेंच.**

केशवसुतांच्या 'नवा शिपाई'शीं ह्या कवितेचें साम्य स्पष्ट असलें तरी तें सर्वाङ्गीण नाही. येथील 'जन्मभूमिसेवाधर्मी'चें पालुपद त्या कवितेंतील विश्वपूजेच्या

तुलनेने कोतेंच वाटणार. ‘ नवा शिपाई ’ ही मर्यादित, म्हणजे हिंदु (– किंवा हिंदी –) समाजनिष्ठ अर्थाने ‘ समाज-सुधारक ’ कविता नाहीच. तिची झेंप फार विशाल आहे. ही कविता भोंवतालच्या समाजभेदांविषयींच आहे ; अर्थात् तिच्यामागील तळमळ मुळींच कमी नाही. शेवटच्या कडव्यांत हिंदुस्थानच्या एकीचा कवीला लागलेला ध्यास आहे. धार्मिक असहिष्णुतेमुळे ह्या राष्ट्राचे तुकडे पडण्याचा – राष्ट्रांत राष्ट्रें उत्पन्न होण्याचा – धोका टिळकांनी भविष्यवेत्तेपणाने त्या वेळींच बोलून दाखविला होता ! ’

४ गोवें : गुंता, कोडें.

## ११ पुरें जाणतों मीच माझें बल !

मन्दारामाला वृत्त

हा व्यक्तित्वाचा, ‘ मी ’पणाचा, जयजयकार आहे ; कवीची खाजगी बढाई नाही. माणूस पामर आणि दुबळा ; त्याने चाकोरींतून जावें हेंच शहाणपणाचें ही परंपरेची शिकवण. रूढीची अशी जबरदस्त पकड त्या समाजावर होती. तिच्याविरुद्ध ही उठावणी आहे. मात्र ती फार वरच्या पातळीवर आहे. व्यष्टि-समष्टि वादापार जाऊन येथें समस्त सृष्टीला व्यक्तीचें आव्हान आहे. इतकी तडफड टिळकांच्या फार थोड्या कवितांत आढळेल. ‘ आम्ही कोण ? ’ सारख्या केशवसुतांच्या कविता प्रतिभावंतांच्या सामर्थ्याविषयीं आहेत. ह्या कवितेची कक्षा अधिकच भव्य आहे.

‘ मी मर्त्य, मी मृत्यूला जिंकणारा ’ –ह्या विरोधाभासांत समर्थ शैलीचा एक विशेष आहे ; तो म्हणजे सूत्र-लेखनासारखा शब्दांना अधिकाधिक संक्षेप. विचारांचें ओज शब्दांत ओतणाऱ्या शैलीच्या दृष्टीने ही कविता मननीय आहे.

# ३ विनायक

## १ महाराष्ट्र-लक्ष्मी

जाति मोहिनी वा ( ह्याच कवितेवरून मिळालेलें नांव ) महाराष्ट्र-लक्ष्मी.

विनायकाच्या ह्या प्रसिद्ध कवितेंत त्या गुणदोषांची बेरीज-वजावाकी आढळेल. रचना सुटसुटीत व अर्थाला स्वच्छ आणि तोंडांत सहज बसतील अशा ओळी. शेवटचें कडवें असेंच म्हणीसारखें भाषेंत स्थिर झालें आहे. तें विनायकाच्या विचाराची मर्यादाहि आंखून देतें. जुन्याच्या असल्या भावनाविवश गौरवांतच शेवटपर्यंत

विनायक अडकून पडला. नव्या विचारांची झळहि त्याला लागली नाही. पण पुढे महाराष्ट्रांत ही पूर्वजपूजा फार फैलावली. परिणामीं असल्या कवितांना अवास्तव महत्त्व येऊन ' राष्ट्रीय कविता ' हा शिक्का त्यांच्यावर सवंगपणें मारण्यांत येऊं लागला.

१ ' द्वादशाब्द दुष्काळानें ' : " चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांत सर्वभर एक मोठा दुष्काळ पडला. हा एकसारखा बारा वर्षें चालू होता. आकाशानें पाऊस पाडण्याचें बंद केलें व जमिनीनें पिकें टाकलीं. चांगलीं नांदतीं शहरें होतीं तीं उजाड पडलीं व प्रांताच्या प्रांत ओसाड झाले. महाराष्ट्रांतल्या मोठ-मोठ्या नद्या होत्या त्यांत आचमनालाहि पाणी राहिलें नाहीं आणि बावी व विहिरी तर साफच कोरड्या पडल्या. ह्यामुळे वस्ती नाहीशी झाली. हजारों लोक हाता-पायांना सूज येऊन अन्नान्न करून मरून गेले व थोडेफार राहिले ते प्रांत सोडून निघून गेले. ह्यामुळें महाराष्ट्राचें महारण्य झालें. " ( वि. ल. भावे, " महाराष्ट्र सारस्वत ' भाग १ ). ह्याला ' दुर्गादेवीचा दुष्काळ ' असें म्हणतात.

## २ हतभागिनी

**पालुपदाची जाति रेवती. अंतऱ्यासह सर्व चाल शारदा नाटकांतील ' कधिं करिती लग्न माझें ' ह्या पदाची.**

मातृभूमीवरील ह्या रूपकांत वर्तमानकाळांतील दुरवस्था व भूतकालांतील वैभव ह्यांचें विरोधी चित्र काढून विनायकाने पुनश्च तोच विचार प्रकट केला आहे.

## ३ यापुढें

जाति नृपममता

' महाराष्ट्र-लक्ष्मी ' इतकीच प्रसिद्ध असलेली ही कविता कांहीशी तिच्याच स्वरूपाची आहे; पण येथें गतकालासंबंधीं खंती अधिक. ह्यांतील विचार पटो न पटो, कळकळ मात्र मनांत भरते. ' यापुढें 'च्या खटकेबाज पालुपदाने ह्या कवितेच्या रचनासौंदर्यांत भर घातली आहे.

## ४ संयोगिता

**जाति केशवकरणी, त्रिपदी लीलारतीची.**

## ५ ध्यास तो भास

आर्या

विनायकाच्या ऐतिहासिक कथाकाव्याचे हे मासले त्याचें धर्माभिमानाधिष्ठित इतिहासप्रेम, बोधपर वृत्ति आणि प्रवाही रचना हीं वैशिष्ट्यें दाखवितात. संस्कृत शब्दांचा मुबलक उपयोग केला असूनहि वाचतांना जडपणा भासत नाही, असा कांही विनायकाच्या लिहिण्याचा अखंड ओघ असतो. 'संयोगिता'मधील नाट्यगुण व 'ध्यास तो भास' मधील आरंभींच्या वर्णनांतील सौंदर्य ह्यांचाहि निर्देश केला पाहिजे.

## ६ दसरा

जाति पंचकल्याणी

ह्याच मथळ्याची गोविंदाग्रजांची कविता आहे, तिच्या आरंभीं कवीची टीप अशी : "रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा." विनायकाच्या मतें आपण रूढीच्या परंपरेच्या पूर्वजांनी घालून दिलेल्या सीमा उल्लंघिल्या म्हणून असें सर्वस्व हरवून बसलों. तेव्हां पुनश्च त्यांचा अंगीकार करणें, म्हणजे जणू उलट दिशेने 'सीमोल्लंघम' करणें, हाच विनायकाचा दसरा !

८ येथें 'घरकोंबडे' आणि 'कृति' ह्यांचे अर्थ वरील विचारांच्या संदर्भानेंच लाविले पाहिजेत.

## ७ प्रीति निमाली तर –

शार्दूलविक्रीडित

ह्या सुनीत-प्राय कवितेंत प्रत्येक श्लोकाच्या शेवटीं येणारें 'प्रीती निमाली तर' हें पालुपद सुनीतांतील अन्त्य द्विपदीचें कार्य करितें. दुसऱ्या कडव्यांतील आत्मपरतेचा ओलावा विनायकाच्या इतर बहुतेक कवितांत नसलेलें एक निराळेंच सौंदर्य आणितो; आणि नव्या युगांतील काव्यकल्पनांच्या स्पर्शाचीहि ती एक खूण आहे. विनायकाच्या 'चारित्र्या'चीं चिकित्सा करितांना असली कविता न विसरणें बरें !

## ८ सुवास

जाति पादाकुलक

"ओसाडींत सहल करीत असतां कवीला मधूनमधून कस्तूरीसारखा वास येई. हा वास जुन्या भुजंगाच्या श्वासाचा असतो म्हणतात. वास कसा आला, कोठून

आला म्हणून त्यानें पुष्कळ शोध केला, पण व्यर्थ ! त्या नादांत त्याच्या मनाची जी स्थिति झाली तिचें खालील पद्य हें चित्र होय. " – अशी ह्या कवितेच्या आरंभीं टीप आहे.

ज्या अनामिक हुरहुरींतून केशवसुत अथवा बालकवि ह्यांच्या कांही व्याकुळ कविता निपजल्या तिचीच ओझरती छटा येथे आहे. तो ओसाडींतील उदास सुगंध 'भग्नमनोरथ' वालेच्या आंसवांचा कीं जगांतून उठून आलेल्या कवीच्या पाव्याचा ह्या कल्पना श्री. जोग म्हणतात तशा कृत्रिम नाहीत. ह्या कवितेचा आशयच कांहीसा गूढ आहे; त्याला अनुरूप अशा ह्या कल्पना आहेत.

४ जगाविरुद्ध असला वैताग विनायकालाहि कधींकधीं वाटत असे हें विशेष. ह्याला कारण केशवसुतांशीं साहचर्य ? 'रसिकत्व' हें काव्यविषयकच नसून अधिक व्यापक अर्थी असावें असें विनायकाच्या चरित्रावरून अनुमान काढण्यास हरकत नाही.

५ जगावेगळ्या वेडेपणाची असली कबुली केशवसुत आणि टिळक ह्यांच्या काव्यांत पदोपदीं सांपडते. ह्यांत मृतप्राय समाजाच्या पोटभरू शहाण-पणाचा धिक्कार आहे.

शेवटच्या चार ओळींत काव्याची खरी प्रकृति विनायक जाणत होता ह्याची साक्ष आहे. पण, दुर्दैवाने त्याच्या बहुतेक कवितांत 'स्वानुभूत वासाचें दान' नाही. नंतरच्या काळांत त्याचा कित्ता पुढें ठेवणाऱ्यांनी एकंदरीने कण्हेरीच अधिक फुलवल्या.

## ९ स्त्री आणि पुरुष

**नवरंगजातीसारखी रचना**

श्री. माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणें हें एक 'उत्कृष्ट ध्वनिकाव्य' आहे. त्यांत जी नाजुक सूचकता आहे तिला विनायकाच्या इतर कवितांत क्वचितच अवसर मिळाला. 'सुवास'मधील तिसऱ्या कडव्यांत ही कविता बीजरूपाने आहे. हा स्त्रीविषयक हळुवारपणा आणि त्याच्या ऐतिहासिक काव्यांतील आदर्श नायिकांचा गौरव ह्यांतील भिन्नता ध्यानीं घ्यावी.

वासुदेव बळवंत पटवर्धन म्हणतात : " 'प्रीती निमाली तर,' 'सुवास,' 'स्त्री आणि पुरुष' हीं तीन विनायकाचीं आहेत अशी खातरजमा अनंततनय ( विनायकाच्या कवितांचे संग्राहक ) देतात म्हणून, नाही तर सी केशवसुतांच्या काव्यांत मिसळून जातीं."

## १० नदी आणि कवि

वृत्त उपजाति

कवि आणि कविता ह्यांविषयीं केशवसुत आणि टिळकांप्रमाणें विनायकानेहि लिहिलें; पण तें त्या उद्दामपणाने नाहीं. नदीच्या उपमेमुळें कविमाहात्म्यावर अढळ लक्ष्य राहत नाही. शेवटीं, महाकवींच्या मानाने ' मी बापडा ' थोडी गुणगुण करणारा असें नम्रपणें सांगितल्यामुळे कवींतील उच्चनीचभावच मनांत ठसतो.

# ४ गोविंदाग्रज

## १ अनामिकाचे अभंग

**पहिले तीन अभंग देवद्वार छंदांतील ; पुढील सात देवीवर छंदांतील.**

अडीच हजार अभंग लिहिण्याचा गोविंदाग्रजांचा संकल्प होता. पण इतकेच लिहून झाले. त्यांचा संतवाङ्मयाचा अभ्यास गाढ होता. कसल्याहि शैलीचें लीलया अनुकरण करूं शकणारी भाषासिद्धि आणि तिच्याबाबतचा उदंड आत्मविश्वास ह्यांतून हे अभंग स्फुरले, खऱ्या भावांतून नव्हे, असा आक्षेप घेतला जातो. पण गडकरी भाविक होते ह्याचा मुबलक पुरावा त्यांच्या चरित्रांत आहे. देवदर्शन, पूजाअर्चा, उपास आणि ' शिवलीलामृता 'चा पाठ नियमितपणें करणाऱ्या ह्या कवीने देवाचा असा धावा केला ह्यांत नवल कसलें ? म्हणून ही केवळ कसरत नव्हे. लिहिणें अतिरंजित अथवा गडद वाटेल; पण ती गडकऱ्यांची नेहमींचीच लकब आहे ! इतर 'कांही कवितांत अथवा नूपुराकरवीं गडकऱ्यांनी देवांची थट्टा केली असेल; पण असा कांहींसा दुरंगीपणा त्यांच्या मनाच्या घडणींत मूळचाच होता. त्यांची अवखळ आणि तीव्र विनोदबुद्धि भावनेला असा तिरकस पलटा देण्यांत वाकबगार होती. ह्या अभंगांतहि, विशेषतः ९ आणि १० ह्यांमध्यें, तिच्या करामतीचा थोडास वास येतोच.

## २ राजहंस माझा निजला

जाति उद्धव

एके काळीं, विशेषतः गडकऱ्यांच्या मृत्यूनंतरचीं कांही वर्षें, महाराष्ट्राला वेड लावणारें हें गाणें विभूतिपूजेचा भर ओसरल्यावर चिकित्सेचा विषय झालें व कदाचित् प्रतिक्रिया म्हणून, त्यांतील दोष डोळ्यांत अधिकच खुपूं लागले. श्री. हर्षे

ह्यांच्या 'गोविंदाग्रज' ह्या पुस्तकांत ह्या कवितेची तपशीलवार तपासणी आहे. तें दोषदर्शन अतिरेकी आणि शुष्क वाटलें, तरी कृत्रिमता, भडकपणा आणि शब्दबाजी ह्या आरोपांतून ह्या कवितेचा बचाव करणें कठिण आहे. तिच्या भूमिकेंत नाट्य आहे; पण संयमाच्या अभावीं कविता नाटकी झाली. करुणरसाला आवश्यक असलेली सूचकता सोडल्यामुळें रडवेपणा आला. इतकें असूनहि, ह्या कवितेंत कसलें तरी आकर्षण आहे. तिचा विषय सर्वस्पर्शी आहे; साधारण वाचक विनासायास तिच्याशीं समरस होतो. कित्येक ओळी, क्वचित् नवऱ्या कडव्यासारखें सबंध कडवें, सहज तोंडांत बसतात. क्षणभर कृत्रिमता दृष्टिआड व्हावी अशी भाषेची चमक पदोपदीं आढळते.

# ३ दसरा

पादाकुलक जाति

'तुतारी'ची ही प्रामाणिक नक्कल आहे. वृत्तप्रकार तोच; 'तुतारी'चे उल्लेख (कडवीं १३ आणि १४); आणि शेवटीं आपण केशवसुतांचा "चेला सच्चा" असल्याची बढाई. अर्थात् अस्सल आणि नक्कल ह्यांतील अंतरहि उघड आहे. केशवसुतांचा जळजळीत आवेश येथें नाहीं; आणि तो नसणारच, कारण गडकरी बंडखोर नव्हते. इतिहासाला कल्पनेचे स्वैर रंग चढवून त्यांत गुंगणारें भाविक मन बुद्धिवादांतून उपजलेला मूर्तिभंजक सुधारणावाद ग्रहण करणें अशक्य. त्यामुळें कित्येक ओळी आणि कडवीं मूळ कवितेचें वळण गिरवीत आहेत असें वाटलें तरी त्यांत ती सफाई आणि तो कणखरपणा नाहीं. सावध वाचकाला त्यांतील कच्चेपणा खटकतो. केशवसुतांप्रमाणें विषयाशीं तादात्म्य पावणें हें गडकऱ्यांच्या काव्यप्रकृतीच्या एकंदरीने विरुद्धच. कदाचित् विनोदबुद्धीमुळें असेल, पण कवींत कांहीसा अलिप्तपणा येऊन, आपण अनुकरण करीत आहों, सवाई करामत दाखवूं शकतों, ही जाणीव बुजत नाहीं. म्हणून 'तुतारीं'त दिसणारी शब्दाशब्दांतील रग 'दसऱ्यांत'त नाहीं; येथें कृत्रिमतेची शंका पाठ सोडीत नाहीं. एकविसाव्या कडव्यांतील खटाटोपी यमकें पाहिल्यावर क्षणभर अर्थावरील भान ढळतें. इतर कांही स्थळींहि शब्दच डोळ्यांत भरतात.

पण 'तुतारी'चा संदर्भ विसरल्यास 'दसऱ्या'चें वैभव अधिक उठून दिसेल. ह्यांतील रूपकांतून चमकणारी कल्पनाशक्ति आकर्षक आहे आणि गडकऱ्यांच्या

कोठल्याहि लिखाणांत आल्हाद देणारा भाषेचा रसरशीतपणा येथेंहि आहे. तिला कोठें कोठें बखरी-पोवाड्यांतील जुनेपणाचें पाणी दिल्यामुळे तिची कांति वाढली आहे.

२ ' चौमास ' ही गुजरातेंतील बाळपणाची खूण असावी.

९ उप्लाणी : ' खोगीरसाज न घातलेला घोडा ' (व्युत्पत्तिकोश)

१० नव्या सुधारणेच्या ' जरिपटका ' आणि ' भगवाझेंडा ' ह्या प्रतिमा गोविंदाग्रज ' जुन्यापुराण्या चिंध्या ' पूर्णपणें विसरूं शकत नव्हते हेंच दाखवीत नाहीत का ?

१२ अमीन : विश्वासपूर्ण.

१४ आगरकरांइतकें राजारामशास्त्री रामकृष्ण भागवत ( १८५१--१९०८ ) ह्यांचें सुधारणाकार्य प्रसिद्ध नाही. पण, विधवाविवाह, जातिभेद, आहारस्वातंत्र्य ह्यांबाबत, विक्षिप्तपणाचा आळ पत्करूनहि, त्यांनी निष्ठेनें प्रचारकार्य केलें. केशवचंद्र सेन ( १८३८–१८८४ ) हे बंगाली जीवनांत सुधारणेचा एक मोटा प्रवाह निर्माण करणाऱ्या ' ब्राह्मसमाजा 'चे पुढारी होते.

## ४ विरामचिन्हें

**वृत्त शार्दूलविक्रीडित**

व्याकरणांतील विरामचिन्हें जीवनलेखांत ठाकठीक बसविणारा हा कल्पनेचा खेळ निरर्थक नाही ; त्याला विचाराची बैठक आहे. रचनेच्या दृष्टीनेहि कविता अभ्यसनीय आहे, कारण श्लोकाश्लोकांतून विचाराचा चढ रेखीवपणें साधला आहे.

५ ' कीर्तिप्रभा सद्यश ' ही श्री. हर्षे ह्यांस वाटते तशी द्विरुक्ति आहे का ?

## ५ ती कोण ?

**वृत्त शार्दूलविक्रीडित. शेक्स्पिअरी पद्धतीचें सुनीत.**

ह्या कवितेंतील भावनेची तल्लीनता आणि शैलीची अकृत्रिमता पाहिल्यावर गोविंदाग्रजांचें ' रहस्य मनिंचें ' ओळखण्याची सहृदय वाचकांस हुरहूर लागते. रित्या हृदयाचा हा उदास नाद म्हणजे कवीच्या तुफान विनोदाची उलटी बाजू होय हें लक्ष्यांत आलें कीं पहिल्याबद्दलची करुणा आणि दुसऱ्याबद्दलचें कौतुक वाढतें. सुनीतरचनेच्या शिस्तीचाहि ह्या कवितेच्या परिणामकारकतेंत थोडासा भाग असणें अशक्य नाही.

## ६ प्रेम आणि मरण

जाति नृपममता; शेवटीं अनुष्टुभ्.

"क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणांचा ॥ मग पुढें ॥" म्हणून अलौकिक प्रेमासाठीं आत्मार्पण करणाऱ्या वृक्षाचें हें रूपक नाट्यपूर्ण आहे. ह्या कवितेंतील त्याची रंगत निर्दोष आहे. इतका संयम राखून, फांटे न फोडतां, काव्य-विषयाच्या गाभ्याभोंवतींच रुंजी घालणारी अशी कविता गोविंदाग्रजांच्या अनिर्बंध प्रतिभेला अपवादासारखीच. ह्या उत्कटतेमागें 'ती कोण ?' मधील प्रेमनिराशा आणि आदर्श प्रेमाचा ध्यास आहे. गोविंदाग्रजांची प्रेमाची कल्पना स्वप्नमय, काव्यात्मक आणि भावनाकुल आहे. नवयौवनाला धुंदी आणील असें तिचें रूप आहे. म्हणून असल्या कवितांचें आकर्षण चिरंजीवि राहणार.

भाषेचा साजहि विषयाला शोभेल असाच आहे; त्यानें कवितेचा एकजिनसीपणा विघडत नाही. गोविंदाग्रजांचें अनुप्रासाचें प्रेम वारंवार उफाळून येत असलें तरी तें विरस करीत नाही. कीं हा विषयच असा आहे कीं त्यांत योग्य प्रमाणांत आलेली, कृत्रिमताहि नैसर्गिक वाटावी ? कोठें "इष्काचा जहरी प्याला" अथवा "जीविंच्या जिवाची बाला" असे खास गडकरी घडणीचे प्रयोग भेटतात. पुढें त्यांच्या नकल्यांनी ती बदनाम केली तरी येथें ती हिणकस वाटत नाही. नवव्या कडव्यांतील "सांगती हिताच्या गोष्टी । देवांच्या तेतिस कोटी ॥" ह्यांत डोकावणारा विनोद बेरंग करण्याआधींच दाबून टाकला हें कवितेचें भाग्य !

२ विंदान : कारस्थान, लीला. आन : निराळें, विचित्र.

## ७ कवि आणि कैदी

जाति वधूवल्ली

ह्या कवितेवर गोविंदाग्रजांनी जी टीप दिली आहे तिच्यांतील वेदान्तापुरताच कवितेचा अर्थ आवरावयाचा नाही. साध्यासुध्या संसाराच्या पातळीवर रूढि-वंधनांतून सुटण्याची धडपड चालू असते ती ह्या कवितेच्या कक्षेंत येते. मात्र "पायीं गंजत बेडी पडली" ह्यावरून कवि विवाहबंधन तोडून पळण्याच्या विचारांत होता हा श्री. हर्षे ह्यांचा निष्कर्ष धाडसी वाटतो. त्यांनी ह्या कवितेविरुद्ध वृत्तदोष व ग्राम्यता हे आक्षेप घेतले आहेत. वृत्तदोष क्वचित् आढळतो. 'ब्याद भिकारी' सारख्या शब्दांनी कवितेचें सौंदर्य वाढत नसलें तरी पांचव्या व सहाव्या

कडव्यांतील वर्णनें अर्थात भरच घालतात. असल्या मुक्तिशोधक कविता केशवसुत व गोविंदाग्रज ह्यांमधील आणखी एक दुवा होय.

## ८ एक समस्या

जाति हरिभगिनी. शेवटीं अनुष्टुभ्.

ह्या कवितेंतील उपरोध अतिशय मार्मिक आहे. वृद्ध विधवा, अडाणी कुणवट आणि भंगी ह्यांना नाक मुरडणारा कोणी मनुष्य सुंदर तरुण विधवा पाहतांच सुधारणेचा आक्रोश करतो ! आगरकर आणि केशवसुत ह्यांच्या पिढींतील सुधारकांनी हालअपेष्टा व बदनामी सोसून जुन्यांशीं झुंज घेतली. त्यांच्या पुण्याईने पुढच्या पिढ्यांचा सुधारकी मार्ग सुकर झाला. पण इतर कोणत्याहि चळवळीप्रमाणें येथेहि पहिली कळकळ ओसरल्यावर दंभ माजला आणि सुधारकांत पोपाखीपणा व स्वार्थीपणा फैलावूं लागला. राजकारणांतहि, दुर्दैवाने, सुधारकांची सांगड निष्क्रिय आणि स्वास्थ्यप्रेमी मवाळांशीं पडली. गडकरी टिळकपक्षीय, म्हणून जहाल होते. पण टिळकपक्ष समाजकारणांत परंपरानिष्ठ, सुधारकांचा वैरी. केशवसुतांचा आणि टिळकांचा हा चेला दोन दगडांवर पाय ठेवून होता. 'दसऱ्यां'त अथवा 'प्रेमसंन्यासां'तील गोकुळांत कर्मठांचा उपहास केला; येथे सुधारकांचा. पण हा दुतोंडीपणा नव्हे किंवा केवळ वर दाखविलेली द्विधा निष्ठाहि नव्हे. हा विनोदबुद्धीचा खेळ आहे; ती पक्षांध होऊंच शकत नाही.

## ९ कृष्णाकांठीं कुंडल

जाति लवंगलता

'राजसंन्यास' नाटक अपुरें राहिल्याची हळहळ रसिकांना राहूनराहून वाटत असते. तशीच हळहळ 'कृष्णाकांठीं कुंडल' हें काव्य गोविंदाग्रज पुरें करूं शकले नाहीत ह्याचीहि वाटते. ह्या अपूर्णात इतकें सौंदर्य ओसंडत आहे कीं पूर्ण सौंदर्य किती भव्य झालें असतें ह्याच्या कल्पनेनेच आनंदाचा कांटा उभा राहतो. शिवाजीचा कोणी बारगीर, 'रायबागचा राया,' आणि कुंडलच्या 'मान्यांची मैना' ह्यांच्या अभागी प्रणयाची ही रानकथा गोविंदाग्रजांच्या भाषेच्या गोडव्याने फुलली आहे. जुन्या मराठींतील वेंचक शब्दांनी शृंगारलेली, नादाच्या नाजुक कुसरीने थरारणारी आणि मखमली शब्दचित्रांनी खचलेली ही शैली कथेभोंवतीं जें मादक आवरण निर्माण करिते त्यांतच तिचें अर्धेअधिक यश सामावलेलें आहे. ह्यांत इतिहासाचें

सत्य नांवागांवापुरतेंहि नसेल, पण कल्पनेचें सत्य भरघोंस आहे. " मनिंच्या मळ्यांत पिकलें हें शाळूचें शेत." वाचतांवाचतां जणूं तीनशें वर्षें जाणीवेंतून गळून पडतात आणि कृष्णाकांठीं एका हिरव्या-पिवळ्या राईंत कुंडल उभें राहतें; त्यांत कोणा राघू-मैनेची मराठमोळी प्रीत सळसळते ... असला कल्पना-रम्य इतिहास भूल घालणारा वगैरे विचक्षणा येथें अस्थानीं ठरेल.

" कुंडल कृष्णाकांठीं नाही; पण घटकाभर त्याला तेथें नेलें आहे. " — असें गोंविंदाग्रज म्हणतात. तसेंच " गांवठाणाच्या ह्या हालचालीने भूगोलाच्या भक्तांची थोडीशी दिशाभूल झाल्यास एक आण्याच्या भूगोलपत्रकाने त्यांचें समाधान होण्यासारखें आहे " — असा विनोदी निर्वाळाहि त्यांनी दिला आहे! पण टीकाकारांची कुरवूर संपलेली नाही. पण कुंडलच काय, ही कृष्णाहि कल्पनेच्या मुलुखांतील आहे; शाळकरी भूगोलांतील नाही. ही कांहीं क्षणांची स्वप्नसृष्टि आहे. तिचा नकाशा कोण काढणार?

हें काव्य अपुरें आहेच; पण तें सलगहि नाहीं. फक्त तुटक भाग आहेत. असाच एक तुकडा येथें दिला आहे. राया आणि मैना ह्यांची मनमिळवणी झाल्यावर " तिने बरोबर घेऊन चला असा हट्ट धरला तेव्हां तो म्हणतो व ती त्याला उत्तर देते... " ह्या चलाख आणि लाडिक सवाल-जबाबांत गोविंदाग्रजांच्या रसवंतीचें दर्शन आहे.

# ५ बालकवि

## १ अरुण

### जाति चन्द्रकान्त

ह्या कवितेंतून स्फूर्ति घेऊन गोविंदाग्रजांनी दोन ' अरुण ' लिहिले. एक कोमल आणि दुसरा भीषण! केशवकुमारांनीहि एक विनोदी ' अरुण ' लिहिला. बालकवींचा अरुण आणि गोविंदाग्रजांचा ( कोमल ) अरुण ह्यांची तुलना केली तर ह्या दोन कवींच्या सरणींतील भेद ध्यानांत येईल. गोविंदाग्रज उत्प्रेक्षांच्या बौद्धिक कसरतीने थक्क करितात. बालकवींनी उत्प्रेक्षांनीच कवितेला आरंभ केला असला तरी लवकरच त्यांचा नाद सोडून ते स्वतःच जणू अरुणोत्सवांत रंगतात आणि अल्लडपणें गिरि, वनमाला, कोकिळ, सरिता, इत्यादि निसर्गांतील सवंगड्यांना साद घालून स्वतःला विसरून जातात. त्यांच्या उत्प्रेक्षाहि अतिशय हळुवार आहेत; त्यांत कृत्रिमतेची खरखर नाही. जणूं वाचतांच विरघळणाऱ्या शब्दांत त्या गोवलेल्या आहेत.

बालकवींच्या अशा कवितांत सुंदरसुंदर शब्दचित्रांची दाटी झालेली असते; त्यांतून अर्थाची वाट मिळवयाला मोठा प्रयास पडतो. पण तसा ओळींतून वा कडव्यांतून अर्थ पुढें सरकण्याची अपेक्षाहि धरूं नये. तो आपल्या भोंवतींच बेभानपणें गिरक्या घेत असतो. ‘ स्वर्भूमीचें ऐक्य ’ सारख्या कल्पना, ‘ दिव्य ’, ‘ मधु ’ सारखे शब्द, कित्येक प्रतिमा ह्यांची पुनरावृत्ति बालकवीच्या कवितांत आढळेल; पण त्यांना तिची जाणीवहि नसेल इतक्या त्या गोष्टी त्यांच्या काव्यजीवनांत भिनलेल्या होत्या.

‘ निसर्गाचा कवि ’ ही बालकवींची पदवी सर्वच मानतात. ते निसर्गाशीं तन्मय होऊन जणू आंतून त्याची ओळख करून देतात; आपले भाव त्याच्या ठिकाणीं कल्पितात. कवि स्वतःसंबंधानें कोठें लिहीत आहे आणि निसर्गाचें वर्णन कोठें करीत आहे, ह्यांमधील रेषा हरवते इतका एकजीव संगम ह्या निसर्गवर्णनांत आहे. तेथें तपशील कमी पडेल; कदाचित् यथातथ्य नसेल. स्वभावोक्ति त्यांना साधावयाची नव्हती; किंबहुना कोणताच अलंकार त्यांच्या ध्यानींमनीं नसावा. ह्याच दृष्टीने, माधवराव पटवर्धनांनी दाखविलेल्या वर्णनप्रमादांचा (‘ अधोवदन झालेली पूर्वदिशा ’ ओळ ४३; दंवबिंदूचा पडदा तोंडावरून दूर करणारी भूदेवी ’ ओळी ४७–५१) विचार करावा. म्हणूनच, हा अरुण कोणत्या ऋतूंतला व कोणत्या स्थळीं पाहिलेला ह्याचा बोध होत नाही हा एका टीकाकाराचा आक्षेपहि व्यर्थ आहे. बालकवींनी अरुण पाहिला नव्हता; ते तो प्याले होते.

## २ निर्झरास

*जाति बालानन्द*

महाबळेश्वर येथें कवि टिळकांचे चिरंजीव देवदत्त व बालकवि दूर फिरावयास गेले होते. “ सूर्यास्त होत होता. भोंवतालीं किर्र झाडी होती; अशा वेळीं बालकवींना स्फूर्ति झाली व ‘ दरी दरी घुमवित येई ’ ही ‘ निर्झर ’ ह्या कवितेची ओळ साभिनय म्हणण्यास त्यांनी सुरुवात केली; मग तेथेंच बसून त्यांनीं ती कविता पुरी केली. ” ( समग्र कविता, पृष्ठ ३१ )

निर्झरमय होऊन लिहिलेल्या ह्या गाण्यांतील गोडवा चिकित्सेपार आहे. पहिल्याच परिच्छेदांत शब्दांच्या नादांतून जें चित्र रेखाटलें आहे त्याला मराठी कवितेंत तोड मिळणें कठिण जाईल. नादाइतकाच रंगवाचक शब्दहि ह्या चित्रांत जिवंतपणा भरतात.

पण हें केवळ गुळगुळीत वर्णन नाही. निर्झर हा 'काव्यदेवीचा प्राण'; अक्षय संगीताची ती मूर्ति. ज्या दिव्य सौंदर्याचा कवीला ध्यास लागला आहे त्याचें रहस्य ह्या निर्झराच्या जणू स्वाधीन आहे. जडतेच्या आवरणांत जखडलेल्या कवीला तें चैतन्य हवें आहे पण मिळत नाही; म्हणून ही निर्झराची विनवणी. त्याच्या प्रसादानें तसलेंच दिव्य संगीत कवींत उसळलें तर सौंदर्याचा आणि शांतीचा लाभ होईल ही आशा. केशवसुतांसारखीच पण कांहीशी मर्यादित व कमी तीव्र अशा अशांतीचा किंचित् स्पर्श येथे झाला आहे. पुढें सुदैवानें ती वाढीस लागून बालकवींचें जीवनच करपल्यासारखें झालें.

## २ फुलराणी

जाति पादाकुलक

ही बालकवींची सर्वांत लोकप्रिय कविता. रविकिरणानें फूल फुललें ह्या निसर्गांतील साध्या गोष्टींतून बालकवींच्या स्वप्नतरल प्रतिभेनें ही नाजुक प्रेमकथा निर्माण केली. तिच्यावर कसल्याच राठपणाची सावलीहि नाही. ह्या कवितेमागील मन आनंदी आणि नाचऱ्या मुलाचें आहे. आपल्याच कल्पनेच्या भातुकलींत तें रंगून गेलें आहे. त्यांत लाजणारी भोळी फुलराणी आहे; वात्रट संध्यावात आहे; नाचरा प्रभातवात आहे; आणि सोनेरी नवरदेव आहे. ह्या लगीनघाईंत कवीचा पिंगा चालू असतो.

इतक्या गोड कवितेंत वारंवार जड संस्कृत शब्दहि येतात; पण ते बोंचत नाहीत. प्रौढ शब्द लीलेनें वापरणाऱ्या लहान मुलाच्या बोलण्याप्रमाणें त्यांत एक निराळीच गोडी वाटते. माधवराव पटवर्धनांना येथेंहि कांही 'वर्णन-प्रमाद' आढळले. [ संध्येच्या आंदोली झोंके घेणारी रजनी ( ३ ), तानांवर ताना घेणारे कोकिळ आणि पखवाज वाजविणारे निर्झर ( ८ ); वगैरे ]. असल्या स्वप्नाळू कवितेंतील प्रतिमा वास्तव कशा असतील? त्यांचा विलक्षणपणा हाच त्यांचा मोठा गुण. स्वप्न आणि जागृति, बाल्य आणि तारुण्य, ह्यांच्या सीमेवर नाचणाऱ्या ह्या कवितेला घोटीव कायदे नकोत.

ह्या कवितेची रचना इतकी लयबद्ध झाली आहे कीं ओळीमागून ओळ 'फुलराणी'सारखीच डोलत असल्याचा भास होतो. छंद, शब्द आणि कल्पना ह्यांचा सुंदर मेळ दृष्ट लागण्यासारखा आहे.

## ४ तारकांचें गाणें

जाति बालानंद; पादाकुलकाचा खंडित सयमक अंतरा.

'फुलराणी 'च्याच बालवृत्तीने लिहिलेलें हें आणखी एक गाणें. क्षणभर तारका होऊन चमचमणारा कवि निर्मल आकाशांतून सृष्टीकडे पाहत आहे. तो आनंदाने भरलेला आहे. इतर वेळीं खुपणारीं सृष्टींतील शल्यें ह्या चांदण्यांत दृष्टिआड झालीं आहेत. खट्याळपणाहि करावा असें त्यास वाटतें. हीच आनंदी वृत्ति शेवटपर्यंत राहती तर?

## ५ संध्यातारका

जाति अंजनी

पहिल्या कडव्यांतील कल्पनेच्या आधारावर पुढील लाडिक अंगाई रचली आहे. तिचा हळुवारपणा आनंदाचीं आसवें आणणारा आहे. तो 'ग, बाई' असल्या शब्दांतून येत नाही, तर कवितेमागील अति कोमल भावनेंतून येतो. श्री. माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणें "रात्रीविषयीं ठोमऱ्यांची निरंतर मातृभावना होती." संसाराने शिणलेल्याला रात्र ही माउलीसारखी. येथें मात्र ती भावना नाही. निसर्गांतील सौंदर्याला सजीव करणारी त्यांची काव्यशक्तिच येथें पाहावयाची.

## ६ श्रावणमास

जाति हरिभगिनी

बालकवींचें निसर्गाचें निरीक्षण सूक्ष्म नसल्याची तक्रार हें 'श्रावण महिन्याचें गीत' वाचिल्यावर खरी वाटणार नाही. श्रावणांतील ऊन सांवल्यांची पाठशिवणी पहिल्या कांही ओळींत आपल्या डोळ्यांसमोरून जाते; इतकी येथे भाषा चित्रमय झाली आहे. 'क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरुनी ऊन पडे!' अथवा 'फडफड करुनी भिजले अपुले पंख पांखरें सांवरिती' ह्या ओळींतील नादचित्रें विसरणें कठिण.

२ शिरवें : थोडा वेळ पडलेला जोराचा पाऊस.

## ७ बाल-विहग

जाति चन्द्रकान्त

ज्या अशांतीचा 'निर्झरा' बाबत उल्लेख केला आहे ती बालकवींत पुढें वाढीला लागली व ही आणि ह्यापुढील कांही कविता तिने काळवंडून गेल्या आहेत. 'निर्झर',

'फुलराणी' अथवा 'तारका' ह्यांजबरोबर बालभावानें नाचणारा हा कवि आतां उदास दिसूं लागला. चौथ्या कडव्यांत काव्यजीवनांतील मनोरथ बालकवींनी व्यक्त केला आहे. पण तो सफळ होण्याच्या आड संसारांतील अनंत उपाधि येत आहेत. पूर्णाची आंच लागली आहे, पण अपूर्णाचीं बंधनें तुटत नाहीत. ज्या आदर्श सौंदर्याच्या अनुभूतींतून काव्य उचंबळलें ती दुरावत असल्याचें दुःख येथें आहे. पण ह्या समयीं, सुदैवानें, कोणा इवल्याशा पक्षाचा दुवा जडून पुनश्च त्या हरपल्या सौंदर्याचा चित्ताला स्पर्श झाला आणि हें कवन लिहिलें.

"काव्य-देवता अंतरली मज गरिबाला आज" ह्यांवरून केशवसुतांच्या "शब्दांनो, मागुते या" अथवा "क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास" ह्या कवितांची आठवण व्हावी.

## ८ पांखरांस

### जाति भूपतिवैभव

ह्या आर्त गीतांत वर उल्लेखिलेल्या दुःखाची छाया अधिकच दाट झाली आहे. केशवसुतांच्या 'घुबडा'वरून स्फूर्ति घेऊन ही कविता लिहिली हें माधवराव पटवर्धन ह्यांचें विधान पटत नाही इतकी जीवाची तगमग ह्या ओळीओळींत आहे. चिरदुःखी जीवाला मरणानेच शांति मिळेल ह्या येथें सुचविलेल्या विचाराचा बालकवींच्या अपघाती मरणाशीं संबंध सुचविणें अयोग्य होईल. हें विफलतेचें गाणें आहे. असंख्य कलावंतांना अशी विफलता चटका देऊन गेली आहे. तिचें निश्चित स्वरूप काय ह्याविषयीं मात्र कल्पनाच लढवावी लागेल.

निसर्गांत आपल्याच भावनांचें प्रतिबिंब पाहण्याचा हा संकेत पाश्चात्य किंवा इंग्रजी आहे; ह्यावरून बालकवींनी तो उसना घेतला होता असें समजण्याचें कारण नाही. उदास स्वर काढणाऱ्या पांखरांविषयीं आपुलकी वाटणें अथवा त्याच्या स्वरांत आपलीं दुःखें ऐकणें हें बालकवीसारख्या कवीबाबत साहजिकच आहे.

हें पांखरूं म्हणजे पारवा ह्या पटवर्धनांच्या अंदाजाला आधार काय? पण पारव्यावर बालकवींनी पुढें अशीच एक खिन्न कविता लिहिली हें खरें.

## ९ बाळें तीं खेळत होतीं

### जाति उद्धव

ही व बालकवींचीच 'कविबाळें' ह्या कवितांत फारच थोडा फरक आहे. 'कवि-बाळें'तील शेवटचें कडवें असें :

परि त्याच दीर्घ किंकाळ्या    ठरतात जगाचीं गाणीं
निःश्वास आंत जे रुढती    ती स्फूर्ति लोक हा मानी
संतप्त अश्रुमालेला    गणितांत कल्पनाश्रेणी !
गौरवितें विश्व कवींना,
जग सर्व दोलवी माना,
परि मुग्ध मधुर आत्म्यांना
त्यां काय वोंचतें चित्तीं    बाळें तीं खेळत होतीं !

"Our sweetest songs are those that tell of saddest thought" ह्या शेलीच्या प्रसिद्ध ओळींत हाच विचार आहे. दिव्य आनंदांत रंगून गेलेल्या कवींना परम सौंदर्याचा साक्षात्कार होतो आणि दुःखाची आठवणहि राहत नाही; "आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहिंकडे" असें महिरून आल्यासारखें होतें. पण कोठून तरी 'विषारी वारा' येतो आणि हा आनंद कोमेजून जातो; भेसुर दुःखांची ओळख होते. त्यांच्या करुण आक्रंदनांवर जग भाळतें. ह्या कवितेंतील शेवटल्या कडव्यांत मृत्यूने त्यांची सुटका केल्याचें आहे.

ह्या कांहीशा गूढ कवितेची बालकवींच्या काव्यजीवनाशीं संगति लागेल. पहिल्या आनंदाची जागा विष्णतेने घेतली. ती विषण्णता कोठून आली हीच शंका मनाला चुटपुट लावते.

"'ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति' ह्या भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायांतील श्लोकार्धावरून बालकवींना ही अभिनव कल्पना सुचली. त्या कल्पनेचा आविष्कार त्यांनी ह्या गीतांत केला आहे" असें श्री. माडखोलकर म्हणतात.

## १० धर्मवीर

जाति पादाकुलक

केशवसुतांची 'तुतारी', टिळकांचें 'रणशिंग', गोविंदाग्रजांचा 'दसरा' ह्यांच्या संप्रदायांतील ही कविता आहे. श्री. रा. श्री. जोग ह्यांना "तीमधील अवसान मूळचें नसून उसनें आहे", तसेंच आद्यऋषि, सत्यधर्म, धर्मवीर, तेजाची पूजा वगैरे न पेलणारे शब्द पेलण्याचा कवीचा प्रयत्न हास्यास्पद आहे असें वाटतें. ते म्हणतात, "'तुतारी' वाङ्मयांतील सर्वांत अयशस्वी कविता हीच असेल. तींत काव्य नाही, सुसंगत तत्त्वज्ञान नाही; रूढीविरुद्ध व रूढीच्या भक्तांविरुद्ध केलेलें तें एक कंटाळवाणें प्रवचन आहे." उलट माडखोलकरांना 'धर्मवीर' "हें कवन

विलक्षण ऊर्जस्वल, केशवसुतांच्या ‘ तुतारी ’हूनहि अधिक आवेशयुक्त ” आणि अशा कवितांत “ निरंतर अग्रेसर ” आहे असें वाटतें. इतके अंतिम अभिप्राय ह्या कवितेबद्दल प्रकट केले गेले आहेत. बालकवींच्या काव्यांत भावना व कल्पना ह्यांनाच स्थान, विचाराला नाही, हा जोगांचा मुद्दा कच्चा आहे; कारण भावना अथवा कल्पना आणि विचार ह्यांत असें वैर नसतें. ह्या सौंदर्यवादी कवीला जेव्हां जगांतील विरूपतेची जाणीव झाली तेव्हां त्याचा उद्वेग त्वेषानें बाहेर पडला. बालकवींच्या पत्रांतहि त्यांच्या विचारशीलतेची साक्ष आहे. कवि टिळकांच्या सान्निध्यांत बालकवींनी त्यांची धर्मपरता शोषून घेतली असणें अशक्य नाही; म्हणून ‘ आद्यऋषि ’ ‘ सत्यधर्म ’ वगैरे शब्द सोंगाडे समजूं नयेत. गोडगोड कविता लिहिणाऱ्याची असली कविता प्रथम कंटाळवाणी वाटली तरी ती कृत्रिम होत नाही ! सुधारणेच्या विचारांनी बालकवींना स्पर्श केला असणें शक्य आहे. मात्र माडखोलकरांनी ‘ धर्मवीर ”ची तारीफ केली तींत त्यांचा संयम सुटला आहे. ती न स्वीकारतांहि, ‘ धर्मवीर ’मधील कळकळ आणि काव्यगुण मान्य करावयास हरकत नाही.

## ११ प्रेम-लेख

शार्दूलविक्रीडित

सुनीतरचनेच्या नीटसपणामुळे ह्या कवितेंत संथपणा आणि भारदस्तपणा ह्यांचा प्रत्यय येतो; बालकवींच्या इतर कवितांतील शैलीचा गाचरेपणा येथे नाही. शेवटच्या द्विपदींतील कलाटणी परिणामकारक आहे. हें प्रेमगीत अनुभवाचें कीं कल्पनेंतील असले वाद व्यर्थ आहेत.

## १२ औदुंबर

जाति लवंगलता

ह्या चिमुकल्या कवितेंतील चित्र इतकें नाजुक आहे कीं क्षणभर शब्द रंगांत विरून गेल्याचा भास होतो. पहिल्या सात ओळींतील रंगकामानंतर शेवटच्या ओळींत जणूं एकाएकीं डोळ्यांपुढें उभें केलेलें स्थिर चित्र अंगावर रोमांच आणतें.

## १३ कांहीं अपूर्ण गीतें

### तूं तर चांफेकळी

जाति सूर्यकांत

अद्भुतरम्य विषयाला साजून दिसेल असें येथें भाषेचें सौंदर्य आहे. ‘ नादमाधुर्य ’ ह्या अतिपरिचयामुळे सवंग झालेल्या शब्दाचा पुरा अर्थ अशा कवितांत उमगतो.

पांच कवि

ही कविता अपूर्ण राहावी ह्याची रसिकाला नेहमीच टोंचणी लागेल. तो कल्पनेने ती पूर्ण करूं पाहील; पण कल्पनाहि पांगळी पडावी अशी कांही तरी जादू ह्या थोड्या ओळींत आहे.

## वीर मराठा कुमार

जाति पादाकुलक

'निःश्वास' ह्या नांवाचें दीर्घ ऐतिहासिक काव्य बालकवींना लिहावयाचें होतें; त्यांतील कांही लहानलहान भाग मागें उरले आहेत. त्यांपैकीं एका भागांतील कांही ओळी येथें दिल्या आहेत. नाजुक सौंदर्याइतकेंच उग्र सौंदर्यहि बालकवि रंगवूं शकत हें समजण्यास त्यांची मदत होईल. बालकवींतील काव्य आटून गेलें होतें म्हणून त्यांचा मृत्यु हा त्यांच्या काव्यजीवनाच्या दृष्टीने अकालीं नव्हता, ह्या कांही टीकाकारांच्या म्हणण्याला अशा कवितांनी बाध येतो. कोण जाणे, कदाचित् बालकवींची प्रतिभा निराळ्याच दिशेने वहरली असती.

## मेघांचा कापूस

जाति चन्द्रकान्त

'औदुंबरा'सारखेंच हें एक सुंदर चित्र आहे. त्यांतील रंगाची किमया आणि भाषेची तलम कुसर ह्यांची रसिकाला नशा चढते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १४०६८.
अनुक्रम ...४३५.७० वि: काव्य
... १२०२८ ... नों: दि: २०।२।६७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२०२८
REFBK 0012728
REFBK-0012728